THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192582
UNIVERSAL LIBRARY

391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Cal.

Accession No.

Autho

Title

This book sl

returned on or before the date last marked below.

कादंबरीमय पेशवाई

२

# पेशवाईची प्राणप्रतिष्ठा

# कादंबरीमय पेशवाई

२

## पेशवाईची प्राणप्रतिष्ठा

लेखक

**विठ्ठल वामन हडप**

Post Graduate Library
College of Arts & Commerce, O.

१९४०

परचुरे पुराणिक आणि मं.
मुंबई नं. ४

किंमत दोन रुपये.

किंमत

प्रकाशक
बळवंत विष्णु परचुरे,
परचुरे पुराणिक आणि मंडळी,
बुकसेलर्स व पब्लिशर्स, माधवबाग, मुंबई नं. ४

'कादंबरीमय पेशवाई'चें पुनर्मुद्रण, भाषांतर,
रूपांतर वगैरेसंबंधी सर्व प्रकारचे मालकीहक्क
सौ. वैजयंती हडप यांच्या स्वाधीन आहेत.

द्वितियावृत्ति
१९४०

मुद्रक
विठ्ठल वामन हडप
'आदर्श' मुद्रणालय,
; रामाचा गोट, सातारा शहर

# 'मी'चें आत्मनिवेदन

## ( प्रथमावृत्तींतील प्रस्तावनेमधील महत्त्वाचा भाग )

लेखक या नात्यानें मी इ० सन १९१४–१५ पासून स्वयंस्फूर्तीनें वाग्देवी सरस्वतीची सेवा करूं लागलों, व त्या सेवेचें काहींसें मूर्त स्वरूप अशी माझी 'झांकली मूठ' ही मिश्रविवाहविषयक स्वतंत्र सामाजिक कादंबरी इ० सन १९१७च्या प्रारंभीं प्रसिद्ध झाली. प्रो० वामन मल्हार जोशी, एम्. ए ह्या वंदनीय वाग्भटांनीं 'शाळेंत जाणाऱ्या ह्या सोळा-सत्रा वर्षांच्या मुलानें काय कादंबरी लिहिली असेल?' अशी माझी हेटाळणी न करतां 'ह्याला उत्तेजन दिलें पाहिजे' ही सद्भावना धरून माझ्या विनंतीला मान देऊन त्या कादंबरीला प्रस्तावना लिहून माझें कौतुक केलें व महाराष्ट्र-जनतेलाही--माझ्या कादंबरींतील गुणांकडे पाहूनच केवळ नसेल; माझ्या पोरवयाकडेही पाहून असेल–माझी ती पहिली कृति कौतुकास्पद वाटली. तेव्हांपासून आज नऊ-दहा वर्षें मी महाराष्ट्र-सारस्वताची यथामति सेवा करीत आलों आहें.. ती सेवा महाराष्ट्र-जनतेच्या चरणीं रुजू आहेच. ह्या काळांत जनतेकडून अनेक-वार आशीर्वाद–ओंव्या गाऊन घेण्याचे तसेच शिव्याशाप घेण्याचेही अनेक प्रसंग परिस्थितीच्या औचित्यानुरूप मीं आजवर अनुभवले आहेत. त्या भल्या बुऱ्या प्रसंगाकडे मी सतत जागरूक दृष्टीनें पाहत आहें. इ० सन १९२०-२१ मध्यें असहकारितेच्या जगड्व्याळ प्रवाहांत सांपडून मीं 'लोकशाही' पत्र चालविलें व त्या निमित्तानें मला इ० सन १९२१ २२ मध्यें राजद्रोहाच्या आरोपाबद्दल एक वर्ष सक्त-मजुरीचा तुरुंगवास भोगावा लागला; तेव्हां बहुजनसमाजानें कौतुकानें व प्रेमानें मला गौरवून जें आजन्म ऋणी करून ठेवलें आहे, तें ऋण मी विसरलों नाहीं व आजन्म विसरावयाचाही नाहीं. तसेंच त्यानंतर सद्भावानें वाङ्मयसेवेचें समुद्रमंथन करता करता लौकिकदृष्ट्या त्या मंथनांतून हालाहलात्मक वाङ्मयाची निपज झाली व जनक्षोभाच्या

स्वरूपांत त्या हालाहलाचा दुर्दमनीय दाह जो मला सहन करावा लागला, त्याचाही मला आमरण विसर पडावयाचा नाहीं. बहुजनसमाजाचा ग्रह,–मग तो अनुकूल असो कीं प्रतिकूल असो,–आदर्शवत् सतत स्वतःच्या नजरेसमोर ठेवून अत्यंत लीनतापूर्वक निर्ममत्वबुद्धीनें त्यात स्वतःचें प्रतिबिंब पाहावयाचें; व बहुजनसमाजाच्या खुषामतीसाठीं नव्हे, तर महाराष्ट्र सारस्वताचा विनम्र सेवेकरी या नात्यानें त्या सेवेची यथोचित सांगता करण्यासाठीं 'सत्यं शिवं सुंदरं' असें अभियुक्त सौंदर्य वाणी-करणी-लेखनि अशा त्रिविध स्वरूपात स्वतःच्या ठायीं बाणावें ह्या एकमात्र अंतिम इच्छेनें वाङ्मयसेवेचें जें ध्येय एकदां निश्चित केलें गेलें, त्या ध्येयसाधनाप्रीत्यर्थ सत्पथावलंबन करून त्या सेवेला सर्वविध अभियुक्त सौंदर्य प्राप्त करण्यासाठीं काया वाचा मनें-करून झटावयाचें, हें माझें ब्रीद आहे. आता, माझ्या वाङ्मय-सेवारूपी समुद्रमंथनांतून बहुजनसमाज म्हणतो त्याप्रमाणें कांहीं रत्नें निर्माण होतात व कांहीं हालाहलाचे कुंभही निर्माण होतात हें गृहीत धरलें, तरी त्यात पुराणकाळीं देव-दानवांनीं केलेल्या समुद्रमंथनाहून विसदृश असें काय आहे?

मनुष्य आणि परिस्थिति यांच्या युद्धात परिस्थितिरूपी प्रतिस्पर्धी सामुदायिक दृष्ट्या निसर्गतःच बलवान् असतो त्या प्रतिस्पर्ध्याशीं झगडणारा मनुष्य दुबळा असला तर नुसत्या रणशिंगाच्या कंपनानेंच कापरें भरून हतवीर्य होऊन जातो, किंवा प्रतिस्पर्ध्याच्या एखाद्या फटकाऱ्यासरसा गतप्राण होतो, हें तर खरेंच. पण मनुष्य तुल्यबल असला तरीदेखील ह्या युद्धात परिणामीं विजयी होण्यास्तव त्याला कधीं वार खावे लागतात, कधीं हार खावी लागते, कधीं माघार घ्यावी लागते, तर कधीं चढाई करावी लागते. परिस्थितीचा अथांग वेगवान प्रवाह सदैव वेगानें वाहत आहे; ह्या प्रवाहांतून पैलतीराला जाण्या-साठीं एखादा धाडसी मनुष्य प्रवाहांत उतरला व घटकाभर मध्येंच एखाद्या भोंवऱ्यात सापडून स्वतःच्या इच्छेविरुद्ध प्रवाहाबरोबर वाहत जातोसा दिसला, तर तो त्यातूनही मार्ग काढून पैलतीराला जातो

किंवा नाहीं हें पाहण्यापूर्वींच तो प्रवाहपतित झाला असा कोणी आपला ग्रह करून घेणें असमंजसपणाचें ठरलें नाहीं तरी उतावळे-पणाचें तरी खास ठरेल. पण असा उतावळेपणा सुविद्य व विचारवंत जनसमाजानें तरी करतां कामा नये.

उपलब्ध ऐतिहासिक साधनांत एककल्लीपणा, अंधश्रद्धा, पक्ष-पात व दुराभिमान यांमुळें जी अपूर्व परस्परविसंगति दिसून येते, तींतून खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक सत्याचा राजमार्ग शोधून काढावयाचा तर सत्यप्रिय चिकित्सकाला सूक्ष्मविवेकी तारतम्यबुद्धीचा उपयोग केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. प्रस्तुत 'कादंबरीमय पेशवाई'ची रचना करतांना मींही ह्याच मार्गाचें अवलंबन करण्याचा उपक्रम केला आहे.

ताराबाई व शाहूमहाराज यांमधील दुफळींत मराठशाही सर्वस्वीं हतबल होऊन मरणाच्या पंथाला लागली असतां पेशवाईचे आद्य-पुरुष बाळाजी विश्वनाथ यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा भगिरथ-प्रयत्नांनींच मराठशाहीला हात देऊन कसें वांचविलें, व त्यांच्याच प्रयत्नांनीं शाहूमहाराज छत्रपति कसे झाले, याचें सविस्तर निरूपण प्रस्तुतच्या 'पेशवाईची प्राणप्रतिष्ठा' ह्या कादंबरींत करण्यासाठीं शाहूमहाराजांच्या सुटकेपासून राज्याभिषेकापर्यंतचा काळच प्रस्तुत कथासूत्रांत गुंफून घेतला आहे.

**विठ्ठल वामन हडप**

# कादंबरीमय पेशवाई

## आजवरच्या कादंबऱ्या

लेखक-वि. वा. हडप

पेशवाईचें पुण्याहवाचन
पेशवाईची प्राणप्रतिष्ठा
पेशवाईचें ध्रुवदर्शन
पेशवाईचा ध्रुव ढळला ?
पेशवाईचा पुनर्जन्म
पेशवाईचें पुनर्वैभव
पेशवाईचा दरारा
पेशवाईतील दुर्जन
पेशवाईतील पश्चिमदिग्विजय
पेशवाईतील धर्मसंग्राम
पेशवाईतील उत्तरदिग्विजय
पेशवाईवरील गण्डान्तर
पेशवाईचें मन्वंतर
पेशवाईचा पुनर्विकास
पेशवाईचा मध्यान्ह
पेशवाईचें दिव्य तेज

मुख्य विक्रेते :

**परचुरे पुराणिक आणि मंडळी**

बुकसेलर्स व पब्लिशर्स, मुंबई नं. ४

# पेशवाईची प्राणप्रतिष्ठा

## सिंहावलोकन

"पिराजी!" बाळाजीपंतांनीं हाक मारली.

"सरकार!" पिराजी पुढें येऊन मुजरा करून अदबीनें उभा राहिला.

"ही चिठ्ठी घे व धावडशीला स्वामींपाशीं जाऊन त्यांना पावती कर. ते ती वाचून उत्तर देईतों तिथें थांब. आणि हें पाहा; स्वामी जर धावडशीला नसले तर वनवासवाडीला असतील. त्यांच्या ठावठिकाणाची नीट चौकशी करून ते जिथें असतील तिथें जावयाचें व एवढें काम करावयाचें. वाटेंत कोणी परका माणूस भेटला तर त्याला आपण कुठें व कशासाठीं जातों याचा मुळींच सुगावा लागूं द्यावयाचा नाहीं. पाहूं आतां कशी कामगिरी फत्ते करतोस ती! ही तुझ्या परीक्षेची वेळ आहे." असें म्हणून बाळाजीपंतांनीं एक चिठ्ठी लिफाफ्यांत बंद करून पिराजीच्या स्वाधीन केली व विचारलें, "घोडा पाहिजे का? पाहिजे असला तर पागेतला घेऊन जा."

"सरकार! मला घोडाबिडा कांहीं नको. आपल्या कृपेनें या माझ्या दोन पायांत एवढें बळ आहे कीं, मी माझ्या धन्याच्या कामगिरीसाठीं पायींपायीं त्रिखंड पृथ्वी पालथी घालीन. आपण त्याविषयीं मुळींच चिंता करूं नये." पिराजी म्हणाला.

"जा तर!" बाळाजीपंतांनीं पिराजीला निरोप दिला.

"सरकार! मी येतों." असें म्हणून पिराजी बाळाजीपंतांना मुजरा करून तेथून निघून गेला.

जंजिराधिपति सिद्दीच्या अमानुष जुलमाला विटून बाळाजीपंत भार्गवस्वामींच्या आशीर्वादानें स्नेहांकित त्रिवर्ग भानूंना बरोबर घेऊन आपली मायभूमि सोडून देशावर आले तेव्हांपासून ते प्रगतीची एकेक पायरी चढत होते. पण स्वामींच्या आशीर्वादानुसार भाग्योदयाचीं खरीं मंगल चिन्हें त्यांना आजवर दिसत नव्हतीं; तीं आतां शाहू-महाराजांच्या सुटकेची सुवार्ता कानीं येतांच दिसूं लागलीं. त्याबाबतच त्यांनीं पिराजीच्या हातीं स्वामींना चिठ्ठी पाठविली होती.

पिराजी चिठी घेऊन गेला व बाळाजीपंत दरवाजांतच क्षणभर उभे राहिले. तेव्हां आपण कोण, कोठून, कसे व कशासाठीं एथवर आलों वगैरे भूतकालीन गोष्टींचीं नानाविध स्मृतिचित्रें त्यांच्या स्मरण-चक्षूंसमोर तरळूं लागलीं. अंजनवेलचा किल्लेदार कासीमखान अंजन-वेलच्या सूर्याजी मोहित्याच्या गौरी नांवाच्या खुबसूरत व नवपरिणीता मुलीला पकडून सिद्दीच्या जनानखान्यांत कोंबण्याचा डाव रचतो काय; लटक्या मानवैभवाच्या मोहाला बळी पडून सूर्याजीचा कुलांगार जावई किल्लेदाराच्या ह्या हलकटपणाच्या बेतांत सामील होतो काय; ते दोघे गौरीला पळवितांना नेमके श्रीवर्धनकर देशमुख बाळाजीपंत व जानोजी-पंत भट तेथें जातात काय; बाळाजीपंत स्वाभिमानाला व स्वधर्मा-भिमानाला जागून गौरीला त्या राक्षसाच्या हातून सोडवितात काय; त्या झगड्यांत किल्लेदार व रणधीरराव नाना प्रकारचीं कुटिल कार-स्थानें रचून गौरीचा पति, पिता व बंधु यांना ठार करण्यासाठीं बुडवितात काय; गौरीसारख्या स्वधर्मी साध्वीची अब्रू राखण्याचें सत्-कार्य केल्याबद्दल बाळाजीपंतावर सिद्दी कोपतो काय; तो जानोजीपंतां-ना गोणत्यांत बांधून ठार करून बाळाजीपंतासह त्यांच्या घराण्या-वरून नांगर फिरविण्याचे अत्यंत नीचपणाचे डाव रचतो काय; आणि इतके अनर्थपात होऊनही अखेर सत्याचा वाली परमेश्वर असल्यानें ह्या कुटिल कारस्थानांत सिद्दी व त्याचे अंकित साथीदार यांचे सर्व बाजूंनीं दांत पडून बाळाजीपंतांना रातोरात आपल्या व आपल्या बंधूं-च्या बायकांमुलांसह व इष्टमित्रांसह देशत्याग करावा लागतो काय!

एवढा अनर्थपात कां झाला हें भवितव्य तेव्हां बाळाजीपंतांना कळेना. पण त्या काळीं अंजनवेलीजवळील भार्गवगुहेंत गुप्त रीतीनें वास्तव्य करणारे व पुढें धावडशीला वास्तव्य करूं लागल्यावर ब्रह्मेंद्रस्वामी या नांवानें त्रिभुवनविख्यात होऊन पेशवाईच्या अव्वल आमदानींत महाराष्ट्राच्या हितासाठीं अहर्निश कायावाचामनानें झटणारे भार्गवस्वामी प्रथमपासूनच अंतर्ज्ञानानें भविष्यकाळांतील घटनासूत्रें ओळखून ह्या कारस्थानाच्या मुळाशीं एकजीवीपणानें वावरत होते. त्यांनीं बाळाजीपंतांना "आज तुझ्या देशत्यागानें देवाच्या दरबारीं तुझ्या नांवानें भावी 'पेशवाईचें पुण्याहवाचन' ठेवलें गेलें आहे" असें त्यांच्या भावी भाग्योदयाचें रहस्य उलगडून सांगितलें. तेव्हांपासून आजपर्यंतचे दिवस असे गेले; आतां पुढें काय? याचा निर्णय गुरुमुखानें ऐकण्यासाठींच त्यांनीं आज पिराजीच्या हातीं स्वामींना चिठ्ठी पाठविली व पिराजी उत्तर घेऊन केव्हां येतो याची वाट पाहत ते आंत गेले.

आज दोन दिवस बाळाजीपंतांच्या मनांत ह्या एका गोष्टीशिवाय दुसरा विचार नव्हता. ते 'लाथ मारीन तिथें पाणी काढीन' अशा वृत्तीचे धमकदार व शील-सामर्थ्यवान् पराक्रमी पुरुष होते. त्या त्यांच्या कर्तबगारपणाला साजेसा आत्मविश्वास त्यांच्या मनींमानसीं ठसलेला होताच. पण मानवी कर्तबगारीच्या अतीत व अदृष्टिगोचर असा ईश्वरी नेमानेम काय आहे नकळे, ही चिंता कोणाही श्रद्धाळु व आस्तिक कर्तबगाराच्या मनांत आत्मविश्वासाच्या गळ्यांत गळा घालून वावरत असावयाचीच. यालाही बाळाजीपंत अपवाद नव्हते. कोणत्याही कारणामुळें कां होईना, आज दोन दिवस त्यांचा उजवा डोळा कोठें लवला किंवा उजवा बाहु स्फुरण पावला कीं त्यांना वाटावें, हा शुभ शकुन झाला. आणि आपल्या कुलदैवताची–श्रीगजाननाची पूजा करतांना गजाननाला वाहिलेलें तांबडें जास्वंद नीट न बसल्यामुळें सहज डाव्या बाजूनें गळून पडलें कीं ते फिकिरींत पडावे, "असें कां बरें झालें? देवानें डावा कौल कां बरें दिला? माझें कांहीं चुकलें कीं काय?"

## प्रकरण १ लें

# मुक्तेच्या झोंपडींत

बाहेरच्या बाजूला घरामागील डोंगराच्या दरडीवरून कोणी तरी हांक मारल्याची चाहूल लागल्यामुळें मुक्ता आपल्या लाडक्या कपिला हरणीला लाडिकपणानें आंजारीत–गोंजारीत होती ती मध्येंच थबकून बाहेर कान देऊन ऐकूं लागली. झोंपडीबाहेरील डोंगरदरडीवरून कोणींशी हळूच 'मुक्ते' अशी हांक मारली; ती प्रथम कपिलेनें ऐकली व तोंड गोरेंमोरें केलें. त्यावरून मुक्तेचें लक्ष बाहेर गेलें. तेवढ्यांत बाहेरून कोणींशी पुन्हा 'मुक्ते' अशी हांक मारली; ती मात्र मुक्तेनें ऐकली. पण हांक कोणीं मारली याविषयीं मात्र तिला कांहींच तर्क करतां येईना.

हांक ऐकतांच मुक्तेला प्रथम भुतांखेतांचा संशय आला. कारण तेव्हां सातारा ही जरी मराठशाहीची राजधानी होती, तरी मुक्तेची झोंपडी ज्या जागीं होती, ती जागा नगरांतील मुख्य वस्तीपासून बरीच दूर असल्यानें तिला माणसांचा शेजार म्हणण्यासारखा नसून जंगलवाडीचा व जंगलांतील जीवजिवाणूंचाच काय तो खरा शेजार होता. तेव्हांचें सातारा नगर व आजचें सातारा नगर यांत महदंतर होतें. तेव्हां मुक्तेची झोंपडी ज्या जागीं होती, त्या जागेचें महत्त्व आजच्या परिस्थितीला पटवून द्यावयाचें तर आज साताऱ्यांत जी तक्ताची विहीर व त्या विहिरीजवळ एक जुनें जोतें पाहावयाला सांपडतें तीच ती जागा! हें जोतें व ही विहीर हें सारें नंतरचें. त्या जागीं शाहूमहाराजांच्या हातीं मराठशाहीच्या तक्ताचा अधिकार जाईतों ती जंगलानें घेरलेली अशी खांचखळग्यांची पडजमीन होती. ताराबाईच्या कारकीर्दीत राजवाडा थेट किल्ल्यावरच होता व ही वर

निर्देशिलेली जागा किल्ल्याच्या पायथ्याशीं पडजमीन म्हणून पडलेली होती. पुढें शाहूमहाराजांच्या हातीं राज्यसूत्रें आलीं व राजधानीची वस्ती वाढूं लागली, म्हणून शाहूमहाराजांनीं किल्ल्याच्या पायथ्याशीं शाहूनगर वसविलें. तोंवर मुक्तेची झोंपडी कालाच्या अजस्र उदरांत गडप् होऊन गेली होती. त्याच जागीं महाराजांनीं पुढें आपला दरबारचा वाडा व तक्ताची विहीर बांधली.

मुक्तेला हांक ऐकून भुताचा संशय येतांच तिनें एकदम 'राम राम' म्हणायला सुरवात केली. तिचे आजोबा व्यासराव यांनीं तिला एकवार पढवून ठेविलें होतें कीं, 'राम राम' म्हणतांच भुतेंखेतें दूर पळून जातात. तसेंच आजोबांच्याच शिकवणीवरून तिला तरी माहीत कीं, भुतेंखेतें तिन्ही सांजांच्या कातरवेळीं व मध्यरात्रीच्या सुमाराला सृष्टीवर वावरत असतात व उजाडण्यापूर्वीं तीं अदृश्य होतात; तसेंच त्यांना एका वेळीं फक्त तीन हांका मारतां येतात. यासाठीं अशा वेळीं कोणींही हांक मारली व हांक मारणारें माणूस दिसलें नाहीं तर तीन हांकांपर्यंत 'ओ' देऊं नये. ह्या आजोबांच्या उपदेशाप्रमाणें मुक्तेनें 'मुक्ता' 'मुक्ता' 'मुक्ता' अशा तीन हांका ऐकूं येईतों ओ दिली नाहीं. तोंडावाटे नुसता 'राम राम' असा घोष मात्र चालविला होता. पण तशीच हांक चौथ्याही वेळीं ऐकूं आली तेव्हां तिला ती माणसाची असावी हें ओळखतां आलें, इतकेंच काय; पण ती कोणाची असावी याची देखील अंधुक ओळख पटली.

"काय ग कपिले! बाहेर कोण ग हांक मारतें आहे?" मुक्तेनें कपिलेच्या आंगावरून हात फिरवून व आपल्या दोन्ही हातांनीं तिचें मुख कुरवाळून तिचा एक मुका घेत विचारलें. ह्या प्रश्नाला उत्तरादाखलच कीं काय, कपिलेनें आपली लाडकी नजर एकवार गरगर फिरवून मुक्तेकडे पाहिलें.

ही हांक पिराजीचीच असावी हें मुक्तेनें हेरलें होतें. त्यामुळें दरवाजा उघडून बाहेर जाण्याला तिला भय वाटलें नाहीं. तिच्या मागोमाग

कपिलाही धांवत आली. जिथें मुक्ता जाईल तिथें कपिला आपली ठेवल्यासारखी असावयाचीच!

"कोण पिराजी?" मुक्तेनें हांक मारली.

"हळू बोल." दरडीवरील पिंपळाच्या झाडाखालीं उभा असलेला पिराजी म्हणाला, "आज तूं घरांत एकटीच आहेस का?"

"होय."

"दाजी कुठें गेले?"

"आज संकष्टी; दाजी माचीच्या ढोल्या गणपतीला एकादशणी करण्यासाठीं गेले आहेत."

"ही एकादशणी कशासाठीं? मुक्तेला मनाजोगा मनसबदार नवरा मिळावा म्हणून कीं काय?" पिराजीनें हंसत विचारलें.

मुक्ता मनांतून पिराजीच्या प्रश्नानें कितीही खुलली असली तरी बाह्यात्कारीं तिनें रागाचा आविर्भाव आणून उद्गार काढले, "पिराजी, किती चावट आहेस रे तूं! मीं तुला अनेकदां सांगितलें आहे, कीं असला चावटपणा मला नाहीं खपायचा."

"यांत चावटपणा ग कसला झाला? माचीचा गणपती नवसाला पावतो असा त्याचा लौकिक आहे म्हणून मीं म्हटलें."

"अरे, तें खरें! पण बोलतांना तुझ्या जिभेला हाड आहे कीं नाहीं?"

"हाड कुणाच्याच जिभेला नसतें!"

मुक्तेला बोलण्यांत खाशी पकडली असें वाटून पिराजीला इतका आनंद झाला कीं, त्या आनंदाच्या भरांत त्याचे धावडशीहून एथवर वाटेआडवाटेनें चालत येण्याचे सर्व श्रम निवारण झाले. पिराजी कसलेंही अवघड काम करून कितीही थकलेला असो; मुक्तेचा मुखवटा त्याला एकवार दिसला रे दिसला, कीं त्याचा सारा शीण उतरावयाचाच! मुक्तेच्या वाणींत व नजरेंत अशी काय विलक्षण जादू भरलेली होती न कळे; सूर्याच्या कोमल प्रभातकालीन किरणांनीं रात्रभर हिरमुसलीं झालेलीं कमळें जशीं उमलूं लागावीं तसें मुक्तेला पाहतांच

वाटेच्या वाटसरूचें मनदेखील आनंदानें उमलूं लागे. तशांत पिराजी तर तिचा बाळपणापासूनचा खेळगडी व जिव्हाळ्याचा सोबती! मुक्ता आढळली रे आढळली, कीं तिला कुठें ठेवूं व कुठें न ठेवूं असें त्याला होऊन जाई. त्या भरांत तो देहभानदेखील विसरे! मग हातांतील काम विसरे, यांत नवल तें काय?

आजदेखील पिराजीची तशीच अवस्था झाली होती. बाळाजीपंताची एक महत्त्वाची चिठ्ठी घेऊन आज तो ब्रह्मेंद्रस्वामींना भेटण्यासाठीं प्रथम धावडशीला गेला. पण स्वामींचें वास्तव्य या पूर्वीच एक दिवस वनवासवाडीला झालें असल्यानें पिराजीला धावडशीहून तंगड्या तोडीत वनवासवाडीला यावें लागलें. तेथें स्वामींना चिठ्ठी देऊन त्यांचें उलट उत्तर घेऊन तो तसाच मागच्या पायीं माघारा निघाला, तों वाटेंतच काळोख पडला. पण पिराजीला बाळाजीपंतांनीं पुन्हा पुन्हा बजावून सांगितलें होतें कीं, ही चिठ्ठी जिवापलीकडे जतन करून स्वामींना पावती करावयाची व स्वामींकडून तावडतोब उत्तर घेऊन यावयाचें. मग स्वामिनिष्ठ पिराजीला स्वामिकार्यासमोर स्वतःच्या प्राणांची काय पर्वा! त्यानें डोंगर म्हटला नाहीं, जंगल म्हटलें नाहीं, रात्र म्हटली नाहीं, काळोख म्हटला नाहीं, तो जो परमेश्वराचें नांव घेऊन पायाखालील वाट तुडवीत निघाला, तो घटका रात्रीला एकदांचा साताऱ्यांत तर येऊन पोंचला. पण वाटेंतच त्याला मुक्तेची एकवार भेट घ्यावीसें वाटलें. आज बरेच दिवस—चांगले सातआठ दिवस—राजधानींत शाहूमहाराजांच्या सुटकेची वार्ता ऐकून खळबळ उडून गेली होती. त्या राजकारणाबाबत बाळाजीपंतांचीं पत्रें नेणें व पत्रें आणणें यांत पिराजीचा जीव मेटाकुटीला आला होता. त्यामुळें मुक्तेची भेट घेण्याला त्याला सवडच होईना. अशी कामाची गर्दी असली म्हणजे रोज अथवा एका दिवसाआड जरी मुक्तेला भेटतां आलें नाहीं तरी एखादी महत्त्वाची गोष्ट त्याच्या हातून घडली अथवा त्यानें ऐकली तर ती सांगण्यासाठीं तो असेल तेथून मुक्तेपाशीं धांवत यावयाचाच!

हा पिराजीचा स्वभाव मुक्तेला चांगला माहीत असल्यानें आज अपरात्रीं पिराजी अकस्मात् आलेला पाहतांच तिनें तर्कानें ओळखलें कीं, आज स्वारी कांहींतरी महत्त्वाची बातमी सांगण्यासाठींच आली असली पाहिजे. मुक्तेचा हा तर्क कांहीं खोटा नव्हता. पण बोलण्याच्या भरांत ती तें विचारण्याला विसरली होती. आतां आपणाला पिराजीनें शब्दांत पकडलें तेव्हां विषय बदलावा हें बरें, असा विचार करून मुक्तेनें पिराजीला विचारलें, "पण कारे पिराजी, इतक्या रात्रीं कुठून आलास? आणि आजवर कुठें होतास रे?"

पिराजी गेल्या आठ दिवसांतील कामाच्या धांदलीचा पाढा वाचीत वाचीत मुक्तेच्या झोंपडीच्या पडवींत गेला. तेवढ्यांत मुक्तेनें ही त्याच्या गोष्टी ऐकतां ऐकतां त्याला गूळपाणी दिलें व त्याच्या जेवणाची चौकशी करतां तो आज सारा दिवस उपाशी आहे असें कळतांच त्याला भाकरी भाजून खाऊं घालण्यासाठीं विस्तव पेटवून तवा चुलीवर ठेवला. आज चतुर्थी असल्यानें व्यासराव गणपतीची एकादशणी आटोपून परत आल्यावर सैंपाक करावयाचें मुक्तेनें ठरविलें होतें. पण दिवसभऱ्याच्या भुकेनें व वाटचालीनें व्याकुळ झालेल्या पिराजीला चंद्रोदयापर्यंत उपाशीं ठेवणें मुक्तेला बरें वाटलें नाहीं. त्यांतूनही 'मी आतां घरींच जेवावयाला जातों. धनीसाहेब वाट पाहत असतील' असें पिराजी म्हणाला. पण इतक्या अपरात्रीं त्या मंडळीला तरी त्रास कां द्या अशी मुक्तेनें त्याची समजूत घालून त्याला बसवून घेतलें. पिराजीची कहाणी चालली होती व मुक्तेची भाकर चुलीवरील तव्यावर भाजत असून वरण वैलावर शिजत होतें. तेवढ्यांत पिराजीनें कांट्याकुट्यांतून येतां येतां उजव्या पायाचा आंगठा ठेंच लागून रक्तबंबाळ झालेला दाखविला. तेव्हां मुक्तेनें अगोदर ताबडतोब हळद व कांदा ठेंचून त्या जागीं बांधला.

इतकें झालें; मुक्तेचें भाकर–वरण तवार झालें व तें तिनें एका पत्रावळीवर वाढलें व पिराजी न्याहारीला बसणार, तरीही त्याच्या आजच्या पराक्रमांची कथा कांहीं सांगून संपली नव्हती. हा पिराजीचा

पराक्रम जरी एखाद्या रणधुरंधराला साजेसा नव्हता, तरी त्यांत त्याच्या स्वामिभक्तीची पराकाष्ठा स्पष्ट दिसून येत होती. पिराजी हें अठरा वर्षांचें कोंवळें पण पाणीदार पोर—जगाच्या न्यायानें पाहतां तो ओंठावरचा जार देखील न सुकलेलें कोंवळें पोर—असला तरी चौदापंधरा वर्षें वयाच्या मुक्तेच्या दृष्टीनें तो तरणाबांड हिंमतबहाद्दरच होता. तसेंच पिराजीचें वय पाहतां त्याच्या ठायीं वसणारें शौर्यधैर्य दृष्ट लागण्याजोगें होतें. त्याच्या शौर्यधैर्यधुरंधरतेचे अनेक प्रसंग मुक्तेनें आजवर अवलोकन केले होते. पण आजच्या प्रसंगींचें वर्णन जें पिराजीनें केलें, तें इतकें हृदयस्पर्शी होतें कीं तें ऐकून पिराजीच्या कट्ट्या दुस्मानालादेखील पिराजी प्रिय वाटूं लागला असता. मग तीनत्रिकाळ त्याचें प्रिय चिंतणाऱ्या मुक्तेला तें वर्णन ऐकून 'माझ्या पिराजीचा हा पराक्रम' अशा भावनेनें आकाश ठेंगणें झालें असल्यास नवल काय?

पिराजी सूर्य मावळण्याच्या सुमाराला वनवासवाडीहून स्वामी-कडून चिठ्ठीचें उत्तर घेऊन निघाला व लौकर मकाण गांठावयाचें ह्या तीव्र अंतस्थ इच्छेनें धोपटमार्ग सोडून रानजंगलांतील गोवंड्या आड-वाटेनें ईश्वराचें नांव व स्वामींचा आशीर्वाद घेऊन निघाला, तेव्हां वाटेनें भेटणाऱ्या प्रत्येक वाटसरानें त्याला सांगितलें कीं बाबारे, हें वाघचित्त्यांचें रान आहे; अशा तिन्हीसांजांच्या वेळीं ह्या वाटेनें जाऊं नकोस. आजची रात्र वनवासवाडींत मुक्काम कर व उद्यां जा. पण बाळाजीपंतांनीं आजच्या आज उत्तर आणावयास सांगितलें होतें; ती आज्ञा पाळण्यापुढें त्याला स्वतःच्या प्राणांची काय पर्वा!

## प्रकरण दुसरें

# अकल्पित अनर्थ

मुक्तेनें वरणभाकर तयार होतांच पिराजीचें पान वाढलें व पिराजी कपडे काढतां काढतां स्वामींनीं बाळाजीपंतांना दिलेला बंद लिफाफा मुक्तेला दाखवीत म्हणाला, "धनीसाहेबांची ही बहुमोलाची ठेव माझ्यापाशीं आहे."

"काय आहे तें?" मुक्तेनें विचारलें.

"काय आहे कोणास कळे? पण स्वामी मला म्हणाले कीं, महाराष्ट्राचें नशीब ह्या लिफाफ्यांत बंद केलेलें आहे. आजकाल ताराबाई आईसाहेबांचीं शाहूमहाराजांविरुद्ध अनेक कारस्थानें चाललेलीं आहेत, तेव्हां त्यांतला कोणीतरी अर्ध्या वाटेंत मला गांठून लुबाडतो कीं काय, असें मला भय होतें. पण मुक्ते, तुला काय मौज सांगूं!" पिराजी लिफाफा जवळच्या कोनाड्यांत ठेवून हातपाय धुवून पाटावर बसतां बसतां म्हणाला, "जेवढे म्हणून शाहूमहाराजांचे कैवारी, त्यांच्या जिवावर उठण्यासाठीं ताराबाई आईसाहेबांनीं चंद्रसेन जाधवासारखे मनुष्यरूपी राक्षसच जवळ करून ठेवले आहेत असें नव्हे; तर ह्या सभोंवारच्या रानांत असे कांहीं पाळींव वाघदेखील असावेत. त्यांतला एक वाघ मी अर्ध्या वाटेवर आल्यावर नेमका माझ्यावर चालून आला. छे! ती आठवण झाली, म्हणजे अजून देखील आंगावर कांटा उभा राहतो."

"काय, वाघ तुझ्या आंगावर चालून आला? आणि मग तूं काय केलेंस?" मुक्तेनें कपिलेला कुरवाळीत एखाद्या लहान पोराला भरवावें त्याप्रमाणें तिला भाकरीचे घांस भरवतां भरवतां विचारलें.

"ती बघ, अशी मौज झाली." पिराजी एकीकडे जेवतां जेवतां

दुसरीकडे सांगूं लागला, "सूर्य मावळतो न मावळतो, इतक्यांत मीं लौकर घरीं यावें म्हणून मुद्दाम पायांखालचा वळणांवळणांचा राजमार्ग सोडून आडवाटेनें चालूं लागलों. ती किर्रर झाडी पाहून मला वाटलेंच होतें कीं, इथें एखादे वाघोबा वस्ती करीत असावे. शिवाय रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या लोकांनींही मला इषारा दिला होता. पण मी परमेश्वराचें नांव घेऊन एकदांचा पुढें तर सटकलोंच. पण छातींत मात्र धागूधुगू होत होतें, कीं खरोखरच एखादे वाघोबा आपल्या पाठीवर नाहींत ना! वाटेंत एखाद्या झाडींत कांहीं खुट् झालें कीं वाटे, वाघच आला कीं काय! असें होतां होतां हांक दोन हांका चालून आलों असेन नसेन, तोंच एका झाडींत मला खरोखरच वाघाचे डोळे लिकूलिकूलेले दिसले. मनांत म्हटलें की, आतां मात्र आपली पुरी कंबख्ती भरली. आतां काय करायचें! तेवढ्यांत त्या बहाद्दरानें केलें काय, एकवार माझ्या नजरेला नजर भिडविली व मी ज्या दरडीवरून चालत होतों, तिच्या पायथ्यानें आपला रस्ता आंखला. मला वाटलें, कीं हा मला विसरेल. पण तो कसला विसरतो! पांच पंचवीस पावलें दूर गेला कीं त्यानें एकवार मागें वळून पाहावें. असा प्रकार पुनः पुन्हा चाललेला पाहून ओळखलें कीं, हा कांहीं आपली पाठ सोडीत नाहीं. आतां काय करावें असें मला होऊन गेलें. एकवार सभोंवार नजर फेंकली तों डाव्या हाताच्या बाजूनें दूर अंतरावरून घुंगुरांचा खळखळ असा मंद मंद आवाज ऐकूं येऊं लागला. त्यावरून मला तर्क करतां आला कीं गाडीचा मार्ग जवळच असून त्या मार्गानें एखादी गाडी येत असावी. समोर पाहावें तों किर्रर झाडी व जरा बाजूला उजवीकडे पाहावें तों हा काळ डोळे वटारून उभा! आतां प्राणावर बेतणार हें तर जवळजवळ ठरल्यासारखेंच होतें. पण सुखासुखी प्राण देण्याची मनाची थोडीच तयारी होते! प्रसंग तर आला खरा. आतां प्राण बचावण्याची धडपड केलीच पाहिजे, असें पाहून ढोल्या गणपतीचें नांव घेऊन मी जिकडून घुंगुराचा आवाज ऐकूं येत होता तिकडे जीव मुठींत घेऊन धूम ठोकली. धावतां धावतां

मागें वळून पाहावें तों तो काळ माझ्या मागावर येतच होता! त्याला चुकवून गाडीचा पत्ता गांठावा म्हणून मीं आंगांत होता तेवढा जोर लावून एकवटून धूम ठोकली. आता आपलें भक्ष्य आपल्या टप्प्यांतून जातें असें त्या वाघाला वाटलें तेव्हां तो देखील संतापून पल्लेदार उड्या मारीत माझा पाठलाग करूं लागला. त्याच्यापुढें धांवून मी किती पुरा पडणार! माझीं दोन पावलें पुढें पडलीं तर त्याची बारा हातांची उडी पडे! आतां आपण त्याच्या भक्ष्यस्थानीं पडणार अशी खात्री होताच माझे हातपाय गळाले. पण तेवढ्यांत जवळच एक चिंचेचें झाड दिसलें. त्याची एक फांदी सुदैवानें बरीच लोंबकळत होती, तिचा एका उडीसरसा आधार घेऊन मी एकदांचा वर चढतों न चढतों, तोंच वाघ झाडाच्या बुंध्याशीं येऊन धडकला. तेवढ्यांत ज्या गाडीच्या बैलाच्या गळ्यांतील घुंगूर वाजतांना मी ऐकले होते ती पुढें निघून गेली होती. झालें! मी वर झाडावर भीतीनें अर्धमेला होऊन बसलेला व वाघ बुंध्याशीं खळ्या खणतो आहे! त्यानें प्रथम बुंधा उकरून झाड मोडून पाडण्याची शिकस्त केली. पण एवढें मोठें झाड त्याच्या बापाला तरी पडेल! त्या बाजूनें निराशा होतांच त्यानें वर चढण्याकरिता बुंध्यांत नखें रोंवण्याचा कर कर प्रयत्न केला. त्यानें पजे बुंध्याला टेकून रागारागानें दांत चावीत गुरगुरत माझ्याकडे पाहावें व मीं वरून भेवडावतांच खालीं उडी मारावी. अशी आमची झटापट चांगली अर्धी घटका चालली होती. इतक्यांत मागाहून आणखी एक गाडी दौडत आली. ती चाहूल लागतांच वाघ भिऊन दूर पळाला, व मींही गाडीवानाला हांक मारून गाडी थांबवायला सांगितलें. पण तिथेंही माझें कमनशीब दत्त म्हणून उभें राहिलें."

"तें कसें काय?" मुक्तनें मध्येंच विचारलें.

पिराजी म्हणाला, "त्या रात्रींत चोराचिलटांची भीति फार; तेव्हां त्या गाडीवानाला वाटलें कीं, हा कोणी चोरच आहे. त्यानें गाडी थांबविण्याच्या ऐवजीं बैलांच्या शेंपट्या पिरगळून त्यांना आसुडानें

झोडझोडून दामटलें. आतां ही सोबत सोडावी तर तो काळ पुन्हा एक भोंवाडा घेऊन नेमका इथें येईल ह्या भयानें मीं परमेश्वराचें नांव घेऊन झाडावरून खालीं उडी तर घेतली! आतां आपणावर चोराची धाड पडणार असें गाडीवानाला वाटून त्यानें गाडी जास्त नेटानें हांकण्याची शिकस्त केली, व मीही शक्य तेवढ्या चपळाईनें गाडी-मागोमाग धांवूं लागलों. अखेर एकदांची गाडी गांठून मीं बैलाच्या कासऱ्याला हात घातला व गाडी उभी केली. पाहतों तों काय? गाडी चंद्रसेन जाधवाची!"

"अस्सें! वाः! मग फारच बहार उडाली म्हणायची!" नेमकी हीच वेळ साधून कपिलादेखील मुक्तेची मांडी सोडून सैंपाकघरभर बागडूं लागली. मुक्तेनें तिला लाडक्या भाषेंत हंसत हंसत विचारलें, "कपिले! तुला ग यांत काय समजलें?"

कपिलेचें नाचणेंबागडणें म्हणजे मुक्तेच्या झोंपडींत वेळीं अवेळीं थुइथुई नाचून आनंदीआनंदाच्या गुलाबपाण्याचे फवारे उडविणारें कारंजेंच होतें. ह्या कारंज्याचे तुषार अंगावर उडतांच कोणींही देह-भान विसरून जावें.

पिराजी कपिलेला कुरवाळण्यासाठीं डावा हात पुढें करतो, तोंच कपिला टुणुकन् उडी मारून जी गेली ती मुक्तेच्या मानेवर मान टेंकून उभी राहिली.

पिराजी तें मनोरम दृश्य पाहून म्हणाला, "मुक्ते, पूर्वजन्मींच्या तुम्ही मायलेकी दिसतां!"

मुक्ता पिराजीच्या बोलण्याकडे लक्ष दिलें न दिलेंसें करून कपिले-चा एक मुका घेत म्हणाली, "पोरी, त्याच्याकडे जा ग!"

"ये! कपिले, इकडे ये." पिराजी म्हणाला.

कपिलेला त्या दोघांचें हें संभाषण कळलें किंवा कसें कोण जाणे! ती एखादें अल्लड अर्भक आईच्या गळ्याची मिठी सोडून बापाच्या गळ्यांत जाऊन पडतें तशी मुक्तेच्या मिठींतून उठून पिराजीपाशीं गेली व त्याच्या तोंडाशीं तोंड नेऊन उभी राहिली. पिराजीनें

आपल्या उष्ट्या तोंडानें तिचा मुका घेतला, व अर्धवट चघळलेला तोंडचा घांस तिच्या तोंडांत घातला.

मुक्ता आनंदित होऊन म्हणाली, "खरेंच, पूर्व जन्मींचा कांहीं लागाबांधा असल्याशिवाय पशूंसारख्या पशूंना अशा माणसासारख्या प्रेमळ लीला सुचायच्या नाहींत.–बरें, पुढें काय झालें?"

"पुढें काय! त्या गाडीवानानें पहिल्यानें काळोखांत मला कांहीं ओळखलें नाहीं, व मीं गाडी पकडलेली पाहतांच आपल्या कमरेचा थैला सोडून माझ्यापुढें फेंकीत भीतीनें कांपत कांपत म्हटलें, "बाबारे, हा पहा माझ्यापाशीं फक्त दोन रुपयांचा खुर्दा आहे, आणि संभाजीनें चंद्रसेनाला दिलेलें हें एक पत्र. यापेक्षां कांहींदेखील नाहीं."

संभाजीचें नांव ऐकतांच मुक्तेचा चेहरा रागानें इंगळीसारखा लाल झाला. पण राग आंतल्याआंत दाबून तिनें विचारलें, "पिराजी, त्या दोघां सैतानांशीं वागतांना जरा जपूनच वागत जा बरें का? ते कांहीं माणूस नाहींत; हैवान आहेत ते!"

"तें मला माहीत आहे. पण ऐक तरी! पुढची मौज ऐक." पिराजी अर्ध्या जेवणावरून हात खोळंबून म्हणाला, "संभाजीचें पत्र व तें चंद्रसेनाला, असें ऐकतांच मी प्रथम थैला हातीं घेतला व त्यांतलें पत्र तेवढें काढून घेऊन पुन्हा तो गाडीवानाच्या अंगावर फेंकला."

"तो गाडीवान बहुधा भागू असेल!" मुक्ता म्हणाली.

"होय." पिराजी उत्तरला.

"तेंच! तो मेला नांवाप्रमाणेंच भागूबाई आहे. संभाजीच्या चिथावणीनें शेफारून त्यानें एकदां माझ्याशीं बोलतांना चावटपणाची भाषा वापरली होती. त्या गोष्टीला आज किती बरें;–सुमार महिना झाला असेल. तेव्हां मीं त्याची अशी खरडपट्टी काढली कीं त्याला जन्माची याद राहावी! त्या दोघांचें नांव निघालें कीं माझ्या तळ-पायांची आग मस्तकाला जाऊन झोंबते. पण त्यानें तुला सुखानें पत्र घेऊं दिलें कारे?"

"न देईल काय करील? मीं नुसतें पत्र घेतलें मात्र, त्याबरोबर

तो गयावया करून सांगूं लागला, कीं संभाजी शाहूमहाराजांच्या टेहळणीवर निघाला आहे, त्यासबंधानें तें पत्र आहे. तें चंद्रसेना-मार्फत ताराबाई आईसाहेबांपाशीं रवाना व्हावयाचें आहे—"

"तरीच! मला तसा संशय आलाच." मुक्तेनें भुंवया चढवून व ओंठ चावून क्षणभर विचार केला व विचारलें, "तें पत्र तूं काय केलेंस?"

"तें माझ्यापाशीं सुरक्षित आहे. तें मी आतां धनीसाहेबांपाशीं देणार आहें." पिराजी म्हणाला, "बराच वेळपर्यंत भागू इतका भिऊन गेला होता कीं, काळोखांत मी त्याच्या गाडींतून वेशीपर्यंत आलों तरी मीच तो याचा त्याला पत्तादेखील नाहीं. अखेर जेव्हां मीं वेशीवर इकडे येण्यासाठीं खालीं उतरून त्याला रामराम केला तेव्हां कुठें त्याला ओळख पटली. पुन्हा त्यानें माझ्यापाशीं तें पत्र मागितलें; पण मी एकदां दरडावतांच तो गप्प बसला!"

"गप्प बसेल नाहीं तर काय करील? भागूबाई मेला! पण मग तूं इतकीं जरुरीचीं व महत्त्वाचीं पत्रें अगोदर धनीसाहेबांच्या हातीं पावतीं करायचें सोडून इकडे कशाला बरें आलास?"

"इकडे आलों याचें कारण—" पिराजी बसल्या जाग्यावरून जरा कलंडल्यासारखें करून, मुक्ता जवळच बसली होती तिचा डावा हात आपल्या हातांत धरीत धरीत म्हणाला, "ही व ह्याहूनही दुसरी अधिक आनंदाची बातमी मला अगोदर—सर्वांच्याही अगोदर तुझ्या कानांवर घालावयाची होती—"

"पण—"

"पण अगोदर माझें ऐकशील तरी का? मी इथून धावडशीला व धावडशीहून वनवासवाडीला जिवाची पर्वा न करतां धांवत गेलेला पाहून स्वामींनीं माझ्या स्वामिभक्तीचें कौतुक केलें. ते म्हणाले, 'मुला, तुझी स्वामिभक्ति पाहून मी संतोष पावलों. असाच तूं सदैव स्वामि-कार्यनिरत राहा म्हणजे श्रीगजानन व श्रीभार्गवराम तुझे इच्छित मनोरथ पूर्ण करून तुला सुखाचे दिवस दाखवील.' मुक्ते! स्वामींनीं

मला आशीर्वाद दिला तेव्हां माझ्या मनांत कोणता मनोरथ वसत होता, तूंच सांग बरें!"

"मला काय माहीत?"

"तूं खोटें बोलतेस!" पिराजी डाव्या हातानें मुक्तेला आपल्या-जवळ ओढीत म्हणाला, "वेडे! आपली लगीनगांठ मारली जावी यापेक्षां दुसरा कोणता मनोरथ अशा वेळीं माझ्या मनांत असणार बरें!"

"चल, सोड माझा हात!" मुक्ता एकाएकीं रागावून पिराजी-च्या हातून आपला हात हिसकून घेत झणकाऱ्यानें म्हणाली, "तूं इतका नादान् असशील असें मला वाटलें नव्हतें. स्वामींनीं जी तुझ्या स्वामिभक्तीची एवढी वाखाणणी केली, ती फुकट गेली. एवढें जरुरीचें काम हातचें सोडून तूं जो पहिल्यानें मला भेटायला आलास ती मी काय आजच मरत होतें वाटतें?"

"मुक्ते! एवढ्या जीवावरच्या संकटांतून मी जगलों तो तुझ्यासाठीं, केवळ तुझ्यासाठीं जगलों. स्वामींची चिठ्ठी घेऊन अवेळीं आडरान तुडवीत निघालों तो तुझ्यासाठीं. केव्हां एकदां तुला भेटेन व स्वामीं-च्या आशिर्वादाची शुभवार्ता तुझ्या कानावर घालीन असें मला होऊन गेलें होतें म्हणून—"

"तें सारें कळलें." पिराजी काकुळतीला येऊन बोलत होता. पण त्याला पुरतेपणीं बोलूं न देतां कोपाविष्ट स्वरांत मुक्ता म्हणाली, "म्हणूनच मी तुला नादान म्हणालें. स्वामींनीं तरी तुला जो आशीर्वाद दिला, तो तुझ्या स्वामिभक्तीला भाळून दिला; तुझ्या मुक्तेविषयीं-च्या नादानपणाला भाळून दिला नाहीं. आणि मला तरी तूं जो आजवर आवडत होतास तो तुझें माझें लग्न होउन तूं माझा जन्माचा सोबती व्हावास यासाठीं नाहीं कांहीं! चल! अचरट कुठचा! पिराजी-सारखा जिवाला जीव देणारा नोकर मला दुसरा मिळायचा नाहीं, अशी तुझ्या धनीसाहेबांनीं मनमोकळेपणानें तुझी प्रशंसा केलेली मी अनेक वेळां ऐकत आलें, तेव्हां अशा शद्बागणिक माझ्या आंगावर मूठभर मांस वाढलें व मी लोकांना देखील सांगत आलें कीं, माझा



मुक्ता:–असल्या जिवंत मुडद्याला मी कधीं–कधींदेखील माळ घालायची नाहीं!

पिराजी आहेच तसा. मला तुझे गुण आवडत होते, तुझा नांवलौकिक आवडत होता—"

"आणि मी मात्र तुला आवडत नव्हतों, असेंच ना?"

"तूं, तूं म्हणजे कोण रे? साडेतीन हात उंचीचा बोलताचालता हाडामांसाचा गोळा म्हणजे तूं का? असे जिवंत गोळे हवे तेवढे आहेत. संभाजी नाहीं का, चांगला तुझ्यापेक्षां गलेलठ आहे. एक कापला तर एका कुणब्या-मराठ्याच्या एका लग्नाला सागोती पुरेल. तूं-तूं तरी असा कोण?"

"खरेंच तें!" पिराजी निराशपूर्ण स्वरानें म्हणाला, "मुक्ते, तुझें मन आज मला कळलें. तुला माझा नांवलौकिक मात्र पाहिजे, पण मी मात्र नको. चुकलेंच खरें माझें. माझा जीव भोळा म्हणून मी तुझ्याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे नादानासारखा 'मुक्ता' 'मुक्ता' करीत वेळ अवेळ न म्हणतां येथवर आलों. त्यापेक्षां मला वाटेंत त्या वाघानें कां बरें खाल्लें नाहीं? म्हणजे तरी तुझ्या जिवाचें समाधान झालें असतें; होय ना?"

पिराजीचे हे त्राग्याचे शद्ब ऐकून मुक्तेच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. तिनें एकीकडे पदरानें आंसवें पुशीत घोगऱ्या आवाजांत उत्तर दिलें, "हो! हो! तूं वाघानें खाऊन मेला असतास तर स्वामिकार्यासाठीं पिराजी मेला असा तुझ्या नांवाचा त्रिभुवनांत डंका गाजला असता, व त्या डंक्याच्या सुराशीं सूर भिडवून तुझी मुक्ता जन्मभर मुक्तकंठानें गौरवाचें रडें रडत बसली असती. गौरवाचें रडें एवढ्यासाठीं हंसत रडायचें कीं, माझ्या जिवाचा जिव्हाळा मरून अमर झाला म्हणून रडायचें, व त्या जिव्हाळ्याच्या वेलीचें आळें शिंपून जिवंत राखायचें म्हणून. जातिवंत माणसानें देशाच्या संसाराला आग लागत असलेली धडधडीत डोळ्यांसमोर दिसत असतांना ती आग प्रथम विझवायची, कीं तशीच पेटूं देऊन त्या भेसूर उजेडांत स्वतःचा संसार उभारूं पाहायचें? बस्स! आजपासून तूं मला मेलास व मी तुला मेलें. आपला एकमेकांचा आतां कांहींदेखील संबंध

पे....२

उरला नाहीं. म्हणे मला वाघानें कां बरें खाल्लें नाहीं!" मुक्ता इतका वेळ कसेबसे हुंदके दाबून बोलत होती; पण आतां तिच्या हुंदक्यांचा वेग अनावर झाला त्या वादळांत तिच्या अंतःकरणांत उद्भवणाऱ्या उद्गारांची पांगापांग होऊन तिचा शद्ब अडखळूं लागला. तिनें क्षणभर त्या वादळाची पहिली सोंसाट्याची लाट ओसरूं दिली व पदरानें पुनः पुन्हा डोळे पुशीत क्षणोक्षणीं जास्त जास्त उचंबळ णाऱ्या अंतःकरणाला वाणीवाटे वाव करून दिला, "म्हणे मला वाघानें कां बरें खाल्लें नाहीं! नि मग म्हणे तुझ्या जिवाचें समाधान झालें असतें. पण वाघ तरी असा कसा खाईल? स्वामिभक्तीची थोर पुण्याई पदरीं असलेल्या पुण्यवानाला खायला माणसें जशीं बेमान होतात तशीं जनावरें कांहीं आजच बेमान झालीं नाहींत! वाटेंत आडवा आलेल्या वाघाला तूं आपल्या स्वामिनिष्ठेची शपथ तरी घालून पाहायची होतीस! वाघानें कां खाल्लें नाहीं असें बोलून मला रडव-तोस काय? हो! मी म्हणतें वाघानें तुला खाल्लें असतें व तूं मेला असतास तर स्वामिकार्य करतां करतां माझा पिराजी मेला तो अमर झाला असें मानून मीं त्या मुडद्याला माळ घालून त्याच्या नांवानें जन्मभर कुंकू लावलें असतें. पण तुला एवढेंदेखील कळलें नाहीं. तूं नादी बनून कर्तव्याला मुकलास. असल्या जिवंत मुडद्याला मी कधीं-कद्धींदेखील माळ घालायची नाहीं. बस्स! आजपासून आपण एकमेकांना मेलों!"

मुक्तेचे शद्ब पिराजीच्या मनाला इतके झोंबले, कीं त्या भरांत त्याला कांहींच बोलावयाला सुचेना. त्यानें क्षणभर तळहातावर डोकें टेंकून विचार केला व लगेच कपडे करून तीं पत्रें घेऊन दरवाज्या-बाहेर पाऊल टाकलें.

"हेंच तुला अगोदर बरें नाहीं सुचलें! साताऱ्याची सारी राज-वट आजकाल शाहूमहाराजांच्या जिवावर उलटली आहे. संभाजी-सारखे गुप्त हेर चोरांच्या पावलांनीं सभोंवार वावरत असतांना गेला क्षण लाखाचा मानून तुझ्या धनीसाहेबांनीं हातीं घेतलेल्या मराठी

दौलतीच्या आबादानीसाठीं जिवाभावाच्या मोलानें झटायचें सोडून असें भ्रमिष्टासारखें भलतेंच कांहीं तरी करायचें त्यापेक्षां आपण असें देखील समजावें कीं—"

"आपण एकमेकांना मेलों ना? ठीक आहे. आतां यापुढें ह्या पिराजीची तुला कधींच भेट होणार नाहीं. यःकश्चित् एका पोरीचे असे उणे बोल मुकाटपणें ऐकून घ्यायला मी कांहीं मेलेल्या मायेचें दूध प्यालेलों नाहीं; माझ्या अंगीं पराक्रम असेल तर तो दिसेल; व मग अशा दहा मुक्ता माझ्या संगतींत आपल्या आयुष्याचें सुख-सोनें व्हावें म्हणून अंतःकरणाच्या पायघड्या माझ्या पायांतळीं पसरण्या-साठीं जोडल्या हातांनी लोटांगणें घालीत येतील." एवढें बोलून पिराजी आवेशानें दरवाज्याबाहेर पडला.

मुक्तेचा पिराजीविषयींचा राग प्रेममूलक होता. पिराजीनें कर्तव्य-च्युत होऊन आपला दुर्लौकिक करून घ्यावा हें तिला अप्रिय असल्यानें त्याला कर्तव्योन्मुख करण्यासाठीं मधून मधून ती थोडा थोडा चंडि-केचा अवतार धारण करी. आज तिनें त्या बेगडी रागाचा खरोखरीच कडेलोट केला; तरी पिराजी चिडून आपल्या कामगिरीवर निघालेला पाहून तिचें मन संतुष्ट झालें. पिराजी रागावलेला पाहून ती या वेळीं हंसत होती तें तिचें हंसणें पिराजीच्या आंधळ्या रागाला उपहासास्पद वाटलें तरी खरोखर तें कौतुकास्पदच होतें. बोलण्याच्या ओघांत 'मी मेलेल्या मायेचें दूध प्यालेलों नाहीं' असें बेधडकपणें बोलून जाण्याची पिराजीला लकबच होती. पण खरा प्रकार खरोखरच तसा असल्याचें मुक्तेनें व्यासरावाच्या तोंडून ओझरतें ऐकलें होतें. तेंच आतां बोलून पिराजीला निरुत्तर करण्याचें मुक्तेला आठवलें. पण ही थट्टा अकालीं होईल ह्या भयानें ती गप्प राहिली. पिराजी व मुक्ता यांचा हा प्रेम-कलह पाहून, पशूसारखी पशु कपिला पण तीदेखील कावरीबावरी होऊन भोंवतीं पाहूं लागली.

काळोखांत पिराजीला आंगणांतील अडगळ दिसणार नाहीं म्हणून मुक्ता लामणदिवा हातीं घेऊन दरवाज्यापर्यंत येते न येते तोंच पिराजी

दहापांच पावलें पुढें जातांच एकाएकीं जागच्याजागीं थबकून दचकत ओरडला "कोण आहे?"

हा पिराजीच्या तोंडचा शब्द ऐकून मुक्ताही दचकली. तेवढ्यांत वाऱ्याची एक जोराची झुळूक येऊन तिच्या हातचा दिवा विझला. तेवढ्यांत कोणी तरी दोघे दांडगट पुरुष पिराजीला चोहों बाजूंनीं घेरीत असतांना मात्र तिनें पाहिलें. पण ते कोण होते हं कांहीं तिला कळेना.

## प्रकरण तिसरें

# बायकोसाठीं भांडण

मुक्ता पुन्हा घरांत जाऊन कांकडा पेटवून आणून त्या उजेडांत आंगणांत येऊन पिराजीच्या आंगावर हात टाकणाऱ्या झोंबटांचे चेहेरे न्याहाळून पाहूं लागली तों भागू व संभाजी ह्या दोघांची तिला तेव्हांच ओळख पटली.

संभाजीनें पिराजीला दरडावून विचारलें, "पिराजी! मुकाट्यानें भागूपासून लुबाडून घेतलेलें पत्र देतोस कीं नाहीं बोल."

पिराजी यावर कांहींच बोलला नाहीं. तो भ्याला अशी कल्पना त्यानें करून घेतली. भागू आपला उपजत भागूबाईपणा क्षणभर बळेंच दूर सारून पिराजीच्या दंडाला पकडून गदगदां हालवीत म्हणाला, "थोरामोठ्यांच्या आश्रयाला राहून असे वाटमाऱ्याचे धंदे करतोस नव्हे का?"

नेमकी त्याच क्षणाला मुक्ता व संभाजी यांची दृष्टादृष्ट झाली; त्याबरोबर दोघांच्याही आंगावर रोमांच उभे राहिले. मात्र हें रोमांचांचें पीक ज्या मानवी अवस्थेच्या पोटीं पिकलें, ती दोघांच्याही अंतःकरणांतील अवस्था भिन्नभिन्न स्वरूपांची होती. संभाजीच्या अंतःकरणांत स्वरूपसुंदर मुक्तेला पाहून आनंदाच्या ऊर्मि उसळत होत्या तर मुक्तेच्या अंतःकरणाला संभाजीकडे पाहून तिरस्काराचें कांपरें भरलें होतें.

आतां कसें करावें असें मुक्तेला होऊन गेलें. पिराजी काय अथवा संभाजी काय, दोघेही तिच्या सारखेच परिचयाचे. इतकेंच काय, पण पिराजी मुक्तेबरोबर खेळलेला तर चंद्रसेनानें संभाजीबरोबरच तिला आंगाखांद्यावर खेळविलेलें. शिवाय चंद्रसेन हा तिचा धनी पडला

व संभाजी त्याचा मुलगा! मुक्तेचा आजोबा व्यासराव हा धनाजी जाधवाच्या देवांची पूजा करी व त्याच्या घरची भिक्षुकी सांभाळी. पण काय असेल तें असो; मुक्तेचा ओढा चंद्रसेन किंवा धनाजी यांच्याकडे मुळींच नव्हता. तो होता पिराजीकडे व पिराजी बाळाजी-पंतांचा हुजऱ्या म्हणून त्यांच्याकडे. हा ओढा अमुकच अर्थाचा आहे असें संभाजीला व इतर खेळमेळीच्या माणसांना नुसतें संशयित माहीत होतें. पण मुक्ता व पिराजी हीं दोघें एकमेकांना अभिन्नहृदयी मानीत असतील ही त्या दोघांचीही मनकवडी गोष्ट मात्र कोणालाच माहीत नव्हती. आतांदेखील संभाजी व पिराजी यांची झुंज जुंपलेली पाहून ह्या झगड्यांत पिराजी संभाजीचा अपराधी आहे हें मुक्तेला माहीत असतांही ती संभाजीवरच रागावली व ह्या अरिष्टांतून पिराजी-ची कशी मोकळीक करावी याचा विचार करूं लागली. आपण पुढें होऊन अमक्या एकाला हात आवरता घेण्यास सांगावें असा धीर प्रथम तिला होईना. ती व तिच्या पायांशीं उभी असलेली कपिला अशा दोघीही चित्रासारख्या तटस्थ उभ्या राहून झोंबी पाहूं लागल्या. पिराजीनें आपलें होतें नव्हतें तेवढें बल एकवटून संभाजी व भागू यांच्या मिठींतून स्वतःला सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. पण लहानपणापासून सुखांत वाढून धष्टपुष्ट झालेल्या संभाजीसमोर त्याचा टिकाव लागेना. पिराजीदेखील शरीरकाठीनें तसा बळकट होता. पण संभाजी त्याच्याही सवाई होता तशांत भागू त्याच्या मदतीला होता. त्या दोघांनीं पिराजी-च्या हातून पत्रें हिसकून घेण्याची शिकस्त केली, व यांच्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें कळतांच आपल्या जवळच्या दोन्ही चिठ्या पिराजीनें दूर फेंकून दिल्या. सुदैवानें स्वामींनीं बाळाजी-पंताना दिलेली चिठ्ठी तेवढी नेमकी मुक्तेच्या ओच्यांत येऊन पडली व दुसरी चिठ्ठी मात्र तिच्या पुढ्यांत पडली. स्वामींची चिठ्ठी पिवळ्या रंगाच्या कागदावर लिहिलेली होती, ती मुक्तेनें थोड्या वेळापूर्वी पाहिली होती; म्हणून तिनें प्रथम ओंचे खोंवून ती नीट ओंच्यांत लपवून ठेवली व लगेच पुढ्यांतल्या दुसऱ्या चिठ्ठीला हात घातला.

संभाजीनें तेवढ्यांत चपळाई करून तिला दूर लोटून चिठ्ठी हस्तगत करण्याचा प्रयत्न केला, व तो बहुतांशीं साधलाही होता. पण तेवढ्यांत मुक्तेनें मागें वळून 'कपिले' अशी हाक मारतांच कपिला माणसासारखी पुढें सरून आपल्या धनिणीच्या तोंडाकडे उत्सुकतेनें पाहूं लागली. मुक्तेनें तिला नुसती मानेनें खूण केली मात्र, त्याबरोबर तिनें ती चिठ्ठी तोंडांत धरून थेट घरांत धूम ठोकली.

संभाजी तावडतोब मुक्तेच्या घरांत घुसला व कपिलेला अडवूं लागला. पण ती खरीखुरी चपळ हरिणी, ती त्याला थोडीच दाद देते! तिनें मोठ्या शिताफीनें संभाजीच्या दोन्ही पायांमधून पुन्हा झोंपडीबाहेर उडी मारली. आतां मात्र संभाजीचा राग अनावर झाला. त्यानें झोंपडीच्या उजव्या कोंपऱ्यांत जातें मांडलेलें होतें त्याचा खुंटा उपटून तो कपिलेवर फेंकला. त्याचा मार तिच्या पुढच्या पायांना जोरानें लागून ती केंकाटत खालीं पडली व तिच्या तोंडांतील चिठ्ठी जवळच उडाली. आपल्या जिव्याळ्याच्या कपिलेची अशी दशा पाहून मुक्तेला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. तिच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागल्या. तेवढीच संधि साधून संभाजी ती चिठ्ठी घेण्यासाठीं धांवला व भागूही दुसऱ्या बाजूनें धांवला. संभाजीच्या गुढग्याला आंगणांतील पारिजातकाच्या बुंध्याचा जोराचा धक्का लागून त्याची चाल खुंटली. पण भागूनें मात्र कपिलेला लाथेनें दूर लोटून ती चिठ्ठी उचलून घेतली. पिराजी ह्या धादलींत अगदीं मोकळा सुटला होता. त्यानें प्रसंगावधान राखून पुढें पाऊल टाकलें, व मुक्तेनेंही कपिलेला भागूनें लाथ मारलेली पाहून चिडून पुढें होऊन भागूला जोरानें दूर ढकलीत त्याची निर्भर्त्सना केली, "भागूबाई नाहीं तर. त्या मुक्या जनावराला लाथ मारलीस, ते तुझे पाय कुजून सडून मोडून कां पडले नाहींत?"

भागूचें अवसान बोलून चालून उसनवट होतें. तें मुक्तेच्या एका धक्क्याबरोबर कुठच्या कुठें अदृश्य झालें. तो मुक्तेच्या तोंडाकडे पाहत एखाद्या बावळटासारखा उभा राहिला. तों पिराजीनें मागाहून येऊन त्याच्या एक खाशी श्रीमुखांत ठेवून दिली व त्याच्या हातांतील

पत्र हिसकावून घेऊन त्याचा चोळामोळा करून दूर कोठें तरी फेंकून संभाजीच्या डोळयांत धूळ फेंकण्यासाठीं हात आपल्या तोंडापाशीं नेला.

"शाबास! पिराजी, शाबास! याला म्हणतात चातुर्य! आतां मात्र तूं खरा माझा पिराजी शोभलास!" मुक्ता कपिलेला उचलून पोटाशीं धरीत व तिच्या दुखावलेल्या पायांवर फुंकर घालीत म्हणाली. तिचे त्या कागदाच्या बोळयाकडे मात्र पूर्ण लक्ष होतें.

पिराजीनें सारा घात केला असें पाहतांच पुन्हा संभाजीच्या रागाची वीज पिराजीवर कडाडली. त्यानें पिराजीच्या एक सणसणीत श्रीमुखांत भडकावून विचारलें, "हरामखोरा! अशी दगलबाजी करतोस काय? काढ–काढ तें पत्र अगोदर तोंडाबाहेर"

पण पिराजी कांहीं तोंड उघडीना. अखेर संभाजीनें त्याच्या आणखी एक श्रीमुखांत भडकावून जोरानें त्याचें नाक दाबलें त्यामुळें पिराजाजीचें तोंड उघडलें. पण तोंडांत काय आहे? पत्र केव्हांच त्यानें दूर फेंकून दिलें होतें. पिराजीही चिडून एकदम संभाजीच्या आंगावर तुटून पडला. आतां मात्र हा झगडा विकोपाला जाणार अशी मुक्तेची खात्री होऊन चुकली. ह्या खात्रीची प्रचीति यावयालाही वेळ लागला नाहीं. चंद्रसेनानें तोंडून उच्चारूं नये तसल्या शिव्या उच्चारून पिराजीची निर्भर्त्सना करण्यास सुरवात केली. पिराजी तरी सहन करून किती सहन करणार? त्यानें आंगणांतील तोंडलीच्या मांडवाचा बांबू ओढून तो संभाजीच्या डोक्यांत घालण्यासाठीं उगारला. त्याबरोबर चंद्रसेनानें जोरानें एक लाथ त्याच्या कमरेंत हाणून त्याला लोळवलें. आतां पिराजीचा संभाजीच्या लाथांखालीं चक्काचूर होऊन जावयाचा; पण मुक्ता मध्यें पडली व संभाजीला हातांनीं दूर लोटीत म्हणाली, "हें काय हें! असे जन्मोजन्मींच्या हाडवैऱ्यांसारखे एकमेकांच्या मानेला कां खिळतां?"

"मानेला कां खिळतों?" संभाजी मुक्तेकडे पाहत म्हणाला, "ही सारी ताराबाई आईसाहेबांविरुद्ध फंदफितुरी आहे. तो बाळाजीपंत, ते स्वामी, हे लोक आज आईसाहेबांविरुद्ध नव्हे नव्हे तीं

कारस्थानें रचून कुठल्या तरी बाटग्या मुसंड्याला शाहूमहाराज करून आमच्या डोक्यावर आणून बसविणार आहेत. आम्ही—माझे बाबा, माझे आजोबा व मी, सारे आईसाहेबांचे नेकीचे नोकर पडलों—"

"आणि माझ्या धनीसाहेबांच्या आंगीं नेकी नाहीं असें तुझें म्हणणें आहे कीं काय?" पिराजीनें विचारलें.

"ती दिसतेच आहे. पण आतांच त्याचें काय! वेळ आली म्हणजे सारें चव्हाट्यावर येईल. तुम्ही तुझे ते धनीसाहेब, ते भानू-भटजी, ते स्वामी, मिळून आईसाहेबांविरुद्ध व शिवाजीराजांविरुद्ध काय पाहिजे ते कट करा, फंदफितुरी करा; पण बच्चंजी! पुरी याद राखून ठेवा, कीं ही चंद्रसेन व संभाजी अशी बापलेकांची जोडी तुमच्या कटांचा शेषाच्या मस्तकापर्यंत शोध लावून तुमचे दांत तुमच्या घशांत घातल्याशिवाय राहणार नाहीं." संभाजी म्हणाला.

भांडणाचा पहिला पूर आतां अंमळ ओसरला व हातघाईवरील प्रकरण नुसत्या बोलाचालीवर येऊन ठेपलें. त्यामुळें मुक्तेलाही कपि-लेचे दुखावलेले पाय दाबून फुंकर घालण्याला अवसर सांपडला.

संभाजीनें स्वामी व बाळाजीपंत यांच्याविरुद्ध अनुदारपणाचे उद्गार काढले ते पिराजीला सहन होईनात. पण तो स्वभावाचा बराच धिमा असल्यामुळें अशा झगड्यांत होतांहोईतों एकदम शेंडींत राख घालीत नसे. तो सामोपचारानें संभाजीला म्हणाला, "संभाजी! स्वामी, नानासाहेब अशा मोठया माणसांच्या बाबतींत तुझ्यामाझ्या-सारख्या लुंग्यासुंग्या माणसांनीं लुब्रेपणा करूं नये हें चांगलें."

"असे तुझे ते स्वामी व ते बाळाजीपंत हा कुठच्या झाडाचा पाला रे? स्वामी आतांशा धावडशीला बसून कटवाल्यांचे राजे झाले आहेत व बाळाजीपंत त्यांना आंतून सामील आहेत. मुसलमानांशीं गट्टी करून ह्या दोघांना मराठशाही उलथून पाडावयाची आहे. जसा कांहीं तो बाटगा तोतया शाहू येऊन मराठयांच्या गादीवर बसला म्हणजे स्वामींच्या पादुका देव्हाऱ्यांत पुजेला लावणार आहे, व बाळाजीपंतांना पेशवा नेमणार आहे!"

संभाजीच्या तोंडून अखेरचे उद्गार निघावयाला व वाऱ्याच्या झुळुकेनें आंगणात एकाएकीं पारिजातकाच्या फुलांची पखरण पडावयाला एक गांठ पडली. त्याच वेळीं नेमकी एक कोकिळा पारिजातकावर घरटें करून राहिली होती, ती 'कुहु' 'कुहु' असें मंजुळ कूजन करूं लागली.

नेमकी ह्याच शद्बाला मुक्ता पिराजीच्या डाव्या बाजूला मागें उभी होती ती थाड्कन् शिंकली. त्या शिंकेबरोबर तिच्या तोंडून उद्गार निघाले, "डावी तारी उजवी मारी समोर करी घात पाठीं उभा जगन्नाथ. पिराजी जें बोलला त्याला परमेश्वरी साक्षात्काराचें पाठबळ आहे."

"मुक्ते! तूं तर पिराजीवर अगदीं फिदा झाल्यासारखी बोलतेस!" संभाजी कुरेबाजीनें म्हणाला, "इतका त्याचा कैवार घ्यायला जसें कांहीं व्यासराव तुझें त्याच्याशीं लग्न लावून देणार आहे!"

"असला चावटपणा तुला शोभत नाहीं बरें का संभा!" मुक्ता म्हणाली, "मी उगाच कुणाचा कशाला कैवार घेऊं? आणि घेतलाच तर पिराजीचा कैवार घ्यायचा मला हक्कच आहे. तो आणि मी एका खेळीं खेळलेलीं, एका घरीं घोळलेलीं व एका ताटीं जेवलेलीं मुलें आहों."

"पण बहीणभावंडें आहों असें नाहीं ग म्हटलेंस!" संभाजी मध्येच म्हणाला.

"संभा! मायेममतेला नातीं लागत नसतात." मुक्ता म्हणाली, "लहानपणापासून बहीणभावंडांप्रमाणें एकत्र सुखदुःख भोगीत लहानांचीं मोठीं झालेलीं मुलें एकमेकांवर मायाममता करणारच."

"आणि मी तुझ्याशीं लहानपणापासून हंसलों खेळलों नाहीं का? मीं तुला तुझ्या लहानपणीं माझ्या आंगाखांद्यावरून खेळविलेली आहे. तसें पाहूं गेल्या जितका तुझ्यावर पिराजीचा प्रेमाचा हक्क आहे त्याहून माझा जास्त हक्क आहे. लहानपणीं तुझ्या लुटुपुटूच्या संसारांत तुझें लग्न उभें राहिलें म्हणजे आम्ही दोघे वीर एकमेकांशीं

झुंजत असूं व त्या झुंजींत मी पिराजीला चीत केल्यावर 'संभा! तूं भांडू नकोस. मी तुझी बायको होईन' असें तूं मला सांगून आमची झुंज सोडवीत असस. चांगला कालपरवापर्यंत असा प्रकार चालत आला. बरें; आज तुम्ही अन्न खातां तें आमचेंच खातां ना? ज्याचें अन्न खावें त्याच्या घरचे असे वासे मोजावे काय?" संभाजीनें विचारलें.

वास्तविक संभाजी चंद्रसेनाच्या सांगण्यावरून इथें पिराजीचा तपास करीत आला तो आपण भागूच्या हातीं चंद्रसेनाला पाठविलेलें महत्त्वाचें पत्र पिराजीच्या हातीं पडलें, तें बाळाजीपंतांच्या हातीं पडल्यास अनर्थ ओढवेल ह्या भयानें तें हस्तगत करून घेण्यासाठीं आला. पण मुक्ता दृष्टीला पडताच कुठचें पत्र व कुठचें काय, मुक्तेकडेच पाहत लाळ घोटीत उभें राहण्यात तो रमून गेला. पिराजीशीं भांडताना त्यानें हात अंमळ आखडता घेतला याचें कारणही हेंच. सुदैवानें असो, कीं दुर्दैवानें असो, भागूनें त्या पत्राचें महत्त्व ओळखलें होतें. तो रडतराऊत 'पत्र हरवलें' हें सांगण्यासाठीं चद्रसेनापाशीं आला, तों त्याच्या मागोमाग अकस्मात् संभाजीही दुसरी एक बैलगाडी गाठून तेथें येऊन पोंचला. त्यानें शाहूमहाराजांच्या सुटकेची निश्चित बातमी स्वामींच्या हालचालींवर गुप्त नजर ठेवतांना महाराजांकडून स्वामींपाशीं आलेल्या एका हेराच्या तोंडून ऐकली; ती खबर चंद्रसेनामार्फत ताराबाईच्या कानांवर घालण्यासाठीं त्यानें एवढी चपळाई केली. शाहूमहाराजांना ताराबाई कशी पाण्यांत पाही हें चंद्रसेन व संभाजी ह्या दोघानाही माहीत असल्यानें आणि ताराबाई व शाहू यांच्यांतील वितुष्टाच्या पेटलेल्या होळीवर स्वतःची पोळी भाजून घेण्याचा चंद्रसेनाचा मानस असल्यानें शाहूमहाराजांना वाटेंतच गुप्त रीतीनें गांठून त्यांचा नायनाट करण्याचा एक नीचपणाचा डाव त्यानें आपल्या मनाशीं रचिला असून संभाजीनेंच त्या कामगिरीवर जावयाचें असें ठरलें होतें. हें कपटकारस्थान चद्रसेनाला परस्पर पार पाडतां आलें असतें. पण ताराबाईच्या कानांवर वेळींच ही गोष्ट बोलून ठेविल्यास

शाहूमहाराजांचा निःपात झाल्यास ताराबाईच्या राजवटीला आपल्या भावी यशाचा मार्ग मोकळा होऊन राहील अशा धूर्तपणानें चंद्रसेन ताबडतोब थेट राजवाड्यावर गेला. संभाजीही हरवलेलें पत्र हस्तगत करण्यासाठीं व्यासरावाच्या झोंपडीकडे भागूच्या सांगण्यावरून तपास करण्यासाठीं आला. एवढी मोठी जबाबदारी शिरावर असतांना संभाजी मुक्तेला पाहतांक्षणीं आपलें कर्तव्य विसरून मुक्तेसभोंवार रेंगाळूं लागलेला पाहतांच भागू सर्वांची नजर चुकवून झालेला प्रकार चंद्रसेनाला कळविण्यासाठीं निसटून गेली.

मुक्तेनें संभाजीची मनोवृत्ति चळत असल्याचें प्रथम ताडलें होतें. संभाजीनें जेव्हां तिच्यावर कृतघ्नपणाचा आरोप केला तेव्हां ती म्हणाली, "संभा! त्या पोरपणाच्या गोष्टी थोरपणीं जमेला धरायच्या नसतात. पोरपणीं मी कधीं तुज्या बाजूनें तसें बोललें असेन. वाटेनें चालतांना एखादा मारका बैल माझ्या अंगावर चालून आला तर त्यानें मला शिंगावर घेऊं नये म्हणून मी त्याला बैलदादा म्हणेन. पण म्हणजे त्या बैलोबाविषयीं मला प्रेमाचा पान्हा फुटला असेंच तूं म्हणशील का?"

"मुक्ते! ह्या मला शालजोडींतल्या शिव्या आहेत!" संभाजी मानखंडित होऊन म्हणाला, "पण याद राख, वेळ आली म्हणजे मी ह्याच शिव्यांचें दामदुप्पट माप मोजून तुझ्या पदरांत घालीन.—"

संभाजीला आणखीही कांहीं बोलावयाचें होतें. पण मुक्ता मध्येंच म्हणाली, "तसें झालें तर मग तुझ्यासारख्या—तूं शेखी मिरवतोस त्याप्रमाणें—मातबर मर्दांनीं बरोबरीच्या मर्दांशीं लढायचें सोडून बायकांशीं सामना केला व तुझी तलवार बांगड्यांशीं भांडूं लागली म्हणून जग तुझ्या मर्दुमकीचे पोवाडे गाईल. मग तरी झालें ना!"

पिराजी इतका वेळ 'स्वामींचें पत्र हरवलें आतां कसें करावें, धन्याला तोंड कसें दाखवावें' ह्या फिकिरींत होता. पण मुक्ता व संभाजी यांची भांडाभांड विकोपाला जाऊं लागलेली पाहतांच त्याला त्यांत तोंड घालणें अवश्य वाटलें. तो म्हणाला, "संभा! तुला पुन्हा बजावतों, जरा तोंड आटोपून बोल. आजवर मी तुला माझ्या सख्ख्या

भावाच्या जागीं मानीत आलों; त्या नात्याची मुर्वत राखण्यासाठीं मी शक्य तों पड खातों आहें."

"मुक्तेची खुषामत करण्यासाठीं तुझी ही सारी कारवाई चालली आहे हें सारें मला माहीत आहे. पण तूं, आणि मुक्ते, देखील लक्षांत ठेवा कीं, व्यासराव आमचा पुजारी आहे; तो कांहीं पिराजीला आपला जांवई करणार नाहीं." संभाजी आपल्या कुत्सित नजरेच्या कोंपऱ्यांतून मुक्तेकडे पाहत उद्गारला. त्याच वेळीं पिराजीनेंही तशाच तिरव्या तिखट नजरेनें संभाजीकडे पाहिलें.

मुक्तेनें संभाजीकडे मर्मभेदक दृष्टीनें पाहत विचारलें, "पण तुम्हांला ह्या उठाठेवी कोणीं सांगितल्या आहेत? मी सांगून ठेवतें, असला चावटपणा मला मुळींच खपणार नाहीं."

"मग तुला कसला चावटपणा खपेल तरी?" संभाजीनें विचारलें.

"संभा! तूं मुकाट्यानें इथून चालता हो; नाहींपेक्षां मी तुझ्या बाबांना सांगेन."

या वेळीं आपण नादिष्ट बनल्याचें बापाला कळतांच तो आपली चांगलीच खरडपट्टी काढील असें वाटल्यामुळें मनांतल्या मनांत शरमिंधा होऊन 'बरें आहे; याचें उत्तर तुला लौकरच देईन' अशी मुक्तेला पोकळ धमकी देत संभाजी तेथून निघून गेला. पण जातां जातां पुन्हा एकवार पापी दृष्टीनें मुक्तेकडे व तिरस्काराच्या दृष्टीनें पिराजीकडे पाहण्याला त्यानें कमी केलें नाहीं. तो चार पावलें दूर जातो न जातो तोंच मुक्ता अर्धवट स्वगत व अर्धवट प्रगट अशा गंगाजमनी आवेशानें उद्गारली, "हा मेला माझ्याकडे पाहूं लागला, कीं माझ्या सर्वांगाचा तिळपापड होतो. त्याच्या डोळ्यांत बोटें घालून डोळेच फोडावेसे वाटतात."

संभाजीनें मुक्तेचे बोल ओझरते ऐकले असावे. एरव्हीं तो मागें वळून तरी कां म्हणून पाहता? पण तूं असें कां म्हणालीस असें मुक्तेला विचारण्याचें धाडस मात्र त्याला झालें नाहीं.

## प्रकरण चवथें

# भांडण विकोपास गेलें !

संभाजी निघून गेल्यावर आतां एकमेकांशीं कसें बोलावें असा पिराजी व मुक्ता यांना मोठाच पेंच येऊन पडला. मुक्तेचा पेंच एकेरीच होता; पण पिराजीचा पेंच दुहेरी होता. आतां आपण भांडलों. तेव्हां पिराजी माझ्याशीं बोलेल का एवढीच मुक्तेची चिंता, व तीही फारशी अवघड चिंता नव्हती. कारण पिराजीच्या आजच्या कामगिरीचें सारें श्रेय–स्वामींचें पत्र तिच्या पदरीं होतें; त्या पत्रावर आपण पिराजीची समजूत करूं इतकेंच काय, पण त्याला आपल्यासमोर 'नमो नमो 'ही करायला लावूं असा तिला आत्मविश्वास होता. पण पिराजीची चिंता एक तर संभाजीशीं झगडतांना आपण त्याला पुरा लोळवला नाहीं म्हणून मुक्ता आपल्याला हंसेल ही व दुसरें, ज्या पत्रासाठीं त्यानें आज एवढें जिवाचें रान केलें व ज्याच्या जोरावर नशीब काढून मुक्तेला लाजवण्यासाठीं तो ईर्षेनें तिचा अव्हेर करून तिच्या झोंपडीबाहेर निघाला तें पत्र हरवलें. पलीकडच्या पानपाचोळ्यांत तें पत्र शोधावयाचें तर अजून चंद्रोदय झाला नसल्यानें चांदणें कांहीं पडलें नव्हतें, व मुक्तेपाशीं दिवा मागावा तर तिच्याशीं बोलावें लागतें. !

" पत्र इथेंच कुठें हरवलें असावें. पण तें काळोखांत शोधावयाचें कसें ! " पिराजी इकडे तर स्वगत, पण मनांतून तर तें मुक्तेला ऐकूं जाऊन तिनें दिवा आणावा हा उद्देश, अशा युक्तीनें म्हणाला.

यावर मुक्ता कांहीं बोलणार होती. पण इतक्यांत तिला कोणाचीशी पावलट ऐकूं आली व चुडीचा प्रकाशही दिसला. मुक्ता कोण आलें तें पाहण्यासाठीं तिकडे कान देऊन व डोळे लावून उभी राहिली. तों

तिला भागू व चंद्रसेन यांचें संभाषण ऐकूं आलें. हें कांहींतरी नवें संकट पिराजीच्या बोकांडीं बसण्यासाठीं त्याचा शोध करीत येत असावें असें तिला वाटलें. आतां अबोला धरण्यांत व मौज पाहण्यांत अर्थ नाहीं, हें ओळखून ती लगबगीनें पिराजीपाशीं गेली व त्याच्या कानाशीं लागून म्हणाली, "भागूनें जाऊन चंद्रसेनापाशीं चहाडी केली असावी, म्हणून ते दोघे इकडे येत आहेत. त्या माजलेल्या रेड्यांसमोर तुझा टिकाव लागायचा नाहीं; तूं ह्या मागच्या वाटेनें आपल्या बिऱ्हाडीं जाऊन स्वस्थ झोंप."

"पत्र पत्रांची वाट काय?" पिराजीनें विचारलें.

"पत्रें मी रात्रौ शोधून काढीन. तीं इथेंच कुठें तरी पानपाचोळ्यांत पडलीं असतील, तीं सांपडतील. तीं मी तुझ्या धनीसाहेबांच्या घरीं उजाडतांच पोंचतीं करीन. तुला काळजी करायला नको."

इतक्या धीरानें ज्या अर्थीं मुक्ता बोलते आहे, त्या अर्थीं आपणाला चिंता करण्याचें कारण नाहीं असें समजून पिराजी मुक्तेनें सांगितल्या-प्रमाणें मागच्या वाटेनें निघून गेला. लगेच मुक्तेनें एक कांकडा पेटवून भागूपासून पिराजीनें मिळविलेलें व संभाजीबरोबरच्या झग-ड्यांत चोळामोळा करून दूर फेंकून दिलेलें पत्र शोधून काढलें व स्वामींचें आणि तें अशीं दोन्ही पत्रें बंदोबस्तानें निऱ्यांत खोंचून ठेवून दिलीं.

पिराजीला जाऊन थोडा वेळ होतो न होतो तोंच तिच्या अटकळी-प्रमाणें चंद्रसेन, संभाजी व भागू तेथें येऊन थडकले. संभाजी त्यांना वाटेंतच भेटला. मुक्ता त्यापूर्वीच आपल्या झोंपडींत येऊन कपिलेच्या दुखावलेल्या पायांना हळद उगाळून लावण्याच्या धांदलींत होती.

चंद्रसेनानें हांक मारून विचारलें, "व्यासराव आहेत का?"

"नाहीं. आजोबा गणपतीला गेले आहेत. ते आतां इतक्यांत येतील." मुक्तेनें दरवाजांतून बाहेर आकाशाकडे डोकावून पाहत म्हटलें, "ते यायला झालेच. बाहेर चंद्रोदयाची वेळ झाली."

"बरें; पिराजी कुठें आहे?" चंद्रसेनानें विचारलें.

"तो बाळाजीपंतांच्या घरीं निघून गेला." मुक्ता उत्तरली.

"हरामखोर!" चंद्रसेन एकदम खवळून म्हणाला, "दगाफटका करून पळून जातो काय?"

संभाजीला मुक्तेचा विश्वास पटेना. तो हळूच चंद्रसेनाला म्हणाला, "आतां थोड्या वेळापूर्वी तो इथें होता आणि इतक्यांतच कसा गेला? घरांत नाहींना लपला?"

"मुक्ते! तूं ढालगज आहेस. तूं त्याला सामील आहेस हें आम्हांला माहीत आहे." चंद्रसेन म्हणाला.

"मीं काय केलें?" मुक्ता मानखंडित होऊन दुखवलेल्या नागिणी-प्रमाणें वर मान करून म्हणाली, "गरिबाची मुलगी दिसली म्हणून तिला उगाच ठेवूं नयेत तशीं नांवें ठेवायचीं तीं!"

चंद्रसेन मुक्तेच्या बोलण्याकडे लक्ष न देतां संभाजी व भागू ह्या दोघांना म्हणाला, "जा, आंत जा आणि पिराजी आंत लपून बसला असेल तर पाहा."

चंद्रसेनाच्या शद्बाची पडत्या फळाची आज्ञा घेऊन संभाजी व भागू झोंपडींत शिरले. मुक्तेला हें मुळींच आवडलें नाहीं. पण चंद्र-सेनाच्या शद्बावर प्रतिशद्ब बोलण्याची तिची छाती नव्हती. तरी पण तिनें एवढें सांगितलें, "पिराजी आंत नाहीं, मी सांगतें. इतकेंही करून तुम्हांला त्याचा शोध करण्यासाठीं आंत जायचेंच असेल, तर आतां आजोबा येतील, तोंवर थांबा."

पण मुक्तेचा शद्ब कोण मानतो! संभाजी व भागू बेलाशक आंत घुसले व चुडीच्या प्रकाशांत इकडे तिकडे पिराजीचा शोध करूं लागले. ते माजघरांतून कोठडीच्या खोलींत गेले व आतां देवघरांत जाणार, असें पाहतांच मात्र ती म्हणाली, "हं! देवघरांत मात्र जाऊं नका."

संभाजी व भागू यांना वाटलें कीं पिराजी देवघरांत दडून बसलेला असावा, म्हणून मुक्ता असें सांगते आहे. ते मुद्दाम देवघरांत घुसले.

"संभा! काय हें! ब्राह्मणाचें देवघर तुम्हीं असें विटाळायचें? मीदेखील कधीं देवघरांत पाय ठेवीत नाहीं." मुक्ता म्हणाली.

पण मुक्तेचे बोल कोण मानतो! संभाजी व भागू आंत घुसावयाचे ते घुसलेच. तो भ्रष्टाचार देवांना मानवला नाहीं म्हणूनच कीं काय, भागूच्या हातांतील चुडीची झळ झोंपडीच्या छप्परावरील ओळंबत्या गवताला लागून त्यानें पेट घेतला. तेवढ्यांत व्यासराव आला. पाहतो तों झोंपडीचा होम चालला आहे. सर्वांनीं लागून ती आग एकदांची थोडक्यांत विझविली. कपिला मात्र त्या आगींतच भाजून मरावयाची; पण त्यांतल्या त्यांत मुक्तेनें चपळाई करून तिला मात्र कशीबशी वांचविली.

"आग कशी लागली?" व्यासरावानें आग विझाल्यावर मुक्तेला विचारलें.

संभाजी व भागू यांच्याकडे बोट दाखवून मुक्ता खिन्न स्वरानें म्हणाली, "हे दोघे हातांत चुडी घेऊन देवघरांत शिरले तेव्हां नजर चुकून चुडीनें आग लागली."

"पण यांना देवघरांत जाण्याचें काय कारण होतें?" व्यासरावानें संतापून दुर्वासाचा अवतार धारण करीत विचारलें.

गुन्हेगारांच्या गुन्ह्यांचें समर्थन करण्यासाठीं चंद्रसेनानें पिराजीच्या अपराधाची गोष्ट तिखटमीठ लावून व्यासरावाला सांगितली व शेवटीं ह्या प्रकरणाची बनावट सारवासारव केली, "पिराजी व त्याचा धनी बाळाजीपंत हे ताराबाई आईसाहेबांविरुद्ध शत्रूला फितूर आहेत ही बातमी आईसाहेबांना कळतांच त्यांना विलक्षण संताप आला, व त्या संतापाच्या भरांत त्यांनीं पिराजी, मुक्ता आणि तुम्ही अशा तिघांनाही पकडून आणण्याचा मला हुकूम दिला आहे. तसेंच पिराजीनें संभाजीपासून बळजबरीनें घेतलेलें पत्र जर मुक्ता किंवा पिराजी यांनीं झोंपडींत कोठें लपवून ठेवलें आहे हें त्यांचीं तीं सांगत नसतील तर झोंपडी जाळून टाकावी असेंही आईसाहेब म्हणाल्या."

"म्हणून तुम्हीं माझी झोंपडी जाळली वाटतें!" व्यासरावानें

विचारलें, "आणि झोंपडी जाळतांना देवांनाही बाटवून जाळावें असें आईसाहेबांनीं सांगितलें होतें वाटतें? ज्यांनीं अरेरावीनें भ्रष्टाचार करून देवाला बाटविलें व देवघर जाळून उध्वस्त केलें, त्यांचें आयुष्य तसेंच उध्वस्त होईल." व्यासराव वैतागून म्हणाला.

"व्यासराव, जीभ इतकी सैल सोडूं नकोस. कोणाला शिव्याशाप देत आहेस याचा विचार कर. ज्यांच्या अन्नावर जगतोस, त्यांच्यावर असा सर्पासारखा उलटून कृतघ्न होऊं नकोस." संभाजी संतापून मुक्तेकडे बोट दाखवून म्हणाला, "हा सारा त्या पोरीचा प्रताप आहे. तिला पिराजीशीं चावटपणा करीत बसायला पाहिजे—"

"चंद्रसेन!" व्यासराव म्हणला, "मी तुमचें अन्न खातों हें तर खरेंच; पण म्हणून काय तुमच्या रांडापोरांनीं मला अशीं उणीं उत्तरें बोलावीं?"

"माझें उणें काढण्यापूर्वी मला सांग, मुक्ता व पिराजी हीं तुझीं नातवंडें कोणत्या जातकुळीचीं आहेत बरें?" संभाजीनें विचारलें.

"पोटासाठीं असले मरणप्राय अपमान सहन करावयाचे, त्यापेक्षां पोटाला बिब्बा घालून मरण पत्करलेलें काय वाईट! बस्स! आजपासून मला कोणाचाच आधार नको आहे. राजवटीची नियत सुटली म्हणून राजद्वारीं गोंडा घोळणारे अरेराव असे मातून देवांब्रह्मणांची पायपोसजपूजा करूं लागले. राणी काय म्हणाली; त्या पोराच्या यःकश्चित् चुकीबद्दल व्यासरावाला व त्याच्या पोरीलादेखील कैद करा आणि त्याची झोंपडी जाळा? राणीला म्हणावें, गोरगरिबांना हकनाक छळणारे व देवांब्राह्मणांचा अपमान करणारे अपशकुनी कावळे जे तुझ्या पदरीं आहेत, त्यांना वेळींच दूर करण्याची सद्‌बुद्धि तुला सुचावयाची नाहीं, व माझ्या झोंपडीची जशी राखरांगोळी झाली तशीच तुझ्या सत्तेचीही राखरांगोळी होईल! आज चतुर्थी आहे. आज साऱ्या दिवसाचा उपवासी ब्राह्मण तळतळत परागंदा होतांना तुला शिव्याशाप देतो आहे. ते कधींच अस्थानीं व्हावयाचे नाहींत. —चल ग मुक्ते!"

व्यासराव आवेशाच्या भरांत जें बोलूं नये तें बोलून निघाला; त्याच्या मागोमाग मुक्ताही निघाली. पण चंद्रसेन त्यांना थोडेंच जाऊं देतो! त्यानें संभाजी व भागू यांना आज्ञा केली, "आजची रात्र त्यांच्यावर नजर असूं द्या. उद्यां आईसाहेबांना सांगून यांचा काय निकाल करावयाचा तो करूं. तोंवर पिराजी हातीं सांपडला तर बरेंच झालें."

संभाजीला तरी तेंच पाहिजे होतें. त्याला मुक्तेशीं कोणत्या ना कोणत्या निमित्तानें हक्कानें बोलावयाचें होतें. व्यासराव व मुक्ता यांना संभाजी व भागू ह्या दोघांना सांभाळावयाला सांगून चंद्रसेन निघून जातांच संभाजीनें मोठ्या तोऱ्यानें मुक्तेला विचारलें, "मुक्ते! आतां तरी तूं माझ्याशीं लग्न करण्याला तयार होशील कीं नाहीं?"

व्यासरावाचें मन एथवरचा अपमान सहन करतां करतां अत्यंत खिन्न झालें होतें. तशांत तो पडला पंचावन्न वर्षांचा म्हातारा व परिस्थितीनें गांजलेला! आपल्या बाबतींत होत असलेल्या अन्यायाचा आंगच्या शक्तीच्या जोरावर प्रतिकार करूं म्हणेल तर तें त्याला शक्य नव्हतें. शिवाय आजच्या मराठशाहींतील न्याय त्याला पूर्णपणें माहीत होता. कावळ्याची दृष्टि जशी नेमकी व्रणावर असावयाची तशी संभाजीची दृष्टि व्यासरावाच्या प्रतिकूल परिस्थितीवर खिळून बसली होती. आधींच व्यासराव राणीला बोलूं नये तसलीं दुरुत्तरें बोलून गेला होता; तें त्याचें वर्म धरून त्यानें मुक्तेला हस्तगत करण्यासाठीं त्याला परोपरीनें भेवडावण्याला सुरुवात करून पिराजीविषयीं त्या दोघांच्याही अंतःकरणांत विष ओतण्याचा प्रयत्न केला. व्यासरावाला तें खरेंच वाटलें. मुक्तेला मात्र तें पटलें नाहीं; पण राजकाजाच्या दृष्टीनें पिराजीनें भागूपासून पत्र घेण्यांत मोठाच अपराध केला असून चंद्रसेन व संभाजी मनांत आणतील तर खरोखरच राणीचे कान फुंकून तिच्या कोपाच्या वणव्यांत पिराजीला आणि त्याच्या लाग्याबांध्याच्या इतर माणसांना जाळून नामशेष करूं शकतील याविषयीं तिला संदेह नव्हता. हा अनर्थ टाळावयाचा तर संभाजी-

च्या निर्लज्जपणाच्या मागणीला ह्या वेळेपुरती मान तुकविण्याशिवाय गत्यंतर नाहीं असें ओळखून ती त्याला म्हणाली, "संभा! मी मघां रागाच्या भरांत जें बोललें तें तूं मुळींच मनावर घेऊं नकोस. माझ्या लग्नाविषयीं तुझ्या बाबांचें माझ्या आजोबांशीं एकवार बोलणें झालेलें आहेच; आणि त्याला मी कबूलही आहें. पण त्याच त्याच गोष्टी पुनः पुन्हा बोलूं लागलें म्हणजे मात्र मला राग येतो. आणि दुसरें असें पाहा, पिराजी झाला तरी आपलाच खेळगडी ना! त्याला वांचविणें आपलें काम नाहीं का?"

मुक्तेच्या मायावी बोलांनीं संभाजी तेव्हांच फंसला. तो म्हणाला, मुक्ते! तूं हें खरें बोलतेस ना?"

"होय." मुक्ता उत्तरली.

"तर मग तुझ्यासाठीं मी काय वाटेल तें करीन; आणि पिराजी व व्यासराव यांच्या केंसालाही धक्का लागूं देणार नाहीं." संभाजी म्हणाला.

"पाहा बरें!" मुक्ता ओढून ताणून स्मित करीत पण अंतःकरणांतून संभाजीच्या नांवानें जळत म्हणाली, "माझ्या गळयाची शपथ तूं आपल्या शद्बाला जागशील ना?"

"हो! तुझ्या गळयाची शपथ!" संभाजी उत्तरला.

## प्रकरण पांचवें

# बाळाजीपंतांच्या घरीं

"कोण, पिराजी!" बाहेरून दरवाजा कोणीसा वाजविल्याचा भास झाला, तेव्हां बाळाजीपंतांना वाटलें, कीं पिराजीच आला; म्हणून ते 'पिराजीच आला असावा' असें दादासाहेबांना-बाळाजीपंत भानूंना—उद्देशून पुटपुटत उठून दरवाजाची कडी काढायला निघाले. दादासाहेब व बाळाजीपंत बुद्धिबळांचा डाव खेळत होते. बाळाजीपंतांचा डाव बराचसा हुकल्यामुळें आणि दादासाहेबांचा डाव जोरांत असल्यामुळें प्रतिपक्षावर प्यादी कशी करावी ह्या विचारांत दादासाहेब दंग होऊन गेले होते. त्यामुळें बाळाजीपंत उठले कशाला व पुटपुटले काय, इकडे त्यांचें मुळींच चित्त नव्हतें. बाळाजीपंतांचा डाव तरी हुकला याचें कारण, आज डावांत त्यांचें मुळींच चित्त नसून अजून पिराजी कसा आला नाहीं याची चिंता करतां करतां चित्ताला लागलेली बोंचणी जराशी थांबविण्यासाठीं त्यांनीं बुद्धिबळाचा डाव मांडला होता इतकेंच. पण खरें पाहिलें तर त्यांच्या डोक्यांत आज दोनचार दिवस एक निराळाच महत्वाचा डाव—मराठशाहीच्या राजकारणाचा आणीबाणीचा डाव—घोळत होता. दिल्लीच्या बादशहाच्या कैदेंतून शाहूची सुटका होणार अशा बातम्या अलीकडे गांवगन्ना उठल्या होत्या. शाहू हा छत्रपति संभाजीचा औरस पुत्र असल्यानें तो आतां येऊन मराठी राज्यावर आपला हक्क सांगणार हें कोणालाही न सांगतांदेखील कळण्यासारखें होतें. आणि राजमाता ताराबाई मराठी राज्याचीं सूत्रें सुखासुखी शाहूच्या हातीं लागूं देणार नाहीं, हेंही तिककेंच खरें होतें. अशा स्थितींत बाळाजीपंतांना आतां मोठी दुग्धा पडली होती कीं, जर शाहू सुटून आला व राजसत्ता मागूं

लागला तर, आपण आपल्या राजनिष्ठेचीं छत्रचामरें कोणाच्या मस्तकीं ढाळावयाचीं; ताराबाईच्या पोटीं जन्मलेल्या वेड्या शिवाजी-च्या कीं शाहूच्या !

असा एखादा अवघड पेंच पडला, कीं आपले गुरु ब्रह्मेंद्रस्वामी यांना विचारून त्यांच्या अनुज्ञेप्रमाणें काय तें करावयाचें, असा बाळाजीपंतांचा कोंकणपट्टी सोडून देशावर आल्यापासूनचा परिपाठ होता. स्वामी आपलें कोंकणप्रांतींच्या परशरामक्षेत्रींचें वास्तव्य सोडून आपल्या शिष्यपरिवारासह साताऱ्यापासून अडीच-तीन कोसांच्या अंतरावर निसर्गसुंदरीच्या दिलप्याच्या अशा धावडशी खेड्यांत मठ बांधून राहिले होते. *वेळदूरच्या भार्गवगुंफेंत स्वामींचें वास्तव्य असतां बाळाजीपंतांवर देशत्यागाची आपत्ति कोसळली व त्या वेळीं त्यांना स्वामींनीं शुभाशीर्वाद देऊन त्यांचें गुरुत्व पत्करिलें; तेव्हांपासून आज-वरच्या आठनऊ वर्षांच्या काळांत बाळाजीपंत व स्वामी ह्या उभय-तांच्याही आयुष्यांत अनेक महत्वाच्या घडामोडी झाल्या होत्या. बाळाजीपंतदेखील क्रमाक्रमानें भाग्योदयाच्या रमणीय प्रांतांत एकेक पाऊल पुढें टाकीत चालले होते. ते आपल्या ऋणानुबंधी त्रिवर्ग भानूंसह प्रथम श्रीवर्धन सोडल्यावर उत्तरतिवरा घाटानें सासवड येथें अंबाजीपंत पुरंदरे यांच्या आश्रयाला आले; तेथून अंबाजीपंतांच्या ओळखीनें मोगलाईत शेंपांचशें स्वार पदरीं बाळगून मामलत करतां करतां परशराम त्रिंबक प्रतिनिधि, शंकराजी नारायण वगैरे मराठशाहीं-तील मोठमोठ्या लोकांशीं त्यांची ओळख झाली. हीच ओळख पुढें त्यांना धनाजी जाधव याच्या पदरीं आश्रय मिळविण्याला उपयोगीं पडली. धनाजीला बाळाजीपंतांच्या आंगच्या कर्तबगारीची साक्ष पटण्यास उशीर लागला नाहीं. धनाजीच्या कृपेनें बाळाजी-पंतांच्या कर्तबगारीचा परिमल मराठशाहीच्या वातावरणांत दिवसें-दिवस जास्त जास्त दरवळूं लागला. पण त्या परिमल पुष्पाला निसर्ग-

*टीप : 'पेशवाईचें पुण्याहवाचन' ही पहिली कादंबरी पाहा,

नियमाप्रमाणें कीड लागावयाची टळली नाहीं. धनाजीचा चंद्रसेन हा बाळाजीपंतांचा समवयस्क होता. तो बापासारखा पराक्रमी; पण पट्टीचा खुनशी, विषयलंपट, व दुराचारी असा कोत्या मनाचा दुरात्मा होता. चंद्रसेनाच्या आंगचे हे दोष धनाजी पूर्णपणें ओळखून असल्यानें त्यानें परोपरीच्या लोकहिताच्या व पराक्रमाच्या कामीं आंधळ्या अपत्यप्रेमाला बळी न पडतां चंद्रसेनाऐवजीं बाळाजीपंतांवरच जास्त विश्वास टाकावा, व पित्याच्या ह्या करणींत चंद्रसेनाला पक्षपात दिसून त्यानें बाळाजीपंतांचा मनांतून मनमुराद हेवादेवा करावा! हा हेवादेवा हळुहळू इतक्या थराला जाऊन पोंचला कीं, बाळाजीपंतांनीं अमूक गोष्ट केली म्हणूनच चंद्रसेनानें त्यांच्या विरुद्ध गोष्ट करावयाची. बाळाजीपंतांच्या सहवासांत धनाजी ब्रह्मेंद्रस्वामींना मानूं लागला, म्हणूनच चंद्रसेनानें स्वामींना न जुमानण्याचें कंकण हातीं बांधलें. स्वामींच्या सल्ल्यानें बाळाजीपंत व धनाजी कधीं कधीं अलम् मराठी दुनियेच्या हिताकडे लक्ष देऊन ताराबाईच्या स्वार्थमूलक कारभाराला आपल्या अधिकारांत शक्य तेवढा पण सौम्य विरोध करीत, म्हणूनच चंद्रसेन केवळ ताराबाई जें जें कांहीं करील त्याला त्याला सरास पाठिंबा देण्याला एका पायावर तयार असावयाचा! आजदेखील शाहूमहाराजांना तोतया किंवा दिल्लीपतीचा गुप्त हेर ठरविण्याच्या ताराबाईच्या प्रयत्नांत धनाजी व बाळाजीपंत यांच्याकडून ऐन वेळीं विरोध होण्याचा संभव आहे असें आजूबाजूच्या हालचालींवरून आगाऊ ओळखून आपण ताराबाईच्या मताला दुजोरा द्यावयाचा, असा बेत चंद्रसेनानें अगोदरच आपल्या मनाशीं ठरवून ठेविला होता. कोणत्या ना कोणत्या उपायानें चंद्रसेनाला आपल्या वाटेंतील बाळाजीपंतांचा कांटा दूर करावयाचा होता; त्यासाठीं मराठशाहीच्या आंगांत बदकरणीचे कितीही कांटे खुपसून तिला रक्तबंबाळ करावें. लागलें तरी त्याला त्याची ना नव्हती.

पिराजी जो काल रात्रौ धावडशीला गेला, तो ज्या अर्थी इतका वेळपर्यंत आला नाहीं, त्याअर्थी तो आतां स्वामींची चिठ्ठी घेऊनच

आला असेल, असें मनांत म्हणत बाळाजीपंत दरवाजापाशीं जातात न जातात तोंच त्यांच्या लहानग्या बाजीरावानें पुढें येऊन दरवाजा उघडला होता, व तो एका चौदा-पंधरा वर्षांच्या मुलीशीं बोलत उभा होता.

"हें काय? दरवाजा कोणीं वाजविला?" बाळाजीपंतांनीं त्या बालिकेकडे पाहत कपाळाला आंठ्या पाडून तिरस्कारानें विचारलें, "मुक्ते! दरवाजा तूं वाजविलास काय?"

"होय!" मुक्ता भीत भीत उत्तरली.

"पिराजी आला का?" बाळाजीपंतांनीं बाजीरावाला विचारलें.

"हो आला." मुक्ता मध्येंच हळूच उत्तरली. तिनें लाजल्या-सारखें करून खालीं मान घातली.

"आणि तूं ग या वेळीं इकडे कशाला आलीस? आजोबांनीं पाठविली काय?" बाळाजीपंत मुक्तेच्या सुंदर अधोवदनाकडे व कपिलेच्या कोमल चर्येकडे अंमळ कौतुकानें पाहत म्हणाले, "आतां बरी तुझ्या आजोबांना आमची गरज लागली?"

"पण मला आजोबांनीं पाठविलेंच नाहीं!" मुक्ता करारी स्वरांत उत्तरली.

बाळाजीपंतांचा टोमणेवजा प्रश्न व त्या प्रश्नाला मुक्तेनें दिलेलें खणखणीत जशास तसें उत्तर ह्या दोहोंच्याही मुळाशीं दोघांच्याही अंतःकरणांत पाया घालून बसलेल्या बाणेदारपणाचें मूळ फार खोल-वर होतें. मुक्ता व पिराजी यांची कुळकथाही अशीच संदिग्ध होती. ह्या संधिग्धपणाचा पायाही फार खोल होता. व्यासराव हा मुक्ता व पिराजी यांचा आजोबा होता. व्यासराव हा जातीचा कनोज-कडील ब्राह्मण. त्याचीं मुक्ता व पिराजी हीं नातवंडें कशीं कोण जाणे! व्यासराव हा पूर्वी केव्हांतरी मोंगलाई सोडून मराठशाहींत आला अशी वरवर जनवार्ता होती. तो स्वतःही केव्हां केव्हां सांगे का, 'आपण छत्रपति संभाजीमहाराजांच्या कारकीर्दीत कबजीबाबांच्या चलतींत त्यांच्याबरोबर मराठमुलखीं आलों, व मुक्ता आणि पिराजी

हीं दोन आपलीं भावंडें. यापेक्षां त्यानें त्या नातवंडांच्या जातकुळी-विषयीं कोणाला कांहीं सांगू नये, व लोकांनीं त्यांच्याविषयीं भलभलते तर्ककुतर्क चालवावे. कोणीं म्हणावें हीं दोघेंही ब्राह्मणाचीं मुलें आहेत, व कोणी आणखी कांहीं म्हणावें. व्यासराव धनाजी जाधवाकडे पुजारीपण पत्करून राहिल्यास आज उणीं पुरीं आठ वर्षें झालीं होतीं. तो प्रथम धनाजीच्या पदरीं आला तेव्हां सातआठ वर्षांची मुक्ता व अकरा बारा वर्षांचा पिराजी हीं नक्षत्रांनाही लाजविणारीं दोन नक्षत्रें त्यांच्या पदरीं असलेलीं सर्वांना माहीत होतीं. ह्या दोघां अर्भकांचें संगोपन करणारी म्हाळसा या नांवाची एक तरुण व सुंदर विधवा व्यासराव धनाजीच्या पदरीं येऊन एक-दीड वर्ष होईतों त्यांच्याबरोबर होती. त्यानंतर ती धनाजी व चंद्रसेन यांच्या भयानें असो किंवा आणखी कांहीं कारणामुळें असो, कोठें तरी दूर अज्ञात अशा ठिकाणीं निघून गेली, तरीही ती व्यासरावाची व मुलांची कोण हें कांहीं कोणाला कळलें नाहीं. कोणी म्हणत ती मराठा विधवा होती व कोणी म्हणत ब्राह्मण विधवा होती. खुद्द व्यासराव याबद्दल तोंडावाटे कधीं ब्रदेखील काढीत नसे. ती व्यासरावापाशीं होती तोंपर्यंत पिराजी व मुक्ता हीं दोन्ही मुलें मात्र तिला 'आई' अशी हांक मारीत. व्यासरावाच्या मुग्धपणामुळें त्याच्यावर व म्हाळसेवरही जनापवादाचे शिंतोडे चारी बाजूंनीं उडत असत. कांहीं कांहीं उपद्व्यापी लोकांनीं तर व्यासराव हा आचारभ्रष्ट ब्राह्मण आहे यास्तव त्याला पुजाऱ्याचें काम सांगणें योग्य नाहीं असे धनाजीचे कान फुंकण्यालाही कमी केलें नव्हतें. पण धनाजीनें असल्या रिकामटेकड्या जनापवादाच्या विषानें आपलें अंतःकरण विखारूं न देतां उदार मनानें व्यासरावाला आपल्या पदरीं आश्रय दिला होता. लोकें बोलत तीं तरी व्यासरावाचा किंवा म्हाळसेचा दुष्टावा साधण्यासाठीं बोलत असें नाहीं. व्यासरावाच्या घरीं जरी म्हाळसा राही तरी ती पुष्कळच मर्यादेनें वागे. व्यासरावाच्या देवांना तिच्या हातचा नैवेद्य कधीं चालत नसे. ती गेल्यावर मुक्ता मोठी होऊन वावरूं लागली तरी ती

देखील तिच्या आईनें घालून दिलेला कित्ताच गिरवी. म्हाळसा गेल्यावर पिराजी व मुक्ता यांचा भार एकट्या व्यासरावावरच पडला. पुढें धनाजीच्या घरीं नोकरी करतां करतां बाळाजीपंतांची व व्यासरावाची ओळख झाली व धनाजीच्या प्रोत्साहनानें बाळाजीपंत दिवसेंदिवस योग्यतेला चढूं लागले. तेव्हां पिराजीची तडफ पाहून त्यांचा त्याच्यावर लोभ जडला व त्यांनीं त्याला आपल्या पदरीं हुजऱ्या म्हणून नोकरीला ठेवून दिलें. बाळाजीपंतांना तेवढा धनाजी जवळ करतो व आपला तिरस्कार करतो अशी कुढ्या भावाच्या चंद्रसेनाची दिवसेंदिवस समजूत होऊं लागल्यानें त्यांच्यांत वैमनस्य उत्पन्न झालें व व्यासराव कांहीं काळपर्यंत तरी ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी ह्या न्यायानें कांहींसा चंद्रसेनाच्या तंत्रानें वागूं लागला. हें पिराजीला मुळींच आवडेना. पण त्याची आवडती मुक्ता व्यास रावाच्या ताब्यांत असल्यानें व एरव्हीं व्यासराव कसा झाला तरी त्याचा आजोबा असल्यानें त्याला त्याच्याशीं उघड उघड फटकून वागण्याचें धैर्य होईना. ह्या अंतस्थ गृहकलहांत बिचाऱ्या मुक्तेची मात्र कुचंबणा होत असे. असल्या गृहकलहांचें मर्म ओळखण्याइतकी ती दिवसेंदिवस जाणती होऊं लागतांच ती शक्य तों सर्वांशीं नमल्या नुरानें वागून आली वेळा साजरी करी. पण ती वयांत आल्यावर तिला आपली सून करण्यासाठीं चंद्रसेन व्यासरावाशीं संधान बांधूं लागला तेव्हां मात्र तिला मोठा पेंच येऊन पडला कीं, आपणाला आपल्या इच्छेविरुद्ध संभाजीची बायको व्हावें लागणार कीं काय!

बाळाजीपंतांनीं व्यासरावाविषयीं तिरस्कार दर्शविण्याच्या हेतूनें 'आतां बरी तुझ्या आजोबांना गरज लागली' असे आढ्यतेनें उद्गार काढले, तेव्हां मुक्तेनें आपल्या आजोबांची इभ्रत राखण्यासाठीं 'मला आजोबांनीं पाठविलें नाहीं' असें मानी मुलीला साजेसें बाणेदार उत्तर दिलें. तें ऐकून बाळाजीपंत व दरवाजांत उभा असलेला बाजीराव हे दोघेही क्षणभर चकित झाले. मुक्तेला मात्र वाटलें कीं, आपल्या

तोंडून ताठरपणाचे शद्ब निघाले, म्हणून ती दुसऱ्याच क्षणाला नरम-ल्यासारखी झाली.

"मग तूं इकडे कशाला आलीस?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

"आपणाला देण्यासाठीं पिराजीनें दोन पत्रें दिलीं आहेत" असें म्हणून मुक्तेनें आपल्या जुन्या लुगड्याच्या निऱ्यांतून पूर्वोक्त दोन्ही पत्रें काढून बाळाजीपंतांच्या हातीं दिलीं.

"मग इतका वेळ स्वस्थ कां राहिली होतीस?" असें विचारून बाळाजीपंतांनीं पत्रें आपल्या हातीं घेतलीं, तों त्यांपैकीं एक चुरगळलें असून दुसरें कांहींसें फाटलेलें होतें. तें पाहून ते म्हणाले, "हें काय! हीं पत्रें फोडलीं कोणीं? तूं फोडलींस?"

"छे! मीं नाहीं फोडलीं." मुक्ता करारी शद्बांत उद्गारली. बाकी, मुक्ता जरी पत्रें फोडल्याचें नाकबूल करती ना, तरी तिच्या गालांवर स्वाभिमानाची व चिडखोरपणाची लाली लालावूं लागलेली पाहून कोणींही असाच तर्क केला असता कीं, हिनें लखोटा उघडला नाहीं.

"तर मग कोणीं फोडलीं? पिराजीनें?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

"नाहीं. त्यानेंही फोडलीं नाहींत."

"मग तूं हें मला कां नाहीं सांगितलेंस?" बाजिरावानें आपण पिराजीचे धनी आहों ह्या गोष्टीची मनांत जाणीव ठेवून कांहींशा अधिकारी थाटानें विचारलें.

"धनीसाहेबांशिवाय कोणालाही पत्राची गोष्ट सांगूं नको असें पिराजीनें मला बजाविलें." मुक्ता बाजीरावाकडे पाहत उत्तरली. 'आणि मी धनीसाहेब नव्हे कीं काय?' अशा आशयाच्या ऊर्मि तेव्हां बाजीरावाच्या अंतःकरणांत उसळूं लागल्या. व मुक्ता पिराजी-च्या शद्बाला एवढा मान देते ती कां, असा नवा विचारही त्याच्या मनांत घोळूं लागला.

प्रकरण सहावें

# गुरुमाउलीचा आशीर्वाद

बाळाजीपंतांनीं स्वामींचें पत्र उघडून वाचलें:—

संतवचनीं विश्वास ठेविंजे
भावो तेथें देवो जाणिजे
जीवमात्रीं समत्व राखिंजे
पुरुषार्थ प्राप्त होय जेणें १
त्रस्त ग्रस्त पीडित जन वोळखिंजे
छत्र तयां शिरीं न्यायनीतीचें पैं धरिंजे
त्रयलोकीं ज्यांकारणें कीर्तिडंका गर्जे
पराक्रम ऐसें करणें २
तीन त्रिकाळ सत्याचरण करिंजे
मान धनाचा व्यामोह अव्हेरिंजे
न अन्य साधना चोखटी जं
वैखरी नोहे अन्यथा ३
भगवदिच्छा म्यां संबोधिली जे
वरदहस्त तो भगवंताचा मानिंजे
शारदावराचीं चरणाम्बुजें
लीनभावें वंदिंजे अहर्निशीं ४
होइंजे विजयी प्रतिभूपति
हा आशीर्वादो तुजप्रती
वरकड बोलणें नलगे संप्रतीं
रहस्य रसिकें वोळखावें ५

पत्र वाचतां वाचतां बाळाजीपंतांच्या चेहऱ्यावर एकीहून एक

जोराच्या अशा आनंदाच्या लहरी उमटत होत्या. त्यांना पत्र वाचून समाधान झालेलें पाहून मुक्तेचेंही समाधान झालें. पिराजीनें आणिले-ल्या पत्रानें त्याच्या धन्याचें समाधान झालें, हें कदाचित् तिच्या समाधानाचें कारण असेल!

"आणि हें दुसरें पत्र कोणाचें?" बाळाजीपंतांनीं दुसरें चुरगळ-लेलें पत्र उघडून पाहतां पाहतां विचारलें.

मुक्तेनें त्या पत्राविषयीं जेवढी माहिती तिला स्वतःला होती तेवढी सांगितली. तेवढ्यांत बाळाजीपंतांनींही पत्र वाचून पाहिलें. त्यांतील प्रत्येक ओळ वाचतांना त्यांची मुद्रा जास्त जास्त लालावत होती. पत्र वाचून होतांच त्यांनीं तें घडी करून आपल्या बाराबंदीच्या खिशांत ठेवीत तोंडावाटे उद्गार काढले, "अरे हरामखोरांनो! तुम्ही इतके पाताळयंत्री आहां काय?"

"असें त्या पत्रांत आहे तरी काय?" मुक्तेनें भीत भीत खालच्या मानेनें विचारलें.

"जा! त्यांत तुला सांगण्यासारखें कांहीं नाहीं." बाळाजीपंत लगेच बाजूला तोंड फिरवून म्हणाले, "पिराजीला गोत्यांत आणण्या-चा त्या संभ्याचा बेत होता काय? आणि आतां म्हणे हे राणीच्या वतीनें शाहूमहाराजांच्या वाटेंत उभे राहून त्यांच्या जिवावर मारे-करीसे उठणार. मुक्ते! तुझी मात्र शाबास! हें पत्र हातीं राखून ठेवण्यांत तूं जी दक्षता दाखविलीस, त्या कामगिरीबद्दल मी तुला काय बक्षिस देऊं?"

"मला स्वतःला कांहींसुद्धां नको. फक्त पिराजीला तेवढा संभाजी-च्या कांटेरी काव्यांपासून सांभाळा. त्याचें कल्याण झालें, कीं त्यांतच माझें कोटकल्याण झाल्याइतका आनंद मला होईल." मुक्ता लाजत कपिलेला कुरवाळीत म्हणाली, "बाकी, तसें खरें पाहूं गेल्यास हा पराक्रम खरा आहे माझ्या कपिलेचा. तिनें वेळींच पत्र लांबविलें नसतें तर तें कांहीं आपल्या हातीं लागलें नसतें."

"होय का! मग प्रथम तिलाच बक्षीस दिलें पाहिजे. तें आपण

शाहूमहाराज आल्यावर पाहूं. पण तूं चंद्रसेनाला व संभाजीला इतकी कां भितेस? आम्ही तुझे पाठीराखे आहों ना?" बाजिरावानें बाळाजी-पंतांकडे पाहत विचारलें.

"त्याला भ्यायला माझें अडलें आहे डाव्या पायांतलें खेटर!" मुक्ता आवेशानें आपला डावा पाय जमिनीवर आपटीत म्हणाली, "वाघ म्हटलें तरी खातो नि वाघोबा म्हटलें तरी खातो. मग त्याला वाघ्या कां म्हणूं नये? पण मी भित्यें ती एवढ्याचसाठीं कीं, माझ्या आजोबांचा स्वभाव आहे अंमळ भित्रा. त्यांना चंद्रसेनासारख्या कुत्र्यांनीं कांहींच्याबाहीं सांगावें व पराचा पारवा व्हावा!"

"बरें आहे; त्याची तूं मुळींच काळजी करूं नकोस. मी त्या कुत्र्यांचा योग्य तो बंदोबस्त करितों." असें म्हणून बाळाजीपंत आत निघून गेले. लगेच मुक्ताही बाहेर निघून गेली.

"नाना!" बाळाजीपंत आंत आलेले पाहून रामाजीपंत बुद्धि-बळाच्या पटावरून नजर ढळवून त्यांच्याकडे पाहत म्हणाले, "चला या. आतां पाहा चार हातांत कशी खाशी प्यादी करतों ती?"

बाळाजीपंत हातांतील पत्राकडे पाहत म्हणाले, "आतां तुम्ही कसली प्यादी करतां? आम्हीं डाव जिंकला."

"तो कसा काय?" रामाजीपंतांनीं विचारलें.

"आतां तुमच्या वजिराला इरेला पकडून तुमचा गोट फोडा-यचा व आमच्या राजाला आपल्या घरीं आणायचा, म्हणजे आम्हीं डाव जिंकला." बाळाजीपंत उत्तरले.

"याचा अर्थ मी नाहीं समजलों!" रामाजीपंत म्हणाले.

"त्याचा अर्थ हा पाहा!" असें म्हणून बाळाजीपंतांनीं आपल्या हातांतील स्वामींचें पत्र रामाजीपंतांना दाखविलें. त्यांतील खुबी प्रथम रामाजीपंतांच्या ध्यानीं आली नाहीं. पण बाळाजीपंतांनीं त्यांना प्रत्येक चरणाचें प्रथमाक्षर वाचावयाला सांगतांच रामाजीपंतांची खात्री पटली.

"स्वामी काय म्हणतात, 'सं–भा–जी–पु–त्र–छ–त्र–प–ति–

मा–न–वै–भ–व–शा–ली–हो–हा–व–र' वाः! एकूण आतां महाराष्ट्राच्या राजकारणाला हा नवा रंग चढणार म्हणावयाचा!" रामाजीपंत समाधानवृत्तीनें म्हणाले.

बाळाजीपंतांनीं दुसरें पत्रही रामाजीपंतांना दाखविलें व मुक्तेनें सांगितलेली सर्व हकीकत सांगितली; तेव्हां तर रामाजीपंतांची मति गुंगच होऊन गेली. इतक्या अडचणींतून पुढचा मार्ग कसा कंठावयाचा याविषयीं त्या दोघांचें संभाषण बराच वेळ चाललें होतें.

इतक्यांत धनाजी जाधवांचा हुजऱ्या तेथें आला. त्यानें बाळाजीपंतांना धनाजीचा निरोप सांगितला, "सेनापतीसाहेबांनीं आपल्याला आज दरबारांत हजर राहावयाला सांगितलें आहे."

"ठीक आहे" बाळाजीपंतांनीं हुजऱ्याला वाटेला लावलें.

"नाना! अखेर तुम्ही आम्हांला प्यादी करूं देत नाहीं म्हणायचे!" रामाजीपंत म्हणाले.

"छे! आतां कसली ही पटावरची प्यादी घेऊन बसलां! खरींखुरीं मोहरीं नाचावयाची आणीबाणीची वेळ येऊन ठेपली असतांना आतां हीं कापडी पटावरचीं लांकडी मोहरीं कोण नाचवीत बसतो! आतां आजच्या दरबाराकडे माझे डोळे लागून राहिले आहेत. बाकी, आज दरबारांत कोणत्या गोष्टींचा खल होणार व काय ठरणार हें ठरल्यासारखेंच आहे." बाळाजीपंत म्हणाले.

"मग सांगा पाहूं, आजच्या दरबारांत काय ठरणार?" रामाजीपंतांनीं विचारलें.

"हा मुळीं बोलूनचालून वेड्या छत्रपतींच्या तोंडपुजा होयबा राजनिष्ठांचा—कावळ्यांचा दरबार! अर्थात् शाहूमहाराजांच्या वाटेंत कांटे पसरविण्यापेक्षां दुसरी कोणतीही कामगिरी आज व्हावयाची नाहीं. पण श्रीगजानन सत्याचा वाली आहे, त्याला महाराष्ट्री राखावयाची असली तर तो इतक्या साऱ्या अडचणीं शाहू छत्रपतींनाच राजी होईल व आमच्या प्रयत्नांना फळ देईल!" असें म्हणून बाळाजीपंत दरबारला जावयाच्या तयारीला लागले.

## प्रकरण सातवें

# राजवाड्यांतील खलबत

आज सातारा राजधानीवर जो सूर्य उगवला, त्यानें जणुं काय आपल्या सोनेरी किरणांनीं राजधानीला सौभाग्याचें स्नान घातलें. उजाडतें न उजाडतें तोंच राजधानीभर मराठशाहीच्या खऱ्या धन्याच्या नांवाचा जयजयकार होऊं लागला, "छत्रपति शाहूमहाराज की जय!"

होतां होतां हा ध्वनि जास्तच वेगानें दुमदुमूं लागला. किल्ल्याच्या पायथ्याशीं नागरिकांच्या तोंडून ह्या जयजयकाराच्या प्रचंड लाटा हवेंत उसळूं लागल्या. त्याच वेळीं इकडे राजवाड्यांत ताराबाई, चंद्रसेन व संभाजी यांच्याशीं शाहूचा मोड कसा करावा याविषयीं खलबत करीत होती. संभाजीनें पत्र लिहून भागूच्या हातीं पावतें केलें व तें पिराजीनें मधल्यामध्यें घेतलें वगैरे प्रकार जरी चंद्रसेनानें पूर्वींच ताराबाईच्या कानांवर घातला होता, तरी संभाजीनें मुक्तेच्या आशेनें तिच्या गोड बोलांना भुलून तें पत्र सांपडल्याचें खोटेंच चंद्रसेनाला सांगितलें व चंद्रसेनानें ताराबाईला सांगून तिची समजूत घातली.

नुसतें पत्र सांपडलें असें सांगितल्यानेंही ताराबाईचा राग व्हावा तसा शांत झाला नाहीं, असें पाहतांच संभाजी असेंही बोलून गेला कीं, पिराजीला या वेळीं क्षमा करून आपला मिंधा करून ठेवल्यानें तो थोड्याच दिवसांत बाळाजीपंतांच्या घरीं आपल्या बाजूनें गुप्त-हेराचें काम करण्याला उपयोगीं पडेल. ही युक्ति संभाजीनें सहज ताराबाईला समजावून शांत करण्यासाठीं म्हणून काढली; पण तिचा परिणाम मात्र त्याला न कळत भलताच होऊन बसला. ताराबाई व

चंद्रसेन ह्या दोघांनाही ही युक्ति सोळा आणे पटली, व असा घर-भेदेपणा करण्याला पिराजीला प्रोत्साहन यावें यास्तव व्यासरावापाशीं भीड खर्च करून मुक्ता पिराजीला देऊं करावयाची असें चंद्रसेनानें तेव्हाच आपल्या मनाशीं ठरवून टाकलें. संभाजीचें मन मुक्तेच्या ठायीं लुब्ध आहे व तो ह्या विचाराला विरोध केल्याशिवाय राहावयाचा नाहीं, यास्तव त्याचें लग्न तत्पूर्वीच ताराबाईच्या दासीपरिवारातील रत्नावली दासीच्या हिरू नांवाच्या खुबसुरत मुलीशीं लावून द्यावयाचें असाही त्याचा तेव्हांचा मनोमन बेत झाला. पण तो दुसऱ्या कोणाला कळणें मात्र शक्य नव्हतें.

त्या खलबतांत अनेक गोष्टीची भवति न भवति होऊन शाहूला मराठशाहींत येऊं द्यावयाचें नाहीं यासाठीं काय काय करावयाचें तें ठरलें. पण इतकेंही करून शाहू आलाच तर—ताराबाई निर्वाणीच्या भाषेंत म्हणाली, "काय वाटेल तें झालें तरी माझ्या जिवांत जीव असेतों मी साताऱ्यांत शाहूचीं पावलें रुजूं द्यावयाची नाहीं."

तोंच बाहेर किल्ल्याच्या पायथ्याशीं 'छत्रपति शाहूमहाज की जय' अशा जयजयकाराच्या द्वारा होणाऱ्या जनसंमर्दाच्या गंभीर मेघ-गर्जनेनें सारें वातावरण दणदणून गेलें. जणुं काय 'साताऱ्यांत शाहूचें पाऊल रुजूं द्यावयाची नाहीं' ही मानवी सत्ताधारी राणीची वाणी अस्थानीं आहे असें भविष्य वर्तवणारी देववाणीच जनतारूपी जगन्नाथाच्या मुखांतून ह्या निमित्तानें स्रवली, व आपल्या राजकारणी उलाढालींना परमेश्वरी सत्तेचें पाठबळ नाहीं ही जाणीव पुन्हा एक-वार ताराबाईच्या मनाला पटली! राजाराममहाराजांच्या मृत्यूनंतर आपल्या शिवाजीचें मंचकारोहण राजाराममहाराजांच्या आचार परंपरेला धरून करण्याचें सोडून तिनें त्याचें राज्यारोहण करण्याचा डाव रचिला, तेव्हां 'ही राजलक्ष्मीची अमर्यादा आहे' असें तिला ब्रह्मेंद्रस्वामींनीं स्वप्नांत येऊन बजावून सांगितलें होतें. पण तें तिनें मानलें नाहीं. त्यानंतर अलीकडे शाहूच्या सुटकेच्या बातम्या येऊं लागल्या तेव्हां तिनें शाहू व शिवाजी ह्या उभयतांच्याही पत्रिका

एका ज्योतिषाला दाखविल्या. तेव्हां त्यानेंही शाहूचा जबरदस्त राजयोग दाखविला होता. ह्या अपराधाबद्दल त्या बिचाऱ्या ज्योतिष्याला मात्र हद्दपारीची शिक्षा भोगणें प्राप्त झालें. ही वेळ ओळखून चंद्रसेनानें व्यासरावाला पढवून त्याच्या तोंडून 'शाहूचा नायनाट होणार' अशा अर्थाचें बनावट भविष्य वर्तवून ताराबाईच्या मनदुबळेपणाचा स्वतः तिची मर्जी संपादन करण्याच्या कामीं भरपूर उपयोग करून घेतला होता. पण इतकें करूनही ताराबाईचें मन गादीच्या भवितव्यतेविषयीं बरेंच साशंक होतें. ह्या वेळीं निदान ब्रह्मेंद्रस्वामींचा तरी आपल्या मुलाला शुभाशीर्वाद असावा म्हणून तिनें स्वामींना विनवून पाहिलें; पण 'भवितव्यता सत्पक्षाची बांधलेली आहे, तिचे गूढ खेळ कोणास कळणार! त्या भवितव्यतेच्या ओघास अडविण्याचें सामर्थ्य माझ्या आशीवार्दांत नाहीं' असें सांगून स्वामींनींही तिची निराशा केली होती. तरी ती म्हणाली, "चंद्रसेन, ही दंगल कांहीं करून बंद केलीच पाहिजे. लोकांना जाहीर केलें पाहिजे, कीं शाहू तुमचा छत्रपति नव्हे; तुमचे छत्रपति धाकटे शिवाजीमहाराज."

हे शेवटचे शब्द ताराबाईच्या मुखांतून निघतात न निघततात, तोंच शिवाजी समोरासमोर थाड्कन् शिंकला. ती शिंक ऐकून ताराबाई मनांतल्या मनांत 'डावी तारी, उजवी मारी, समोर करी घात' ह्या शिंकाशकुन आठवून 'हत् दळभद्र्या' असें स्वतःशीं शिवाजीला म्हणाली. हेच शब्द तिनें मोठ्यानेंही उच्चारले असते. पण जवळ चंद्रसेन उभा होता; त्याच्यासमोर मराठी राज्याच्या छत्रपतीला तिनें उणें उत्तर कसें बोलावें?

"बरें चंद्रसेन! तूं अगोदर आंग्र्यांपाशीं जा व आजच्या दरबारांत त्यांनीं हजर राहावें अशी छत्रपतींची आज्ञा असल्याचें सांग." ताराबाई शिंकेची अस्फुट शापवाणी निधड्या मनानें पचनीं पाडीत म्हणाली.

"बरें आहे आईसाहेब!" असें म्हणून चंद्रसेन लगेच आंग्र्यांकडे जावयाला निघाला.

चंद्रसेन गेल्यावर ताराबाई व तिच्या मागोमाग वेडा छत्रपति अशीं दोघेंही राजवाड्याच्या गच्चींत येऊन उभीं राहिलीं. त्या मायलेकरांनीं राजवाड्याच्या पायथ्याकडे साशंकपणें नजर फेंकली, तों नगरांतील आबालवृद्ध रयत उमलत्या उत्साहानें शाहूमहाराजांच्या नांवाचा जयजयकार करीत राजवाड्याकडेच चालत येतांना त्यांना दिसली. त्या जनसंमर्दाच्या अग्रभागीं एक म्हातारा अंतःकरणांत आनंदाचें आऊर लोटल्यामुळें तारस्वरानें पावलोपावलीं ललकारत होता, "छत्रपति शाहूमहाराज की जय!"

"आईसाहेब! हें काय आहे?" नगरपथानें राजवाड्याडे मोठ्या डौलानें व आनंदानें चालत येणाऱ्या जनसंमर्दाकडे बोट दाखवून वेड्या शिवाजीनें आपल्या जन्मजात वेडसरपणाला अनुसरून विचारलें, "हा मावळचा तमाशा आहे वाटतें! आणि हा म्हातारा सर्वांच्या पुढें कोण चालला आहे? हा मला वाटतें मुख्य तमासगीर असावा."

शिवाजीचा हा वेडगळ प्रश्न ऐकून ताराबाईचें मन पुन्हा पाण्यांत टाकलेल्या ढेंकळाप्रमाणें बिरघळलें. शिवाजी जरी राजाराममहाराजां-सारख्या शहाण्या राजपुरुषाच्या पोटीं जबर पूर्वपुण्याईनें जन्माला आला असला, तरी तो जन्मापासून वेडसरच होता. पण ताराबाई ही राजाराममहाराजांची पट्टराणी असल्यानें राजाराममहाराजांच्या पश्चात् ताराबाईच्या भगीरथ प्रयत्नांनीं तो सिंहासनारूढ झाला, आणि वेड्या शिवाजीचा एकदम 'छत्रपति शिवाजीमहाराज' बनला! वस्तुतः औरंगजेब बादशहानें छत्रपति संभाजीमहाराजांचा अमानुषपणें वध केल्यानंतर त्यांचा पुत्र शाहू हाच मराठी राज्याचा खराखुरा वारस ठरावयाचा. पण संभाजीमहाराजांच्या वधानंतर थोड्या अवकाशानें त्यांची राणी येसूबाई व शाहू ह्या मायलेंकरांच्या कपाळीं बादशाही कैद आल्यामुळें छत्रपतींचे प्रतिनिधि या नात्यानें केवळ कर्तव्य म्हणून राजाराममहाराज मंचकारूढ झाले. त्यांनीं राजसिंहासनाला आपल्या पायांचा विटाळही होऊं दिला नाहीं. राजाराम छत्रपतींना त्यांच्या

ताराबाई व राजसबाई ह्या दोघां राण्यांपासून अनुक्रमें शिवाजी व संभाजी असे दोन पुत्र झाले. पैकी शिवाजी मोठा असून वेडा होता व संभाजी लहान असून शहाणा होता. पण शिवाजी वेडा असला तरी वडील राजपुत्र व तोही वडील राणीच्या उदरीं जन्मास आलेला, तसेंच तो स्वतः वेडा असला तरी त्याची जन्मदात्री आई ताराबाई ही वडील राणी होती. शिवाय ती राजसबाईपेक्षां बुद्धिवान्, महत्त्वाकांक्षी आणि कर्तबगार स्त्री असल्यानें राजाराम छत्रपतींच्या पश्चात् तिनें आपल्या आंगच्या चतुराईनें सर्व सरदार—मानकऱ्यांना जरबेनें वश करून घेऊन आपल्या वेड्या मुलाचें छत्रपतित्व मान्य करावयास लावलें, व राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेऊन पूर्ववत् अष्टप्रधानांच्या साह्यानें राज्यकारभार चालविला. हा प्रकार तेव्हांच्या रामचंद्रपंत अमात्य, शंकरजी नारायण सचीव, धनाजी जाधव सेनापति वगैरे कारभारी मंडळीला मनापासून रुचला असें नाहीं. पण एक तर संभाजीमहाराजांचे पुत्र जे राज्याचे खरे वारस शाहू राजे, ते बादशहाच्या कैदेंतून मुक्त होण्याचा तेव्हां मुळींच संभव नव्हता, व राजसबाईचा पुत्र हा राजाराममहाराजांचा कनिष्ठ पुत्र असून अगदींच अल्पवयी असल्यामुळें त्यांना मोठ्या राणीच्या मनीषेला मान देणें प्राप्त झालें. अशा चोहोंकडील अडचणींच्या परिस्थितीचा फायदा घेऊन ताराबाईनें आपल्या वेड्या मुलाला एकदांचा राज्याभिषेक करून स्वतःची राजमाता होण्याची हौस फेडून घेतली. ही ताराबाईची हौस सतत सात वर्षें बिनधोकपणें भागली. पण सातव्या वर्षीं मराठशाहीचा हाडवैरी व हिंदवीचीं पाळेंमुळें खणून काढण्यासाठीं अहोरात्र तळमळणारा औरंगजेब बादशहा मृत्युवश झाला, व त्याच्या मुलांत बादशहातीविषयीं यादवी माजली, तेव्हां बादशहातीच्या अशा पडत्या काळीं मराठ्यांच्या मुलखांतून येणाऱ्या परचक्रांच्या वावटळींना आळा कसा घालावा, हा बादशहा होऊं घातलेल्या अजीमशहासमोर मोठा पेंचाचा प्रश्न येऊन पडला. तेव्हां बादशहाचा सुभेदार झुल्पिकारखान यानें अजीमशहाला अशी भेदनीति

शिकविली कीं, 'आपला सध्यां ढांसळता काळ आहे, व मराठे तर जोरांत आहेत. अशा वेळीं मराठ्यांत आपसांत फूट पडेल व यादवी माजेल असा उपाय करावयाचा, तर शाहूची सुटका करावी हा एकच रामबाण उपाय आहे. शाहूची सुटका झाली, कीं तो मराठमुलखीं जाऊन राज्यावर वारसा सांगूं लागेल, त्याचें ताराबाईशीं वितुष्ट येईल, मराठशाहींत दुफळी माजेल, आणि अशा रीतीनें छत्रपतींच्या राजघराण्यांत रण माजून राहिलें म्हणजे त्या रणकंदनांत मराठ्यांच्या माना परस्पर मुर्गळल्या जाऊन ते बादशहातीच्या वाटेस जाईनासे होतील.'

झुल्पिकारखानाची ही भेदनीति अजीमशहाला सोळा आणे पटली. त्यानें शाहूला आपल्यापाशीं बोलावून आणून विचारलें, "तुम्ही मराठशाहीचे खरे वारस, तुम्हांला राजवैभवापासून विन्मुख करावें अशी आमची इच्छा नाहीं. आम्ही तुमची मोकळीक करून तुम्हांला तुमच्या देशीं जाऊ देण्यास खुषी आहों. पण त्या बाबतच्या आमच्या अटी तुम्हांला मान्य कराव्या लागतील."

स्वतःच्या वारशाचें राजवैभव आज अनायासें स्वतःला मिळतें आहे, तें नको म्हणण्याचें धाडस शाहूसारखा जातिवंत राजपुरुष कसें करील? तशांत रात्रौ ब्रह्मेंद्रस्वामींनींही त्याच्या स्वप्नात येऊन त्याला साक्षात्कार दिला होता कीं, 'आल्या संधीचा उपयोग करून साताऱ्याला जा व बाळाजीपंत आणि धनाजी यांच्या मदतीनें राजवैभव भोग.' तें सारें आठवून त्यानें हर्षातिरेकानें उत्तर दिलें, "माझें राज्य मला देणें ही न्यायाची गोष्ट बादशहांनीं वस्तुतः यापूर्वींच करावयाला हवी होती. मरहूम जहांपन्हांनीं ही गोष्ट फारां दिवसांपूर्वी मनींमानसीं धरली होती. ती त्यांच्या हयातींत तडीला गेली नाहीं, ती आपण तडीला नेल्यास परवरदिगार अल्ला आपलें कल्याण करील."

झुल्पिकारखान म्हणाला, "तुम्ही सुटकेनंतर आपणास दिल्लीच्या बादशहाचे अंकित म्हणवून घ्यावें व राज्य करावें. तुमची आई व तुमचा कबिला आमच्यापाशींच तूर्त ठेवावा. विरूबाई व कांहीं

मानकरी यांना मात्र समागमें न्यावें. आपल्या राज्यांत जाऊन राज्याचा बंदोबस्त करावा. बखेडे करणाऱ्या अपराध्यांचें पारिपत्य करावें व बादशहात लक्षांत वागवून बादशाही मुलखाला कोणत्याही प्रकारें उपद्रव होऊं देऊं नये. तुम्ही याप्रमाणें निखालस नेकीनें वागतां अशी हुजूरची खातरजमा झाली म्हणजे, आम्ही दिल्लीला गेल्यावर व तेथें हुजूर तक्तनशीन झाल्यावर तुमचीं माणसें तुम्हांकडे पाठवून दिलीं जातील. तुम्हांला सरदेशमुखीचें उत्पन्न सहा सुभ्यांत चालतें त्याची सनद, त्याप्रमाणेंच सदर सुभ्यांची चौथाईची सनद देण्यांत येईल. शिवाय वतनघाट बालाघाटावरील महाल विजापूर, दौलताबादचे पादशाहींतील महाल आणि भीमा व गोदावरी यांच्यामधील निम्मा मुलूख, ह्यांतील बादशाही अंमलामधील ठाणीं किल्लेकोटसुद्धां तुम्हांला हुजुरांतून इनाम करून देऊं तूर्त 'ह्यांचें राज्य हे बंदोबस्तेंकरून करतील' अशीं पत्रें हुजूरच्या सुभ्यांस देण्यासाठीं तुम्हांपाशीं देतों. कर्नाटक, गोंडवण, गुजराथ व तंजावरचें राज्य यांचा अंमल तुमच्याकडे चालत आहे तो तुम्हीं तसाच चालवावा, व नेहमीं हुजुरांचे हुकूमतींत वागून प्रसंग पडेल तेव्हां आपल्या फौजेनिशीं हुजुरातीला हातभार लावावा. हें तुम्हांला मान्य आहे?"

"होय. मला हें सारें मान्य आहे." दगडाखालीं सांपडलेला आपला हात न मोडतां मोकळा करून घेण्याच्या दूरदर्शी इराद्यानें शाहू उत्तरला.

लगेच अजीमशहा व झुल्पिकारखान यांनीं शाहूकडून तसा करारनामा करून घेऊन हत्ती, घोडे व दोनशें रांगडे स्वार इत्यादि सरंजाम देऊन त्याची मोकळीक केली. ही पडत्या फळाची आज्ञा घेऊन शाहू आपणाबरोबर फक्त विरूबाई ही अविधिमान्य प्रिय पत्नी, व मोरोपंत सबनीस, कृष्णाजी नाईक जोशी, गदाधरभट्ट आणि शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून प्रत्येक छत्रपतींची हनुमानाप्रमाणें अनन्यभावानें सेवा करून म्हातारा झालेला व ज्यानें शाहूला जन्मापासून कटिखांद्यावर खेळवून लहानाचा मोठा केला होता तो जोत्याजी

केसरकर, एवढ्या निवडक मंडळीसह आपल्या मंडळीचा, तसेंच खऱ्या मातेचा–येसूबाईचा आणि मातृवत् मानलेल्या बेगमेचा निरोप घेऊन दक्षिणेंत यावयाला निघाला. वाटेंत जोधपूर, जयपूर, उदेपूर वगैरे बादशाही सुभ्यांच्या जागीं मेजवान्या घेत व फौजफांटा गोळा करीत उज्जनी महेश्वराहून विंध्याद्रि व सातपुडा ह्या पर्वतांतून बऱ्हाण-पूरच्या वाटेनें मराठशाहीचा हा वारसदार धनी मराठमुलखांत येऊं लागला. तेव्हां येतां येतां परसोजी भोंसले, पिंगळे, पेशव्यांचा सर-दार चिमणाजी दामोदर वगैरे मराठशाहीच्या अंमलाखालील कर्ते पुरुष आपल्या सहस्रावधि सैन्यानिशीं राजनिष्ठापूर्वक ह्या आपल्या धन्याला सामील झाले व त्यांनीं त्याच्याशीं राजनिष्ठेनें वागून मराठ शाहीची घडी पुन्हा पूर्ववत् बसविण्याच्या कामीं झटण्याबद्दल त्याच्या चरणांना स्पर्श करून शपथा घेतल्या. संभाजीमहाराजांच्या पश्चात् मराठशाहीचा खरा धनी शाहू हाच आहे, याविषयीं कोणासही शंका नव्हती. तो धनी बादशाही गुलामगिरींतून मुक्त होऊन पुन्हा आपल्या मायदेशीं राजशासन करण्यासाठीं आला असें पाहून मराठमुलखींच्या रयतेला अत्यंत आनंद झाला. असंख्य तरुण मराठे लढवय्ये भरा-भर शाहूशीं राजनिष्ठ राहण्याच्या आणाभाका करून त्याच्या सैन्यांत नोकऱ्या पत्करून राहूं लागले. अशा रीतीनें राजवैभवाला शोभेसा सारा सरंजाम अल्प श्रमांनीं साजरा झाल्यावर 'शाहू' चे 'शाहू-छत्रपति' बनले. आतां त्यांना धर्मविधिपूर्वक राज्याभिषेक व्हावयाचा काय तो बाकी राहिला होता. तो विधि साताऱ्याला गेल्यावर करा-वयाचा, तोंवर राज्यकारभाराची घडी हळूहळू बसवावयाची, ह्या इराद्यानें शाहूमहाराजांनीं मोरोपंत सबनीस यांना आपल्या अफाट सैन्याचा सेनापति नेमलें. जोत्याजी केसरकराला सरदेशमुखीची मुतालिकी दिली व परसोजी भोंसले याला 'सेनासाहेब सुभा' हा किताब देऊन त्याचा गौरव केला. त्या किताबाबरोबरच त्याला वऱ्हाड व गोंडवण ह्या प्रांतांची जहागिरी करून दिली. चिमणाजी दामोदर याला 'पंडितराव' हा किताब देऊन त्यालाही भरींव नेमणूक करून

दिली. पुढें मार्गांत हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, परसोजी भोंसले वगैरे बलाढ्य मराठे सरदारही राजनिष्ठापूर्वक शाहूमहाराजांना येऊन मिळाले. त्यांत निंबाळकर यांना 'सरलष्कर' हा किताब देऊन व भोंसल्यांचे कारभारी रामचंद्र महादेव यांना खासनिशी आणि पोतनिशी देऊन, असे राजनिष्ठेनें प्रेरित होऊन जे जे लोक शाहूमहाराजांच्या राज्यछत्राखाली आपखुषीनें जमा झाले, त्यांचा त्यांचा त्यांच्या इतमामाप्रमाणें मानसन्मान करून शाहूमहाराजांनीं त्यांना संतुष्ट केलें, व ह्या आपल्या वाढत्या राजवैभवासह गोदावरी नदीच्या पैलतीराला येऊन तेथें तळ ठोकला.

आतां पुढें काय करावयाचें याविषयीं शाहूमहाराजांनीं आपल्या सरदार–मानकऱ्यांचीं मतें घेतलीं. तेव्हां असेंच मकाण दर मकाण करीत राजधानीचें सातारा शहर गांठावयाचें असा सर्वांचा अभिप्राय पडला. शाहूमहाराजांचें मत असें कीं, आपली महद्भाग्येंकरून सुटका झाली, हें पाहून आपल्या कोटमाप रयतेला जसा आनंद झाला, तसाच आपली चुलती ताराबाई हिलाही आनंद होईल, व आपली माता आपल्या बादशहाच्या बंदींत आहे, तिच्याऐवजीं ही काकीच आपली माता शोभून आपलें मंगल करण्यासाठीं झटेल. पण खरी वस्तुस्थिति इतर मराठे सरदारांना माहीत असल्यानें त्यांनीं एकमतानें, तिकडे तर ताराबाईचा अपमान करावयाचा नाहीं व इकडे शाहूमहाराजांनाही प्रेमाच्या फोलकट–पसाऱ्यांत गुरफटून ठेवावयाचें नाहीं, असा दुहेरी डाव साधण्याच्या इराद्यानें शाहूमहाराजांना सांगितलें, "महाराज! मराठशाहीचे खरे वारस आपण; आपण असे सरळ दिग्विजय संपादीत साताऱ्याला जाऊन पोंचलां, कीं आपल्या पायधुळीनें पावन होण्यासाठीं थोरल्या आबासाहेबांचें सिंहासन आपली वाट पाहत बसलेलें आहे. ज्या वस्तूवर आपला खराखुरा हक्क आहे, त्या वस्तूच्या प्राप्तीसाठीं आपण कोणाची कां म्हणून मिनतवारी करावी?"

यावर शाहूमहाराज म्हणाले, "तें खरें. पण राजारामाच्या मृत्यू-

पासून आज सात वर्षें आमच्या काकीसाहेबांनीं मोठया शर्तीनें मराठयां-ची गादी अभंग राखली आहे. त्या आम्हांला मातृवत् वंदनीय आहेत. आम्ही राजधानींत प्रवेश करतांना त्यांनीं आपुलकीनें आमच्या-वरून दृष्टीची मीठमोहरी ओंवाळून टाकली तर त्यांतच आमचें कोटकल्याण आहे." लगेच शाहूमहाराजांनीं जोत्याजीला हांक मारून स्वामींच्या साक्षात्काराचा वृत्तांत निवेदन करून सांगितलें, "जोत्या-जी! तूं आमचें पत्र घेऊन साताऱ्यास जा व काकीसाहेबांना समक्ष भेटून आम्ही येत असल्याची खबर त्यांना दे."

शाहूमहाराजांची ही आज्ञा ऐकून जोत्याजीला परमानंद वाटला. शाहूमहाराजांच्या सभोंवारच्या सर्वच लोकांना व मराठमुलखींच्या कोटमाप रयतेला शाहूमहाराजांची सुटका झाल्याचें ऐकून अत्यानंद झाला होता हें जरी खरें, तरी एकट्या जोत्याजीचा आनंद त्या कोटमाप लोकांच्या आनंदाहून कांहीं और होता. शिवाजीमहाराजां-च्या गौरवसंपन्न अमदानींत ह्याच जोत्याजीनें संभाजीमहाराजांना आंगाखांद्यावर खेळवून लहानाचे मोठे केले. संभाजीमहाराज पुढें कलुषाकबजीसारख्या नादान् व नीच कनोज्याच्या कच्छपीं लागून व्यसनाधीन बनूं लागले तेव्हां याच जोत्याजीनें त्यांना वेळोवेळीं शुद्धी वर आणण्याची शिकस्त केली. राजे चळले व तुळशीसारख्या रखेल्यां-शीं रंगेली करण्यांत रंगून राजकाजाचा बेरंग करूं लागले. त्या दुःखानें येसूबाईराणीसाहेबांनीं क्षणोक्षणीं ढसढसां रडावें व ह्याच जोत्याजीनें त्यांचीं आंसवें पुसून त्यांना जिव्हाळ्याचा आसरा द्यावा. वेळीं-वखतीं राजांनीं कलुषासारख्या कुटिलबुद्धि सांगात्याच्या खोडसाळ सांगीवर विश्वासून जोत्याजींचें मन जायबंदी करावें. पण जोत्याजीनें तो जाच जोडल्या हातांनीं व स्वामिभक्तीच्या जाणिवेनें सहन करावा. अशा मराठशाहीच्या कठीण अवदशेंतच शाहूमहाराजांचा जन्म झाला, व ज्या मांडीवर बाप खेळला, त्याच मांडीवर बेटा खेळला. संभाजीराजांच्या वधानंतर बादशहाच्या बंदिशाळेंत येसूबाई व शाहू यांचें जिव्हाळ्यानें जतन करण्याचें स्वामिभक्तीचें थोर भाग्य जोत्याजी-

लाच लाभलें होतें. येसूबाई व शाहू यांच्या कपाळीं बादशहाची सक्तीची कैद आली, तेव्हां जोत्याजीनें त्यांच्या सहवासांत राहून त्यांची सेवा करण्यासाठीं खुषीची कैद पत्करून आपल्या स्वामिसेवेची परिसीमा केली होती. त्या वेळीं त्या म्हाताऱ्यानें रायगडच्या रानोमाळीं जीं आंसवें गाळलीं, त्या आंसवांचे ओघळ त्याच्या गालांवर उमटलेले जणुं अजून आटून कोरडे झाले नव्हते. छत्रपतींच्या विपदावस्थेंत गाळलेलीं तीं आंसवें आपण पुन्हा छत्रपतींना पूर्ववत् संपन्नावस्थेला पोंचलेले पाहूं तेव्हांच पुसूं असा मनोमन पण करूनच कीं काय, जोत्याजी ज्या मंगल दिवसाच्या मणिमौक्तिकाचा शोध लावण्यासाठीं आज अठरा वर्षें अठरा विश्वे अपंगतेंत काळसमुद्राच्या डोहांत पाणबुड्याप्रमाणें बुड्या मारीत जगला होता, तें मौक्तिक अखेर आज त्याच्या हातीं लागलें. तें घेऊन विजयी मुद्रेनें छत्रपतींच्या राजधानींत जावयाचें व उगवत्या छत्रपतींच्या आगमनाची शुभवार्ता मराठशाहीच्या गादीला पावती करून मावळत्या छत्रपतींच्या भयंकर मरणामुळें मलूल झालेल्या महाराष्ट्रसुंदरीच्या गालांवर मांगल्याचा नवा तजेला उठवावयाचा. ही कामगिरी शाहूमहाराजांनीं आपणालाच सांगितली, हीच आपल्या आजवरच्या अठरा वर्षांच्या एकनिष्ठ तपश्चर्येची फलश्रुति आपल्या पदरीं पडली, असेंच जोत्याजीला वाटलें. त्या आनंदातिशयाच्या भरांत त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु गळूं लागून वृद्धापकाळामुळें सुरकुतलेल्या त्याच्या गालांवर आंसवांचा पावसाळा सुरू झाला, व कंठीं गहिवर दाटून आला.

“सरकार! आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे.” असें म्हणून जोत्याजीनें शाहूमहाराजांना सप्रेम वंदन केलें व त्यांनीं स्वदस्तुरनें लिहिलेली कुशलपत्रिका घेऊन त्याच घडीला साताऱ्याचा रस्ता धरला.

## प्रकरण आठवें

# शुभशकुन कीं अपशकुन?

तोच हा म्हातारा! ज्याच्या तोंडून शाहूमहाराजांच्या नांवाचा जयजयकार ऐकून ताराबाईच्या कपाळाला आंठ्या पडल्या व वेड्या छत्रपति शिवाजीराजांना जो मुख्य तमासगीर वाटला, तोच हा म्हातारा जोत्याजी होता. जोत्याजी जो घडीभराचीही उसंत न घेतां वाऱ्याच्या वेगानें साताऱ्याच्या राजधानींत आला, तो ज्याला त्याला छत्रपति शाहूमहाराजांची बादशहाच्या कैदेंतून सुटका झाल्याचें मोठमोठ्यानें ललकारून सांगूं लागला. त्याला पहिल्यानें कोणी नागरिक ओळखूं शकले नाहींत. कारण एक तर आज अठरा वर्षें तो मराठशाहीपासून दूर बादशाहींत राहत होता व दुसरें, राजारामहाराजांच्या कारकीर्दींत मराठशाहीच्या छत्रपतींची रायगडची राजधानी बदलून साताऱ्याला आली होती. संभाजीमहाराजांच्या वधकालीं तारुण्याच्या ऐन उमेदींत असलेले अनेक मराठे गडी आज काठी टेंकीत टेंकीत चालूं लागले होते. तेव्हां वयोवृद्ध शोभणारे अनेक लोक आज देवाच्या दरबारीं निघून गेले होते. आणि तेव्हां गर्भावस्थेंत असणारीं किंवा रांगतीं पांगळीं अर्भकें आज अठरावीस वर्षांचे उमदे शिपाईगडी बनून वीर मराठेशीं चमकूं लागलीं होतीं. पण जोत्याजीनें लोकांकडून ओळखला जाण्याची वाट न पाहतांच आपल्याच तोंडानें आपली ओळख सर्वांना करून दिली व शाहूमहाराजांच्या सुटकेच्या वार्तेनें साऱ्या राजधानीभर दुमदुम करून सोडली, तेव्हां ज्याला त्याला ह्या जोत्याजीबाबाची ओळख पटली व ते शाहूमहाराजांच्या सुटकेची शुभवार्ता राजवाड्यावर पोंचविण्यासाठीं हर्षातिरेकानें नाचतबागडत त्याच्या मागोमाग चालूं लागले.

हां हां म्हणतां ती प्रचंड लोकगंगा राजप्रासादाच्या पायऱ्यांशीं येऊन थडकली. आतां आपण राणीसाहेबांना भेटतों केव्हां, शाहू-महाराजांची कुशलपत्रिका त्यांच्या हातीं देऊन महाराजांच्या सुटकेची शुभवार्ता त्यांच्या कानांवर घालतों केव्हां, व राणीसाहेब आपणाला शाबासकी देऊन आपल्या तोंडांत साखर घालतात केव्हां, अशा आनंदाच्या लाटा जोत्याजीच्या अंतःकरणांत उचंबळूं लागल्या. त्यानें राजवाड्याच्या देवडींत पाऊल टाकण्यापूर्वी एकवार छत्रपतींच्या त्या इतिहासरम्य राजमंदिराला लवून अनन्यभावानें मुजरा केला व पायरीवर मस्तक टेकून मेघगर्जनेप्रमाणें जयजयकार केला, "छत्रपति शाहूमहाराज की जय!"

ह्या प्रत्येक जयध्वनीबरोबर राजवाड्याच्या गच्चींत उभी असलेल्या ताराबाईच्या मस्तकावर जणुं काय घणाचे घाव पडूं लागले. तेवढ्यांत हा कसला तमाशा आला आहे म्हणून तिकडे कुतूहलपूर्वक टक लावून पाहत उभा असलेल्या अचरट शिवाजीकडे पाहून तर तिला जास्तच खेद झाला.

तिकडे खासदरबाराच्या दिवाणखान्यांत सेनापति धनाजी जाधव, प्रतिनिधि परशराम त्रिंबक, सचीव शंकराजी नारायण, सेनापतीचा मुलगा चंद्रसेन जाधव, अंबाजीपंत पुरंदरे, त्यांचा पूर्वीचा आश्रित व आतां सेनापतीचा कर्तबगार मुतालिक बाळाजी विश्वनाथ, बाळाजीपंतांचे ऋणानुबंधी स्नेही हरिपंत, रामाजीपंत व बाळाजीपंत भानू वगैरे मंडळी जमा झाली होती. कान्होजी आंग्र्यांचाही आज राजधानींत मुक्काम असून त्यांनीं मराठशाहीशीं सलोख्यानें वागावें अशा प्रकारची वाटाघाट सर्वांच्या विचारें करण्यासाठीं त्यांनाही आज दरबारांत येण्याचें निमंत्रण देण्यांत आलें होतें. सर्व मंडळी जमली पण कान्होजी आंग्रे अजून आले नाहींत, म्हणून ताराबाईनें आपल्या विश्वासांतील चंद्रसेन जाधव यांच्या हातीं आंग्र्यांना फेर-बोलावणें पाठविलें होतें. आतां आंग्रे आल्यावर खासगी दरबारांत मराठशाहीच्या राजकारणाची वाटाघाट व्हावयाची होती.

तोंच चंद्रसेन ताराबाईपाशीं आला व मुजरा करून म्हणाला, "आईसाहेब! आंग्रे येऊन दरबारात दाखल झाले."

"होय का? ठीक आहे." ताराबाई चंद्रसेनाकडे वळून म्हणाली, "पण चंद्रसेन! आज लोकांनीं हें काय मांडलें आहे?"

"आईसाहेब! तें कोणीं काय सांगावें? पण तो म्हातारा आज नगरांत आल्यापासून त्यानें ही पुंडाई चालविली आहे."

"तो म्हातारा कोण?"

"आपलें नांव जोत्याजी केसरकर असें तो सांगतो."

जोत्याजी केसरकर हें नांव ऐकतांच ताराबाईला भूतकाळचा सारा इतिहास एकदम आठवला. तिला जोत्याजीची नावनिशीवार ओळख तेव्हांच पटली. पण ती बाहेर न दर्शवितां तिनें चंद्रसेनाला आज्ञा केली, "जा. त्या म्हाताऱ्याला आमच्यासमोर दरबारांत घेऊन ये."

चंद्रसेन ताराबाईच्या आज्ञेप्रमाणें जोत्याजीला आणण्यासाठीं निघाला व ताराबाई आपल्या शिवाजीला—छत्रपति ह्या नामधारी पदवीनें ओळखल्या जाणाऱ्या हाडामांसाच्या सजीव बाहुल्याला—बरोबर घेऊन दरबारांत निघून गेली. तीं मायलेंक दोघें दरबारांत जाऊन पोचतांच सर्व सरदार-मानकऱ्यांनीं उठून उभे राहून त्यांना त्रिवार मुजरा केला, व राजमाता आणि छत्रपति उच्चासनावर विराजमान होतांच राजमातेच्या आज्ञेनुसार सर्वजण पुन्हा खालीं बसले. एवढ्यांत जोत्याजी थेट दरबारांत येऊन पोहोंचला. चंद्रसेनही त्याच्या मागोमाग हात चोळीत दरबारांत येऊन उभा राहिला. जोत्याजीनें उच्चासनारूढ छत्रपति व राजमाता ताराबाई यांना अदबीनें त्रिवार मुजरा करून भरदरबारांत पुन्हा एकवार जयजयकार केला, "छत्रपति शाहूमहाराज की जय!"

जोत्याजीला पाहतांच व त्याच्या तोंडचा जयजयकार ऐकतांच दरबारांत जोत्याजीनें धिटाईनें पुढें होऊन शाहूमहाराजांनीं स्वहस्तानें लिहिलेली कुशलपत्रिका तिच्या हातीं दिली व हात जोडून सांगितलें, "आईसाहेब! शाहूमहाराजांनीं आपणाला हें पत्र दिलें आहे."

## प्रकरण नववें

# पारडें फिरलें !

ताराबाईनें तें पत्र घेऊन परशुरामपंत प्रतिनिधींच्या हातीं दिलें व सांगितलें, "प्रतिनिधि ! हें पत्र वाचा पाहूं !"

प्रतिनिधींनीं पत्र वाचलें:—

"श्री० ताराबाई आईसाहेबांचे सेवेशीं. अपत्यसमान शाहूचा दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग दंडवत उपरी. आमची आपणा सर्वांच्या आशीर्वादेंकरून व श्रीभवानीमातेच्या कृपेंकरून बादशाही कैदखान्यांतून मुक्तता झाली असोन आम्ही अमच्या मायदेशीं आपल्या चरणांपाशीं यावयाला निघालों आहों. लौकरच तेथें प्रविष्ट होतों. ही गोष्ट सकलांना विदित व्हावी. अधिकोत्तर समक्ष भेटी अंतीं.

आपला बालक

शाहू"

प्रतिनिधींनीं पत्र वाचलें, तें ऐकून दरबारच्या गांभीर्यात जास्तच भर पडली. ताराबाईचा चेहरा पूर्वीपेक्षांही जास्त काळवंडला व डोळे रागानें लाल झाले. जोत्याजी हा सारा प्रकार पाहत स्तब्धपणें समोर उभा होता. प्रथमच आपणाला कोणीं बैसदेखील म्हटलें नाहीं, ही चुकभूल शाहूमहाराजांच्या सुटकेमुळें सर्वांना होणाऱ्या आनंदातिरेकापायीं झाली असेल असें मानून जोत्याजीनें प्रथम आपल्या मनाला अपमानाची जाणीव जरादेखील होऊं दिली नाहीं. आतां पत्र वाचून होतांच ताराबाई जेव्हां नगरभर हत्तीवरून साखर वांटून आनंदीआनंद करण्याचा बेत करील, तेव्हां खास तिच्या हातून साखरेची

पहिली चिमटी आपल्या तोंडीं पडणार व मग आपण गोड तोंडानें शाहूमहाराजांच्या नांवाचा जयजयकार करीत सर्व राजधानीभर साखर वांटावयाला जाणार! अशा काल्पनिक सुखाचे मनोरे रचतां रचतां जोत्याजी ह्या शुभवार्तेचा गोड ठसा ताराबाई आणि इतर दरबारी लोक यांच्या चेहऱ्यावर कसा काय उमटतो तो पाहण्यासाठीं चातकाप्रमाणें वाट पाहत स्मितहास्य करीत जोडल्या हातांनीं उभा होता. त्याला आला क्षण एकामागून एक अधिकाधिक विपरीत भासूं लागला. तेवढ्यांत ताराबाई त्याच्याकडे वळून तिरस्कारानें उद्गारली, "ठीक आहे. पत्र पोंचलें. तुला आतां जाण्याला परवानगी आहे."

बिचारा स्वामिभक्त जोत्याजी साखर तोंडांत केव्हां पडते याची इतका वेळ वाट पाहत उभा होता; तो अखेर ताराबाईच्या विखारलेल्या वाणीचें विष प्राशन करून खिन्न मनानें बाहेर जावयाला निघाला. एका क्षणांत त्याचे विचार साफ बदलले. इतका वेळ त्याच्या ठायीं ताराबाईविषयीं पूज्यबुद्धि वसत होती, ती एका क्षणांत लयाला जाऊन 'ही लांसवट शाहूमहाराजांच्या राज्यारोहणाला हटकून अपशकुन करणार' अशी त्याची खात्री होऊन चुकली व ही आपत्ति आतां कशी टळणार याचा विचार करीत तो दरवाजाबाहेर जातो न जातो तोंच ताराबाईनें धनाजीला हांक मारून आज्ञा केली, "सेनापति! हा म्हातारा जर असा एकटाच गेला व राजधानींत वस्ती करून राहिला, तर असाच शाहूच्या नांवाचे देव्हारे माजवीत राहील. यांत आमच्या राज्याला जबर धोका आहे. यासाठीं हा असाच याच पावलीं वेशीबाहेर कडेकोट बंदोबस्तानें पावता केला जाईल अशी कांहीं तजवीज करा."

धनाजीनें लगेच बाळाजीपंतांना हांक मारून आज्ञा केली, "बाळाजीपंत, जोत्याजीला आईसाहेबांच्या आज्ञेनुसारें बंदोबस्तानें नगराच्या वेशीबाहेर पावता करून या."

धनाजीच्या आज्ञेप्रमाणें बाळाजीपंत जोत्याजीच्या पाठोपाठ त्याला वेशीपार करण्यासाठीं निघून गेले.

जोत्याजी एवढ्या आनंदानें शुभवार्ता घेऊन आला, त्याला वेशी-पार करण्याचा वेडेपणाचा हुकूम ताराबाईच्या तोंडून सुटलेला ऐकतांच तर बाळाजीपंतांच्या हृदयाची लाही लाही होत होती. त्यांच्या मनांतून जोत्याजीला भेटून सर्व वृत्तांत ऐकावयाचा होता. पण भरदरबारांतून उठून कसें जावें ही चिंता त्यांना होती, ती परमेश्वरी कृपेनें आपोआप दूर झाली.

जोत्याजीची मुस्कटदाबी करण्याचें काम आतां बेमालूम पार पडणार, असा भरंवसा बाळगून ताराबाई, शाहूमहाराजांकडून आलेलें पत्र प्रतिनिधींनीं वाचून समोर ठेविलें होतें तिकडे बोट दाखवून दरबारांतील सर्व सरदारमानकऱ्यांना उद्देशून म्हणाली, "ह्या पत्रावरून तिकडे बादशहाच्या गोटांत मराठशाही नामशेष करण्याचीं कसकशीं कारस्थानें चाललीं आहेत, याची तुम्हां सर्वांना योग्य कल्पना झालीच असेल. मराठशाहीवर गंडांतर आणावयाचें, म्हणून बादशाही सरकारकडून हा कोणी तोतया शाहू गुप्त हेर इकडे पाठविण्यांत आला आहे! यावर तुम्हां सर्वांचें काय मत आहे?"

धनाजी म्हणाला, "आईसाहेब! मला वाटतें, आपण म्हणतां तसा हा बादशाही सरकारचा डाव असला तरी तोतया शाहू निर्माण करून इकडे पाठविण्याइतक्या लांबच्या पल्ल्याचा तो डाव खास नसेल. तसें असतें, तर आपण अलीकडे रोज रोज नवे नवे मराठे सुभेदार व सरदार शाहूमहाराजांना सामील होत असल्याचें ऐकतों, तसें झालें नसतें. हैबतराव निंबाळकर, परसोजी भोंसले, मोरोपंत सबनीस, नेमाजी शिंदे वगैरे मराठशाहींत मुरलेले लोक शाहूमहाराजांना छत्रपति मानून त्यांच्या पायांच्या छायेखालीं सेवा करूं लागल्याच्या बातम्या जे आपले गुप्त हेर रोजच्या रोज आणतात ते हे सारे लोक तोतया शाहूला शरण जाण्याइतके दुधखुळे किंवा दगलबाज खास नाहींत."

धनाजीच्या बोलण्याचा कल कांहींसा शाहूमहाराजांकडे झुकत आहे असें पाहून ताराबाई मोठ्या चतुराईनें अशा आणीबाणीच्या

वेळीं जुळतें घ्यावयाचें ठरवून म्हणाली, “ बरें; सेनापति ! तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें हा शाहू तोतया नसून खरा आहे असें मानिलें, तरी ह्या गादीवर त्याचा हक्क मुळींच पोंचत नाहीं. थोरल्या आबासाहेबांनीं इतक्या महत्प्रयासांनीं मराठशाहीच्या स्वराज्याची स्थापना केली, व त्यांच्या हयातींतच संभाजीराजे सूर्यापोटीं शनैश्चरसे दुर्लौकिकानें गाजूं लागले. थोरल्या आबासाहेबांच्या अवसानानंतर संभाजीमहाराजांनीं दंडेलीच्या जोरावर राज्य बळकावलें. त्यांनीं अपत्यधर्म सोडून सासूबाईना भिंतींत चिणून ठार मारलें, आमच्या कपाळीं वनवास आणला, व पावलोपावलीं राजनीतीचे मुडदे पाडून रांडापोरां-छाकट्यांच्या नादानें महाराष्ट्रभर बेबंदशाही गाजवतां गाजवतां अखेर आपलें व आपल्याबरोबर महाराष्ट्राचेंही समूळ वाटोळें करून सोडलें. त्याच कुळबुडव्या संभाजीराजांचा हा शाहू मुलगा ! ह्या प्रसंगांतून महाराष्ट्राला तारण्यासाठीं राजाराममहाराजांना कसकसा वनवास काढावा लागला, व तुम्हां सर्वांच्या साह्यानें महाराष्ट्राची विस्कटलेली घडी पुन्हा पूर्ववत् बसविण्यासाठीं त्यांनीं किती यातायाती भोगल्या हें महशूरच आहे. अर्थात् महाराष्ट्राच्या राजसिंहासनावर खरा वारसा राजाराममहाराज व त्यांचे वंशज यांचाच आहे. असें असतां शाहू जर आज आला व ह्या आयत्या पिठावर रेघोट्या ओढूं लागला, तर त्याला ह्या राज्यांत थारा दिल्यानें तुम्ही राजाराममहाराजांच्या वंशजांशीं बेइमानी केल्याच्या घोर पापाचे धनी व्हाल. सांगा ! हें घोर पाप तुम्हांला जोडावयाचें आहे, कीं आजच्या छत्रपतींशीं राजनिष्ठ राहून खाल्ल्या निमकाची नेकी राखावयाची आहे ? ”

ताराबाईच्या ह्या आवेशवाणीवर उत्तरपक्ष करण्याची तेथें जमलेल्या सरदार-मानकऱ्यांपैकीं कोणाचीही छाती नव्हती. कारण एक तर ताराबाईचा हे सारे डाव रचण्यांत आपल्या वंशाकडे वंशपरंपरेनें गादी राखण्याचा मानस आहे हें सर्वांना माहीत होतेंच. शिवाय तिनें आपल्या चतुराईनें कारभारीमंडळींच्या मनांत शाहू जन्मापासून बादशहाच्या जनानखान्यांत वाढल्यामुळें मनानें निव्वळ मुसलमान बनला

आहे, असें विष वेळोवेळीं पेरण्याची खबरदारी घेतली होती. शाहू महाराजांवर औरंगजेब बादशहाच्या मुलीचें—झुल्पिकार बेगमचें—बेसुमार प्रेम होतें व तिनें त्यांचें पुत्रवत् पालन केलें होतें, वगैरे गोष्टीदेखील तेव्हां जगजाहीर असल्यानें ताराबाईनें आपल्या स्वार्थसाधनासाठीं विपर्यासानें त्यांचा फायदा करून घेतला होता.

तशांत सर्व सरदार मानकऱ्यांच्या आंगीं नेकी असल्यानें व मराठशाहीच्या हितासाठीं जिवावर उदार होऊन काय वाटेल तें करावयाचें इतकी कडवी स्वदेशनिष्ठा त्यांच्या ठायीं वसत असल्याचें धूर्त ताराबाई अगोदरपासून ओळखून असल्यामुळें शाहूमहाराजांविषयीं सर्वांच्या मनांत विष कालवून त्यांचें मन कलुषित करण्यासाठीं तिनें शाहूला बादशहाचा गुप्त दूत ठरविलें. हें स्वाभिमानी व अतुलपराक्रमी मराठ्यांचें वर्म तिनें बरोबर ओळखलें खरें! तिची ही शंका धनाजी जाधवांशिवाय इतरांना बहुतांशीं खरी वाटली. धनाजीदेखील पूर्वीपूर्वी ताराबाईवर अंधविश्वास ठेवून हरएक बाबतींत तिचीच रीऽऽ ओढीत असे. पण अलीकडे तो एकांगी आंधळ्या राजनिष्ठेच्या चक्रांतून हळुहळू बाहेर पडत होता.

आपण शाहूमहाराजांचा पाडाव करण्याचें कापट्यपूर्ण कोडें भर दरबारांत सर्व सरदार-मानकऱ्यांना घातलें; पण दिलसफाईच्या खुल्या बोलांनीं तें कोडें सोडविण्याला कोणीही पुढाकार घेईना असें पाहून ताराबाई पुन्हा सर्व सरदार दरखदारांना उद्देशून म्हणाली, "सेनापति! प्रतिनिधि! सचीव! तुमच्यांपैकीं कोणीच आमच्या विचाराला खुल्या दिलाचा दुजोरा देत नाहीं याचा अर्थ काय?" लगेच ताराबाई कान्होजी आंग्र्यांकडे वळून म्हणाली, "कान्होजीराव! तुम्हीदेखील असे स्वस्थ कां बसलां? आम्हीं तुम्हांला आज आंवतून एथवर आणलें, तें असे मुखदुर्बळासारखे स्वस्थ बसण्यासाठीं नाहीं. मराठशाहीची सलामत आतां तुम्हां सर्वांच्या स्वामिनिष्ठेवर अवलंबून आहे. बोला, कान्होजीराव! बोला. तुम्ही मराठशाहीच्या ढांसळत्या डोल्हाऱ्याला धिमेपणानें खांदा देऊन राजारामछत्रपतींच्या वंशजांशीं

नेकी राखणार, कीं त्या उचल्या शाहूच्या तोतयेगिरीला भाळून महा-राष्ट्र-सुंदरीला बादशाही सत्तेची बटीक बनवून सोडणार? बोला!"

"आईसाहेब! आम्हांला आपल्याशीं व आपल्या वंशजांशीं इमान राखावयाचें. जी गोष्ट आपणांला मान्य नाहीं, ती आम्हांला-ही मान्य नाहीं." कान्होजी आंग्रे उद्गारले. आंग्र्यांच्या ह्या उत्तरांत सामान्यतः वरवर दिसणाऱ्या रूढार्थापलीकडचा गूढार्थ खच्चून भर-लेला होता. पण तो ताराबाई किंवा तेथें जमलेले इतर सरदार—दरखदार यांच्या निदर्शनाला मात्र आला नाहीं. ताराबाईनें त्यांना आपले अंकित मानून त्यांच्या त्या अरेरावीला सामोपचारानें आळा घालण्यासाठीं त्यांना उभयपक्षीं सलोखा करण्याच्या मिषानें पाचारण केलें, व त्यांनीं त्याला मान दिला; याचें कारण त्यांना छत्रपतींच्या गादीचा एवढा मोठा वचक वाटत होता व सलोख्याची आवश्य-कता वाटत होती असें मुळींच नव्हे. आतां छत्रपतींचा अंमल म्हणजे जराऽवस्थेनें ज्याचे सर्व दांत गळून पडले आहेत व जो परावलंबी झाला आहे, अशा लुप्तवीर्य मृगराजाची गडगंज गुहा आहे. ह्या गुहेंत शिरून आतां कोणाही मर्दानें मनमुराद मनगटमस्ती करून आपली मानमरातबांची व राजवैभवाची मनीषा तृप्त करून घ्यावी, एवढाच सातान्याच्या गादीचा अर्थ घेऊन कान्होजी आंग्रे चालले होते. असें असतांही त्यांनीं ताराबाईचें सलोख्याचें बोलणें सहजगत्या मान्य केलें. याचें कारण, छत्रपति हा कसा झाला तरी परंपरेचा वन-राज होता, व त्या वनराजाच्या आंगीं परक्या प्रतिस्पर्ध्यांचें पारिपत्य करण्याचें पाणी उरलें नसलें तरी त्याच्या राज्यांतील इतर मर्द मराठे त्याचें स्वामित्व कबूल करून परचक्राला वेशीवरून परतून लावण्या-च्या कामीं सर्वथैव समर्थ असे होते. इतक्या साऱ्या मर्द मराठ्यांशीं दावेदारी साधून उघड उघड राज्याचा सवता सुभा स्थापन करा-वयाच्या कामीं पदरीं पडणारे अपार कष्ट वांचविण्यासाठीं आंग्रे आज ताराबाईच्या होला हो देऊन मोकळे झाले. त्यांनादेखील ताराबाई-प्रमाणेंच शाहूमहाराजांचे पाय मराठ्यांच्या गादीवर रुजावयाला

नको होते. कारण ताराबाईसारख्या स्त्रीराज्यकर्त्रीसमोर आपला शिरजोरपणा जितका चालेल, तितका शाहूमहाराजांसारख्या मर्दानी धन्यासमोर चालावयाचा नाहीं याची त्यांना पक्की जाणीव होती.

"आणि प्रतिनिधि! इतर मंडळींचें या बाबतींत काय मत आहे?" ताराबाईनें परशुरामपंतांना विचारलें.

"आईसाहेब! इतर मंडळींचें मत आपल्या विचाराबाहेर थोडेंच असणार! येथें जमलेल्या सरदार-मानकऱ्यांपैकीं कोणी देखील आपल्या पायांपाशीं फसवेगिरीचें पाप करणार नाहीं." परशरामपंत म्हणाले.

"पण सेनापति कांहींच कां बोलत नाहींत?" ताराबाई धनाजीकडे वळून म्हणाली, "सेनापति! तुम्हांला हा सर्व मंडळींचा विचार मानवत नाहीं काय? आपले शिवाजीराजे गादीवर बसले तेव्हां त्यांच्या पायांना स्पर्श करून तुमच्यासह सर्वांनीं तहाहयात राजनिष्ठेची शपथ घेतली, त्या शपथेचा तुम्हांला इतक्यांत विसर पडला काय?"

धनाजी धीरगंभीर स्वरानें उत्तरला, "आईसाहेब! मला त्या शपथेचा विसर पडला नाहीं. पण—"

"पण काय?" ताराबाईनें धनाजीला पुरतेपणीं बोलूं न देतां सांगितलें, "आतां पणबीण कांहीं नाहीं. एथल्या सर्व सरदार दरखदारांना आमची अशी आज्ञा आहे कीं, त्यांनीं आज ह्या गादीला स्पर्श करून राजनिष्ठेच्या शपथा घ्याव्या. त्यांनीं तोतया शाहूला कोणत्याही प्रकारें मदत करूं नये व त्याचें छत्रपतित्व मान्य करूं नये."

ताराबाईच्या तोंडून शपथेविषयीं शब्द निघतात न निघतात, तोंच प्रथम कान्होजी आंग्र्यांनीं गादीला स्पर्श करून राजनिष्ठेची शपथ घेतली. त्यांच्या मागोमाग चंद्रसेनानें शपथ घेण्याचा उतावळेपणा केला. नंतर प्रतिनिधि, सचीव वगैरे मंडळींनीं शपथा घेतल्या. नंतर ताराबाई पुन्हा धनाजीकडे वळून म्हणाली, "सेनापति! आतां तुम्हीं तेवढी शपथ घ्यावयाची राहिली आहे. तुम्हीं शपत घेतली म्हणजे तुम्ही व प्रतिनिधि ह्या दोघांवर तोतया शाहूच्या पारिपत्याची जोखमीची कामगिरी आम्हांला सोंपवावयाची आहे."

आतां धनाजीला मोठा पेंच पडला. त्यानें धाकट्या शिवाजीच्या राज्यारोहणाच्या वेळीं राजनिष्ठेची शपथ घेतली होती खरी. त्या शपथेशीं विसंगत असें वर्तन करण्याला त्याचें मन धजेना. बरें, आज शपथ घेऊन शाहूमहाराजांसारख्या खऱ्याखुऱ्या व कर्तबगार छत्रपतीशीं उघड उघड दावेदारी करणें देखील त्याच्या राजनिष्ठ मनाला रुचेना. आतां काय करावें याचा क्षणभर विचार करून धनाजी उत्तरला, "आईसाहेब! शाहूमहाराज जर सुटून आले व ते खरे छत्रपति आहेत अशी माझी खातरजमा झाली, तर त्यांच्याशीं दावेदारी करण्याचें पाप माझ्या हातून व्हावयाचें नाहीं. पण ज्या अर्थी मीं पूर्वी राजनिष्ठेची शपथ घेतली आहे, त्या अर्थी आज पुन्हा आपल्या मुवर्तीखातर शपथ घेतों. मात्र ती एकाच अटीवर. ती अट अशी कीं, माझ्या जिवांत जीव आहे तोंवर फक्त एकदांच मी शाहूमहाराजांशीं लढेन. त्या लढाईत महाराष्ट्राच्या भाग्याविषयीं भवितव्यता जो काय कौल देईल तो खरा."

या वेळेपुरता तरी धनाजी भाडेभिडेनें कां होईना पण वळला! नंतर प्रतिनिधि आणि सेनापति यांनीं सैन्य घेऊन शाहूमहाराजांवर चाल करून जाऊन त्यांचा पुरा मोड करावा असें ठरलें. त्याप्रमाणें त्या दोघांनीं भरदरबारांत बेलभंडार उचलला. लगेच ताराबाईनें प्रतिनिधींना आज्ञा केली, "प्रतिनिधि! आतांच्या आतां सर्व नगरभर दवंडी पिटवून व ठिकठिकाणच्या सुभेदारांना आज्ञापत्रिका पाठवून जाहीर करा कीं, शाहूला कोणीं मदत करूं नये. त्याला भेटावयाला जाऊं नये. त्याचा जयजयकार करूं नये. ह्या आज्ञा जो कोणी मोडील त्याला कडक शासन करण्यांत येईल."

ताराबाईची आज्ञा म्हणजे बोलूनचालून राजाज्ञा ती! ती अमान्य कोण व कशी करणार! सर्वांनीं त्या आज्ञेप्रमाणें वागण्याचें ठरविलें. शाहूमहाराजांवर सर्वतोपरी बहिष्कार घालणें व जो कोणी तो बहिष्कार मोडील, त्याला कडक शासन करण्यासाठीं पकडून आणून जिकडे तिकडे आबादी आबाद राखणें ह्या जबाबदारीच्या कामावर

ताराबाईनें मुद्दाम चंद्रसेनाची नेमणूक केली. चंद्रसेनानें ती कामगिरी अत्यानंदानें मान्य केली. शाहूमहाराज खेड कडूसच्या बाजूनें मजल दरमजल करीत येत आहेत अशी बातमी ताराबाईच्या गुप्त हेरांनीं आणल्यामुळें धनाजी व परशरामपंत यांनीं चाळीस हजार सैन्य व पुरेशी सामुग्री बरोबर घेऊन खेड कडूसच्या बाजूनें शाहूमहाराजांवर स्वारी करावी असें ठरलें व दरबार बरखास्त झाला.

## प्रकरण दहावें

# स्वामिनिष्ठेची शिकस्त

"बोला छत्रपति शाहूमहाराज की जय!" असा जोत्याजीनें राजवाड्याच्या बाहेर पाऊल टाकतांच प्रचंड जयजयकार केला, त्याबरोबर तेथें जमलेले हजारों नागरिक मेघगर्जनेप्रमाणें गर्जू लागले, "छत्रपति शाहूमहाराज की जय!"

"जोत्याजीबाबा! तुम्ही आंत आईसाहेबांपाशीं गेलां तें काम फत्ते करून आलांना?" गर्दीतून पुढें घुसून एका अठरा एकोणीस वर्षे वयाच्या मिसरूड देखील न फुटलेल्या उमद्या तरुणानें विचारलें.

त्या तरुणाकडे पाहून जोत्याजीला काय वाटलें नकळे; पण त्याच्या डोळ्यांतील अपूर्वाईचा तेजाळपणा अवलोकन करून जोत्याजी एकाएकीं जागच्या जागीं थबकल्यासारखा झाला व कांहीं काळ त्या तरुणाच्या नजरेला नजर भिडवून उभा राहिला. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत त्यानें नजरेच्या भरारीसरसें त्या तरुणाचें नखशिखान्त अवलोकन केलें. तेव्हां त्याच्या अंतःकरणांत सळसळणाऱ्या ऊर्मि असें उचंबळतें पण अस्पष्ट भाषण करूं लागल्या कीं, हा बेटा जणुं काय केसरकरांच्या कुळीं रुजलेला कोंवळा अंकुरच आहे! कारण, एरव्हीं ते टपोरे तेजस्वी डोळे, तो विशाल ललाटप्रांत, ती चाफेकळीसारखी सरळ नासिका व मदनालाही लाजविणारा भरदार चेहरा दुसऱ्या कोणत्या वंशांत थेट साच्यांतून उतरल्याप्रमाणें घडला जावा! पण दुसऱ्याच क्षणाला जोत्याजीनें आपल्या मनाशीं विचार केला कीं, ही आपली निव्वळ फसवणूक आहे. केसरकरांचा वंश येथें कोठून यावयाला! जोत्याजीचा एकुलता एक सूर्यासारखा तेजस्वी व पराक्रमी पुत्र सूर्याजी शाहूमहाराजांच्या हुजरातींत हजर होता व सूर्याजीहून सात वर्षांनीं

त्याची म्हाळसा ह्या नांवाची मोठी कन्या होती, ती जवळजवळ पंधरा-सोळा वर्षांची असतांना संभाजीमहाराजांच्या अंधेरनगरींत बेपत्ता होऊन कांहीं दिवसांनीं तिनें आत्महत्या केल्याची दुष्ट वार्ताही तेव्हांच त्याच्या कानीं आली होती. अर्थात् आज समोर दिसणारा तरुण आपल्या वंशांतील असणें शक्य नाहीं. पण त्या तरुणाची शाहू-महाराजांच्या ठायींची कळकळ पाहून पुन्हा जोत्याजीला वाटलें कीं, इतकी अलोट स्वामिभक्ति तरी केसरकरांच्या कुळाशिवाय अन्य-ठायीं कोठची सांपडावयाला!

"तूं कोण?" जोत्याजीनें त्या तरुणाला विचारलें.

"मी पिराजी." तो तरुण उत्तरला, "बाळाजीपंत देशमुखांचा हुजऱ्या मी. तुम्हांला मी कोण असेनसें वाटलें?"

पिराजीच्या प्रश्नाला उत्तर देण्याची विशेषशी पर्वा न करतां जोत्याजीनें विचारलें, "तुझ्या बापाचें नांव काय?"

जोत्याजीच्या ह्या प्रश्नाचा पिराजीच्या मस्तकावर जणुं काय वज्रा-घात झाला. हाच—अगदीं हाच प्रश्न अनेकवार पिराजीला त्याच्या सख्यासोबत्यांनीं विचारला होता, व तेव्हां त्याला लाजेनें खालीं मान घालावी लागली होती. पिराजी अगदीं लहान होता, तेव्हां हिंडूं-फिरूं लागल्यावर शेजारीपाजारी लोक जेव्हां त्याला उद्देशून 'हा कोणाचा मुलगा' असें विचारूं लागले, तसेंच त्याचे संवगडी जेव्हां त्याला तुझ्या बापाचें नांव काय असें विचारूं लागले, तेव्हां त्यानें गोंधळलेल्या मनानें प्रथम थेट आपल्या आईपाशीं—म्हाळसेपाशीं जाऊन विचारलें, "आई! मुलें मला विचारतात, तुझ्या बाबांचें नांव काय? माझ्या बाबांचें नांव काय ग?" ह्या पिराजीच्या प्रश्नानें गोंधळून जाऊन त्याची कशीबशी बोळवण करण्यासाठीं 'तूं आजो-बांचा मुलगा' असें तिनें त्याला सांगितलें. त्यावरून 'मी आजोबांचा मुलगा' असें सांगण्यांत पिराजीनें आपल्या बाळसेदार बाल्याचे अनेक दिवस अनुभविले. या वेळीं कोठचा कोण व्यासराव, कोठची कोण म्हाळसा, कसलीं हीं आईबापें, असें म्हणून लोक पिराजीच्या तोंडा-

वर व मागेंही प्रच्छन्न निंदा करीत. पण ती कळण्याला पिराजीला कांहींसा अवकाश लागला. तो अवकाश आईबापें म्हणजे काय हें कळण्यापुरताच होता. तें एकदां त्याला कळूं लागलें, व ह्या रहस्य-मय गोष्टींचा पाढा व्यासराव व आई यांच्यासमोर वाचून त्यांना खिन्न करण्यांत अर्थ नाहीं हें तो उमजून चुकला. इतकेंच काय; पण तो तेव्हांपासून म्हाळसा व व्यासराव यांना 'तूंच माझी आई' व 'तुम्हीच माझे आजोबा' असें अंतःकरणापासून म्हणूं लागला, व देवानें जीं हीं दोन मायेचीं माणसें आपल्याला दिलीं आहेत, त्यांना आपण अखेरपावेतों अंतर द्यावयाचें नाहीं असा त्यानें आपल्या मनोमन धडा केला.

ही जी अवस्था पिराजीच्या मनाची, तीच मुक्तेच्याही मनाची होती. जगाकडून होणारा असा जाच वाढत्या वयाच्या मुक्तेला व पिराजीला सहन होईनासा झाला व स्वतःच्या रहस्यमय जीवितामुळें मनमोकळेपणानें जातकुळीचा अभिमान त्या दोघांनाही जागवितां येईना, तेव्हां पोरपणीं जगभर जिकडेतिकडे फांकणारी त्यांची पवित्र नजर तारुण्याच्या रामप्रहरांत एकमेकांच्या हृदयाला जिवींच्या जिव्हाळ्यानें भिडून जीवाभावाचे बोल बोलूं लागली. त्या दोघां सम-दुःखी जीवांच्या संभाषणांत शतसंवत्सरांची करुणा साठवलेली अस-ल्यास त्यांत नवल तें काय? बिचाऱ्या दोघांनाही आपल्या माता-पितरांचा नक्की थांगपत्ता नाहीं. एवढा मात्र थांगपत्ता घरच्या घरीं लागला कीं, हें कांहीं तरी गूढ आहे. पण हें गूढ कोणीं उकलावयाचें!

काळाच्या अथांग दरियांतील परिस्थितीचा प्रवाह तोडीत जातां जातां पिराजीच्या आयुष्याची नाव एकदांची बाळाजीपंतांच्या उंब-ऱ्याला लागली. पुढें चंद्रसेन व बाळाजीपंत यांच्यांत बेबनाव आला व व्यासराव केवळ अन्नवस्त्राच्या मोहबतीसाठीं चंद्रसेनाशीं नमत्या नुरानें वागूं लागल्यामुळें पिराजीला विषाद वाटूं लागला, हें सारें खरें असलें तरी ते आजे नातू एकमेकांमधील जिव्हाळा मात्र विसरले नव्हते, व मरेतों विसरलेही नसते. आजदेखील जोत्याजीनें पिराजी-

ची जातकुळी विचारली, तेव्हां पिराजीनें मनांतली तळमळ मनांत ठेवून दिखाऊ धिम्मेपणानें उत्तर दिलें, "माझ्या बाबांशीं तुम्हांला काय करायचें आहे? माझ्या आजोबांनीं आजवर माझें लालन-पालन केलें. व्यासराव त्यांचें नांव."

"कोण, व्यासराव?" जोत्याजीनें आश्चर्यानें भारून गेल्यासारखें करून विचारलें.

"होय, व्यासराव!" पिराजी उत्तरला.

"आणि ती पोरगी मुक्ता?"

"होय. मला ती माहीत नाहीं; पण मी बादशहाच्या दरबारीं असतांना तिच्याविषयीं ऐकलें मात्र आहे. मुक्ताच तिचें नांव असेल कदाचित्. ती कुठें आहे?"

"तीही आजोबापाशींच आहे."

"ती तुझी बहीण ना?"

"होय!" पिराजी जीभ चावीत उत्तरला.

"बरें; पण तुला रे मी कोण, कुठचा, कुठें गेलों होतों हें कसें माहीत झालें?"

पिराजीनें बाळाजीपंतांच्या सांगण्यावरून धावडशीला गेल्यापासून परत येईतों जो प्रकार घडला, तो जशाचा तसा जोत्याजीला निवेदन केला. चंद्रसेनानें बाळाजीपंतांविषयीं मनांत वांक बाळगिलेला आहे व तो शाहूमहाराजांविरुद्ध ताराबाईला सामील आहे ही गोष्ट जग-जाहीर होती. खुद्द जोत्याजीलाही राजवाड्यांत जातां जातां चंद्र-सेनाच्या विखारलेल्या स्वभावाची ओझरती झुळूक लागली होती. तेवढ्यांत पिराजीनें अभिमानपूर्वक आपल्याला स्वामींनीं बाळाजी-पंतांना दिलेल्या पत्राच्या रक्षणासाठीं चंद्रसेन व धनाजी यांच्या हातून कशी विटंबना सहन करावी लागली हें सांगतांच, व इतक्या यातना सोसून देखील पिराजी शाहूमहाराजांच्या ठायीं अलोट निष्ठा टेवून एथवर आला असें पाहतांच जोत्याजी आवेशानें उद्गारला, "बाप तसा आणि बेटा असा! ही आपलीच अवलाद असें सांगतांना

बिचारा धनाजी शरमिंदेपणानें पावलोपावलीं खालीं मान घालीत असेल! त्या निमकहराम चंद्रसेनाला म्हणावें, शाहूमहाराजांच्या राज-सिंहासनाच्या पायरीखालीं तुझ्यासारखे असे कितीही विंचू दिमाखानें दडून बसले व राणीदेखील जरी नागिणीप्रमाणें महाराजांच्या मानेचा चावा घ्यावयाला टपलेली असली, तरी त्या सर्वांना लाथांखालीं ठेंचून सिंहासनाची पायरी चढण्याचें बळ परमेश्वरानें महाराजांना दिलें आहे."

"काय, आईसाहेबांनादेखील शाहूमहाराजांची सुटका झाली ही गोष्ट रुचली नाहीं!" पिराजीनें विचारलें.

"नाहीं!" जोत्याजी कळवळ्यानें म्हणाला, "मी मोठ्या आशेनें शाहूमहाराजांच्या सुटकेची वार्ता घेऊन आईसाहेबांपाशीं गेलों. आई-साहेब ही वार्ता ऐकून माझ्या तोंडीं साखर घालतील अशी मला जबर आशा होती. पण त्या आशेच्या तोंडीं निराशेची माती पडली. ह्याच राणीला—ह्याच ताराबाईला बाळपणीं मी माझ्या कटिखांद्यावर खेळविली. पण त्याची तिला आज आठवण नाहीं! जगाचा न्याय हा असा आहे!"

सभोंवारच्या जनसंमर्दाच्या गलबल्यांत जोत्याजीच्या एकेका शद्बा-वर एकेक भाष्य रचिलें जात होतें; जोत्याजी व पिराजी एकमेकांशीं बोलतां बोलतां इतके एकजीव होऊन गेले होते कीं, तेघढ्यांत मागा-हून येऊन 'जोत्याजीबाबा' अशी कोणीं तरी दोन वेळां हाक मारली तरी दोघांनाही दाद लागली नाहीं.

"पिराजी!" जोत्याजीला ज्या व्यक्तीनें हांक मारली, त्याच व्यक्तीनें पिराजीलाही हांक मारली.

"कोण, धनीसाहेब!" पिराजी मागें वळून विचारतां विचारतां पाहतो तों बाळाजीपंत तेथें हजर! बाळाजीपंतांनीं हातानें खूण कर-तांच जोत्याजी व पिराजी त्यांच्या मागोमाग दूरवर चालत गेले. नंतर बाळाजीपंतांनीं प्रथम पिराजीच्या प्रकृतिमानाची चौकशी केली व गोड शद्बांनीं त्याला शाबासकी देऊन नंतर ते जोत्याजीकडे वळून

म्हणाले, "जोत्याजीबाबा! तुम्हांला वेशीपार करण्याविषयीं मला आईसाहेबांचा हुकूम झाला आहे."

छत्रपतींच्या तीन पिढ्यांना आंगाखांद्यावर खेळवून मीं वाढविलें, छत्रपतींच्या कुळाचें कल्याण साधण्यासाठीं उभ्या संसाराची मीं मीठ-मोहरी त्यांच्यावरून ओंवाळून टाकली. त्या मला वेशीपार व्हावयाला सांगणारी ही आईसाहेब कोण?" जोत्याजी पिराजीकडे वळून विचारूं लागला, "हेच तुझे धनीसाहेब बाळाजीपंत ना?"

"होय." पिराजी उत्तरला. तेवढ्यांत आपल्या मागावर कोणी येत आहे किंवा कसें, हें पाहण्यासाठीं बाळाजीपंतांनीं पिराजीला नगराकडे पाठविलें.

"बाळाजीपंत!" जोत्याजी बाळाजीपंत आतां एकटेच तेथें उभे असलेले पाहून मनमोकळेपणानें म्हणाला, "तुमच्या ह्या हुजऱ्या-वरून मीं माझ्या मनाची खातरजमा केली होती कीं, तुम्ही मराठ्यां-च्या गादीचे नेकीचे नोकर असाल. तुम्हां दोघांच्या भरंवशावर शाहू-महाराजांनीं माझ्या हातीं खलिता पाठविला. महाराष्ट्राचा देव आज-वर जो दिल्लीला मुसलमान दैत्यांच्या दाढेखालीं मेलेलें जिणें जगत होता, आणि 'दैत्य माजले भूमंडळीं' अशीं पुराणकाळचीं रड-गाणीं गात आपण सारे कपाळाला हात लावून बसलों होतों, त्या देवाची दैत्यांच्या दाढेंतून मोकळीक झाली व तो पुन्हा देव्हाऱ्यांत येऊं लागला. त्याला देवघराचे दरवाजे तुमच्याआमच्यासारख्या देव-भक्तांनीं खुले करावयाचे नाहींत तर दुसऱ्या कोणीं खुले करावयाचे? तुम्ही त्या देवांचा रस्ता रोधणार का? त्यांच्या वाटेंत कांटे पसरणार का? आपत्तींच्या अंधाऱ्या रात्रीं त्यांना राजरोस राजरस्ता दिसावा म्हणून स्वामिभक्तीची दिवटी हातीं घेऊन वणवणणाऱ्या माझ्या-सारख्या देवसेवकाला असा जिवंतपणीं खच्ची करणार का?"

जोत्याजीचे शब्द जिव्हाळ्याचे होते, व ते बाळाजीपंतांच्या जिव्हारीं जाऊन भिडलेही. वस्तुतः हे शब्द कोणाच्याही वर्मी घाव पडण्या-सारखे होते, पण ते घाव कोणाच्या वर्मी? तर चंद्रसेन जाधवासारखे

बद्नेकीचे निमकहराम असतील त्यांच्या! बाळाजीपंत तसे नव्हते. त्यामुळें त्यांना जोत्याजीच्या वाणींतून जणुं काय देवलोकींच्या नंदन-नंदनवनांतील सुवासिक सुवर्णपुष्पांची पखरणच आपल्या अंतःकरणा-वर पडली असें वाटलें. असल्या कळकळीच्या व खऱ्या दिलाच्या म्हाताऱ्याचे पाय आज इतक्या वर्षांनीं आपल्या राज्याला लागले; त्याच्या पुण्यशील पावलांच्या आश्रयानें नव्या राजोपचारी शृंगार-साजांत विराजणारी मराठ्यांची राजलक्ष्मी आपल्या माहेरघरीं चालून आली असें मानावयाचें सोडून ताराबाईनें त्या राजलक्ष्मीचीं उमटतीं पावलें पुशीत तिला वेशीपार करण्याची कडू कामगिरी आपल्या कपाळीं लादली, म्हणून मात्र बाळाजीपंतांचा जीव कळवळूं लागला.

आपल्या भाषणानें बाळाजीपंत ओशाळे झालेले पाहून जोत्या-जीला आशा वाटूं लागली कीं, आपण ह्या उमद्या वीराला आपल्या बाजूला वश करून घेऊं. तो पुन्हा म्हणाला, "बाळाजीपंत! तुमच्या मनींचा हा गोंधळ अशी स्पष्ट साक्ष देत आहे कीं, तुमचें मन तुम्हांला खातें आहे."

बाळाजीपंत उत्तरले, "जोत्याजीबाबा! राजाज्ञेची पाळणूक करणें महाकर्म कठीण आहे."

"पण राजा कोण व तुम्ही आज्ञा पाळतां कोणाची?"

"तें सारें मला कळतें. पण जसा देश तसा वेश घ्यावा लागतो; सर्व काळीं परिस्थिति सारखीच नसते."

"पण परिस्थिति बदलली म्हणून माणसाची दानत बदलावी कीं काय? परिस्थिति माणसांना जन्माला घालीत नाहीं; माणसें परिस्थिति जन्माला घालतात. खऱ्या धन्याशीं बेइमान होऊन परिस्थितीसमोर मान नमविणाऱ्या नादान् नामर्दांनीं परिस्थितीचा बागुलबोवा पुढें करावा. तें तुमच्या–आमच्यासारख्या इमानी मर्दांचें काम नाहीं."

"तुम्ही म्हणतां तें सारें खरें; पण जोत्याजीबाबा! ही बोलत बसण्याची वेळ नाहीं. तुम्ही येथलेच पिढीजाद रहिवासी असलां तरी अलीकडे येथील वातावरणांत वाहूं लागलेले विषारी वारे तुमच्यां-

सारख्या नेकीच्या स्वामिनिष्ठांना मुळींच मानवण्यासारखे नाहींत. तुम्ही माझें ऐका व ही गर्दी सोडून जरा तोंड लपवून आडवशाला जा."

"तोंड लपवूं? मी कां म्हणून तोंड लपवूं? मी राजरोस राजरस्त्यांतून मिरवून असाच ललकारणार!" असें म्हणून जोत्याजी जोरानें ललकारला, "छत्रपति शाहूमहाराज की जय!"

"जोत्याजीबाबा! माझें ऐका. स्वाभिमान आणि स्वामिनिष्ठा अशी अवेळीं उतूं देतां उपयोगाची नाहीं. तुमची वागणूक सचोटीची व नेकीची खरी; पण कौल लावावयाचा तो पाषाणाच्या ठायीं देवरूपानें बसणाऱ्या देवाला लावावयाचा; देवपणावेगळ्या दगडाला नाहीं लावावयाचा."

बाळाजीपंतांच्या तोंडचें वाक्य पूर्ण होतें न होतें, तोंच पिराजी वाड्याकडील कानोसा घेऊन धावत धावत पुढें आला व घाबऱ्या घाबऱ्या सांगूं लागला, "धनीसाहेब! जोत्याजीबाबापाशीं बोलत बसण्याची ही वेळ नाहीं. ताराबाई आईसाहेबांच्या सांगण्यावरून चंद्रसेन व संभाजी यांनीं जो कोणी शाहूमहाराजांच्या नांवाचा जयजयकार करील त्याला चेंचण्याचा सपाटा चालविला आहे, व शाहूमहाराजांचें पत्र घेऊन येणारा म्हातारा सांपडल्यास त्याला कैदेंत डांबण्याचीही त्यांची आईसाहेबांच्याच सांगण्यावरून धडपड चालली आहे."

"काय? मला कैदेंत टाकणार?" जोत्याजीनें चवताळून विचारलें, "हे भुरटे बाजारबुणगे मला कैद करणार? जा!—राणीला सांगा मराठी राज्याचे खरेखुरे धनी छत्रपति शाहूमहाराज हेच आहेत; व तुझा दरबार हा कावळ्यांचा दरबार आहे. तेथल्या कावळ्यांच्या कावकावीला हा भोंसलेराजांच्या कैक पिढ्यांचा पिढीजाद बंदा सेवक कस्पटासमान मानतो म्हणावें. म्हणे मला कैदेंत टाकणार!"

बोलतां बोलतां जोत्याजीला इतका चेव चढला, कीं त्या भरांत त्याला बोलताच येईनासें झालें. त्याची जीभ अडखळूं लागली,

सर्वांग थरथर कांपूं लागलें व डोक्यावरील केंस खंद्या वीरांच्या पलटणीसारखे ताठ उभे राहिले.

जोत्याजीचा रागाचा वणवा जास्त भडकूं नये म्हणून विषयांतर करण्याच्या इराद्यानें बाळाजीपंत पिराजीला म्हणाले, "आईसाहेबांचा असा हुकूम झाला आहे म्हणून तुला कोणीं सांगितलें?"

पिराजी उत्तरला, "चंद्रसेनानें दोघां शिपायांना तसा हुकूम देतांना मीं प्रत्यक्ष माझ्या कानांनीं ऐकला. आणि चंद्रसेनही इकडेच यावयाला निघाला आहे. तो जर इतक्यांत इथें आला, तर केवढा बरें अनर्थ गुदरेल!"

"गुदरूं दे! काय अनर्थ गुदरावयाचा तो गुदरूं दे! धनाजी जाधवाचीच अवलाद आहे का ही? बाप तसा; बेटा असा! बस्स! चंद्रसेन येऊं दे किंवा त्याचा संभाजी कोण तोही येऊं दे. मी त्यांना मारीन तरी किंवा त्यांच्या हातीं मरेन तरी!"

म्हातारा सामोपचारांनीं ऐकत नाहीं असें पाहून पिराजीनें त्याच्या पायांना मिठी मारून विनविलें, "जोत्याजीबाबा! आतांच धनीसाहेबांनीं तुमचें व माझें आजे नातवांचें नातें लावून दिलें आहे. तुमच्यावर कोणीही चालून आला तरी माझ्या डोळ्यांदेखत मी तुमच्या केंसालाही धक्का लागलेला मुळींच सहन करणार नाहीं!"

पिराजी एवढें बोलूनच थांबला नाहीं; त्यानें जोत्याजीचा हात घट्ट पकडून त्याला आपल्याबरोबर चालविलें. पिराजीच्या हस्तस्पर्शांत अशी काय अजब जादू होती नकळे; त्यानें जोत्याजीच्या सर्वांगांत कसल्या तरी गूढ आपलेपणाचीं गोड कंपनें विद्युत्प्रवाहाप्रमाणें वाहतीं केलीं.

"पिराजी! कोणीं विचारलेंच तर जोत्याजीला वेशीपार केला म्हणून सांगावयाचें, व आमच्या घरींदेखील कोणाला कसलीच जाग लागूं द्यावयाची नाहीं." बाळाजीपंतांनीं पिराजीला बजावलें. पिराजी मानेनें होय म्हणून वाटेला लागला. जोत्याजीही वेळेचें महत्त्व ओळखून पिराजीच्या मागोमाग चालूं लागला.

जोत्याजीची सोय लावून बाळाजीपंत राजरस्त्यानें पुन्हा नगरांत येतात न येतात तोंच थोड्या वेळापूर्वी जें नगर शाहूमहाराजांच्या जयजयकारानें दुमदुमून गेलें होतें, त्याच नगरांत दवंडीचा अमंगळ ध्वनि दुमदुमूं लागलेला त्यांच्या कानीं आला, "शाहू हा तोतया असून बादशहाचा हेर आहे. तो मराठशाही बुडविण्यासाठीं इकडे येत आहे. त्याला कोणी छत्रपति म्हणावयाचें नाहीं. त्याच्या नांवाचा जयजयकार करावयाचा नाहीं. शाहूच्या पक्षाशीं जो कोणी सामीलगिरी करील त्याला कडक शासन करण्यांत येईल."

ही चमत्कारिक दौंडी ऐकून बाळाजीपंतांना पराकाष्ठेचें वाईट वाटलें. ह्या प्रसंगांतून सहीसलामत कसें पार पडावयाचें हा विचार बाळाजीपंतांच्या मस्तकांत वेगानें वावरत असतांना बाळाजीपंत मंद गतीनें एकेक पाऊल मोजीत चालले होते. इतक्यांत वारुळांतून सर्प बाहेर पडावा त्याप्रमाणें मार्गांतील ओसरत्या गर्दीतून चंद्रसेनानें आपल्या चार संवगड्यांसह पुढें येऊन बाळाजीपंतांना विचारलें, "बाळाजीपंत! त्या थेरड्याला कैद केलात का?"

"नाहीं." बाळाजीपंत म्हणाले, "चंद्रसेन! जरा सरळ भाषेंत बोलावें. मीं त्याला सेनापतींच्या हुकुमाप्रमाणें वेशीपार करून दिला."

"पण तुम्हीं त्याला कैद कां केला नाहीं हें अगोदर सांगा." चंद्रसेनानें विचारलें.

"त्याला कैद करण्याचा मला हुकूम नव्हता." बाळाजीपंत उत्तरले.

"हुकूम नव्हता तर आतां मी हुकूम देतों; आतांच्या आतां जा व त्या म्हातारड्याला सांपडेल तसा कैद करा. त्याला आतांच्या आतां अटक करून कैदखान्यांत डांबावें, असा आईसाहेबांचा हुकूम आहे; ही माझ्या पदरची गोष्ट नाहीं."

बाळाजीपंत उत्तरले, "हुकूम कोणाचाही असला, तरी एकदां जखमी होऊन जंगलांत रिघलेल्या वाघाला पुन्हा पकडून बंदिवान करणें तुम्हां आम्हांला वाटतें तितकें सोपें नाहीं."

यावर 'खऱ्या मर्दाला अशक्य अशी कोणतीच गोष्ट नाहीं. त्या वाघाला मी जंगलांतून हुडकून काढून कसा पकडतों पाहा' असें म्हणून चंद्रसेन चंग बांधून जोत्याजीच्या पाठलागावर निघाला. त्याच्या शेवटच्या शद्बांचे घाव बाळाजीपंतांच्या वर्मी बसले. पण करणार काय? योग्य वेळीं त्यांची परतफेड करण्याची मनोमन खूणगांठ बांधून बाळाजीपंत पुढील कारस्थानाच्या उभारणीसाठीं धनाजीच्या घरीं निघाले.

## प्रकरण अकरावें

# एक भयाण कारस्थान

"मुक्ते!" मुक्ता बाळाजीपंतांच्या घरून आपल्या झोंपडींत येऊन प्रातःकाळचें केरपाणी व सडासारवण आटोपून आंगणांत रांगोळी घालीत होती, व तिची कपिला तिच्या सभोंवार बागडत होती इतक्यांत मागाहून कोणींशी हांक मारली. त्या आवाजावरून ती संभाजीची हांक आहे हें तिनें तेव्हांच ओळखलें. त्याबरोबर तिच्या मस्तकांत तिरकाराची तिडीक उठली. पण तिरस्कार दाखविण्याची ही वेळा नव्हे, हें प्रसंगावधान राखून तिनें उसनें हास्य चेहऱ्यावर बठवीत मागें वळून पाहिलें व हांकेला गोड प्रत्युत्तर दिलें, "कोण, संभा!"

"तुझी एक आज्ञा मीं पाळली. तुझ्या पिराजीला मीं काळच्या जबड्यांतून वांचविला." संभाजी अंमळ जवळ येऊन कपिलेला कुरवाळण्यासाठीं हात पुढें करीत लाडक्या भाषेंत कपिलेशींच बोलूं लागला, "पोरी! काल माझ्या हातून तुझा पाय दुखावला म्हणून माझ्यावर रुसलीस कीं काय? चल इकडे ये."

कपिला काय; बोलूनचालून जनावर! ती मुक्तेची जिव्हाळ्याची मैत्रीण होती खरी; पण माणूस नव्हती. त्यामुळें षड्रिपूंचा अरेरावी कारभार तिच्या मनांत चालत नव्हता. कोणीं प्रेमानें वागविलें तर त्याच्याशीं प्रेमानें वागावयाचें, कोणीं दूर लोटलें तर दूर जावयाचें, कोणीं रागें भरलें तर हिरमुसलें व्हावयाचें व जवळ ओढलें तर जवळ जावयाचें अशी तिची साधुवृत्ति होती. ती अगदीं मनमोकळेपणानें संभाजीनें हांक मारतांच त्याच्यापाशीं जाऊन लडिवाळपणा करूं लागली.

"तूं पिराजीला वांचविलेंस म्हणजे काय केलेंस?" मुक्तेनें विचारलें.

संभाजी कपिलेचा एक मुका घेऊन म्हणाला, "माझें पत्र मला सांपडलें व मीं तें फाडून टाकलें असें बाबांना व आईसाहेबांना सांगून तुझ्या पिराजीविषयींचा त्यांचा रोष दूर केला."

संभाजीनें दोन्ही वेळां 'तुझा पिराजी' असा खोंचिक शब्द वापरला तो मुक्तेच्या तेव्हांच लक्षांत आला. ह्या खोंचेचाच पुढें खांच-खळगा व्हावयाचा व त्यांत पिराजी वेळीं गाडलादेखील जावयाचा, ह्या भावी भयाची जाणीव ठेवून वेळींच ती खोंच बुजवून टाकण्याच्या इराद्यानें मुक्ता म्हणाली, "माझा पिराजी आणि तुझा नव्हे? असली भाषा पुन्हा माझ्यापाशीं तरी बोलूं नकोस. आपण एका खेळीमेळीचीं मुलें; एकाला कांटा लागला तर दुसऱ्याला कळ उठली पाहिजे. चुका होत नाहींत कोणाच्या हातून? चुका सर्वांच्या हातून होतात. पण आमच्यांतल्या एखाद्याची चूक झाली तर त्याला आम्हींच संभाळून घ्यायला नको का? त्याला तरी आमच्याशिवाय दुसरें कोण आहे?"

"पण हाच तुझा माझ्या ठायींचा भाव कायम राहिला तर माझा त्याच्या ठायींचा भाव कायम राहील!" संभाजी उत्तरला.

ह्या शब्दांच्या रूपानें संभाजी आपणापाशीं पुन्हा लग्नाचें वचन मागत आहे अशी मुक्तेची खात्री झाली. पण तिनें घेतलेली भूमिका तिला अखेर पावेतों साजरी करावयाची होती. ती उत्तरली, "माझ्याविषयीं तुला पुन्हा संशय येऊं लागला का?"

"संशय आला नाहीं; पण—" पुढें संभाजी भीत भीत थांबला.

"कां? असा मध्येंच कां थांबलास?" मुक्तेनें विचारलें.

"थांबलों एवढ्याचसाठीं, कीं तोंडांत गोष्ट आली ती तशीच महत्त्वाची व गुप्त होती."

"पण माझ्यापाशीं देखील बोलायची नाहीं अशी गुप्त गोष्ट तरी कोणती?"

"पण ही बातमी बाहेर फुटली तर माझ्या व बाबांच्या प्राणावर

तेल; म्हणून मला तिची इतक्यांत वाच्यता करतां कामा नये."

"बरें; मी जर तुला इतकी परकी वाटत असेन तर मला नको ांगूं!" मुक्ता रागाला येऊन तोंड फिरवून म्हणाली.

आतां जर मुक्ता जास्त रागावली तर तिच्या कालच्या होकारा र पाणी पडेल ह्या भयानें संभाजीला आपलें हृद्गत तिच्यापाशीं घडें करणें अवश्य वाटलें. तो म्हणाला, "मुक्ते! अशी रागावूं कोस. जी गोष्ट आतां मी तुला सांगणार आहें, तो माझ्या भावी भवमंदिराकडे जाण्याचा राजमार्ग आहे. पण त्या मार्गानें मी ात आहें असें जर बाळाजीपंत किंवा त्यांचे इतर साथीदार यांना ळलें तर मी मंदिरापर्यंत पोंचण्यापूर्वी त्याच मार्गांत माझा मुडदा डेल!"

"पण तें सांगावयाचें नसलें तर त्याच्याविषयीं इतका पाल्हाळ ी कशाला हवा?" मुक्ता बातमीचें महत्त्व ओळखून, ती आपल्या- ाशीं पुरेपूर ओकून टाकण्याइतकें संभाजीचें मन उचंबळूं लागण्या- ाठीं त्याच्याकडे डाव्या बाजूनें मान वळवून तिरकस पण तीक्ष्ण ासे नेत्रकटाक्ष फेंकीत म्हणाली.

आधींच मुक्ता स्वरूपसुंदर; तशांत तिची नजर म्हणजे चमकती ाजली! ती बिजली चमकण्यापूर्वींच त्याच्या मनाची कार्यदक्षता ांसळूं लागली. तेव्हां अगोदर मुक्तेपासून ही गोष्ट कोणापाशींही बोलण्याविषयीं तिला आपल्या व पिराजीच्या अशा दोघांच्याही ळ्याची शपथ घ्यावयाला लावावयाची होती. पण एकवार बिजली मकतांच तो भोळसट मायावी इष्काच्या ओसरत्या स्रोतांत इतका कजीव होऊन गेला कीं, अशा वेळीं मुक्तेला शपथ घ्यावयाला ावणें म्हणजे तिच्याविषयीं अविश्वास दाखवून तिचा अपमान करणें ाय असें त्याला वाटलें. तो आपलें हृद्गत ओकूं लागला, "बाद- हाकडून एक बाटगा तोतया मराठशाही उलथून पाडण्याच्या इराद्यानें राठ्यांच्या गादीवर हक्क सांगण्यासाठीं 'शाहू छत्रपति' हें नांव ारण करून इकडे येत आहे. त्याचें पारिपत्य करण्यासाठीं आजोबा

व प्रतिनिधि पंचवीस हजार फौजेनिशीं खेड–कडूसकडे आजच चालून जावयाचे आहेत. ते त्या तोतयाचें पारिपत्य करतीलच. पण त्यांचा डाव वेळीं फसला तरी त्या तोतयाचा नायनाट करावयाचाच असा बाबांनीं आईसाहेबांसमोर विडा उचलला आहे.

"पण तो नायनाट कसा करायचा?"

"तें सांगतों." संभाजी संशयी मुद्रेनें सभोंवार पाहत म्हणाला, "पण तुझे आजोबा कुठें आहेत?"

"ते तुझ्याच घरीं देवपूजेला गेले आहेत ना?" मुक्ता म्हणाली.

"होय का?" संभाजी पुन्हा सभोंवार पाहत म्हणाला, "पण दुसरें कोणी आजूबाजूला नाहीं ना?"

"कोणी नाहीं तिकडे." मुक्ता म्हणाली.

"लगेच संभाजीनें मुक्तेच्या कानाशीं तोंड नेऊन हळूहळू तिला कायसें सांगितलें.

"पण हा बेत साधेल का? नाहीं तर त्या तोतयाच्या मानेवर उचललेली तरवार विरुद्ध पक्षाच्या कारस्थानांच्या झंझावातांत उलटा पवित्रा टाकून तुझ्याच मानेवर तुटून पडायची!" मुक्ता म्हणाली

"त्याची नको तुला काळजी." संभाजी मुक्तेचा हात आपल्या हातीं घेत म्हणाला, "आतां तुझ्यापाशीं बोललों म्हणून तुला कळल्या. बाकी, बायकापाशीं अशा महत्त्वाच्या गोष्टी शहाण्या पुरुषानें बोलूं नयेत."

"पण साऱ्याच बायकांना कांहीं हा नियम लागू नाहीं. छत्रपति संभाजी महाराजांची अशी कीर्ति सांगतात कीं, ते एरव्हीं इतके अरेरावी होते तरी येसूबाईराणीसाहेबांच्या संमतीशिवाय कोणतीही गोष्टी करीत नसत. कोणत्याही राजकीय उलाढालीवर छत्रपतींच्या नांवाचा राजशाही शिक्कामोर्तब व्हावयाचा. आणि शेवटीं संभाजी-महाराज कुत्र्याच्या मोतीनें मरून धुळीला मिळाले ते मात्र कबजी-सारख्या पाजी पुरुषाच्या नादानेंच."

मुक्ता बोलली तें अक्षरशः खरें होतें, व तें संभाजीच्या मनाला

पटलेंही. पण त्यानें जी शंका घेतली, तिच्यांत भवितव्येची छाया उमटलेली मात्र त्याला पाहतां आली नाहीं. तो मारे मोठ्या दिमाखानें शाहूमहाराजांची शिकार करावयाला निघाला होता. त्याच्या कल्पनाचक्षूंना शेंपन्नास कोसांवरचें सावज स्पष्ट दिसत होतें; पण पावलाखालीं डोलणारी विषारी नागीण मात्र दिसत नव्हती. तरीही तो बोलून गेल्यावर त्याला शंका आलीच. ती फेडून घेण्याच्या इराद्यानें तो म्हणाला, "पण मुक्ते! तूं कोणापाशीं देखील ह्या गोष्टीची वाच्यता करणार नाहींस ना?"

"नाहीं."

"पिराजीच्या व माझ्या गळ्याची शपथ?" मुक्तेला अजूनही पिराजी प्रिय असेल अशा संशयानें संभाजीनें विचारलें. मुक्ता कधीं थट्टेंतदेखील प्रीतीच्या माणसांवरून खोटी शपथ घेत नाही हें त्याला माहीत होतें; म्हणूनच त्यानें ह्या शपथेवरून तिची परीक्षा पाहावयाचें ठरविलें होतें.

मुक्तेला आतां मोठा पेंच येऊन पडला. तिनें विचारलें, "संभाजी! हें तूं माझें मन पाहत आहेस का?"

"तें कसें?"

"कसें म्हणजे?" मुक्ता आपल्या मोहक नजरेंतून लाडिकपणाचे फवारे सोडीत उद्गारली, "पिराजीची व तुझी योग्यता मीं सारखीच केलेली तुला रुचेल का? मी आतां कांहीं लहान नाहीं तुझ्या बरोबरीनें मी पिराजीला कधींच मान द्यायची नाहीं. देव आणि शंख-घंटा हीं आपण एकाच देव्हाऱ्यांत पुजतों खरीं; पण देवांना देव्हाऱ्याच्या मधोमध संपुष्टांत ठेवून पुजतों व शंख आणि घंटा यांना देवाच्या द्वारपापाळांसारखे देव्हाऱ्याच्या पुढच्या दोन कोपऱ्यांत उभे करून त्यांवर गंधफूल घालतों. मी तुझ्या गळ्याशपथ सांगतें, ह्या गोष्टीची वाच्यता मी कुठेंही करणार नाहीं."

संभाजीला मुक्तेचे बोल मनापासून आवडले. त्या हर्षातिरेकाच्या भरांत तो म्हणाला, "मुक्ते! माझ्या ठायीं तुझी इतकी निःसीम

आपुलकी आहे ह्या एकाच आशेवर मी एक तोतया शाहूचसा काय, पण विजयी होऊन तुला वैभवाच्या शिखरावर चढविण्यासाठीं खरा-खुरा शाहू—एक नव्हे, असे दहा शाहू—आले तरी त्यांना रसातळाला पोंचवीन."

शाहूमहाराजांविषयीं संभाजीनें असे अधमपणाचे उद्गार काढतांच मुक्तेला वाटलें कीं, ह्या नराधमाच्या नरडीचा घोटच घ्यावा. पण ती ही वेळ नव्हे हें ओळखून ती आली वेळा साजरी करून नेण्याच्या इराद्यानें उत्तरली, "मग मला किती अभिमान वाटेल!"

संभाजी मुक्तेच्या अभिमानाकडे पाहून गर्वानें फुगून जाऊन म्हणाला, "आमचा डाव साधला तर मराठशाहीचें सेनापतित्व वंशपरंपरेनें आमच्याकडे राहील. आजोबांच्या पश्चात् बाबा सेनापति होतील व बाबांच्या पश्चात् मी! लोक म्हणतात कीं, बाबांना औरस मुलगा झाला तर वंशपरंपरेनें सेनापतिपदावर त्याचा हक्क शाबीत होईल. पण बाबांकडून आईनें शपथ घेवविली आहे कीं, संभाजी-लाच माझ्या पश्चात् सेनापति करीन. परमेश्वर पावावा व बाबांना दुसरा मुलगाच होऊं नये. पण तो झालाच व वडिलार्जित हक्का-साठीं भांडूं लागलाच तर मी त्याला हां हां म्हणतां गाडावयाला कमी करणार नाहीं. हें सर्व मी केवळ तुझ्यासाठीं, मुक्ते! तुझ्याच-साठीं व तुझ्या मुलांबाळांसाठीं करणार."

इतक्यांत रस्त्याच्या दुसऱ्या वळणावरून व्यासराव येतांना तिला दिसला. तिकडे बोट दाखवून मुक्ता म्हणाली, "अग बाई! आजोबा आले. आतां कसें करायचें?"

"कां? आजोबांची तुला एवढी भीति कां?" संभाजीनें विचारलें.

"आजोबांनीं मला सांगून ठेवलें आहे कीं, संभाजीशीं लग्न होईतों तूं संभाजी किंवा पिराजी यापैकीं कोणाशींच फारशी बोलूं नकोस. आपण तरी उगाच थोडक्यासाठीं वडील माणसांचीं मतें कशाला दुखवा! उद्यांचें राज्य आपलेंच आहे."

संभाजीला मुक्तेचा उपदेश शहाणपणाचा वाटला. तो मुक्तेचा अखेर निरोप मागण्यासाठीं म्हणाला, "मुक्ते! आज मी मुलुख-गिरीवर निघालों आहें वीरपुरुष पराक्रम करण्यासाठीं निघाले म्हणजे त्यांच्या स्त्रियांनीं त्यांचें अभिष्ट चिंतावयाचें असतें—"

"मग मीही तुझें अभिष्ट चिंतितें. परमेश्वर माझ्या संभाजीला विजयश्री हो नवी नवरी मिळवून देऊन सुखरूपपणें घरीं आणील."

"पण तूं तिच्याशीं सवतीमत्सर साधणार नाहींस ना?" संभाजीनें हंसत हंसत कौतुकानें विचारलें.

मुक्तेनें उसन्या हास्याचें परतवाण फेकून सांगितलें, "आतां तूं जा कसा!"

"हो जातोंच." असें म्हणून संभाजी जावयाला निघाला.

व्यासराव घरांत येतो न येतो तों मुक्ता देवघरासमोर हात जोडून अनन्यभावानें देवाला आळवीत होती, "देवा! संभाजीच्या कुटिल कारस्थानांना यश देऊं नकोस."

व्यासरावानें मुक्तेला विचारलें, "मुक्ते! आतां तूं कोणाशीं बोलत होतीस? संभाजी आला होता काय?"

"होय." मुक्ता उत्तरली.

आजोबांपासून कोणतीच गोष्ट चोरून ठेवावयाची नाहीं असा मुक्तेचा बाणा होता. पण ती व्यासरावाच्या मनाचा दुबळेपणा पूर्ण-पणें ओळखून असल्यानें तिनें शाहूमहाराजांच्या वधाच्या कटाची बातमी तेवढी वगळून संभाजी तोतया शाहूचा मोड करण्यासाठीं गेला आहे व तिकडून विजयी होऊन आल्यावर तो आपल्याला मागणी घालणार आहे एवढेंच सांगितलें.

व्यासरावाला ही शुभवार्ताशी वाटली नाहीं. तो हताश हृदयानें उद्गारला, "पोरी! तुझ्या नशिबीं असेल तसें होईल. आपण चंद्र-सेनाच्या अन्नावर जगतों त्याअर्थीं संभाजीसाठीं तुझी मागणी करण्या-चा हट्ट चंद्रसेनानें सोडलाच नाहीं तर मला माझ्या मर्जीविरुद्ध त्याला होकार देणें भाग पडेल."

"पण आजोबा! हा शाहू खरोखरीच तोतया आहे का; व त्याचा नायनाट करण्याच्या कामीं ताराबाई आईसाहेब, चंद्रसेन, संभाजी वगैरे मंडळीच्या प्रयत्नांना यश येईल काहो?"

व्यासराव उत्तरला, "ईश्वरी नेमानेम कोणीं काय सांगावा?"

"पण आपल्या इच्छेसारखें फळ ईश्वर आपणाला देतो ना?" असें कांहींसें प्रश्नार्थक व कांहींसें स्वगत पुटपुटत मुक्तेनें मनांत ईश्वराचें नांव घेऊन आपल्या उजव्या हाताचीं आंगठयाजवळचीं दोन बोटें व्यासरावासमोर धरून म्हटलें, "आजोबा, डोळे मिटून देवाचें नांव घ्या व यांतलें कोणतेंही एक बोट धरा पाहूं!"

व्यासरावाला मुक्तेची ही शकुनवंती पाहण्याची लकब माहीत होती. त्यानें हंसत डोळे मिटून देवाचें नांव घेऊन तिच्या एका बोटाला स्पर्श केला.

"नाहीं; नाहीं." मुक्ता उल्हसित अंतःकरणानें म्हणाली, "देव बोलला, ताराबाई आईसाहेबांच्या प्रयत्नांना यश येणार नाहीं."

इतक्यांत कपिला कान उभारून बाहेर पाहत उभी राहिली; त्यावरून बाहेर कोणी येत असावें असा तर्क करून मुक्ता दरवाजापर्यंत जाऊन पाहूं लागली. तों बोलणारीं माणसें दिसण्यापूर्वीच तिला त्यांपैकीं एकाचें बोलणें ऐकूं आलें, "खरेंच नाहीं."

## प्रकरण बारावें

# जिव्हाळयाची भेट

मुक्तेनें आवाजावरून ओळखलें कीं हा पिराजीचा आवाज. पण पिराजी कोणाबरोबर बोलत होता हें मात्र तिला प्रथम कळेना. अंमळ-शानें पिराजी एका म्हाताऱ्याशीं बोलत बोलत झोंपडीच्या दरवाजांत येऊन पोंचला तरीदेखील मुक्तेला त्या म्हाताऱ्याची ओळख पटेना.

"कोण ग मुक्ते?" व्यासरावानें विचारलें.

"पिराजी आला आहे. पण त्याच्याबरोबर कोणी एक परका म्हातारा आला आहे, तो कांहीं माझ्या ओळखीचा नाहीं." मुक्ता उत्तरली.

हा म्हातारा कोण असावा तें पाहण्यासाठीं व्यासराव झोंपडींतून उठून बाहेर आला. त्यानें त्या म्हाताऱ्याला ओळखून तेव्हांच हांक मारली, "कोण, जोत्याजी!"

"व्यासराव!" अशी गद्गदलेल्या कंठानें हांक मारून जोत्याजीनें पुढें होऊन व्यासरावाला कडकडून मिठी मारली. पिराजी व मुक्ता हा अपूर्व देखावा पाहत चित्रासारखीं दूर उभीं राहिलीं. त्या भेटींत जोत्याजी व व्यासराव ह्या दोघांचाही कंठ इतका दाटून आला कीं, बराच वेळपर्यंत ते एकमेकांशीं कांहीं बोलले नाहींत किंवा त्यांनीं एक-मेकांची मिठीही सोडली नाहीं. दोघांच्याही डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागून तळपायांशीं त्यांचा सडा मात्र पडत होता.

हा गहिंवराचा पहिला पूर ओसरल्यावर दोघेही दीड तपांतील सुखदुःखांच्या आठवणी खुल्या दिलानें बोलत बसले. त्या आठवणींत संभाजीराजांच्या वधापासून आजपर्यंतच्या साऱ्या घडामोडींचें मंथन झालें, त्यानंतर जोत्याजीनें पिराजी व मुक्ता यांची चौकशी केली,

पेराजीला त्यानें पाहिलेंच होतें व नक्षत्रासारखी सुंदर मुक्ता समोर उभी असलेली पाहतांच जिच्याविषयीं त्यानें बादशहाच्या नजरकैदेंत असल्यावेळीं कांहीं गूढ वृत्तांत ऐकला होता तीच ही, असा तर्क यानें केला. अंमळशानें तो व व्यासराव असे दोघेही अंमळ बाजूला ाले व बराच वेळ कांहीं बोलले. ते काय बोलले तें मुक्ता व पिराजी ांना मात्र कळलें नाहीं. त्या दोघांनीं तर्कानें ओळखलें कीं, ही ाहूमहाराजांच्या सुटकेविषयींची भानगड आहे. पण ती काय ानगड आहे हें विचारण्याइतका फाजील चौकसपणा दाखविण्याचें ाडस त्या दोघांच्यानेंही करवलें नाहीं. जोत्याजीच्या तोंडचे ओझरते ाद्ब मात्र दोघांनाही ऐकूं आले, "एकूण कर्मकहाणी अशी आहे!"

"होय. पण याची वाच्यता मात्र कुठेंच करावयाची नाहीं." यासराव म्हणाला.

"होय. गोष्ट कबूल!" जोत्याजी म्हणाला, "पण व्यासराव! का गोष्टीची तूं आरंभापासून टाळाटाळी करीत आहेस हें मात्र रें नाहीं!"

"कोणत्या गोष्टीची?" व्यासरावानें जोत्याजीच्या मनांतील प्रश्न ओळखून प्रथम मुक्ता व पिराजी यांना सांगितलें, "पिराजी! ती हा कापशी गाय पाणी पिण्यासाठीं गोठ्यांत हंबरते आहे; तिला रा पाणी पाजून ये जा बरें! आणि मुक्ते! जोत्याजीबाबांना आज झ्या हातचें भातपिठलें नाहीं का वाढायचें?"

"नाहीं कसें? वाढायचें तर!" मुक्ता उमललेल्या गुलाबपुष्पा-माणें हंसतमुख करून म्हणाली.

"मग जा पाहूं तर घरांत लवकर!" व्यासराव म्हणाला.

दोघेंही मुलें दोन कामासाठीं दूर जातांच व्यासराव जोत्याजीला हणाला, "जोत्याजी! तूं कोणती गोष्ट विचारणार आहेस हें मीं ओळखलें. पिराजी व मुक्ता हीं कोणाचीं कोण, हेंच तूं मला पुन्हा वेचारणार आहेस; खरें ना?"

"होय."

"तेंच! पण मी तुला पुन्हा सांगतों, तूं मला इतक्यांत त्या गोष्टी उजेडात आणण्याचा आग्रह करूं नकोस. त्यामुळें तुझ्या स्वामिभक्तींत अंतराय पडण्याचा संभव आहे."

"काय? व्यासराव! अजूनही तुझ्यासारखा खेळीमेळीचा सवंगडी ह्या जोत्याजीच्या स्वामिभक्तीविषयीं अशी शंका घेतो याला म्हणायचें तरी काय? माझी स्वामिभक्ति ढळावयाची असती तर ती यापूर्वींच ढळली असती. संभाजीराजांच्या कारकीर्दींत अकारण राजकोपाचे रसरशीत निखारे रोज पदरीं घेतांनाही मी स्वामिभक्तीच्या पिढीजाद व्रतापासून ढळलों नाहीं. इतक्या अनेक भयंकर अग्निदिव्यांतून पार पडलेली माझी स्वामिभक्ति जर तुझ्या एका शब्दानें ढांसळूं लागली तर हवेंत कुऱ्हाडीचा घाव घातल्यानें आकाश तरी तुटून कां पडूं नये?"

"पण हवेंतल्या कुऱ्हाडीच्या घावानेंच आकाश तुटून पडण्यास खरेंच असलें तर?"

"असें कधींच शक्य नाहीं. आणि तूं म्हणतोस त्याप्रमाणें हवेंतल्या घावानें आकाश तुटून पडलें तर ज्या परमेश्वरानें पृथ्वीचा भार अहर्निश सहन करण्याचें बळ शेषाला दिलें तोच परमेश्वर तें आकाश सांवरून धरण्याचें बळ माझ्या आगीं देईल. तुला काय सांगावयाचें तें सांग."

"जोत्याजी! पिराजीची कुळकथा तुला सांगूं लागलों तर—गड्या! सांगूं?— पिराजी हा तुझा नातू आहे."

"काय, पिराजी माझा नातू आहे?" जोत्याजी डोळ्यांत आंसवें आणून गहिंवरलेल्या कंठानें म्हणाला, "व्यासराव, खरेंच का पिराजी माझा नातू आहे?"

"होय."

"मग यांत माझ्या स्वामिभक्तींत अंतराय पडण्याजोगी कोणती गोष्ट आहे? देवानें मला सोन्यासारखा नातू दिला—"

"तुझ्या म्हाळसेला त्या नीच कलुषा कब्जीनें एकदां पळविण्या-

प्रयत्न केला होता व संभाजीराजांचेंही त्यांत आंग होतें. पण त्या
ं त्यांचा बेत ढांसळला हें तुला माहीतच आहे. पण पुढें म्हाळसे-
जन्माची काय परवड लागली हें तुला मात्र माहीत नाहीं. ती
ा घरांतून नाहींशी झाली. पण ती कुठें गेली याचा तुला आज-
पत्ता लागला आहे का?"

"नाहीं. तुला तिचा पत्ता माहीत आहे वाटतें?"

"सांगतों ऐक. तुझा डोळा चुकवून कबजीनें तिला पुन्हा सर्वां-
डोळ्यांत धूळ फेंकून पळविली व संभाजीमहाराजांच्या विलास-
रांत नेऊन कोंडून ठेविली. आतां आपल्या कौमार्यावर गदा
गार; असा प्रसंग आपल्यावर येऊं नये म्हणून तिनें कबजीच्या
कर पायधरण्या केल्या. पण बादशाहींत राजवैभवाचा क्षुल्लक
र्थ साधण्याच्या इराद्यानें बादशहाचा गुप्त हेर म्हणून महाराजांच्या
ीला आलेला हा खलग्रह महाराजांना गुंगविण्यासाठीं स्वतःच्या
पाक पतिव्रतेलादेखील महाराजांच्या विलासमंदिरांत लोटण्याला
र झाला! हें पाप करण्याला ती साध्वी अथवा महाराज यांपैकीं
ीच तयार नव्हतीं ही गोष्ट निराळी. पण इतक्या नीच मनो-
च्या सैतानाला पापभीरु म्हाळसेची आळवणूक कशी ऐकूं यावी!
नें तिची सुटका करण्याचें साफ नाकारलें."

"आणि अखेर माझी म्हाळसा महाराजांची राख झाली!—
तूं सांगणार ना?"

"नाहीं. माझें ऐकून तरी घेशील? तुझ्या शेजारचा अंबाजी
पडे महाराजांच्या पदरीं हुजऱ्या होता. त्याचें व म्हाळसेचें एक-
ांवर प्रेम होतें. पण अंबाजीच्या बापाशीं तुझें वैमनस्य असल्यानें
या लग्नाच्या विरुद्ध होतास. त्या अंबाजीनें मोठ्या चतुराईनें
ळसेची मुक्तता केली व तीं दोघें राजधानी सोडून रातोरात पळून
ी."

"काय, माझी पोर माझ्या शत्रूच्या पोराचा हात धरून पळून
ो व त्यांच्या पापांत पिराजीचा जन्म झाला?" जोत्याजी कमर-

पट्टयांतून खंजीर खर्कन् बाहेर काढून दुखावलेल्या नागासारखा थर-कांप कांपत उभा राहिला व लाल डोळे करून सभोंवार पाहत म्हणाला, "कुठें आहे तो पिराजी? जोत्याजी केसरकराची पोर बद्चालीची निघाली याची साक्ष जगाला पटवून देणारी कमअस्सल अवलाद मला कापून काढलीच पाहिजे."

"अरे पण? जोत्याजी! इतक्या उतारवयांत इतका उतावळेपणा तुला शोभत नाही! मी काय म्हणतों तें ऐकून तरी घेशील? तुझी म्हाळसा बदफैली निघाली नाहीं; ती व अंबाजी अशीं दोघें माझ्या आश्र्याला आलीं व मीं त्यांचें यथाविधि लग्न लावून दिलें. संभाजी-राजांवर संगमेश्वरीं संकट कोसळण्यापूर्वी सहा महिने हा प्रकार झाला. तुला ही गोष्ट मानवणार नाहीं म्हणून तीं तुला भेटलीं नाहींत व मींही ही गोष्ट तुझ्या कानांवर घातली नाहीं."

"बरें; पुढें काय झालें?"

"कबजीच्या नादानें अंबाजी म्हाळसेसह मोगलाईत जावयास तयार झाला, तेव्हां माझ्याबरोबरचा रामरतन नांवाचा एक ब्राह्मण–कबजीचा एक दूरचा नातलग–बाटून मुसलमान होऊन बादशहाच्या खानगीकडे दिल्लीला नोकरी करीत होता, त्याला मीं चिठ्ठी देऊन अंबाजीची बादशाही सैन्यांत सोय लावून दिली. पण मागाहून मला पश्चात्ताप घडविण्याजोगी एक गोष्ट तेथें घडली." व्यासराव एकाएकीं खिन्न मुद्रा करून क्षणभर थांबला व मग बोलूं लागला, "औरंगजेब बादशहाचा अंमल म्हणजे हिंदवीचा मरणकाळ होता हें तुला माहीत आहेच. त्याला खूष करून बढती मिळविण्यासाठीं त्या नीच रामरतननें अंबाजीला बढतीची भुरळ पाडून मुसलमान केलें. ही बातमी म्हाळसेला कळली तेव्हां तिनें अंबाजीची अत्यंत निर्भर्त्सना केली. रामरतनच्या चिथावणीनें अंबाजी म्हाळसेला मुसलमान होण्याचा आग्रह करूं लागला. प्रत्यक्ष पति जी गोष्ट सांगतो ती कितीही त्याज्य असली तरी ती करणें हें पत्नीचें कर्तव्य होय, ह्या भावनेला बळी पडून म्हाळसेनेंही विधिपूर्वक मुसलमानी धर्माचा स्वीकार केला. पण ती

मैत्रिणीची, एवढेंच ती बोलली. मींही तिच्या बाबतींत जास्त चौकशी केली नाहीं. पण मला सोडून जाण्यापूर्वी आठ दिवस तिनें मुक्तेला जवळ बोलावलें व माझ्या हातीं तिचा हात देऊन सांगितलें, "बाबा! माझ्या एका जिव्हाळ्याच्या मैत्रिणीची ही मुलगी. ती मैत्रीण संसाराला वैतागून आपल्या कोणा गुरूकडे सेवेसाठीं निघाली तेव्हां तिनें हिला माझ्या स्वाधीन केली. हिला माझ्या हातीं देतांना तिनें एक ताईत मुक्तेच्या गळ्यांत बांधला होता व तो तिचें लग्न ठरविण्याच्या वेळीं किंवा त्यापूर्वी शाहूमहाराजांची सुटका झाल्यास त्यांच्या किंवा येसूबाई आईसाहेबांच्या हातीं उघडावा; त्यापूर्वी कोणत्याही कारणानें उघडूं नये; असें तिनें बजावून शपथ घालून सांगितलें होतें. तो ताईत माझ्यापाशीं आहे. यापेक्षां मला मुक्तेची कांहींदेखील माहिती नाहीं. मुक्तेला ह्यापैकीं मीं एक अक्षरदेखील सांगितलेलें नाहीं."

"आता आलें माझ्या लक्षांत सारें. ही मैत्रीण येसूबाई आईसाहेबांची जिव्हाळ्याची बाळमैत्रीणच असावी. शिवाय तो ताईत—पण इतक्यांतच मी त्याविषयीं कशाला बोलूं! येसूबाई आईसाहेबांच्या तोंडून मीं ह्याबाबत बऱ्याच गोष्टी ऐकल्या आहेत. पण त्या इतक्यांत बोलावयाच्या नाहींत. तो ताईत तुझ्यापाशीं सुरक्षित आहे ना?"

"होय. पण ही काय भानगड आहे तें मला सांग तरी?"

"छे! त्याविषयीं इतक्यांत कांहींच बोलावयाचें नाहीं. परमेश्वराच्या कृपेनें शाहूमहाराजांचे पाय सुखरूपपणें राजधानीला लागले म्हणजे मुक्तेच्या आईच्या इच्छेप्रमाणें आपण तो ताईत महाराजानांच उघडावयाला सांगूं. तोंपर्यंत तूं एक मात्र कर; कोणापाशींही याची वाच्यता करूं नकोस."

इतक्यांत पिराजी धावत धावत पुढें आला व म्हणाला, "जोत्याजीबाबा! तुमच्या मामावर माणसें येत आहेत असें वाटतें. आतां तुम्ही तुमचा वेश मघां मीं सांगितल्याप्रमाणें बदलल्याशिवाय गत्यंतर नाहीं."

"मग? पिराबाळ! आतां कसें करायचें?" जोत्याजीनें पिराजी-

ला विचारलें. आतां त्याच्या दृष्टींत पिराजीविषयीं अपूर्व आपुलकी उत्पन्न झाली होती.

"आतां कसें करायचें व काय करायचें याचा विचार करीत बसावयाचें नाहीं." पिराजी व्यासरावाकडे वळून म्हणाला, "आजोबा! आतां यांना तुम्ही भिक्षुक बनवून सोडा."

तेवढ्यांत मुक्ता साडीचे ओंचे वर खोवून घेतलेले व हात खरकट्यानें माखलेले अशी माजघरांत येऊन म्हणाली, "स्वयंपाक तयार आहे."

"होय ना?" पिराजी जोत्याजीकडे वळून म्हणाला, "जोत्याजीबाबा! उठा आतां. अगोदर शामभटजी बना, व—" पिराजीनें मुक्तेकडे वळून सांगितलें, "आजोबा! हे आज आपल्या घरीं ब्राह्मण जेवावयाचे आहेत."

इकडे असा हास्यविनोद चालला आहे तोंच बाळाजीपंतांच्या घरच्या हैबती हुजऱ्यानें येऊन चौकशी केली, "पिराजी आहे का?"

"होय. पिराजी आहे." स्वतः पिराजीच पुढें होऊन त्या बरोबरीच्या नोकराला म्हणाला, "हैबती! काय म्हणणें आहे?"

"धनीसाहेब आजच सेनापति व प्रतिनिधि यांच्यासह तोतया शाहूचा मोड करण्याच्या कामगिरीवर फौज घेऊन निघावयाचे आहेत. त्यांनीं तुला तुझ्या हातीं सोंपविलेल्या ठेवीसह नगराच्या वेशीबाहेर गुपचुप जाऊन वस्ती करावयाला सांगितलें आहे."

"काय तोतया शाहू?" जोत्याजी एकदम खवळून उभा राहत म्हणाला, "असें कोण म्हणतो?"

पिराजीनें जोत्याजीला हातानें शांत राहावयाला सांगून हैबतीला नेत्रसंकेत करून उत्तर दिलें, "ठीक आहे. धनाजीसाहेबांना सांग, माझ्यापाशीं असलेल्या ठेवीबद्दल आपण मुळींच काळजी करूं नका. मी तिला सुरक्षितपणें आपल्यापाशीं आणून पावती करतों."

## प्रकरण तेरावें

# कारस्थानांत कारस्थान

कांहीं वेळानें पिराजीच्या अपेक्षेप्रमाणें चंद्रसेन जाधव व्यासरावाच्या झोंपडीसमोर दत्त करून येऊन उभा राहिला. त्यानें प्रथम सर्व मंडळींपाशीं जोत्याजीबद्दल चौकशी केली.

पिराजी उत्तरला, "छे! आपल्याला ह्या जोत्याजीची मुळींच खबर नाहीं." बाजूला उभा असलेल्या म्हाताऱ्या श्यामभटजींकडे पाहून त्यानें विचारलें, "भटजी, तुम्हांला तरी माहीत आहे का हो?"

"छे बुवा! आपल्याला नाहीं माहीत." श्यामभटजी उत्तरले.

पिराजीनें विचारलें, "चंद्रसेनजी! तुम्ही त्याला पकडावयाला गेलां होतां म्हणे? तो सांपडला नाहीं का?"

"छे! तो सांपडला नाहीं." चंद्रसेन उत्तरला.

"हें कांहीं बरें झालें नाहीं. गुलामाला पकडून चांगला तुरुंगांत डांबून ठेवावयाचा होता. साऱ्या चार घटकांत त्यानें गांवांत केवढी दंगल उडवून दिली!" पिराजी म्हणाला.

जोत्याजीविरुद्ध पिराजी बोलूं लागलेला पाहतांच चंद्रसेनाला समाधान वाटलें व तो मनांत जो हेतु धरून आला होता, तो बोलून सारण्यापूर्वी नाणें वाजवून घेण्याच्या इराद्यानें म्हणाला, "बाळाजी पंतांच्या हातून तो थेरडा मोकळा सुटला. त्यांनीं त्याला पकडावयाचें सोडून आईसाहेबांची पडत्या फळाची आज्ञा घेऊन त्याला नगराच्या वेशीबाहेर सुरक्षित पोंचविलें. गादीचें मीठ खाऊन गादीच्या शत्रूशीं अशी मिलाफी करणें चांगलें नाहीं."

"खरेंच चांगलें नाहीं. पण आमच्या धनीसाहेबांना हें कोणीं सांगावें? धनाजीबाबांनीं दोन शब्द सांगावे तर—" पिराजी म्हणाला.

"धनाजीबाशांना आतां म्हातारचळ लागला आहे." चंद्रसेन म्हणाला, "त्याचादेखील त्या तोतया शाहूवरच विश्वास आहे. पण ते शपथेंत अडकले म्हणून केवळ आईसाहेबांच्या वतीनें त्या तोतयाशीं लढणार. पण त्या लढण्यांत मला तरी कांहीं राम दिसत नाहीं. धरून कुत्रे कुठें पारध करीत असतात वाटतें! आतां ह्या तोतयेशाहीला आळा घालून छत्रपतींची गादी शाबूत राखण्यासाठीं आम्हीं जातीनें झटलें पाहिजे. पिराजी! तूं व्यासरावाचा नातू व माझ्या संभाजीचा लंगोटीयार म्हणून तुझ्याविषयीं मला संभाजीइतकाच आपलेपणा वाटतो. पण तूं बाळाजीपंतासारख्या स्वार्थी, कावेबाज व निमकहराम धन्याच्या पदरीं पडलास त्यामुळें तुझ्या आयुष्याची माती झाली. ज्या तुझ्या हातांनी आज तलवार गाजवून वैभवाला चढावयाचें, तेच हात आज एका यःकश्चित् भटाचे जोडे कांखोटीला मारण्यांत भूषण मानतात, याला काय म्हणावयाचें!" चंद्रसेन व्यासरावाकडे वळून म्हणाला, "व्यासराव! मी म्हणतों हें खरें ना?"

"हो! अलबत् खरें. पण यांत पिराजीचा तरी काय अपराध? जन्माला आलेल्या जीवाला पोटापाण्याला तर मिळालें पाहिजे! हुजरेगिरी!—पण ती तरी तेव्हां कुठें मिळत होती? त्यांतूनही तुम्हीं आतां त्याला हाताशीं धरून वर काढण्याचें मनावर घेतलें तर श्रीगजाननाची त्याच्यावर मोठीच कृपा झाली म्हणावयाची!" व्यासराव म्हणाला.

"आमची त्याला हाताशीं धरण्याची तयारी आहे. पण तो आला पाहिजे ना?" चंद्रसेन म्हणाला, "तो म्हणेल तर मी त्याला आजपासून हाताशीं धरण्याला तयार आहें."

"मग, माझी कुठें ना आहे?" पिराजीनें विचारलें.

"पाहा! तूं हें मनापासून बोलतोस?" चंद्रसेनानें विचारलें.

"नाहीं तर उगाच वरवर कशाला बोलूं?" पिराजी म्हणाला, "मी आपण होऊनच तुमच्यापाशीं ही गोष्ट काढणार होतों. पण तुमच्या संभाजीचें व माझें नीट नाहीं, तेव्हां तुम्ही माझा शब्द

मानाल अशी मला आशा नसल्यानें मी बोललों नाहीं." पिराजी जोत्याजीकडे पाहून नेत्रसंकेत करीत म्हणाला. पिराजीची झटपट फितुरी पाहून जोत्याजीच्या रक्तांत सळसळ उत्पन्न होण्याच्या बेतांत होती, ती पिराजीच्या नेत्रसंकेतानें थांबली.

"संभाजीचें काय घेऊन बसलास? तो अजून तुझ्यासारखाच अजाण पोर आहे. तुमच्या वादाचें मूळ कोठें आहे हेंही मला माहीत आहे व तें मूळ नष्ट करण्याचा बेतही मीं केला आहे." चंद्रसेन बाजूला खांबाशीं उभी असलेल्या मुक्तेकडे पाहून व मग व्यासरावाकडे वळून म्हणाला, "व्यासराव! आजवर मुक्तेचें लग्न संभाजीशीं करावयाचें असा आग्रह मी तुला करीत आलों; पण आतां माझें मत बदललें आहे. एकंदर गोष्टींचा विचार करतां मुक्तेचें पिराजीशींच लग्न करून देणें मला इष्ट वाटतें."

"पण संभाजी अशानें अनर्थपात करील तो!" मुक्ता म्हणाली.

"तो माझा मुलगा आहे; त्याला कसें आवरावयाचें तें मी पाहीन." चंद्रसेन व्यासरावाकडे वळून म्हणाला, "संभाजीला मीं राजवाड्यांतील एक सुंदर नवरी मुक्रर करून ठेविली आहे. खुद्द आईसाहेबांनींच हें लग्न ठरविलें आहे. आतां संभाजी आपल्या कामगिरीवरून आला म्हणजे त्याचें लग्न करावयाचें, आणि व्यासराव! पिराजीचें लग्नदेखील तो एखादा पराक्रम गाजवीपर्यंत करावयाचें नाहीं."

"पराक्रम गाजविण्याची संधि सांपडल्यावर आम्हांला पराक्रम गाजवतां आला नाहीं तर आम्ही मर्द कसले?" पिराजी म्हणाला.

"मग काय, पिराजी! तूं माझ्या पदरीं नोकरीला राहणार तर?" चंद्रसेनानें विचारलें.

"होय." पिराजी उत्तरला.

"तर मग चल माझ्याबरोबर; जरा बाजूला ये म्हणजे तुला कामगिरी सांगतों." असें म्हणून चंद्रसेन व्यासरावाच्या गोठ्याच्या बाजूला निघाला. पिराजीही त्याच्या मागोमाग गेला.

आतां चंद्रसेन पिराजीचे कसे काय कान फुंकील नकळे, ह्या भयानें व्यासराव, जोत्याजी व मुक्ता चिंता करीत बसलीं होतीं. इतक्यात अंमळशानें पिराजी व चंद्रसेन माघारे आले.

"बरें तर; मीं सांगितल्याबरहुकूम कामगिरी पार पाडावयाची आणि संभाजी भेटला तरी त्याच्याशीं भांडाभाडी करावयाची नाहीं. लग्नाविषयीं त्याच्यापाशीं एक अक्षरदेखील बोलावयाचें नाहीं. आणि आपल्या बेताची बातमीदेखील कोणाला द्यावयाची नाहीं. जरूर तर तुझ्या शामभटजींची मदत तूं घे; त्याला कांहीं हरकत नाहीं. त्यांना म्हणावें, आपली मसलत साधली तर आम्ही तुम्हांला राजोपाध्य बनवून सोडूं." असें म्हणून चंद्रसेन निघाला. पिराजीनें त्याला मोठ्या खुपीनें मान तुकवून वाटेला लाविलें.

"चद्रसेन काय म्हणाला?" जोत्याजीनें विचारलें.

"त्या गोष्टी सांगण्यासारख्या नाहींत." पिराजी गालांतल्या गालांत हंसत म्हणाला, "मुक्तेचें आमिष दाखवून हा बेइमान मला माझ्या मालकांशी बेइमान व्हावयाला शिकवतो आहे. माझ्या मालकांच्या तैनातींत राहून त्यांच्या गुप्त हालचालींवर नजर ठेवून प्रतिनिधींना भेद द्यावयाचा व शक्य तर याला इकडे बातमी द्यावयाची हें गुप्तहेराचें काम मला आजपासून करावयाचें आहे. स्वामींचे ह्या कारस्थानाविषयींचे बित्तंबेत मीं हुडकून काढावयाचे. तसेंच जोत्याजी जर वाटेंत सांपडला तर त्यालाही जगांतून नाहींसा करावयाचा!"

"पण माझें नांव त्या नराधमाच्या तोंडून कां म्हणून निघालें?" जोत्याजीनें विचारलें.

"याचें कारण असें कीं, चंद्रसेनानें शामभटजी हे कोण, कुठले याविषयीं चौकशी केली, तेव्हां स्वामींशीं भांडण करून आलेले हे भटजी आहेत असें मीं त्याला सांगितलें. त्यामुळें स्वामींच्या राजकारणांत हा 'भट' घातल्यानें स्वामींनादेखील अनायासें नेस्तनाबूद करतां येईल, अशी त्याला आशा लागली आहे. स्वामींचा आंतून शाहूमहाराजांना पाठिंबा आहे ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. खुद्द

ताराबाई आईसाहेबांनादेखील हें कळतें. यासाठीं स्वामींना कोणत्या ना कोणत्या उपायांनीं गोत्यांत आणण्याचे हे प्रयत्न चालले आहेत. तुमच्यामार्फत स्वामींना राजकीय उलाढालींच्या साऱ्या चोरवाटा पळवाटा पाहून घ्यावयाच्या असा चंद्रसेनाचा इरादा आहे."

"निव्वळ खोटी अवलाद!" जोत्याजी खवळून दांत ओंठ खात म्हणाला, "आणि पिराजी! तूंदेखील त्या कुलांगाराच्या नादानें ब्राह्मणांना 'भट' अशा उपहासकारक नांवानें संबोधूं लागलास हें बरें नव्हे. केसरकराच्या नातवाला हें शोभत नाहीं. जा–जा आतां आपल्या कामगिरीवर."

पिराजी बाळाजीपंतांच्या निरोपाप्रमाणें निघण्याच्या तयारीला लागला. सर्व तयारी झाली व आतां निघावयाचें, तरीही पिराजीचा जीव झोंपडींतल्या झोंपडींत मुक्तेशीं दोन जिव्हाळ्याचे शब्द बोलण्यासाठीं रेंगाळत होता. पण त्याला एकांत कांहीं मिळेना.

"मुक्ते! देवापाशीं दिवा लाव व पिराजीला ओंवाळून मंगलाक्षता लाव." व्यासराव म्हणाला.

मुक्तेनें तावडतोब देवापाशीं दिवा लावला व पंचारती पेटवून प्रथम जोत्याजीला व नंतर पिराजीला ओंवाळून त्यांना कुंकुमाक्षता लावल्या. जोत्याजीनें तिला प्रेमभरानें 'तुला तुझ्या मनाजोगा पति मिळेल, राजलक्ष्मी तुझ्या पायाशीं लोळण घेईल' असा आशिर्वाद दिला. पिराजीनें मात्र आशीर्वाद वगैरे कांहीं न देतां जोत्याजी व व्यासराव यांची नजर चुकवून मुक्ता आरती ओंवाळण्यासाठीं समोर आली तेव्हां त्याच कुंकवाच्या करंड्यांतून चिमूटभर कुंकूं घेऊन तिच्या ललाटीं कुंकमटिळा रेखला. नंतर जोत्याजी व पिराजी बाहेर पडून वाटेला लागले तेव्हां ते नजरेच्या टापूपलीकडे जाईपर्यंत मुक्ता आनंदाश्रूंनीं डबडबलेल्या नजरेनें एकसारखी टक लावून त्यांच्याकडे पाहत होती.

## प्रकरण चौदावें

# 'तोतया' शाहूवर स्वारी

धनाजी जो दरबाराहून आला, तो एकसारखा आतां काय करावें व कसें करावें याविषयीं विचार करीत होता. वास्तविक हा प्रश्न सोडविण्याला प्रतिनिधि अथवा इतर कारभारी यांच्या दृष्टीनें मुळींच अवघड नव्हता. धनाजी एवढ्या अफाट मराठी राज्याचा सेनापति होता. राजाराममहाराजांच्या पश्चात् मराठ्यांना लाभलेला शिवाजी-राजा जरी वेडा होता, तरी राज्याचीं सारीं सूत्रें ताराबाईसारख्या असामान्य बुद्धिवान् व कर्तबगार स्त्रीच्या हातीं असल्यानें राज-कारणाची घडी विस्कटली नव्हती. इतकेंच काय; पण ताराबाईच्या आंगीं दांडगा वकूब असल्यानें ती कारभारीमंडळाकडून इतक्या चतुराईनें कारभार करून घेई कीं, ज्यानें त्यानें तोंडांत बोटेंच घालावीं! तिचा नुसता हुकूम होण्याचा अवकाश; पंचवीस हजार म्हटल्याबरो-बर पंचवीस हजार सैन्य त्या घटकेला शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन उभें राहिलें. पंचवीस हजारच काय; पण धनाजीचा दरारा व कर्तबगारी एवढी दांडगी होती कीं, त्यानें आपल्या एका शद्वासरसें पन्नास हजार सैन्यदेखील हां हां म्हणतां उभें केलें असतें. धनाजी मोहिमे-वर निघाला कीं विजयश्री बटकीकुणबिणीप्रमाणें त्याच्या पायांवर पाणी ओतण्यासाठीं हातीं सुवर्णकलश घेऊन जोडल्या हातांनीं त्या-च्या पायांच्या आसऱ्यानें चालूं लागावयाची. त्यानें मनांत आण-ल्यावर एक शाहूच काय; पण असे एकोत्तरशें शाहू उलथेपालथे करून त्यांच्या छातीवर थैमान केलें असतें.

पण इतका रणधुरंधर धनाजीदेखील आज शाहूमहाराजांवर चालून जाण्याच्या बाबतींत मागें पाऊल घेऊं लागला. ताराबाईच्या मुर्वती-

खातर एकवार तरी शाहूशीं लढण्याची शपथ त्यानें घेतली खरी; पण ती शपथ पाळणें हेंदेखील त्याला पापसें वाटूं लागलें. बरें, ती न पाळावी तर राजद्रोह होतो! आतां काय करावें अशी हुरहुर धनाजीच्या जिवाला लागून राहिलेली असतांना त्यानें आपल्या दोघां कर्त्या मुलांच्या विचारें काय तें करावयाचें असें ठरविलें. हे दोन कर्ते मुलगे म्हणजे एक चद्रसेन व दुसरे बाळाजीपंत. चंद्रसेन हा मुलगा होता इतकेंच; पण खरा मुलगा बाळाजीपंत हाच होता. ह्या दोन कर्त्या मुलांशिवाय दुसऱ्या दोन देवता धनाजीच्या गृहराज्यांत वास्तव्य करीत होत्या; त्यांचाही शब्द अशा आणीबाणीच्या वेळी तो अवश्य मानी. ह्या दोन देवता म्हणजे एक त्याची बायको चंद्रसेनाची आई गोपिकाबाई, व दुसरी त्याची अर्धी सून संभाजीची आई पुतळाबाई ही होय. चंद्रसेनाची लग्नाची बायको पार्वतीबाई देवाधर्माच्या साक्षीनें जाधवांच्या घराण्याची कर्त्री स्त्री झाली होती खरी; पण ती ह्या दोन देवतांच्या पंक्तींत बसण्यासारखी नव्हती. धनाजीला ती मुळींच आवडत नसे. आपल्या भरल्या घराचा भणगा करण्यासाठीं ही मूर्तिमंत अवदशा अवतरली आहे असें धनाजी वारंवार म्हणे. ती खलवृत्तीच्या दृष्टीनें पाहतां चंद्रसेनाला शोभण्यासारखी बायको होती एवढेंच काय तें. आणि म्हणूनच चंद्रसेनाला कलिपुरुषाप्रमाणें करांगुलीच्या एका टोंकावर नाचविण्यांत ती हरहमेश यशस्वी होई. ह्या सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं संभाजीदेखील पार्वतीबाईच्या अर्ध्या सवतीचा मुलगा असूनही पार्वतीबाईच्या अर्ध्या वचनांत वागे व आपल्या जन्मदात्या आईला पायांतळाच्या पायपोसाप्रमाणें कःपदार्थ लेखून तिचा पावलोपावलीं पाणउतारा करी. याचें कारण एकच; दोघांचींही अंतःकरणें म्हणजे कुटिलनीतीच्या कोंडी होत्या, व स्वार्थाचा प्रश्न येतांच जिव्हाळ्याच्या माणसालादेखील जिवें मारण्याची त्यांची तयारी होती.

असो; धनाजीनें प्रथम गोपिकाबाई व पुतळाबाई यांना बोलावून आतां कसें करावयाचें असें विचारलें. तेव्हां त्या दोघींनींही आपल्या

बुद्धीप्रमाणें खरें कल्याण होईल असें काय तें करा. आपण सुज्ञ आहां; आम्ही आडव्या सुडक्याच्या बाईलमाणसांनीं आपणाला काय सांगावयाचें' अशी त्याची समज घातली. ह्या आशीर्वादात्मक शद्बांनीं धनाजीचें मुळींच समाधान झालें नाहीं. तेवढ्यांत चंद्रसेन आला. धनाजीनें त्याचा सल्ला विचारण्यापूर्वी तो तिरस्कारपूर्वक निर्भर्त्सनेच्या भाषेंत तारे तोडूं लागला, "बाबा! तुमच्या राजनिष्ठेच्या नेकीला इतक्यांतच नाट लागला, हा आपणाला म्हातारचळ तर लागला नाहीं ना? आईसाहेबांनीं शपथ घ्यावयाला सांगतांच तुम्ही शपथ घेतली असती तर त्यांच्या मर्जीतून तुम्ही उतरला नसतां व तोतयाचा मोड करण्याची कामगिरी त्यांनीं एकट्या तुमच्यावरच सोंपविली असती. जाधवांचें घराणें राजनिष्ठेचें बाळकडू पिऊन वाढलेलें आहे असा जो लौकिक तुम्हीं आजवर कमावला तो एका क्षणांत तोतयाची तरफदारी करून गमावला!"

चंद्रसेनाचे हे विषारी बोल धनाजीच्या अंतःकरणाला जाऊन भिडले. तो आपला संताप अंतःकरणांतल्या अंतःकरणांत शक्य तितका गिळीत म्हणाला, "चंद्रसेन! शाहू तोतया नाहीं. तो मराठ्यांच्या गादीचा खराखुरा वारस आहे."

"पण मी सांगतों, शाहू खराखुरा शाहू नसून तोतया आहे. आणि तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें तो खराखुरा शाहू आहे असें घटकाभर धरून चाललें तरी तो लहानपणापासून बादशहाच्या जनानखान्यांत वाढून मोठा झाला असल्यानें मनानें तो बादशहाच्या बेट्यासारखाच मराठशाहीला मूठमाती देण्याच्या इराद्यानें इकडे येत असला पाहिजे. नाहीं तर ताराबाई आईसाहेबांनीं त्याला एवढा विरोध कां केला असता? कीं माणुसकी तुमच्या आंगीं तेवढी आहे व आईसाहेबांच्या आंगीं सैतान संचारलें आहे?"

"खबरदार! चंद्रसेन, माझी जबाबदारी मला कळते. मला तुझें गुरुत्व नको आहे. चल नीघ! माझ्यासमोरून काळें कर." धनाजी आपल्या अनावर रागाला बळी पडून उद्गारला.

"बाबा! तुम्हांला चुकीचें प्रायश्चित्त भोगावें लागेल!" चंद्रसेन तितक्याच रागानें उत्तरला, "यापुढेंदेखील तुम्हांला फंदफितुरीनें वागावयाचें असेल तर बापलेंक जाधव आजच एकमेकांना मेले असें समजा."

"मेले! मेले! बापलेंक जाधव आज एकमेकांना मेले. बस्स! आजपासून तूं माझा कोणी नव्हेस व मी तुझा कोणी नव्हे!" असें वैतागाच्या भरांत बोलून धनाजी दुःखातिरेकानें कपाळाला हात लावून दूर जाऊन बसला.

चंद्रसेनही कांहीं कमी कोपिष्ट नव्हता. तशांत तें ताजें रक्त होतें. तें तत्काळ उसळ्या मारीत मारीत दाणदाण पाय आपटीत दरवाजाबाहेर पडलें.

चंद्रसेनाला बाहेर जाऊन पाव घटकादेखील झाली नाहीं तोंच बाळाजीपंत, बाजीराव व चिमाजी यांना समागमें घेऊन तेथें येऊन पोंचले. त्यांना पाहतांच गोपिकाबाई पुढें होऊन म्हणाली, "बाळ! ते रागावले आहेत; या वेळीं त्यांच्यासमोर जाऊं नकोस."

"काय, धनाजीबाबा रागावले आहेत? आणि ते कोणावर?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

गोपिकाबाईला बाळाजीपंत कोणी परके नव्हते. ती त्यांना चंद्रसेनाप्रमाणेंच आपला पुत्र मानीत असे. तिनें आतां घडलेला सर्व वृत्तांत बाळाजीपंतांना निवेदन केला. तेव्हां 'ऊंः! त्यांत काय आहे! मी धनाजीबाबांचा आवडता पुत्र आहें. मला पाहून त्यांच्या रागावर पाणी पडेल' असें म्हणून बाळाजीपंत दोन्ही मुलांना बरोबर घेऊन आंत गेले. त्यांची व धनाजीची नजरानजर होतांच त्यांनीं भाकित केल्याप्रमाणें झालें. धनाजी एकदम शांत होऊन म्हणाला, "बाळाजी! मी तुझीच वाट पाहत होतों. आतां मला अगोदर सांग, हाताशीं असलेल्या मोहिमेचें काय करावयाचें?"

"मोहिमेवर जावयाचें. आणखी काय करावयाचें?" बाळाजीपंत म्हणाले,

धनाजी व बाळाजीपंत यांचें संभाषण चाललें आहे इतक्यांत धनाजीच्या वाड्याच्या बाहेरील दरवाजांत कोणी तरी मंजुळ स्वरांत एकतारीच्या सुरावर गाऊं लागलें.

राजा परदेशी ! परदेशी !
येइ मायभूमीसी ॥ ध्रु० ॥
अविंधपाशीं बंदिवानसा झाला शाहूराजा !
किती गांजिला कितीक छळिला प्राण महाराष्ट्राचा ! १
कैक युगांचें भाग्य उदेलें पुण्य फळाला आलें !
शिवरायाच्या कृपाप्रसादें शाहूराजे सुटले ! २
उठा उठा हो सर्व मराठे ! जा त्यांना सामोरे !
वंदन करुनी गौरव करुनी आणावे माघारे ! ३
भगवंताची वाणी बोले तेच बोल मी बोलें !
उठा मराठे ! उठा वीर हो व्हा जागे निजलेले ! ४

"बाई ! भिक्षा वाढा !" गाणारी व्यक्ति गाणें आटोपतांच म्हणाली. धनाजी, बाळाजीपंत व बाजीराव आणि चिमाजी गाण्याचा स्वर ऐकून खिडकींत जाऊन उभे राहिले. गाण्यांतील खोंच तेव्हांच सर्वांच्या ध्यानांत आली. ती गाणारी व्यक्ति एक मध्यम बांध्याची, देखणी, पण केंस व शरीर यांची बेनिगा झाल्यानें बेढबपणा पांघरलेली अशी पस्तिशीच्या उमरीची स्त्री होती. तिचा वेष भिकारणीचा होता; पण चर्या विरक्त व विशिष्ट कार्योद्युक्त वृत्तीची साक्ष देत होती. तिनें नेमकें शाहूमहाराजांच्या सुटकेविषयींचें गाणें गाइलेलें ऐकतांच ह्याबाबत तिच्यापाशीं जास्त चौकशी करण्यासाठीं बाळाजीपंतांनीं तिला हांक मारली, "ए बाई ! वर ये पाहूं !"

इतक्यांत कोठून तरी दोन शिपाई धावत आले. व त्या भिकारणीला दोन्ही बाजूंनीं पकडून दरडावणीच्या भाषेत ओरडले, "ए बेवकूब गद्धी ! खबरदार, एक पाऊल तरी पुढें सरकशील तर !"

ती भिकारीण शिपायांच्या ह्या दरडावणीनें जरादेखील भ्याली नाहीं; स्मितहास्य करीत जागच्या जागीं उभी राहिली. एकाएकीं

त्या बिचारीवर संकट कोसळलेलें पाहून बाजीराव बाणासारखा लगबगीनें खालीं गेला व त्या शिपायांना रागें भरला, "त्या गरीब बाईच्या आंगाला हात लावाल तर खबरदार!"

बाजीराव एवढासा मुलगा. त्याला सावजावर टपलेल्या शिकारी कुत्र्यासारखे ते शिपाई थोडेच वचकतात! त्यांनीं त्याला हातानें दूर लोटून त्या भिकारणीच्या दंडांना हात घातले. बाजिरावाला हा अपमान सहन झाला नाहीं. त्यानें ताबततोब आपल्या म्यानांतून आपली छोटेखानी तरवार उपसून शिपायांच्या मानेवर उगारीत अधिकारयुक्त वाणीनें सांगितलें, "बऱ्या बोलानें तिला सोडा; नाहींपेक्षां तुमचीं शिरें धडावेगळीं झालींच असें समजा! नामर्द! अनाथ अपंगावर हात टाकतां काय?" बाजिरावानें लगेच वर मान करून पाहत बाळाजीपंतांना हांक मारून सांगितलें, "बाबा! ह्या बदमाषांना कैद करायला सांगा पाहूं!"

बाजिरावानें वर पाहतांच त्या शिपायांनींही वर पाहिलें, तों धनाजी व बाळाजीपंत खिडकींत उभे असलेले आढळतांच त्यांची गाळण उडाली. भिकारीण हा प्रकार पाहत चित्रासारखी समोर उभी होती. ती मुळींच भ्याली नाहीं अथवा एक पाऊलदेखील सरली नाहीं. पण तिला कैद करण्याला त्या शिपायांचे हात मुळींच धजावेनात. धनाजीच्या कदरबाज नजरेची वीज त्यांवर पडतांच ते जागच्या जागीं लुले पडले.

"काय दंगल आहे रे?" धनाजीनें शिपायांना विचारलें.

"सरकार! आम्ही आपल्या पायांचे चाकर! धाकट्या सरकारांचा आम्हांला सक्त हुकूम आहे कीं, जें कोणी शाहूमहाराजांच्या नांवाचा जयजयकार करील अथवा त्यांच्या स्तुतिपर बोलेल त्याला जागच्या जागीं कैद करावयाचें. आतां ह्या बाईनें शाहूमहाराजांच्या स्तुतिपर पद म्हटलें म्हणून तिला कैद करणें आम्हांला प्राप्त झालें." एक शिपायी म्हणाला व दुसऱ्यानें त्याला दुजोरा दिला. आतां काय होतें आणि काय नाहीं असें भय दोघांनाही वाटत होतें.

इतक्यांत चंद्रसेन कोठूनसा तेथें सैतानानें पाठविल्यासारखा आला. त्याला पाहतांच त्या शिपायांना पुन्हा जोर चढला.

"सरकार! ही बाई शाहूमहाराजांच्या सुटकेचें गाणें गात होती. म्हणून हिला आम्हीं अडविली." एक शिपायी म्हणाला.

"मग पाहतां काय? तिला आईसाहेबांसमोर घेऊन जा."

शिपायी पुन्हा त्या बाईकडे वळलेले पाहतांच बाजिरावाचें पित्त पुन्हा खवळलें. त्यानें पुन्हा तलवार सरसावीत चंद्रसेनाला बजावलें, "चंद्रसेनजी! मर्दांच्या वज्रमुठींना मस्त शत्रूंचीं माथीं फोडण्यांत भूषण आहे. पण अनाथ बायकांच्या बांगड्या पिचवणें हें त्याचें काम नव्हे."

चंद्रसेन बाजिरावाशीं कांहीं न बोलतां वर बाळाजीपंतांकडे पाहून म्हणाला, "बाळाजीपंत! आपल्या चिरंजिवांना सांभाळा. मला आईसाहेबांच्या हुकुमाची तामिली केली पाहिजे. मला माझें कर्तव्य आठवतें. त्यापलीकडे आईबाप, बहीणभाऊ, सगेसोयरे कोणीही आठवत नाहींत."

चंद्रसेन आपल्या कर्तव्याला कितपत जागणारा दानतीचा घड आहे हें बाळाजीपंत व धनाजी ह्या दोघांनाही माहीत होतें. पण आईसाहेबांचा हुकूम आहे असें त्यानें म्हणताच शब्दच खुंटला. बाळाजीपंत व धनाजी यांना चंद्रसेनाच्या ह्या बिनतोड कोटिक्रमावर मूग गिळून स्वस्थ बसावें लागलें. पण तेवढ्यांतच चंद्रसेन आपल्या शद्बाचा आपल्या सिंहासारख्या शूर वडिलांनाही एवढा दरारा वाटला असें पाहून गर्वानें फुगून गेला.

बाजीराव जरी लहान होता तरी त्याला देखील आईसाहेबांच्या हुकुमाचें महत्त्व कळत होतें. तो एवढेंच म्हणाला, "आईसाहेबांचा तरी असला कसला चमत्कारिक हुकूम?"

पण बाळाजीपंतांनीं तेवढ्यांत बाजिरावाला हांक मारून वर बोलावून घेतलें. लगेच चंद्रसेनाच्या शिपायांनीं त्या बाईला धरलें. तिनें हंसतमुखानें स्वतःला धरूं दिलें; जरादेखील विरोध केला नाहीं.

ती उलट म्हणाली, "धरा मला खुशाल धरा. राणी म्हणून राजवाड्याला माझे पाय लागायचे ते कैदी म्हणून लागूंदेत. राजवाडा पाहायची मला किती कित्ती हौस होती; ती तशी फिटायची, ती अशी फिटायची, असें माझ्या दैवीं लिहिलें होतें. धरा मला खुशाल धरा."

"जा, ह्या बाईला आईसाहेबांसमोर नेऊन उभी करा." असा हुकूम देऊन चंद्रसेन दुसऱ्या बाजूनें निघून गेला.

भिकारीण आली व गेली. पण ती कोण, कोठली, शाहूमहाराजांच्या मुक्ततेची बातमी तिला कशी कळली, तसेंच 'राणी म्हणून माझे पाय राजवाड्याला लागायचे ते कैदी म्हणून तरी लागूं देत' असें ती म्हणाली याचा अर्थ काय, वगैरे गूढ धनाजी, बाळाजीपंत अथवा वाड्यांतील इतर माणसें यांना मुळींच उकलेना. तेवढ्यांत परशरामपंत प्रनिनिधि तेथें येऊन पोंचले.

"धनाजीबाबा! मोहिमेची सर्व तरतूद झाली?" प्रतिनिधींनीं विचारलें.

"हो, तरतूद ती काय व्हावयाची? आईसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें पंचवीस हजार फौज सरंजामासह तयार आहे. आतां तुमची कामगिरी आटोपली कीं मोहिमेवर निघावयाचें."

"माझी कामगिरी आटोपली. तोतयाला कोणीं कोणत्याही प्रकारची मदत करूं नये अथवा त्याला आपल्या हद्दींत थारा देऊं नये असे हुकूम लिहून त्यांवर आईसाहेबांच्या साक्षीनें शिक्कामोर्तब करून ते चोहों दिशांच्या किल्लेदारांना जासुदांहातीं रवाना करून आलों. एथल्या किल्ल्याची रखवाली शेखमिरा किल्लेदार करतोच आहे. शिवाय आईसाहेबांनीं चंद्रसेनाला विश्वासांतील माणूस म्हणून इथेंच ठेवून घेण्याचें ठरविलें आहे. आतां आपण निघालें पाहिजे." प्रतिनिधि म्हणाले.

"पण प्रतिनिधि! तो तोतया शाहू नसून ते खरेखुरे शाहूमहाराज असले तरी त्यांच्याविरुद्ध आपण लढावयाचें काय?" धनाजीनें विचारलें.

"धनाजीबाबा! तुम्ही तुमची शपथ हरघडी अशी कशी विसरतां?" प्रतिनिधींनीं विचारलें.

प्रतिनिधींच्या मनाचा वारा कोणत्या दिशेनें वाहत आहे हें बाळाजी-पंतांनीं तेव्हांच ओळखलें व धनाजीला जास्त न बोलण्याविषयीं डोळ्यांनीं खूण केली. धनाजीनें लगेच आपलें बोलणें आवरतें घेतलें, "ठीक आहे. प्रतिनिधि! तुमचें मत मला मान्य आहे. आपलें काय? आपण गादीच्या हुकुमाचे चाकर. आतां आपण आज सायंकाळीं मोहिमेवर निघावयाचें."

प्रतिनिधि निघून गेले व बाळाजीपंतही जावयाला निघाले. तोंच राजवाड्यांतील एक स्वार दौडत धनाजीच्या दरवाजापाशीं आला. बाळाजीपंत व धनाजी बोलत बोलत दरवाजापर्यंत आले होते. स्वारानें त्यांना पाहतांच वर्दी दिली, "आईसाहेबांनीं आतांच्या आतां तुम्हां दोघांना भेटीला बोलाविलें आहे."

हा निकडीचा निरोप ऐकून थोड्या वेळापूर्वीं ज्या शिपायांनीं भिकारणीला पकडून नेलें, त्यांच्या लावालावीचा हा परिणाम असावा असें ओळखून ते तसेच स्वाराबरोबर राजवाड्याकडे जावयाला निघाले.

प्रकरण पंधरावें

# वेड्या शिवाजीचा प्रताप !

"चंद्रसेन ! ही बाई कोण आणि हिला माझ्यासमोर कशाला आणली ?"

"आईसाहेब, ही कोण तें कांहीं मला माहीत नाहीं. तिला विचारलें तरी ती कांहीं केल्या कांहींच सांगत नाहीं. ती रस्त्यानें आक्षेप घेण्याजोगें गाणें गात भीक मागत हिंडत होती, म्हणून तिला पकडली आहे."

"कसलें गाणें म्हणत होती?"

ताराबाईचा हा प्रश्न ऐकून चंद्रसेन निरुत्तर होऊन शिपायांच्या व मधून मधून त्या बाईच्या तोंडाकडे टकमक पाहूं लागला. त्याला तें गाणें कांहीं आठवेना. त्याच्या मनांत असा गोंधळ उडालेला पाहून भिकारणीनें स्वतःच धिटाईनें ताराबाईसमोर जाऊन विचारलें, "राणीसाहेब! मी तें गाणें गाऊन दाखवूं का?" आणि लगेच ती गाऊं लागली.

**राजा परदेशी ! परदेशी !**
**येइ मायभूमीसी ।। धृ० ।।**

"हा राजा कोण?" ताराबाईनें मध्येंच विचारलें.

"ऐका तरी ! आपण सारें गाणें ऐकाल तर सर्व गोष्टींचा उलगडा होईल." असें म्हणून ताराबाईच्या परवानगीची वाट न पाहतां भिकारीण पुन्हा पूर्ववत् गाणें गाऊं लागली.

**अविंधपाशीं बंदिवानसा झाला शाहूराजा !**
**किती गांजिला कितीक छळिला प्राण महाराष्ट्राचा ! १**



भिकारीण:—राजा परदशा । परदशा । ५६ मायभूमाता ॥

"हा कोण शाहूराजा! आणि हा काय महाराष्ट्राचा प्राण?" ताराबाईनें चमकून विचारलें. भिकारणीचें गाणें सुरूच होतें.

कैक युगांचें भाग्य उदेलें पुण्य फळाला आलें!
शिवरायाच्या कृपाप्रसादें शाहूराजे सुटले! २
उठा! उठा! हो सर्व मराठे जा त्यांना सामोरे!
वंदन करुनी गौरव करुनी आणावे माघारे! ३

"असें कोण म्हणतें? त्या तोतयाला शाहूराजे कोणी म्हणतें? त्या बाटग्या बेहिमत्याला आणायला सामोरे जा असें कोण म्हणतें? सांग ए भिकारणी! खरें सांग, तुला हें गाणें कोणीं शिकविलें? त्या फितुऱ्याचें नांव सांग कीं आतांच्या आतां त्याचा कडेलोट करतें." ताराबाई संतापून बसल्या आसनावरून उठून मुठी आंवळीत व दांतओंठ खात म्हणाली.

भिकारीण ताराबाईच्या आवेशाला जरादेखील न जुमानतां शांत स्वरानें आपल्या गाण्याचें शेवटचें कडवें गाऊं लागली:

भगवंताची वाणी बोले तेच बोल मी बोलें!
उठा मराठे! उठा वीर हो व्हा जागे निजलेले! ४

"ही बाई वेडी तर नाहीं?" ताराबाई त्या भिकारणीला खाऊं कीं गिळूं अशा विस्फारित दृष्टीनें तिच्याकडे पाहत म्हणाली, "ह्या कारस्थानाच्या मुळाशीं कोण आहे याचा शोध लावलाच पाहिजे."

चंद्रसेन मध्येंच म्हणाला, "आईसाहेब! बाळाजीपंत ह्या कारस्थानाच्या मुळाशीं असावे असा मला जबरा संशय येतो."

"आईसाहेब!" त्या भिकारणीला पकडून आणणाऱ्या शिपायांपैकीं मारुती नावाचा एकजण पुढें होऊन हात जोडून लुब्रेपणानें म्हणाला, "त्यांनीं शांतपणें गाणें ऐकून घेतलें इतकेंच नव्हे; तर त्या बाईचें गाणें आटोपल्यावर ते तिला वर माडीवर बोलावीत होते. तितक्यांत आम्ही पुढें होऊन तिला पकडूं लागलों तेव्हां बाळाजीपंतांचा मोठा मुलगा बाजीराव आम्हांला मारण्यासाठीं तलवार उगारून पुढें आला!"

"त्यावरूनच मला जास्त संशय आला कीं ही बाई गुप्त हेर असावी. ती मुद्दाम भिकारणीच्या वेषांत नगरांत आली असावी." चंद्रसेन म्हणाला.

"हें साफ खोटें आहे!" भिकारीण उद्गारली.

"मग तुला बाळाजीपंतांनीं नेमकी वर हाक कां मारली?" ताराबाईनें विचारलें. ताराबाईनें ताबडतोब आपल्या हुजऱ्याला हांक मारून सांगितलें, "नवलसिंग! पागेंतला घोडा घेऊन सेनापतींच्या घरीं जा व ते आणि बाळाजीपंत यांना आतांच्या आतां माझ्यासमोर घेऊन ये. बाळाजीपंत तेथें नसले तर त्यांच्या घरीं जा."

"आज्ञा सरकार!" असें म्हणून हुजऱ्या निघून गेला.

लगेच त्या भिकारणीला ताराबाईनें पुन्हा विचारलें, "सांग, तुला बाळाजीपंतांनीं नेमकी वर हांक कां मारली?"

"हांक कां मारली हें काय विचारतां राणीसाहेब! माझ्या मुखीं त्या अवतारी पुरुषाचें—पुण्यप्रताप शाहूराजाचें नांव वसत असतां जगांत असें कोण माणूस आहे कीं जें मला आदरानें जवळ करणार नाहीं? तसेंच जगांत अशी कोणती जागा आहे कीं, जिथें मला प्रवेश मिळणार नाहीं? शाहूराजांचें गुणगान गात गात गांवोंगांवीं हिंडत हिंडत तुमच्या राजधानींत माझ्या शाहूराजांच्या—पण ते माझे शाहूमहाराज कसले! ते माझे एकटीचे राजे नाहींत; ते अलम् मराठी दुनियेचे राजे! शाहूराजांच्या श्रद्धाळु भाटाला बंदी करील असें जगांत कोण आहे! हेंच पाहाना! राणीसाहेब! तुमच्या दूतांना मला भर रस्त्यांत अडवून इथें तुमच्यासमोर आणण्याची बुद्धि झाली ती तरी तुमच्या व त्यांच्या शाहूमहाराजांवरील विरोधीभक्तीचीच साक्ष देत नाहीं का? राणीसाहेब! माझ्या तोंडून ह्या निमित्तानें तरी तुम्हांला शाहूराजांचें गाणें ऐकायला मिळालें. खरोखर, एक काशीरामेश्वर केल्याचें पुण्य तुमच्या गांठीं जोडलें गेलें. आईसाहेब! नगराच्या वेशीबाहेर शाहूमहाराजांचीं पावलें उमटतांच आपण जातीनें वेशीवर जाऊन त्यांच्यावर सोन्यामोत्याचीं फुलें उधळायला हवीं!"

"कोण बाई ही! हिला खरेंच वेड लागल्यासारखें दिसतें." ताराबाई त्या बाईच्या शद्बांच्या मारानें बेजार होऊन कपाळाला तिरस्काराच्या आंठ्या पाडून म्हणाली, "कोण ग तूं?"

"राणीसाहेब! माझ्या नांवाशीं तुम्हांला काय करायचें आहे? माझ्या नांवांत एका काळीं मोठेपणा होता. माझ्या आयुष्यांत एक काळ असा होता, कीं जेव्हां माझ्या नांवाला मोठेपणा मिळायचा होता. तो मिळाला असता तर आपला माझा मुलगा मराठशाहीचा राजा शोभला असता! आणि हे अष्टप्रधान, हे सारे लोक आज आपल्यासमोर जोडल्या हातांनीं उभे असतात तसे माझ्यासमोर उभे राहिले असते. पण डाव हुकला! दैवाचें दान उलटें पडलें म्हणून राणी व्हायची ती भिकारीण झालें. आतां त्याचें काय!" भिकारीण म्हणाली.

"ही वेडी तर नाहीं खास! ही चांगली शहाणी आहे. पण ही आपलें नांव कां सांगत नाहीं बरें?" ताराबाई चंद्रसेनाकडे वळून म्हणाली.

"राणीसाहेब! एकदां मीं सांगितलें ना, नांवांत कांहीं नाहीं म्हणून! नांव सोनूबाई अन् हातीं कथलाचा वाळा, काय करायचा आहे! नांव मोठें होतें—खूप मोठें होतें माझें नांव, आणि नांवाला नांवरस जुळली असती तर आजला मराठी दुनियेनें माझ्या नांवाचे पोवाडे गाइले असते. पण डाव हुकला! आतां तुम्हांला माझें नांव ऐकायचें तर सांगतें; राणीसाहेब! आपल्यापूर्वी आपली सवत कोण व्हायची होती तें आपणाला आठवतें?"

त्या भिकारणीचा एकेक शब्द ताराबाईच्या मर्मस्थानीं जाऊन झोंबत होता. तिची मुद्रा क्षणाक्षणाला अधिकाधिक संतप्त झालेली दिसत होती. पण नवलाची गोष्ट ही कीं, तिचा राग त्या बाईच्या मनांत यत्किंचित्‌देखील भय उत्पन्न करूं शकला नाहीं. तिची इतकी धैर्यशाली वृत्ति पाहून ताराबाई व चंद्रसेन ह्या दोघांनाही अत्यंत अचंबा वाटला. त्यांचा व इतरांचा आजवरचा अनुभव म्हणजे

राणीला एखाद्या माणसाचा राग येतोसा दिसतांच त्या माणसानें व सभोंवारच्या इतर लोकांनींही त्याच्या मरणाच्या घटका मोजू लागावें. कारण राणीचा राग म्हणजे वीजच ती! ज्याच्या मस्तकावर कडाडावी त्याचे जळून कोळसे व्हावे. पण त्या बाईवर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. ती उलट हंसतमुखानें ताराबाईला म्हणाली, "राणीसाहेब! आपल्या रागाची व सत्तेची मला पूर्ण जाणीव आहे. पण माझ्या अंतर्यामीं शाहूराजाविषयीं निःसीम राजनिष्ठा आहे व माझ्या मुखीं राजाचें पवित्र नांव वसत आहे; तोंवर कोणाच्याही रागागेपाचा माझ्यावर कांहीच परिणाम व्हायचा नाहीं. अशा रागावून माझ्या तोंडाकडे काय पाहतां? संतापून डोळे काय वटारतां? पाहा! पाहा! तशाच आणखी रागावून, संतापून, जळफळून, जळजळत्या नजरेची आग पाखडीत माझ्याकडे पाहा!– चंद्रसेन! तुम्ही देखील मनमुराद रागावा! आणि तुमचे हे शिपाथी––थोरांच्या दारचीं हीं कुत्रींदेखील माझा चावा घेण्यासाठीं माझ्याकडे बुभुक्षित नजरेनें पाहूदेत. पण अरे वेड्यानो! सूर्यानें सहस्र नेत्र उघडून माझ्याकडे पाहिलें तरी मला जरादेखील आच बसत नाही हें तुम्ही पाहतां, मग काजव्याच्या लिकूलिकूण्यानें माझें काय पारिपत्य होणार?"

"जा, चंद्रसेन! ह्या बाईला आतांच्या आतां नेऊन चित्त्यांच्या पिंजऱ्यांत कोंडा. तिला चित्त्यांनीं फाडफाडून खाल्लें पाहिजे. जा–जा हिला घेऊन." ताराबाई चंडिकेचा अवतार धारण करून कडाडली.

तेवढ्यांत हा वेळपर्यंत ताराबाईच्या बाजूला खऱ्याखुऱ्या बावळटाप्रमाणें गुढग्यांत मान घालून बसलेला शिवाजी टुणूकन् उड्या मारीत पुढें आला व फिदि फिदि हंसत म्हणाला, "छे! आईसाहेब! तसें करूं नका. तारांचें मोठें कुंपण करून ह्या बाईला तिचे हातपाय बांधून त्या कुंपणांत कोंडा व मग चित्त्यांना मोकळे सोडा. त्या चित्त्यांना पाहून ही भ्याली म्हणजे मी तिच्यावर गोळी झाडून तिची शिकार करीन."

शिवाजी नुसतें वेड्यासारखें बोलूनच थांबला नाहीं; त्यानें आपण

कशी शिकार करूं हेंही दाखविण्यासाठीं जवळच मारुतीची बंदूक पडली होती, ती उचलून नेमकी उलटी आपल्या खांद्यावर ठेवली व मारुती 'बंदूक भरलेली आहे, सरकार! तिला हात लावूं नका' असें ओरडत पुढें सरकत असतांना त्याला लाथ मारून 'दूर हो! मला बंदूक धरतां येत नाहीं कीं काय' असें विचारीत बंदुकीच्या चापावर हात ठेवला.

"राजे! हात सांभाळा; बंदूक उडेल." ताराबाई म्हणाली.

शिवाजीला बंदूक कशी उडते हें काय माहीत! त्यानें पांखरें हवेंत उडताना पाहिलीं होतीं; तसेंच रोज रोज हुजऱ्यांना सांगून बागेंतून पतंग पकडून आणावयाचे व त्यांच्या पुढील पायांत बाटाण्याएवढीं मोत्यें देऊन व त्यांच्या शेंपटीला बारीक दोरी बांधून त्यांना हवेंत उडवावयाचें, किंवा स्वतः हुजऱ्यांच्या सांगाती वावड्या उडवावयाच्या एवढेच उडणें व उडवणें ह्या शब्दांचे प्रत्यक्ष प्रयोग त्या मूर्खोजी रावांनीं पाहिले होते. त्यांचे रोजचे तेच खेळ होते. बंदूक उडेल असें ताराबाई म्हणाली त्याची उमज त्याला कशी पडावी!

आपल्या चिरंजिवांची ही ऐट नुसती पोकळच नव्हे तर प्राणघातकही आहे हें ताराबाईला पक्कें माहीत असल्यानें तिनें 'राजे! हात संभाळा, बंदूक उडेल' अशा सौम्य शब्दांनीं शिवाजीची कान उघाडणी केली. चंद्रसेन वगैरे नोकरमाणसें समोर उभीं होतीं म्हणून ताराबाईनें 'राजे' 'अहो' 'जाहो' अशा गौरवयुक्त शब्दांनीं त्याला संबोधिलें. हाच जर तो एकटा असला खेळ करतांना सांपडला असता, तर ताराबाईकडून 'मूर्खा'! 'बेअकल्या!' असल्या शेलक्या व्याजोक्तींनींच त्याची संभावना झाली असती.

ताराबाई बंदूक उडेल म्हणाली खरी; पण शिवाजी आईच्या शब्दाला थोडाच जुमानतो! 'मला बंदूक धरून नेम मारतां येत नाहीं कीं काय' असें बोलून आईला निरुत्तर करावयाचें या इराद्यानें, पण बंदुकीचा नेम कसा असतो हें माहीत नसल्यानें फुलपांखरूं अथवा वावडी आपण उडवितों तशीच बंदूक उडत असेल; तिला

घट्ट धरावी अशा समजुतीनें 'कशी उडते पाहतों' असें म्हणून त्यानें चापावर हात घट्ट धरला. त्याबरोबर बंदूक उडाली व त्यांतील गोळ्या नेमक्या ज्या शिपायाची ती बंदूक होती त्याच्या छातींत घुसून तो घायाळ होऊन पडला. वास्तविक त्या गोळ्यांनीं ताराबाईच मृत्युमुखीं पडावयाची. कारण शिवाजीच्या खांद्यावरील उलट्या बंदुकीच्या तोंडासमोर नेमकी ती उभी होती. पण मारुती तेवढ्यांत बंदूक सांवरण्यासाठीं म्हणून पुढें सरला; त्यामुळें ताराबाईचें मरण टळलें व त्याचा काळ ओढवला. तें पाहून कां नकळे; भिकारणीचा चेहरा तात्काळ फिकटला.

## प्रकरण सोळावें

# किल्ल्याच्या पायथ्याशीं

"अरेच्चा! अशी बंदूक उडते काय?" शिवाजी आपल्या हातां-तील बंदूक दूर फेंकून देऊन ताराबाईच्या मागें लपत घाबऱ्याघाबऱ्या म्हणाला.

तो अघटित प्रकार पाहून सर्वच मंडळी क्षणभर स्तिमित झाली. भिकारीण आपल्या मनांतील कालवाकालव मनांत गिळून म्हणाली, "राणीसाहेब! पुण्यपुरुषाची पुण्याई ही अशी आहे. माझ्या मुखीं शाहूराजे, माझ्या मनीं शाहूराजे, त्यामुळें माझ्या आंगावर हात टाकणाऱ्या दुष्मनाच्या मानेवर काळाची कुऱ्हाड कोसळली." लगेच भिकारीण शिवाजीकडे पाहून ताराबाईला म्हणाली, "तसेंच हे तुमचे शिवाजीराजे वेडे आहेत;—आतांच्या आतां थोरल्या शिवाजीमहा-राजांना व देवी भवानीला स्मरून शपथ घ्या, कीं शाहूराजांना तोतया म्हणणार नाहीं, त्यांच्या नाशाचे डाव रचणार नाहीं, व ते वेशीवर आल्यावर त्यांना सामोरी जाऊन गौरवानें मिरवीत आणून राज्या-वर बसवीन. राणीसाहेब! खरेंच अशी शपथ वाहून पाहा कीं, तुमच्या शिवाजीराजांचें वेड तेव्हांच जाईल. श्रीशिवाजीमहाराजांनीं इतक्या आयासांनीं हिंदवी स्वराज्याची स्थापना केली; त्यांच्या सिंहासनावर एका अप्रबुद्ध वेड्यानें बसून तें सिंहासन विटाळल्यावर तें वैभव त्या सिंहासनावरील व्यक्तीच्या पचनीं कसें पडावें! राजवैभव नीट भोगलें तरच तें लाभतें नाहींतर शापतें. राजाराममहाराज एवढे थोर संभाजी-राजांच्या पश्चात् व शाहूराजांच्या गैरहजेरींत मराठशाहीचे खरेखुरे वारस ते होते. पण त्यांनीं सिंहासनारोहण न करतां मंचकारोहण मात्र केलें व राजा म्हणून राज्यकारभार न हांकतां राजाचा गुमास्ता म्हणून

राज्य केलें. तरीही तुम्ही—राणीसाहेब! तुम्हीं अभिषिक्त राणी होण्याचा हव्यास धरला! राणीसाहेब! माझें ऐका, व आज, आतां, या घडीला शपथ वाहा, कीं शाहूमहाराजांचा हेवादावा करणार नाहीं. मग तुमच्या व तुमच्या वेड्या मुलाच्या भाग्याला कसा सुवर्णाचा उजाळा येतो पाहा!"

मारुती कांहीं काल अर्धवट बेशुद्धींत होता. त्यानें भिकारणीचे बोल ऐकले असावे. निदान तिनें ताराबाईला शाहूमहाराजांचा हेवादावा न करण्याविषयीं शपथ वाहण्याला सांगितलें, ते शद्ब तरी मारुतीला ऐकूं गेले असले पाहिजेत. तो लगेच वर मान करून कण्हत कण्हत उत्तरला, "मी शपथ घेतों कीं, आजपासून मी शाहूमहाराजांचा हेवादावा करणार नाहीं. पण देवा! मला आराम पडूं दे."

"काय म्हणालास?" ताराबाई मारुतीच्या तोंडचे शब्द ऐकून वसूकन् त्याच्या अंगावर आरडून म्हणाली, "मरणघडीला तुला ही बेइमानी आठवली काय?"

—"घे बाबा! मारुती! तीनवार तशी शपथ घे, कीं तुला बरें वाटेल." भिकारीण म्हणाली.

मारुती भोळ्या भावानें पुनः शपथ घेण्याचा प्रयत्न करूं लागला. त्याबरोबर ताराबाईनें चंद्रसेनाला आज्ञा केली, "चंद्रसेन! या कुतरड्याची नेकी बिघडली आहे. याला जंगलांत नेऊन फेंकून दे. तिथें ह्याला कोल्ह्याकुत्र्यांनीं फाडफाडून खाल्लें पाहिजे. आणि हें पाहा, याला रस्त्यानें नेतांना दर चौकांत हा जिवंत मुडदा थांबवून दौंडी पिटवा कीं, जो कोणी तोतया शाहूविषयीं पक्षपाताचें धोरण स्वीकारून छत्रपतीशीं बेइमान होईल त्याला असें अथवा याहूनही जबर शासन होईल."

ताराबाईच्या हुकुमाप्रमाणें चंद्रसेन मारुतीला दुसऱ्या शिपायांकरवीं हाताशीं धरून चालवीत घेऊन गेला. आतां त्या विस्तीर्ण दिवाणखान्यांत ताराबाई, वेडा शिवाजी, राणी व भिकारीण एवढीं चारच माणसें राहिलीं. इतका वेळ राणी परकी मंडळी दिवाण-

खान्यांत उभी असलेली पाहून आंत होती, ती आतां बाहेर आली. ताराबाईच्या कोपाची वीज अशी क्षणोक्षणीं कडकडत असतां प्रत्यक्ष धीरदेवतेची छातीदेखील जिथें दडपून जावयाची तिथें जी यःकश्चित् बायको माणूस निर्भयपणें उभी राहते ती आहे तरी कशी काय, हें पाहण्यासाठीं राणीला बाहेर यावयाची वासना झाली.

"बाई! तूं चेटुकबिटुक जाणतेस का?" ताराबाईनें आपला सारा रागरोष गुंडाळून ठेवून भिकारणीला विचारलें.

"छे! मी चेटुकबिटुक कांहीं जाणत नाहीं." भिकारीण उत्तरली.

"मग मोंगलांच्या कैदेंतून सुटलेला शाहू तोतया नसून खरा आहे असें तुला कसें कळलें?" ताराबाईनें विचारलें.

"त्यांत कळायचें तें काय?" भिकारीण म्हणाली, "अलम दुनिया जें बोलते तें मी बोलतें."

"तूं खरें सांग. माझ्यापाशीं खोटेपणा चालायचा नाहीं. खरें सांगशील तर तुझें जन्माचें दारिद्र्य फिटेल असें करीन."

"राणीसाहेब!" भिकारीण उपहासपूर्वक हंसत म्हणाली, "सर्वसामर्थ्यवान् देवानेंच जिथें जन्मदारिद्र्य माझ्या ललाटीं लिहिलें आहे, तिथें तुमच्यासारख्या पामर माणसांच्या हातून तें कसें फिटणार! मी नशिबाची थोर असतें तर—पण जाऊंद्या! कंटाळा येईतों त्याच त्याच गोष्टी बोलून फायदा काय? मला तुमच्या धनदौलतीची मुळींच अपेक्षा नाहीं."

"धनदौलतीची अपेक्षा नाहीं तर नाहीं; प्राणाची तरी अपेक्षा आहे ना?" ताराबाईनें पुन्हा संतप्त मुद्रा करून विचारलें, "अग ए भिकारणी! मी कोण हें नीट ध्यानीं घे व खरें बोल. नाहीं तर विनाकारण प्राणास मुकशील!"

"राणीसाहेब! मी खोटें कधींच बोलत नाहीं. मी बोलतें तें खरेंच बोलतें; पाहिजे तर माझ्या शब्दावर विश्वास ठेवा किंवा ठेवूं नका. ही पाहा मी चाललें." असें म्हणून भिकारीण 'राजा परदेशी! परदेशी!' हें गाणें गात निघाली. तें गाणें ऐकून ताराबाईचें पित्त

जास्तच खवळलें. लगेच तिनें पुढील दरवाजांत जाऊन पहारेकऱ्याला मोठ्यानें हांक मारून सांगितलें, "त्या बाईला आतांच्या आतां कैद करा."

ताराबाईच्या तोंडचे शद्ब निघावयाला व धनाजी आणि बाळाजीपंत आंत यावयाला एकच गांठ पडली. बाळाजीपंतांबरोबर बाजीराव व चिमाजी हेही होतेच.

"आईसाहेब! कोणाला कैद करावयाचें?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

"त्या भिकारणीला; तुमच्या कटाच्या साथीदारणीला!" ताराबाई क्रुद्ध स्वरांत उत्तरली.

"आईसाहेब! आपण काय बोलतां हें! अलीकडे आपणाला संशयाच्या पिशाच्चानें घेरलेलें दिसतें. असा जर आपणाला आम्हां नेकीच्या नोकरांविषयीं संशय येऊं लागला, तर आपल्या पायांची चाकरी करणें आम्हांला फार अवघड जाईल. एवढ्यासाठीं—ह्या बाईची चौकशी करण्यासाठींच आपण मला बोलावलें का?" धनाजीनें विचारलें.

"होय. मला तुमच्याविषयीं तसा संशय घ्यायला कारणें होतीं."

"तीं कारणें मी जाणतों. पूर्व जन्मीं मीं काय पाप केलें नकळे, म्हणून माझ्या पोटीं जन्मलेला कुलकलंक कारटा सर्पासारखा माझ्यावरच उलटूं लागला आहे. त्याबद्दल मी दुसऱ्या कुणाला कशाला बोल लावूं!" धनाजी कपाळाला हात लावून म्हणाला, "आपलाच दाम खोटा; तिथें दुसऱ्याला दोष कां द्यावा! पण आपणासारख्या जबाबदार थोरांनीं—आजला महाराष्ट्राचें भवितव्य आपल्या हातीं आहे, मराठशाहीच्या कुंडलींतील ग्रह आजला तरी आपल्या पाऊलवाटेच्या आश्रयानें चालत आहेत, आपल्यासारख्या थोरांनीं इतक्या हलक्या कानांनीं वागणें बरें नाहीं." धनाजी म्हणाला.

"सेनापति! तुम्ही तुमच्या पोटच्या मुलाला इतके पाण्यांत पाहतां; तुम्हांला काय म्हणायचें?" ताराबाई म्हणाली.

"पोटचा मुलगा! पोटचा मुलगा खरा; पण त्याला मूर्खपणानें बापाच्या मानेवर तरवारीचे खेळ खेळूं द्यावयाचे का? आईसाहेब! आपणच सांगा; मराठाईचा सेनासारंग ह्या नात्यानें मराठी राज्याचें भवितव्य बहुतांशानें माझ्या कर्तबगारीवर अवलंबून आहे. त्या कर्तबगारीला शोभेसें कर्तव्य पार पाडण्याच्या कामीं जर माझा मुलगा आडवा येऊं लागला, तर आंधळ्या पुत्रप्रेमाच्या नादांत मीं माझ्या कर्तव्याला मुकावें कीं पुत्राला शत्रु मानून सावधगिरीनें वागावें? बलाढ्य शत्रूलादेखील ज्याचें नांव ऐकतांच चळचळां कांपरें भरतें, त्या धनाजीचा पोटचा पोर अशा बेपर्वाईनें वागूं लागावा; त्याचा निवाडा करण्यासाठीं स्वतःची अब्रू वेशीला टांगण्याचें ह्या धनाजीच्या कपाळीं यावें ना! शिव! शिव!" धनाजी ताडकन् कपाळावर हात मारून घेऊन कळवळ्यानें म्हणाला.

आंत राजवाड्यांत हें संभाषण चाललें होतें, त्याच वेळीं किल्ल्याच्या पायथ्याशीं निराळाच प्रकार चालला होता. मारुतीला ताराबाईच्या आज्ञेवरून जंगलांत फेंकून देण्यासाठीं चंद्रसेनाचे शिपायी फरफरां ओढून नेत असतां भिकारीण 'राजा परदेशी' हें गाणें गातगात वाऱ्यासारखी राजवाड्यापार चालती होऊन तेथें जाऊन उभी राहिली. तिचा कंठ तसाच अप्रतिम कोमल, रूप तसेंच मोहक व चेहऱ्यावर अपूर्व निर्भयता आणि हंसरेपणा यांची जाईजुई फुललेली, त्यामुळें ही जाईजुईची वेल आपण पायांखालीं कशी तुडवावी असें प्रत्येकाला वाटे. शिवाय तिचा वेषही एखाद्या विरक्त योगिनीला शोभण्यासारखा असल्यानें, त्या तिच्या यौगिक तेजानेंही ज्याचे त्याचे डोळे दिपून जात. ही सामान्य लोकांची स्थिति झाली. पण चंद्रसेन जाधव जरी असामान्य कोटींतील दुरात्मा होता तरी त्यालादेखील आतां त्या भिकारणीकडे पाहून अभिलाष व अनुकंपा उत्पन्न झाली. ती अर्थात् दुरात्म्याची अनुकंपा; ज्या अंतःकरणांतून ती उत्पन्न व्हावयाची, तेथील विष त्या अनुकंपेंत मुरलेलें असावयाचेंच. पण तें चावा घेणाऱ्या विषारी जनावरांच्या दाढांतील विष व दुरा-

त्म्यांच्या अंतःकरणांतील दुर्वासनांचें विष यांत अत्यंत मोठा फरक असतो तो हाच कीं, विषारी जनावरांचें विष त्यांचें त्यांनाच बाधत नसून ज्यांना तीं दंश करतील त्यांनाच बाधतें. पण दुरात्म्यांच्या हृदयीं वसणारें दुर्वासनांचें विष ते ज्यांना चावा घेतील त्यांना व त्यांना स्वतःला सारख्याच तीव्रतेनें बाधतें. चंद्रसेन दुरात्मा असल्यानें भिकारणीला पाहतांच त्याला तिच्याविषयीं जी अनुकंपामय दुर्वासना उत्पन्न झाली, तिनें त्याला हा हा म्हणतां एका क्षणांत दुबळा बनवून सोडलें. ताराबाईच्या हुकुमाची तामिली करण्यासाठीं जो कोणी तोतया शाहूचे गुणानुवाद वर्णन करील त्याला पकडून शासन करावयाचें ही कर्तव्याची जाणीव त्याला आता आणखेनाशी झाली. त्या भिकारणीला नुसतें पकडण्याचीच गोष्ट कशाला; तरवारीच्या एका घावानें कोणीं तिचे दोन तुकडे केले असते अथवा बंदुकीच्या एका गोळीसरशी तिला ठार केली असती तरी ताराबाईनें त्याची चहा केली असती. पण नाहीं! चंद्रसेनाच्यानें तें कांहीं करवलें नाही. इतकेंच काय; पण ती भिकारीण त्या घायाळ झालेल्या शिपायाच्या तोंडाकडे टक्मक् पाहत संथपणानें उभी असतांना तिला नुसत्या एका शब्दानें 'दूर हो' असें सांगण्याचें धाडसदेखील त्याच्याच्यानें करवलें नाहीं. उलट त्याला वाटूं लागलें की आपण काय केलें म्हणजे ही भिकारीण आपल्या अंकित होईल!

चंद्रसेनाच्या डोक्यांत हे विचार धांगडधिंगा घालीत असतांना भिकारीण मारुतीकडे एकसारखी पाहत होती. अंमळशानें मारुती शुद्धीवर आला व भिकराणीशीं त्याची दृष्टादृष्ट झाली, त्याबरोबर त्यानें ओघासरशी 'अंबिके'! अशी हांक मारली. त्या हांकेला प्रत्युत्तर म्हणून कीं काय नकळे, भिकारणीनें एकवार तीक्ष्ण दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें. हा देखावा पाहून चंद्रसेन व इतर लोक तिथें उभे होते त्यांना संशय आला, ही भिकारीणच मारुतीची अंबिका आहे कीं काय? कीं ह्याची एकादी अंबिका भिकारणीच्या ओळखीची आहे? चंद्रसेनाला दुग्धा पडली कीं यांची ओळख तरी कुठची?

त्यानें आपली संशयनिवृत्ति करून घेण्यासाठीं भिकारणीला विचारलें, "ए बाई! तूंच ह्याची अंबिका काय?"

भिकारणीनें प्रथम मारुतीकडे वळून पाहिलें तों तो पुन्हा बेशुद्ध पडला. ती उत्तरली, "छे! ही ह्याची अंबिका कुठची कोण जाणे!"

"मग आतां तो अर्धवट शुद्धींत 'अंबिके' असें ओरडला तें कोणत्या अर्थानें?" चंद्रसेन स्वतःशीच म्हणाला. या वेळीं त्याच्या स्मरणशक्तीला कांहींसा अकल्पित ताण बसला. संभाजीराजांच्या हयातींत अंबिका याच नांवाच्या एका रूपसंपन्न मराठा तरुणीच्या आयुष्याची होळी पेटविण्यासारखे अघोर प्रयत्न त्याच्या हातून एकवार घडले होते, ती अंबिका, व मारुती आतां जिच्या नांवानें बरळला ती अंबिका ह्या दोन्ही एक तर नसतील ना, अशा विचारानें त्याचें मन क्षणकाळ चिंताग्रस्त झालें. पण लगेच दुसऱ्या क्षणाला त्याला धीर आला कीं ती अंबिका ह्या कवडी किंमतीच्या मारुतीला कोठून भेटायला! ती केवढी रुबाबाची पोरगी होती! तिचें नखदेखील असल्या शिपुरड्याच्या दृष्टीला पडावयाचें नाहीं. ती ह्याची अंबिका कुठून असणार! ह्याची अंबिका ही दुसरीच कोणी तरी शेणीगोंवऱ्या लावणारी खडबडीत, नकटी अशी मावळीण मराठीण असली पाहिजे. चंद्रसेनानें, तेव्हां ती अंबिका आपल्या पाशवी वासनेला बळी पडेना, व त्यानें तिच्या अंगावर हात टाकतांच तिनें त्या हाताचा सडकून चावा घेतला, म्हणून चिडून आपल्या नोकरांमार्फत तिच्या तोंडांत बोळा कोंबून व तिचे हातपाय जखल बांधून तिला दूर जंगलांत एका विहिरींत लोटून मारली होती. ती आतां कोठून पुनः जिवंत होऊन येणार!

"जा. मारुत्याला उचलून आईसाहेबांच्या आज्ञेप्रमाणें जंगलांत फेंकून द्या." चंद्रसेन म्हणाला.

"पण सरकार! त्याला कोठें नेऊन फेंकायचें!" एका शिपायानें विचारलें.

महारदऱ्याच्या जंगलांत नेऊन फेंकून द्या. तिथें जंगलवाडींतले

वाघ, कोल्हे पाणी प्यायला येतात. त्यांचा एक दिवसाचा फराळ भागेल. जा." चंद्रसेन म्हणाला.

भिकारीण एकसारखी मधून मधून एकवार मारुतीच्या तोंडाकडे व पुनः चंद्रसेनाच्या तोंडाकडे टकमक् पहात होती.

शिपायी मारुतीला घेऊन गेले. आतां तेथें फक्त एक हुजऱ्या –ताराबाईच्या विश्वासांतील हरनामसिंग–उभा होता. त्याला चंद्रसेन म्हणाला, "हरनाम! आईसाहेबांपाशीं जाऊन विचार, ह्या भिकार-णीला कैद करावयाची कीं सोडून द्यावयाची?"

## प्रकरण सतरावें

# भिकारणीच्या प्राणावर गदा !

हरनामसिंग मुजरा करून आंत निघून गेला. आतां तेथें चंद्रसेन व ती भिकारीण अशीं दोघेंच राहिलीं. चंद्रसेनानें हरनामसिंगाला सांगितलें तें भिकारणीनें ऐकलें होतें. पण तिला त्याची कांहींच क्षिती नव्हती. तिनें चंद्रसेनाला विचारलें "चंद्रसेन! आतां मी जाऊं कीं राहूं?"

"मीं काय करावें अशी तुझी इच्छा आहे?"

"माझी कांहींच इच्छा नाहीं. साऱ्या आशा, इच्छा व महत्त्वाकांक्षा यांची होळी करून जन्मावेरीं वनवासाला निघालेली जोगीण मी; माझी इच्छा कसली व अनिच्छा कसली? पण तुमचें म्हणणें काय?" भिकारणीनें विचारलें.

"माझें म्हणणें एवढेंच कीं, तूं सुखी व्हावेंस व मीं तुला सुखी करावें!"

"तुम्ही मला सुखी करणार? तुम्ही कसे बरें मला सुखी करणार?"

"तूं सांगशील तसें करीन; पण तुला सुखी करीन."

"मी सांगेन तसें कराल?" भिकारणीनें क्षणभर—फक्त क्षणभरच पण खोल—खोल—अत्यंत खोल असा विचार करून विचारलें.

चंद्रसेन क्षणभर गोंधळल्यासारखें करून उत्तरला, "हो! तूं सांगशील तसें करीन."

"पांहा बरें!"

"पाहिलें. तूं सांगशील तसें करीन; मग तर झालें!"

"पण मग मीं तुमच्यासाठीं काय करायचें!"

"तर मग सांगतोंच. तूं माझी हो!"

"मी तुमची होऊं?"

"हो! तूं माझी हो!" चंद्रसेन भिकारणीच्या डोळ्याला डोळा भिडवून अंमळ धीटपणानें म्हणाला, "खरेंच, तूं माझी हो! पण मी तुला हांक कोणत्या नांवानें मारूं बरें?"

चंद्रसेनाचा प्रश्न ऐकून भिकारीण रस्त्यावरच्या एका दगडावर बसल्या बसल्या आपल्या डाव्या तळहातावर हनुवटी टेंकून विचार करण्यांत गढून गेली. त्या वेळची तिची बसण्याची ढब पाहून चंद्र-सेनाला त्याच्या ऐन तारुण्यांतील एका प्रसंगाची पुन्हा आठवण झाली. तो वयानें अठरा–वीस वर्षांचा असतांना मंगला नांवाच्या एका पंधरा वर्षे वयाच्या खुबसूरत तरुणीशीं लग्न करण्याचा त्याचा मानस होता. ही मुलगी थोरां-मोठ्यांच्या कुळांतील होती व ती देखणी होती. अशी बोलवा होती कीं संभाजीमहाराज किंवा राजा-राममहाराज यांपैकीं कोणी तरी तिच्याशीं लग्न लावावें असे तिच्या बापाचे प्रयत्न सुरू होते. पण तिचा बाप कुळानें थोर असला तरी मानानें व संपत्तीनें अत्यंत हीनावस्थेंत होता. त्यामुळें ती राजवैभवाला मुकली. आपल्या मोठेपणाला साजेसें स्थळ आपल्या पडत्या काळा-मुळें आपणाला मिळत नाहीं असें पाहतांच मंगलेच्या बापाला चारु-दत्ताप्रमाणें मरण बरें वाटूं लागलें. त्या वैतागाच्या भरांत तो खऱ्या हाडाचा मराठा संतापला व 'मुसलमानाशीं सोयरीक करीन पण मराठ्याशीं सोयरीक करणार नांहीं' असा निर्धार करून एखाद्या मुसलमान उमरावाशीं मंगलेचें लग्न लावून देण्याच्या इराद्यानें मराठ शाही सोडून मोंगलाईंत निघून गेला. तिकडे गेल्यावर त्या बाप-लेकींची काय वाट झाली याची कोणालाच कांहीं खबर नव्हती. त्या मंगलेला: त्यानें सारी तीनचार वेळां–एकदां गुरें वळून आणतांना, एकदां पाण्याची भरलेली घागर कडेवर घेऊन जातांना, व दोनदां ती कसल्या तरी चिंतेनें–बहुधा आपल्या गरीबीमुळें आपणाला कोणी मान्यतेचा वर वरावयाला तयार होत नाहीं ह्याच चिंतेनें–आपल्या मोडकळलेल्या वाड्याच्या आंगणांतील सोनचाफ्याच्या चिरेबंदी

आळ्यावर डाव्या तळहातावर हनुवटी टेंकून टपटप् आंसवें गाळीत बसलेली असतांना पाहिली होती. तेव्हां तिच्या डाव्या तळहाताच्या मुळाशीं एक तीळ त्यानें पाहिला होता. तसाच तीळ ह्या भिकारणीच्या तळहातावर, ती हनुवटी टेंकून उभी असतांना त्यानें पाहिला त्याबरोबर त्याला पूर्वीचें सारें ब्रह्मांड आठवलें.

"चंद्रसेन! मी तुमची राणी होण्यांत आतां फारशी शोभा राहिलेली नाहीं—"

"पण अगोदर मला सांग, तुझें नांव काय? आतां तसें चालायचें नाहीं. मला तुझ्या नांवाविषयीं संशय आहे. पण तो मी इतक्यांत बोलून दाखवीत नाहीं."

"बोलून दाखवा ना, काय बोलून दाखवायचें तें?"

"तुझ्या डाव्या तळहातावर तो तीळच आहे ना?"

"माझ्या डाव्या तळहातावर तीळ आहे?" भिकारीण एकवार आपल्या डाव्या तळहाताकडे पाहत म्हणाली, "होय. तीळ आहे खरा."

"असाच तीळ मंगला नांवाच्या एका मुलीच्या हातावर होता. तुझें नाव मंगलाच काय? खरें सांग."

"माझें नांव कांहीं मंगला नाहीं; पण तेंच आहे असें क्षणभर धरून चाला." भिकारीण विचारपूर्ण व चौकस दृष्टीनें पाहून म्हणाली, "तुमच्या मायेममतेंतली ती मंगला होती वाटतें?"

"होय. त्या आठवणी झाल्या कीं माझ्या अंतःकरणांत कालवाकालव सुरू होते. तीच तूं असावीस अशी माझी हळुहळू खात्री होत आहे. हीच खात्री जर अगोदर झाली असती तर तुला माझ्यापासून पोंचला इतका त्रास पोंचला नसता. खरें सांग; तीच मंगला तूं ना?"

"चंद्रसेन! असे उतावळे बनूं नका. तुम्ही म्हणतां ती मंगला मी नाहींच. मग मी माझी इतक्या वर्षांची हकीकत तुम्हांला काय सांगूं? तुम्हांला तुमच्या मंगलेचा विसर पडावा म्हणून तुम्ही म्हणतांच तर मी तुमची मंगला व्हायचें वचन देतें. पण तें एका अटीवर."

"कोणत्या अटीवर?" चंद्रसेनानें विचारलें.

"शाहूमहाराजांच्या विरुद्ध कोणतीही गोष्ट तुम्हीं करतां कामा नये."

"कबूल!" चंद्रसेन म्हणाला, "एवढेंच ना तुझें मागणें?"

"आणखी एक मागणें आहे." भिकारीण म्हणाली.

"तें कोणतें?"

"माझ्यामुळें मारुतीला आपल्या प्राणांना मुकण्याची पाळी आली आहे. मीं शाहूमहाराजांच्या स्तुतिपर गाणें म्हटलें व त्यावर त्याची श्रद्धा बसली म्हणून राणीसाहेबांनीं त्याला मरणाची कठोर शिक्षा सांगितली. त्याला तुम्हीं जीवदान दिलें पाहिजे."

"तो माझा कोणी नव्हे. पण माझ्या शब्दावर विसंबून तो प्राणाला मुकला आहे. यासाठीं मला त्याची एवढी काळजी."

"ठीक आहे, मी मारुतीचें रक्षण होईल अशी तजवीज करतों."

"ह्या दोन गोष्टी पार पडेतों मला व्रतस्थ राहून ठिकठिकाणीं संचार केला पाहिजे. शाहूमहाराजांचे पाय सुखरूपपणें राजवाड्याला लागले, कीं माझें व्रत पूर्ण होईल. तोंपर्यंत तुम्ही तुमच्या वचनाला जागला तर मी वचन दिल्याप्रमाणें तुमची होईन. पण जर का वचनाची पाळणूक करण्यांत तुमच्या हातून कसूर झाली, तर मात्र मी त्या गांवची नव्हे!"

इतक्यांत हरनामसिंग राजवाड्यांतून परत आला. त्यानें निरोप आणला, "आईसाहेबांची अशी आज्ञा आहे कीं, त्या भिकारणीला पुन्हा आंत पाठवून द्यावी."

चंद्रसेनाच्या मनांतून बरीचशी ओढाताण करून भिकारणीला ताळ्यावर आणावयाची होती. तिला वश करण्यांत, ती देखणी होती याशिवायही त्याचे नाना प्रकारचे डाव होते. ती कदाचित् शाहू-महाराजांच्या कटांतील गुप्त हेर असेल; अशीच कांहीं तरी अनन्य-सामान्यता तिच्या अंगीं असली पाहिजे. त्या गुणांचा उपयोग आपणाला आपल्या भाग्योदयाच्या कामीं अनेक परींनीं करून घेतां

येईल. ती भक्तीण अथवा जोगीण असली तर आपल्या प्रगतीच्या आड येणारे बाळाजीपंतांसारखे काटे काढण्याच्या कामीं देवदेवस्की करण्याला उपयोगी पडेल. ह्या वैभवदुर्वासना चंद्रसेनाच्या अंतःकरणांत इतक्या तीव्रतेनें बाणून बसल्या होत्या कीं, त्यांच्या प्रभावासमोर त्या भिकारणीच्या ओसरत्या तारुण्यावर सदाफुलीप्रमाणें फुलून राहिलेल्या साध्या पण उत्कट लावण्याचा मोह अगदींच फिक्का पडणें शक्य होतें. ह्या सर्व बेतांना मूर्तस्वरूप देण्यासाठीं ताराबाईच्या हुकुमानें चंद्रसेनाला त्या भिकारणीचा ताबा पाहिजे होता. पण हरनामसिंगानें तिला परत आंत बोलावल्याची खबर आणताच चद्रसेनाच्या साऱ्या बेतांचा मनोरा एका क्षणांत ढांसळून पडला. तो नाइलाजानें मुकाटपणें त्या भिकारणीला बरोबर घेऊन पुन्हा आंत गेला. जातांना त्यानें तिला हळुहळू एवढें मात्र पढवून ठेवलें, "आईसाहेबांनीं तुला कोणतीही शिक्षा दिली तरी तूं मुळींच भिऊं नकोस. त्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याचें काम अखेर माझ्याकडेच येईल व मी तुला वांचवीन. तुझ्यावर कसलाही प्रसंग आला तरी मी तुझा पाठीराखा आहें."

यावर ती भिकारीण एवढेंच म्हणाली, "तें ठीक आहे. तुम्ही माझ्याविषयीं इतकी सहानुभूति दाखवितां ह्याबद्दल मी तुमची आभारी आहें. पण माझा पाठीराखा परमेश्वर आहे. तुम्ही मारुतीची मात्र योग्य काळजी घ्या. माझ्यामुळें त्या बिचाऱ्याचा काळ ओढवला आहे!"

चंद्रसेन त्या भिकारणीशीं आणखी कांहीं बोलला असता; पण हरनामसिंग त्याच्याबरोबर चालत असल्यानें व तो म्हणजे ताराबाईचा एक शिकारी कुत्राच असल्यानें चंद्रसेनाला जास्त बोलण्याचें धैर्य झालें नाहीं. तीं तिघेही राजवाड्यांत ताराबाई वगैरे मंडळी बोलत बसली होती, त्या दिवाणखान्यांत जाऊन पोंहोचलीं, तेव्हां ताराबाईनें थोड्या वेळापूर्वी धनाजी व बाळाजीपंत यांच्याशीं सुरू केलेला वितंडवाद बराच संपुष्टांत आला होता. ती वादाची तोंडमिळवणी दिल-

जमाईची किंवा दिलसफाईची मुळींच नव्हती, उभयतांनाही प्राप्त परिस्थितीची योग्य जाणीव असल्यानें त्यांनीं फक्त तात्पुरतें मिळतें घेतलें होतें. बाळाजीपंत तोतया शाहूशीं फितूर असल्याचा ताराबाईचा संशय वाढ्यांत बाळाजीपंतांनीं त्या भिकारणीला वर बोलाविलें यामुळें द्विगुणित–दशगुणित–शतगुणित झाला होता. त्या अपराधाबद्दल बाळाजीपंतांना कडक शासन करण्याच्या इराद्यानेंच तिनें धनाजीसह त्याला इतक्या तांतडीनें बोलावून आणलें होतें. धनाजीदेखील आंतून शाहूच्या बाजूचा आहे अशी तिची खात्री असतांही त्याच्या नेकी-विषयीं तिला तिळमात्र संशय नसल्यानें बाळाजीपंतांना आपण राज-द्रोहाबद्दल शासन करूं लागल्यास धनाजी आडवा येणार नाहीं असें तिचें मन तिला सांगत होतें. पण तिचा तो अंदाज अजीबात चुकला. तिनें बाळाजीपंतांवर राजद्रोहाचा आरोप शाबीत करण्याचा प्रयत्न सुरू करतांच धनाजी बाळाजीच्या बाजूनें भांडूं लागला व बाळाजी-ला शासन करण्याची गोष्ट काढतांच तर त्यानें आपल्या कमरेची तलवार व डोकीची पगडी काढून ती ताराबाई व वेडा शिवाजी-राजा यांच्या पायांवर ठेवून स्पष्ट सांगितलें, "आईसाहेब! माझे नोकर माझ्या जबरेंत आहेत. त्यांचें वांकडें पाऊल पडतें आहे असें पाहतांच तो पाय जेथल्या तेथें छाटून टाकण्याला मागेंपुढें पाहणारा मी नाहीं, याचा आपणाला अनुभव असतांना देखील ज्या अर्थी आपण माझ्याविषयीं इतका अविश्वास दाखवितां त्याअर्थी मला यापुढें आपली सेवा करणें नाहीं. हें आपलें सेनापतिपद स्वीकारा. त्याबद्दल पाहिजे तर मलाही काय शासन करावयाचें तें करा."

धनाजी असा त्रागा करावयाला उठलेला पाहतांच ताराबाईला नाइलाजानें बाळाजीपंतांचें शासन करण्याचा शब्द माघारा घ्यावा लागला. तसेंच बाळाजीपंत व धनाजी ह्या दोघांनींही त्या भिकारणी-विषयीं आपणाला कांहींच माहिती नाहीं असें शपथेवर सांगितल्या-मुळें तिच्या चारित्र्याचें रहस्य जास्तच गुंतागुंतीचें झालें, व थोड्या वेळापूर्वी एखाद्या भविष्यवादिनीप्रमाणें ती जी भराभर पूर्वापार

राजकीय उलाढालींचें उद्घाटन करूं शकली; त्यावरून ती कोणी सिद्धकोटींतील स्त्री किंवा चेटुकीण असावी असा ताराबाईचा दृढ समज झाला. ही घोरपड आपल्या राज्यांत ठेवावी तरी वाईट व तिला शासन करावें तरी वाईट. केव्हां काय होईल याचा नेम नाहीं. अशा स्थितींत तिचा योग्य बंदोबस्त करावयाचा मार्ग म्हणून तिला चित्त्याच्या पिंजऱ्यांत कोंडून ठार मारण्याची पूर्वोक्त शिक्षा देण्याचा निश्चय करूनच तिला पुन्हा आंत बोलावलें. धनाजी व बाळाजी-पंत यांच्यासमोर नमतें घ्यावें लागल्यामुळें ताराबाई आधींच बेसुमार चिडली होती. तशांत भिकारीण जी आंत आली ती आपली 'राजा परदेशी' हें पद गाऊं लागली. तें ऐकतांच ताराबाईचें मस्तक इतकें भडकून गेलें कीं, त्या भरांत तिनें चंद्रसेनाला हुकूम केला, "चंद्र-सेन! आतांच्या आतां माझ्या समक्ष ह्या चेटुकिणीचें डोकें उडव!"

## प्रकरण अठरावें

# अपूर्व साक्षात्कार

ताराबाईची ही निर्वाणीची आज्ञा ऐकून धनाजी, बाळाजीपंत, व बाजीराव आणि चिमाजी हे लहानगे मुलगेदेखील विस्मयचकित झाले. चंद्रसेन एवढा पाषाणहृदयी पण त्या भयंकर शिक्षेच्या उच्चाराच्या आघातानें त्याच्या अंतःकरणाचा पाषाणही दुभंगला. भिकारणीनें मात्र जणूं काय जन्ममृत्यूचें कोडें उलगडून जन्ममरणातीत परिस्थितीशीं समरस होऊन निर्भयपणें ताराबाईच्या तोंडची कठोर शिक्षा ऐकून घेतली. शिवाजी तर काय बोलूनचालून वेडा!

ताराबाईच्या तोंडून त्या भिकारणीचें डोकें मारण्याची आज्ञा होतांच चंद्रसेनाचा हात लटपटूं लागलेला पाहून त्या वेड्याला अवसान चढलें. तो तावडतोब पुढें होऊन चंद्रसेनाला म्हणाला, "चंद्रसेन! तूं इतका भित्रा कसा? ह्या भिकारणीची मान कशी कांकडीसारखी चिरून टाकावी! तिच्या हातीं काय तरवार आहे कीं बंदूक आहे तें तिचें एवढें भय बाळगतोस? तिचें डोकें उडविण्याचा धीर तुला होत नसेल तर आण ती तरवार इकडे, मी तिचें डोकें उडवितों."

"चंद्रसेन! असा नेभळटासारखा पाहत काय उभा राहिलास? मी मी म्हणणाऱ्या मातबर मर्दांच्या मानेवर मोकाटपणें मरणघाव घालणारी तुझी तरवार ह्या यःकश्चित् बायकोसमोर भ्याड कशी बनली?" ताराबाईनें चंद्रसेनाला प्रत्यक्षतः व बाळाजीपंत आणि धनाजी यांना अप्रत्यक्षत: विचारलें.

चंद्रसेन इतका आज्ञाधारक, पण ताराबाईनें असा अपमान केलेला त्याला सहन झाला नाहीं. तो खड्या शब्दांत उत्तरला, "आई-साहेब! खऱ्या मर्दाची तरवार मर्दांच्या मानेवरच चालावी. ती

जर बायकांच्या मानेवर चालूं लागली तर जगांत तिची अप्रतिष्ठा होईल."

"मी मरेन पण माझी कीर्ति मागें उरेल!" भिकारीण हंसतमुखानें म्हणाली, "आईसाहेब! माझ्या नांवागांवांत आतां गोडी राहिलेली नाहीं. पण एवढें लक्षांत ठेवा, माझा धर्म व माझा राजा यांच्याशीं इमानदारी राखण्यापायींच मीं माझ्या साऱ्या जन्माची होळी पेटविली व त्या होळीच्या प्रकाशांत माझ्या इतर देशबांधवांना आपला देश, आपला धर्म व आपला राजा यांच्या ठायीं किती निःसीम निष्ठा ठेवावी याचा राजमार्ग दाखवून दिला. आपला राजा, आपला देश व आपला धर्म अशा त्रिपदीवर जन्माची तिष्ठत उभी राहून मी जी भीक मागतें ती दहा दिशांच्या दहा वाटांवर माझ्या आयुष्यसर्वस्वाचा नहर बांधून हिंदवी स्वराज्य, हिंदूंचा राजा व हिंदूंचा धर्म ह्या तीन पवित्र नद्यांच्या त्रिवेणीसंगमाचा तीर्थप्रवाह त्या नहरांतून ह्या पुण्यक्षेत्रांत,—राणीसाहेब! ह्या तुमच्या थोर राजधानींत—अलम् मराठी दुनियेच्या ह्या काशी वाराणशींत आणून सोडण्यासाठीं! त्या तीर्थप्रवाहांत हा देह वाहून गेला, त्या पवित्र गंगेला अडविण्यासाठीं वाटेंत दडून बसलेल्या गोट्यागारगोट्यांत ठेंचाळून पतन पावला, तर माझा एक जन्म सार्थकीं लागला असें न मी समजेन! आतां तुमच्या धैर्याची मात्र कसोटी ठरायची आहे. अपराध्याला मारण्यासाठीं दुबळ्या जीवाच्या मनगटांतदेखील बळ उत्पन्न होईल; पण विनापराध एखाद्या माणसाला मारायचें तर तिथें देवाचें देवपणदेखील मलूल पडायचें. राणीसाहेब! तुमची ही आज्ञा म्हणजे देवाच्या देवपणावर चढाई आहे. असली चढाई देवावर सैतान कधीं कधीं करूं पाहतो असें म्हणतात; त्यांतला एखादा सैतान—राणीसाहेब! तुमच्या वाणींत वावरूं लागला आहे. आतां तोच सैतान कोणा मर्दाच्या मनगटांत संचार करून नियतीनें निर्बंधिलेल्या देवराज्यावर आपल्या सैतानी शहामतीचें बिनीचें निशाण कसें फडकवूं शकतो तें तरी मला पाहूं दे! चंद्रसेन! या, असे मर्दपणानें पुढें या

व माझ्या मानेवर तरवारीचा घाव घाला! या शिवाजीराजे! आपण पुढें या व आपल्या जगद्विख्यात पूर्वजांनीदेखील जो पराक्रमाचा ध्वज उभारला नाहीं तो उभारण्यासाठीं माझ्या मानेवर तरवारीचा घाव घाला! सेनापतिसाहेब! या–आपण या; कोणीही या व माझ्या मानेवर तरवार चालवा म्हणजे एका निरपराधी अबलेची–त्यांतूनही उद्यांच्या छत्रपतींच्या एका राजनिष्ठ कन्येची हत्या केल्याची पळती पर्वणी तुम्हांला साधतां येईल. उद्यां शाहूराजे मराठशाहीचे धनी झाले म्हणजे त्यांच्या राजनिष्ठ प्रजाजनाला फट् म्हणण्याचीदेखील कोणाची छाती व्हायची नाहीं; यासाठीं शाहूराजांचा हेवादावा करण्याची खुनशी हौस आज ज्याला जशी भागवून घेतां येईल त्यानें तशी ती भागवून घ्यावी. एवढे शाहूमहाराज नवानवसांनीं आपल्या मायघरीं पुन्हा यायचे; त्यांचा गौरव करण्यासाठीं त्यांच्या वाटेंत कोणीं माझ्यासारख्या राजनिष्ठाच्या रक्ताचें सडासंमार्जन केलें तर त्यांची विरोधी राजभक्ति सार्थ होईल, व आम्हीदेखील ज्या महाराष्ट्र-मायभूमींत जन्म घेतला त्या भूमीचें अंशतः ऋण फेडण्यासाठीं आमचे क्षणभंगुर देह सार्थकीं लागतील." भिकारीण क्षणभर थांबून सर्व लोक सभोंवतीं चित्रासारखे तटस्थ उभे असलेले पाहून गंभीर वाणीनें पुन्हा म्हणाली, "काय? कोणीच पुढें येत नाहीं? शाहूमहाराजांच्या यःकश्चित् एका राजनिष्ठ कन्येचें खून पिऊन पचविण्याचें पाणी इथें उभे असलेल्या एकादेखील वीराच्या तरवारींत नाहीं? तर मग ह्यांतच शाहूमहाराजांचा विजय आहे."

ताराबाई कधीं कोणाचा उणा-दुणा एक शब्ददेखील ऐकून घेणारी नव्हे; पण तिनें भिकारणीचे बोल मुकाट्यानें ऐकून घेतले. चंद्रसेनानें स्त्रीहत्या करण्याचें नाकारलें म्हणून त्याच्यावर देखील तिच्या कोपाची वीज कडाडली नाहीं. भिकारणीचा प्रत्येक शब्द तिच्या अंतःकरणाला भिडत होता व त्यांतून भविष्यकाळांतील घटनासूत्राची जाणीव तिला होत होती. आपल्या कुटिल राजनीतीला यश येणें दुरापास्त आहे अशी तिची मनोमन खात्री होऊन चुकली होती. पण आशा ही अशी

प्रबल शक्ति आहे कीं, ती मारून देखील मरत नाहीं, व सर्पाप्रमाणें अर्धमेली करून फेंकून दिली तरी पुन्हा जिवंत होते. ताराबाईला-देखील आशा होती, कीं सत्याच्या नाहीं तर सत्तेच्या जोरावर कां होईना, पण धनाजीसारख्या रणझुंझारांना मी शाहूच्या विरुद्ध झुंझवीन व शाहूचा पूर्ण मोड करून मरेतों मराठी राज्याची राज्य-कर्ती शोभेन. धनाजीचा बाळाजीपंतांच्या व शाहूच्या बाबतींतील पक्षपात, चंद्रसेनाचें आज्ञा अमान्य करणें, वगैरे अघटित घटनां-मुळें तिची महत्त्वाकांक्षा जरी मृतप्राय होऊन पडली होती, तरी 'ह्यांतच शाहूमहाराजांचा विजय आहे' हे भिकारणीचे शब्द ऐकतांच तिच्या महत्वाकांक्षेला पुन्हा चेव आला.

तेवढ्यांत भिकारीण पुन्हा म्हणाली, "राणीसाहेब! पुण्यश्लोक शाहूमहाराजांच्या एकनिष्ठ भक्तिणीची हत्या करतांना जसें आपलें व आपल्या सर्व लोकांचें शौर्यधैर्य लोपलें, तसेंच शाहूमहाराजांवर चालून जाणाऱ्या आपल्या रणझुंझार सेनापतीचेंही शौर्यधैर्य लोपेल व अखेर शाहूमहाराजच सर्वत्र विजयी होतील, ही पक्की खूणगांठ बांधून ठेवा."

भिकारणीला तोंडचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच ताराबाई मंचका-च्या बाजूला असलेली खाशा स्वारीची सोन्याच्या मुठीची तलवार उपसून भिकारणीवर धावली. आतां तलवारीचा वार भिकारणीच्या मानेवर होणार तोंच हातांतील तरवार गळून खालीं पडली व समोर-च्या श्रीशिवाजीमहाराजांच्या तसबिरीवर खिळलेली तिची नजर एकाएकीं दिपावल्यासारखी होऊन मिटली गेली. नेमका त्याच क्षणाला वेडा शिवाजी आपल्या आईनें हातीं घेतलेलें क्रूर कर्म तडीला नेण्यासाठीं तिच्या हातून गळून पडलेली तरवार उचलण्याच्या इराद्यानें पुढें गेला, तो तरवार बाजूलाच राहून स्वतःच्या तरवारीस हात घालतांच एकाएकीं 'साप! साप!' असा ओरडत कोलमडून जमिनीवर तारा-बाईच्या पायांशीं पडला. लगेच ताराबाई, धनाजी वगैरे :मंडळीनें चपळाई करून त्याला सावध केलें व मंचकावर बसविलें. वास्तविक

तेथें साप मुळींच नव्हता. शिवाजी वेडाच्या लहरींत उगाच भ्याला. त्या भीतीची एवढी जबरदस्त आंच त्याच्या मनाला बसली कीं, अंमळशानें शुद्धीवर आल्यावरदेखील तरवार बाजूला पडलेली पाहतांच तो 'साप! साप!' करून भीतीनें हातपाय लटलट कांपवीत मंचकावरून उठून ताराबाईच्या मागें जाऊन दडाला! अखेर ताराबाईच्या सांगण्यावरून चंद्रसेनानें ती तरवार उचलून एकदांची आंतील दालनांत नेऊन ठेविली.

"हें सारें ह्या चेटकिणीचें चेटुक आहे." ताराबाई भिकारणीकडे बोट दाखबून म्हणाली, "सेनापति! हें चेटुक गाडणारा कोणी मंत्राक्षरी तुम्हांला माहीत आहे का?"

"आईसाहेब! माझें म्हाताऱ्याचें ऐकाल तर ह्या गोष्टींत मुळींच मन घालूं नका. त्या बाईला वेडी म्हणून सोडून द्या; ती जशी आली तशी जाईल." धनाजी म्हणाला,

"सोडून कशी द्या? ती वेडी नाहीं; चेटकीण आहे."

"राजेसाहेब उगीच भ्याले. त्यांचा स्वभाव जात्याच कांहींसा कोंवळा आहे म्हणून त्यांना तरवारीचा साप वाटला." चंद्रसेन म्हणाला.

"पण मला?" ताराबाईनें समोरच्या श्रीशिवाजीमहाराजांच्या भव्य तसबिरीकडे अंगुलिनिर्देश करून विचारलें, "त्या तसबिरींतून थोरले आबासाहेब चालत चालत पुढें येऊन क्रुद्ध नजरेनें माझ्याकडे पाहूं लागल्याचा भास मला झाला तो हिनें कांहीं चेटुक केल्याशिवाय उगाच झाला का? तें कांहीं नाहीं ही चेटकीण असल्याबद्दल माझी पूर्ण खात्री होऊन चुकली आहे. चंद्रसेन! ह्या बाईला नेऊन अंधारकोठडींत कोंडून ठेवा. सेनापति वगैरे मंडळी तोतयावर चालून जात आहे, ती मोहिमेवरून परत येईतों हिला तेथेंच कडेकोट बंदोबस्तांत कोंडून ठेवावयाचें. ए बाई! तूं चेटुक करतेस हें आम्हांला आतां पूर्णपणें कळून चुकलें आहे. म्हणूनच तुला मी शासन न करतां माझ्या पदरीं ठेवणार. आम्हांला लढाया लढण्यासाठीं सैनिक पाहिजे असतात,

शिकार करण्यासाठीं शिकारी चित्ते व कुत्रे पाहिजे असतात, तसेंच तुझ्यासारखीं चेटुक करणारीं लोकेंही पाहिजे असतात. तूं आतां काय वाटेल तें चेटुक कर; पण ह्या मोहिमेंत आमचा जय होऊन तोतया शाहूचा मोड झाला पाहिजे. मराठशाहीचें नशीब ह्या मोहिमेच्या निकालावर अवलंबून आहे. तो तोतया जर धुळीला मिळून मराठ्यांच्या गादीवरील संकट टळलें तर तुझ्या केंसालाही धक्का न लागतां उलट आम्ही तुझें कौतुक करूं व तूं सांगशील त्या तुझ्या मनीषा पुरवूं. पण याद राख, जर ही मोहीम अयशस्वी ठरण्याचा रंग दिसूं लागला तर मात्र तुला आमचे शिकारी चित्ते फाडफाडून खातील."

"राणीसाहेब! आपला शब्द मला शिरसावंद्य आहे. मी कांहीं चेटकीण नाहीं किंवा जादूगारीण नाहीं. पण परमेश्वर बुद्धि देतो त्याप्रमाणें मी बोलतें. मराठ्यांच्या गादीवरील संकट खात्रीनें टळेल, व सारी मराठी रयत सुखी होईल." भिकारीण म्हणाली.

"जा. चंद्रसेन! तिला आतां सांगितल्याप्रमाणें तळघरांत कोंडून ठेव जा. ती पळून बिळून जाईल यासाठीं तिच्यावर खडा पहारा असूं द्या. तिच्याशीं कोणाचेंही दळण-वळण असतां कामा नये. तिला कोणी भेटतां कामा नये व तिच्याशीं कोणी कांहीं बोलतां कामा नये. खास मुदपाकखान्यांतून तिला रोज अन्नपाणी पोंचतें होण्याची व्यवस्था कर. तिच्या अन्नवस्त्राची व्यवस्था कोण बरें पाहील?" ताराबाई क्षणभर विचार करून म्हणाली, "हो! चंद्रसेन, आमच्या कुळंबिणींपैकीं हिरू व तिची आई ह्या दोघींनाच फक्त तिच्या तैनातींत तळघरांत जाण्याची परवानगी आहे."

चंद्रसेनाला ताराबाईची ही योजना सोळा आणे पटली. कारण त्याचा जीव अनेक कारणांनीं त्या भिकारिणीच्या ठायीं गुतून पडला होता. ते मनांतले मनोरथ साध्य करण्यासाठीं त्याला ती सुखरूप राहिली पाहिजे होतीच; पण शिवाय तिच्याशीं जुळलेला नवथरचा सहवास दाट परिचयांत रूपांतर पावण्यासाठीं प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दळण-वळणाची संधीही मिळेल तेवढी पाहिजे होती. ती हिरू व

तिची आई रत्नावली भिकारणीच्या तैनातींत नेमिली गेल्यामुळें अनायासें प्राप्त झाली. ताराबाईच्याच विचारानें चंद्रसेनानें संभाजीचें हिरूशीं लग्न लावून देण्याचें आजच निश्चित केलें होतें. ही घरचीच मंडळी असल्यानें त्याची तेवढ्यापुरती चिंता दूर झाली.

लगेच चंद्रसेन भिकारणीला घेऊन तळघराकडे निघाला. तिला असें कैदेंत डांबून ठेवणें उचित नाहीं अशी ताराबाईची समजूत घालण्याची धनाजीनें शिकस्त केली; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अशानें एखादी दैवी आपत्ति मराटशाहीवर किंवा राजघराण्यावर ओढवण्याचा संभव आहे असा भयप्रद संशय जेव्हां धनाजीनें प्रदर्शित केला, तेव्हां मात्र त्यांत बरेंचसें तथ्य असावेंसें ताराबाईला वाटलें. त्यासाठीं तिनें ब्रह्मेंद्रस्वामींचा विचार घेण्याचें ठरवून चंद्रसेन त्या बाईचा बंदोबस्त करून येतांच त्याला आज्ञा केली, "चंद्रसेन! ताबडतोब धावडशीला स्वामींपाशीं जाऊन त्यांना मीं भेट देण्याची विनंति केली आहे असें सांग. किंवा हें पाहा, स्वामी सध्यां वनवासवाडीला असतील, तेव्हां तिथेंच प्रथम जा. तूंच स्वतः जा मात्र, नाहीं तर स्वामी यायचे नाहींत. बरोबर पालखी व लवाजमा घेऊन जा. मी कशासाठीं भेटीला बोलावलें आहे असें स्वामींनीं विचारलें तर आपणाला कांहीं माहीत नाहीं असें सांग."

"आज्ञा आईसाहेब!" असें म्हणून चंद्रसेन ताबडतोब वनवासवाडीला जाण्याच्या तयारीला लागला. भिकारणीनें तळघरांत जाते वेळीं चंद्रसेनाला त्याच्या व आपल्या कराराची आठवण देऊन मारुतीची काळजी घेण्याविषयीं पुन्हा बजावलें होतें. त्यासाठीं चंद्रसेनाला वनवासवाडीला जाण्यापूर्वीं तिकडे जाऊन त्याची चौकशी करावयाची होती. पण ताराबाईची आज्ञा तर अत्यंत निकडीची होती. त्यासाठीं तिच्या डोळ्यांना पाणी लावण्यासाठीं चंद्रसेन पागेंतला घोडा घेऊन त्यावर स्वार होऊन निघाला तो किल्ल्यापासून कांहींसा दूर येतांच वळणाच्या रस्त्यानें मेरुलिंगाच्या जंगलाकडे वळला. कारण ताराबाईच्या आज्ञेप्रमाणें मारुतीला तेथें नेऊन टाकण्यांत आलें होतें.

पण चंद्रसेन तेथें जाऊन पाहतो तों मारुती नाहीं. आजूबाजूला कोठें पडला आहे कीं काय तें पाहण्यासाटीं त्यानें अर्धी घटकापर्यंत त्या जंगलांतील प्रत्येक झाडी धुंडाळून पाहिली; पण पत्ता लागेना. तेवढ्यांत दूर कांहीं अंतरावर कांहीं गिधाडें एकत्र जमलेलीं दिसलीं. त्यावरून एखाद्या हिंस्र जनावरानें मारुतीचा फराळ केला असावा व त्याचीं रक्तामांसानें माखलेलीं हाडें शेषान्न म्हणून हें गिधाडांचें भिकार भक्षण करीत असावें अशी त्याची खात्री झाली. त्याला अत्यंत खेद झाला. पण त्या खेदापेक्षांही तीव्र अशी चिंता त्याच्या मनाला जाळूं लागली कीं, त्या भिकारणीनें मारुतीविषयीं विचारलें तर आपण तिला काय सांगावें? पण हा विचार करीत बसण्याला तरी त्याला वेळ कुठें होता! वनवासवाडीला जाऊन स्वामींना घेऊन येण्याचा लकडा त्याच्या मागें होताच. त्यासाठीं मारुतीची आशा सोडून त्याला तेथून निघून मार्गाला लागावें लागलें.

❀ ❀ ❀

धनाजी व बाळाजीपंत यांना तांतडीनें बोलावून आणण्यांत धनाजीला आपल्या बाजूला वळवून घ्यावयाचा व बाळाजीपंतांना एकटे पाडून मग त्यांची गटडी वळावयाची असा ताराबाईचा डाव होता. पण धनाजीच्या दुराग्रहामुळें तो फसला व बाळाजीच्या पारिपत्याची दुसरी नामी संधी येईतों वाट पाहावयाची अशा अतस्थ विचारानें तिनें त्या दोघांनाही मोहिमेवर जाण्याला परवानगी दिली. ते मोहिमेवरून यशस्वी होऊन परत आल्यावर धनाजीलादेखील हलकेच सेनापतिपदावरून काढून त्याच्या जागीं चंद्रसेनाला नेमावयाचें असा विचार त्याच क्षणाला तिच्या मनांत जन्म पावून वाढीला लागला.

धनाजी व बाळाजीपंत, बाजीराव व चिमाजी यांसह गेल्यावर थोड्या वेळानें परशरामपंत प्रतिनिधि ताराबाईला भेटावयाला आले. त्यांनीं धनाजीशीं आपला मुकाबला झाल्याची सारी हकीकत तिला सांगितली व धनाजी आणि बाळाजीपंत ह्या मोहिमेंत कितपत नेकीनें वागतील ह्याविषयीं शंका प्रदर्शित केली. ती शंका ताराबाईला देखील

बरीच व्यवहार्य वाटली. तिनें प्रतिनिधींना विचारलें, "तें सारें खरें. पण प्रतिनिधि! ह्याला आतां उपाय काय? यांतूनही एखादा अचूक मार्ग तुम्हांला सुचत असेल तर सुचवा."

"आपणाला पसंत पडेल तर यावर मला एकच मार्ग सुचतो. धनाजी शपथेला जागून नेकीनें वागला तर ठीकच झालें. पण जर त्याची मति चळूं लागलेली दिसली तर त्याला बाजूला लोटून मला एकट्याला मोहीम पार पाडतां यावी यासाठीं—आपला माझ्यावर विश्वास असेल तर हें उपयोगी आहे—'धनाजीला सेनापतिपदावरून तात्पुरता दूर केला आहे व प्रतिनिधींना सेनापति नेमिलें आहे' अशी आपल्या सहीशिक्क्याची राजाज्ञा मला देऊन ठेवावी, म्हणजे वेळींवखतीं तिचा उपयोग होईल."

"माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे." असें म्हणून ताराबाईनें ताबडतोब प्रतिनिधींनीं सांगितल्याप्रमाणें राजाज्ञा लिहून त्यांच्या हातीं दिली व निरोप देतांना सांगितलें, "मात्र वेळप्रसंग ओळखूनच ह्या राजाज्ञेचा उपयोग करावयाचा."

## प्रकरण एकोणिसावें

# साताऱ्याच्या वेशीवर

परशरामपंत प्रतिनिधींना धनाजीचा हेवादावा करावयाचा होता म्हणून कांहीं नव्हे; पण धनाजी यदाकदाचित् ताराबाईशीं बेइमान होऊन सैन्यांत फंदफितुरी करील ह्या भयानें, ताराबाईसमोर आपण एकवार राजनिष्ठेची शपथ वाहिली तिची कायावाचामनानें आमरण पाळणूक करावयाची ह्या एकांगी पण पवित्र हेतूनें ते साताऱ्याहून निघाल्यापासून सैन्याच्या बरोबर चालत होते. धनाजी हें ओळखूनच मुद्दाम कांहींसा दूर दूर बाळाजीपंताबरोबर चालला होता. बाजीरावही बाळाजीपंताबरोबर आला होता. नगराच्या वेशीबाहेर येईतों बाळाजीपंतांचें लक्ष धनाजीशीं बोलण्यांत होतें. पण वेशीबाहेर ज्या जागीं पिराजी व जोत्याजी यांना हजर रहावयास सांगितलें होतें. त्या जागेच्या आसमंतात् येतांच पिराजी व जोत्याजी आपणाला कसे भेटतात इकडे त्यांच्या चित्ताचा लय लागून राहिला. इतक्यांत पिराजीबरोबर निघालेले शामभटजी अकस्मात् पुढें आले. बाळाजीपंतांनीं अर्थातच त्यांना ओळखलें नाहीं.

"आपल्या पदरीं आश्रयासाठीं आलों आहें." शामभटजी बाळाजीपंतांना रामराम करून म्हणाले.

"तुमचें नांव काय?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

"माझें नांव शामभटजी."

"तुम्ही इथें कसे आलां?"

"मला पिराजीनें आपल्या पदरीं आश्रय मिळवून देण्याच्या इराद्यानें एथवर आणलें."

"तें मीं ओळखलेंच." बाळाजीपंत शामभटजींच्या टपोऱ्या

तेजस्वी डोळ्यांना डोळा भिडवून म्हणाले, "तुम्हीं रामराम केला तेव्हांच मी ओळखलें कीं शामभटजी हा बनावट आहे. पण पिराजी कुठें आहे?"

ते शामभटजी म्हणजे खरोखरीच जोत्याजी केसरकर होता. बाळाजीपंतांनीं त्याच्या नजरेवरून मनांतील आशय उल्लेखून म्हटलें, "जोत्याजीबाबा! हे सेनापति आपलेच माणूस आहेत. किंबहुना त्यांची आपणांवर कृपादृष्टि आहे म्हणून तर आपणाला आपल्या कार्यांत खात्रीनें यश येण्याची आशा आहे. त्यांच्यासमोर बोलतांना संकोच बाळगण्याचें कारण नाहीं."

इतके बोलणें होतें तोंच पिराजी हंसत हंसत एका जाळींतून पुढें आला. जोत्याजीला भटजींचा वेश देऊन एथवर आणण्यात त्याची करामत पाहून बाळाजीपंतानीं व धनाजीनेंही त्याचें कौतुक केलें.

"धनीसाहेब! आम्ही एथवर तर आपल्या आज्ञेप्रमाणें सुखरूप येऊन पोंचलों. आतां पुढें काय करावयाचें? परिस्थिति तर अशी बिकट आहे की पुसावयाला नको. शाहूमहाराजांच्या जिवावर मारेकरी घालण्यापर्यंत प्रतिपक्षाची मजल जाऊन पोंचली आहे."

"काय? महाराजांवर मारेकरी?" बाळाजीपंतांनीं आश्चर्यचकित होऊन विचारलें.

"एथवर कोणाची कशी अक्कल धावली?" धनाजीनें विचारलें.

"धनाजीबाबा! ह्या खुनी कल्पनेचा उगम थेट साताऱ्च्या राजवाड्यांत तुमच्या आमच्या पोरांबाळांच्या टाळक्यांत झाला आहे!" जोत्याजी उत्तरला.

"काय? चंद्रसेन ह्या कटांत सामील झाला आहे?" धनाजीनें विचारलें.

"होय." जोत्याजी उत्तरला.

"त्याला आईसाहेबांची भर आहे. तसेंच आईसाहेब आणि चंद्रसेन ह्या दोघांच्या संगनमतानें संभाजी त्या अनर्थाला पोषक असे धागेदोरे जुळविण्यासाठीं अगोदरच शाहूमहाराजांच्या छावणीकडे

रवाना झाला आहे. फार दूरची गोष्ट कशाला?" पिराजी मध्येंच जीभ चावून बाळाजीपंतांकडे पाहत म्हणाला, "एक महत्त्वाची गोष्ट बोलावयाची होती. पण धनीसाहेब! बोलूं का?"

"बोल. बेलाशक बोल." बाळाजीपंत म्हणाले.

"आपण जरा बाजूला या म्हणजे बोलतों." पिराजी म्हणाला.

"हें पाहा पिराजी! धनाजीबाबा मला वडिलांच्या ठायीं व तुला आजोबांच्या ठायीं आहेत. खऱ्या गोष्टी त्यांच्यापाशीं बोलायला कसली चोरी? तुला काय बोलायचें तें निर्भयपणानें बोल. तूं अशा दुज्या भावानें वागूं लागलास तर धनाजीबाबांना राग येईल."

"मला राग कधींच यावयाचा नाहीं उलट इतक्या लहान वयांत राजकारणाचे डाव खेळतांना इतकी सावधगिरी बाळगण्याचें त्याला सुचतें ही खरोखर कौतुक करण्याजोगी गोष्ट आहे. त्याला संकोच वाटला तो बरोबर वाटला. माझ्या पोराचे व त्याच्या पोराचे प्रतापच असे आहेत कीं, ते पाहून कोणालाही ही धनाजीची अवलाद पाहून नाकेंच मुरडावींशीं वाटतील! गुण दिसला कीं तो लहान पोरापासून देखील घ्यावा." धनाजी म्हणाला.

"धनाजीबाबा! मला क्षमा करा; मी बोलावयाला कुचरलों याचें कारण चंद्रसेन व संभाजी यांच्या बद्‌करणीच्या कडू गोष्टीच मला बोलावयाच्या होत्या." पिराजी म्हणाला.

"तें मला माहीत होतें." धनाजी म्हणाला, "पण अमकी गोष्ट माझ्या पोरानें केली म्हणून ती चांगली असें मी कधींच म्हणणार नाहीं. माझ्या अळवाची खाज मला चांगली माहीत आहे."

पिराजी म्हणाला, "मी व जोत्याजीबाबा जे इकडे आलों आहों, ते आपणां उभयतांच्या हालचालींवर देखरेख ठेवणारे गुप्त हेर म्हणून आलों आहों. ही कामगिरी व्यवस्थितपणें पार पाडल्यावर चंद्रसेन आम्हांला आईसाहेबांपासून मानमतराब व मन्सबदारी मिळवून देणार आहे."

"असें काय!" धनाजी एक उसासा सोडून म्हणाला.

"होय." पिराजी बाळाजीपंताकडे वळून म्हणाला.

"धनीसाहेब! मी आपला नोकर नसून चंद्रसेनाचा नोकर आहें. बाह्यात्कारीं आपल्या आसऱ्याला राहून आपल्या चुगल्या करावयाच्या हें आमचें—माझें व शामभटजींचें—काम. त्याबद्दल आम्हांला तनखा चंद्रसेनापासूनच मिळावयाचा."

"वा! तुमचा हा डाव और आहे म्हणावयाचा!" बाळाजीपंत जोत्याजीकडे पाहून म्हणाले, "जोत्याजीबावा! तुम्हीदेखील शामभटजींचें सोंग अगदीं हुबेहूब आणलें आहे. पण पहिल्यानेंच शामभटजी रामराम करून चुकले. ब्राह्मण ब्राह्मणाला कधीं रामराम करीत नाहीत; नमस्कार करतात."

"हो! ही माझी चूक झाली खरी!" जोत्याजी म्हणाला.

धनाजीनें कांहींशा अस्थिर चित्तानें विचारलें, "पण पिराजी! शाहूमहाराजांच्या जिवावर मारेकरी घालण्यांत यावयाचे आहेत अशाविषयीं तूं आतां बोलत होतास तें काय बरें?"

"त्या कामासाठीं चंद्रसेनानें संभाजीची नेमणूक केली आहे." पिराजी उत्तरला.

"याचें नांव दुर्दैव! बाप राजांच्या पायांना राजे मायघरीं येतांना खडादेखील बोंचू नये यासाठीं आपल्या देहाची पायघडी राजांच्या पायांतळीं पसरण्याला निघाला आहे, तर बेटा स्वतःच्या क्षुद्र स्वार्थासाठीं राजांच्या जिवाची रया करण्याचे राक्षसी उपाय योजण्यांत रंगून राहिला आहे!" धनाजी कपाळावर हात मारून दुःखानें उद्गारला, "याचें नांव दुर्दैव! जोत्याजीबावा! तुम्हीं आम्हीं आजवर किती नेकीनें छत्रपतींची सेवा केली! ते तुम्ही माझी अवलाद अशी पापकर्मीं निघालेली पाहून माझी कींव करणार नाहीं काय?" धनाजी दोन्ही हातांनीं थाड्थाड् थोबाड फोडून घेऊन कळकळला, "परमेश्वरा! उभ्या आयुष्यांत मिळविलेल्या लौकिकाची म्हातारपणीं अशी माती व्हावयाची, पोटीं आलेलीं कारटीं अशीं दळभद्रीं निपजावयाचीं, त्यापेक्षां माझी माघारीण वांझ रे कां निपजली नाहीं?"

किंवा शंकराला चुकून आम्हीं तांबडें फूल वाहिलें म्हणून असला हा जिवंत शाप शंकरानें आमच्या पदरीं बांधला?—जोत्याजीबाबा! जोत्याजीबाबा! आतां मी काय रे करूं? धनाजी जाधवाचा पोर असा कुलांगार निघाला असें म्हणून दुनिया माझ्या तोंडावर पिचीपिची थुंकेल, तो अपमान मी कसा रे सहन करूं?"

बाळाजीपंत धनाजीचें शांतवन करीत म्हणाले, "धनाजीबाबा! तुम्ही एवढे धीराचे दरिया! बाब ती केवढी व तिचा एवढा बाऊ तो काय मानतां! चंद्रसेन शाहूमहाराजांच्या जिवावर मारेकरी घालण्याच्या कटांत सामील असला तरी त्याचा खरा सूत्रचालकपणा ताराबाईच्याच हातीं असेल. ती बाई नेहमींच शाहूमहाराजांना पाण्यांत पाहते. तिनें आपल्या अघोर राज्यतृष्णेपुढें कोणत्या वंशांकुराचें बरें-भलें पाहिलें आहे? थोरल्या आबासाहेबांच्या अमदानींत संभाजीराजे बेमर्यादेनें वागूं लागले तेव्हां त्याची बेमर्यादा कळसाला पोंचून राजाराममहाराजांना राज्य मिळावें अशी तिनें कारवाई चालविली होतीच. त्यामुळेंच तर संभाजीमहाराजांनीं चिडून त्या मायलेंकरांवर आग पाखडली. ह्या बाईनें आपल्या अघोर राज्यतृष्णेच्या भरांत बेभानपणें राजसबाईशीं सवतीमत्सर साधून तिला तिच्या तीन चार वर्षांच्या धाकट्या संभाजीराजांसह कैदेंत डांबलें. राज्यतृष्णा भागविण्यासाठीं संभाजीमहाराजांनीं जसे अनन्वित प्रकार केले तसेच ह्या साहसी व शूर बाईनें केले! राजवंशाची वेल तिच्यावरील खाशा पुरुषांचीं वंशफुलें फुलून सुकून गळून गेल्यावर राजसिंहासनाच्या पायरीशीं कशीबशी जीव धरून होती. तिच्या जाळ्यांत आपले पाय गुंतून अडखळतील ह्या भयानें ती वेल उपटून दूर फेंकून देण्यासाठीं ह्या बाईनें काय केलें नाहीं? जोत्याजीबाबा! धनाजीबाबा! गेल्या दीड तपाचा मराठशाहीचा इतिहास आपण पाहिला तर राजवैभवाचा पेला ओंठीं लावून बसलेल्या ह्या राजमातेनें जेव्हां जेव्हां संधी मिळाली तेव्हां तेव्हां 'मी व माझा वेडा मुलगा' ह्या व्यतिरिक्त राजवंशाचें चूर्ण करून तें आपल्या राज्यतृष्णेच्या पेल्यांत पिऊन

पचनीं पाडण्याचा अट्टाहास करण्याला कशी ती जरा देखील कच खाल्ली नाही. अशी राज्याची कर्ती स्त्रीच कठोर करणी करूं लागल्यावर चद्रसेनारख्या कोत्या बुद्धीच्या अविचारी लोकांचें फावलें तर त्यांत कांहींच नवल नाहीं. पण धनाजीबाबा! त्याबद्दल तुम्ही उगाच आपल्या जिवाला खेद करून घेतां. आम्ही एवढे महाराजांचे सेवक ह्यात असतांना महाराजांच्या केंसाला तरी कोण कसा धक्का लावतो तें पाहूं!"

जोत्याजी धनाजीची समजूत घालण्याच्या उद्देशानें म्हणाला, "धनाजीबाबा! असा कमकुवत मनाच्या भित्र्या माणसासारखा कां करतोस? आपण थोरल्या आबासाहेबांच्या कारकीर्दीपासून स्वामिसेवेची पराकाष्ठा करण्यात कसलेलीं माणसें! आजवर आपल्यावर काय असे प्रसंग आलेच नाहींत? थोरल्या आबासाहेबांना धुळीला मिळविण्याचे औरंगजेबबादशानें काय थोडेथोडके प्रयत्न केले? संभाजीराजांचा वध करून मराठशाही नामशेष करण्यासाठीं तो क्रूरकर्मा काय थोडा धडपडला? फार दूर कशाला? शाहूमहाराज बादशाही कैदेंत असतां त्या बादशहानें त्यांना बाटवून मराठशाहीची मुसलमानशाही करण्याची काय थोडी धडपड केली? तो प्रसंग आठवला म्हणजे अंतःकरण भडभडून येतें. खरोखर, आम्हां मराठमोळ्याच्या माणसांची पुण्याई थोर म्हणूनच संभाजीराजांच्या वधानंतर आजवर इतक्या संकटांना पायातळीं तुडवून तान्ह्या शाहूराजांना तक्ताच्या वाटेवर आणून सोडलें. मी मी म्हणणारे दैत्य आम्हीं किती आडवेतिडवे पाडले, तिथें आतां असले सापविंचू महाराजांच्या पायांतळीं वळवळूं लागले तर पायींची वहाण अशी काढून त्या वहाणेनें त्या सापाविंचूंना चेंचून ठार करीन! त्यांची एवढी कसली बिशाद! धनाजीबाबा! राजांच्या सुरक्षितपणाविषयीं तूं मुळींच काळजी करूं नकोस! अरे बाबा! ज्या माणसापाशीं दानत असते, त्याच्या माथीं देव आपल्या कृपेचें छत्र धरून अष्टौप्रहर तिष्ठत असतो. आतां वेळच आली व ओघानें विषय निघाला म्हणून सांगतों."

जोत्याजी हातीं काढून घेतलेली वहाण पुन्हा पायीं घालीत म्हणाला, "धनाजीबाबा! शाहूमहाराजांच्या लग्नाचें घाटत होतें व औरंगजेब बादशहा एका पठाण सरदाराच्या मुलीशीं त्यांचें लग्न ठरवून त्यांना मुसलमान करण्याच्या बेतांत होता, तेव्हां आम्हां सर्वांना चिंता पडली कीं, आतां कसें होणार? बादशहाची शहाजादी झुल्पिकारबेगम— खरोखर तुला सांगतों धनाजीबाबा! मरावें व त्या माउलीच्या पोटीं जन्माला यावें. बादशहानें संभाजीराजांना 'तूं मुसलमान होत असलास तर तुला जीवदान देतों' असें सांगितलें तेव्हां संभाजीराजे संतापून 'तूं आपली झुल्पिकारबेगम शहाजादी मला देत असलास तर मुसलमान होतों' असें बोलले, त्याची बादशहाला चीड येऊन त्यानें राजांना हाल हाल करून ठार मारलें. तेव्हांपासून बेगम स्वतःला संभाजीराजांची विधवा मानते. पुढें बादशहानें बेगमेच्या लग्नाचा घाट घातला तेव्हां 'संभाजीराजे माझ्या निमित्तें मेले; त्यांची मी विधवा आहें. त्यांच्या व्यतिरिक्त जगांतील सारे पुरुष मला बापभावांसमान आहेत, मला शादी कर्तव्य नाहीं. इतकेंही करून तुम्ही जर जबरीनें माझी शादी ठरविली तर मी प्राणत्याग करीन' असें बेगमेनें स्पष्ट सांगून बादशहाला गप्प बसविलें. इतकेंच काय; पण 'संभाजीराजांचा बेटा शिवाजी आहे तोच माझा बेटा मीं मानला आहे. तोच आपल्या बेटीचा बेटा मानून तुम्हीं त्याच्या जन्माची काळजी घेतली पाहिजे' असें बादशहाला सांगून तिनें शिवाजीचें कोटकल्याण करण्याविषयीं बादशहापासून वचन मिळविलें. त्याच वेळीं बादशहानें खुषींत येऊन 'हा एक साहू पाक दिलाचा सच्चा आहे; बाकीचे सारे चोर' असें म्हणून महाराजांचें शाहू असें नांव ठेवलें, व राजांनींही बादशहाची मेहेरनजर राखण्यासाठीं बेगमेच्या प्रेमाच्या आग्रहानें शाहू हेंच नांव अखेरपावेतों धारण करण्याचें कबूल केलें. इतका बेगमेचा शाहूमहाराजांवर प्रेमा होता. तिला बादशहाचे शाहूमहाराजांना बाटविण्याचे बेत बिलकुल रुचेनात. आतां बादशहाची समजूत कशी घालावयाची असा आम्हां सर्वांना मोठा विचार पडला,

एके दिवशीं चांदण्या रात्रीं आम्ही—मी, राजे, आईसाहेब व बेगम जनानखान्यासभोंवारच्या बागेंत ह्याच गोष्टीविषयीं विचार करीत बसलों असतां कुंदाच्या लतामंडपाखालीं राजांचा डोळा लागला. आमचे आपसात एखाद्या हिंदु सरदाराच्या मुलीशीं राजांचें लग्न ठरविण्याविषयीं बादशहाला विनंति करण्याचे बेत चालले असतांना एकाएकीं एक अद्‌भुत चमत्कार घडून आला. आमच्या बेताला राजांची मान्यता आहे किंवा नाहीं हें राजांना विचारावें म्हणून बेगम उठून कुंदाच्या कुंजांत गेली; ती एकदम किंचाळून मटकन् खालीं बसली."

"कां बरें?" बाजिरावानें मध्येंच विचारलें. त्याला मोठ्या लोकांच्या असल्या कुतूहलजनक गोष्टी ऐकण्याचा फार नाद होता.

"बाजी! एखादें माणूस बोलूं लागलें म्हणजे मध्येंच असे प्रश्न विचारूं नयेत!" बाळाजीपंतांनीं बाजिरावाला सौम्य शब्दांनीं समजाविलें.

"कुछ् फिकिर नहिं!" जोत्याजी रंगांत येऊन म्हणाला, "बाजी! थोरा मोठ्यांच्या आयुष्यांतील गोष्टी तुझ्यासारख्या मुलांनीं अशाच लक्षपूर्वक ऐकाव्या. त्यांपासून आपणांला अनेक धडे शिकता येण्यासारखे असतात. आपणां सर्वांच्या थोर नशिबानें शाहूराजे साताऱ्याच्या गादीवर स्थिर झाले म्हणजे तुम्हां आजच्या मुलांनाच उद्यां मर्दुमकी गाजवावयाची आहे. खरेंच; मी आतां कोठवर बोललों बरें?"

"बेगम उठून कुंजांत गेली ती एकदम किंचाळून मटकन् खालीं बसली—" बाजीराव म्हणाला.

"शाबास! बाजी, शाबास तुझी! याला म्हणावें स्मरणशक्ति!" जोत्याजी बाळाजीपंतांना म्हणाला, "बाळाजीपंत! तुमचा पोरगा शाहूमहाराजांच्या अमदानींत नांव काढणार यांत संशय नाहीं. आतां महाराजांची भेट झाली, कीं ह्या मुलाला आपण त्यांच्या पायांवर घालावयाचा. लोखंडालादेखील परिसाचा स्पर्श झाला कीं लोखंडा-

चें सोनें होतें. त्याचा नुसता मनासारखा अलंकार घडवून महाराजांनीं आपल्या कंठीं धारण करावयाचा. परवां नाहीं का, मी इकडे यावयाला निघालों तेव्हां पारदेपर्यंत महाराजांबरोबर आलों. तेथल्या लोखंडे पाटलानें तेथली गांवगढी महाराजांच्या ताब्यांत देण्याचें नाकारलें व त्यांचा उपमर्द केला. त्यावरून महाराज चिडले व त्यांनीं आपल्या सैन्याकडून सारा गांव लुटवून गढी पाडून जमीनदोस्त करविली. पाटील बिचारा गर्दींत केव्हां कसा मारला गेला याचा पत्ताच लागला नाहीं. पण गढी पडली तेव्हां पाटलाची बारा दिवसांची बाळंत बायको आपल्या तान्ह्या मुलाला घेऊन रडत पुढें आली व तिनें तें मूल महाराजांच्या पायावर घालून 'अन्यायी होते ते मारले गेले; त्यांचा हा तान्हा मूल! ह्या मुलानें आपला काय गुन्हा केला आहे? पण वडिलांच्या गुन्ह्याबद्दल मुलानें माफी मागावयाची ती मुलाला वाचा नाहीं म्हणून त्याच्या वतीनें त्याची आई म्हणून मी मागतें. याला आतां मीं आपल्या पायांवर वाहिलें आहे. आतां याचे मायबाप आपण आहां; आपण ह्याला तारा किंवा मारा' अशी महाराजांची विनवणी केली. महाराज आमचे कनवाळू; त्यांनीं पाटलाची अरेरावी जरादेखील ध्यानीं न आणतां त्या मुलाला व त्याच्या आईलाही उदार अंतःकरणानें आपल्या पदरीं आश्रय दिला व बाळबाळंतिणीच्या पोटांतील पाणीदेखील हलणार नाहीं अशी व्यवस्था केली. लगेच त्या मुलाचें बारसें मोठ्या थाटानें करून ही पहिली फत्ते पदरीं पाडली. त्याच्या स्मरणार्थ त्या मुलाचें नांव फत्तेसिंह भोंसले असें ठेविलें. सांगण्याचें तात्पर्य काय कीं, महाराज आमचे इतके प्रेमळ आहेत. त्यांना हा चुणचुणीत बाजी फार आवडेल. —पण मी यापूर्वी काय सांगत होतों तें तेवढ्यावरच राहून गेलें. मीं कोठवर बरें सांगितलें?"

## प्रकरण विसावें

# स्वामिभक्तांचें खलबत

"बेगम उठून कुंजांत गेली ती एकदम किंचाळून मटकन् खालीं बसली." बाजिरावानें पुन्हा जोत्याजीला कथानुसंधान सांगितलें.

"बरोबर! म्हातारपणामुळें मी आतां काय बोललों तें आतां माझ्या ध्यानीं राहत नाहीं. तेव्हां बेगम मटकन् खालीं बसली. आम्ही—मी व येसूबाई आईसाहेब—बेगम किंचाळली कां तें पाहण्यासाठीं लगबगीनें तेथवर गेलों व किंचाळावयाला काय झालें असें बेगमेला विचारलें. बेगमेनें बोलण्याचा प्रयत्न केला पण तिच्या तोंडून शब्दच उमटेना. तेव्हां तिनें निरुपायानें कुंजाखालीं महाराज झोंपले होते तिकडे बोट दाखविलें. तें भयंकर दृश्य पाहून आमची देखील बोबडी वळण्याची वेळ आली."

"असें कोणतें दृश्य तुम्हीं तेथें पाहिलें?" पिराजी व बाजीराव या दोघांनीं एकदम उत्कंठेनें विचारलें.

बाळाजीपंतांनीं एकवार दोघांकडेही धाकाची नजर फिरविली; त्याबरोबर पिराजी व बाजीराव ह्या दोघांनींही ओशाळून खालीं माना घातल्या. जोत्याजी त्या दोघांकडे पाहून स्मितहास्य करीत पुढें सांगूं लागला, "पाहतों तों एक हळकुंडाच्या कांडीसारखा पिंवळा नाग महाराजांच्या मस्तकावर फणा उभारून उभा! आतां हें अरिष्ट कसें टाळावयाचें याचा क्षणभर विचार करून मीं त्या नागाला प्रथम हुसकून दूर पळवावयाचें व मग त्याचें डोकें ठेंचून त्याला ठार करावयाचें अशा इराद्यानें मांडवाची एक लोखंडी कांब पेंचून काढली. ती पाहतांच तो नाग तेथून दूर तर झाला नाहींच पण नागसूर वाजवावा त्याप्रमाणें डोलूं मात्र लागला! ह्याला आतां मारूं कीं नको अशी

दुग्धा मला पडली. तेवढ्यांत कोठून तरी कोणाचा तरी 'मला मारूं नका; मी तुमचा कल्याणकर्ता आहें' असा अस्पष्ट ध्वनि ऐकूं आला. कोण बोलतें तें आम्ही सभोंवार पाहूं लागलों पण कांहीं पत्ता लागेना. तेव्हां बेगम म्हणाली, कीं हा अल्लाचा साक्षात्कार आहे. बेगमेचे बोल मला व आईसाहेबांनाही पटले. बेगमेनें मला त्या सापाला मारण्याला मनाई केली; व यदाकदाचित् जनावर तें, आपल्या स्वभावावर जाऊन चाळवाचाळव करूं लागल्यास त्याला मारून महाराजांचा बचाव करण्यासाठीं ती नेहमीं जवळ बाळगीत असलेला सोन्याच्या रत्नजडित मुठीचा खंजीर माझ्या हातीं देऊन बादशहाला बोलावण्यासाठीं गेली. थोड्याच वेळात बादशहा नुक्ताच झोंपीं जाण्याच्या तयारींत होता तो तिथें आला. तोंवर तो सर्प जागचा ढळलादेखील नाहीं.

"हें मोठेंच आश्चर्य म्हणावयाचें!" धनाजी म्हणाला.

"आश्चर्य तर खरेंच!" जोत्याजी पुढें हकीकत सांगूं लागला, "बादशहा येऊन चित्रासारखा त्या सापाकडे पाहत बराच वेळ स्तब्ध उभा राहिला व बेगमेला म्हणाला, 'बेटा! तुझ्या शाहूचें तकदीर शिकंदर दिसतें.' यावर बेगम म्हणाली, 'मग! तो बादशहाच्या बेटीचा बेटा आहे!' यावर बादशहानें मला विचारलें, 'जोत्याजी! ह्या शकुनाचा अर्थ काय?' तेव्हां मी उत्तरलों, 'परवरदिगर! आपला नातू राजा होणार असें हा साक्षात्कार सुचवितो.' हे शब्द माझ्या तोंडून निघतांच त्या सापानें आपली फणा डोलविली. ती पाहून बेगम बादशहाचे पाय धरून म्हणाली, 'आतां हा साक्षात्कार खरा करून दाखवणें तुमच्या हातीं आहे. माझा बेटा राजा होईल असें वचन मला द्या.' ताबडतोब बादशहानें बेगमेच्या हातावर हात मारून वचन दिलें, 'बेटा! तेरा बेटा महाराष्ट्रका छत्रपति हो जायगा!' या वेळीं बादशहा पूर्ण खुषींत आहे असें पाहून मीं दोन्ही हात जोडून त्याला विनविलें, 'परवदिगर! आम्हां हिंदूंच्या धर्माप्रमाणें साप हा ब्राह्मण आहे. आणि त्या ब्राह्मणाच्या कृपा-

प्रसादानें आपल्या नातवाचें कल्याण व्हावें अशी आपलीही इच्छा आहेच. यासाठीं आपण महाराजांना मुसलमान करण्याचा विचार सोडावा.' माझ्याच म्हणण्याला बेगमेनेंही पुष्टि दिली. बादशहा या वेळीं खुषींत असल्यानें त्यानें महाराजांना मुसलमान करणार नाहीं असें अल्लाची कसम खाऊन सांगितलें व महाराजांना शोभेशी एखादी नवरी शोधण्याचें कामही मलाच सांगितलें. पुढें मीं रुस्तुमराव जाधव शिंदखेडकर यांची कन्या अंबिकाबाई ही वधू नेमस्त केली व बादशहानें जातीनें आपल्या देखरेखीखालीं दिल्लीला सात बिघ्यांचा मांडव घालून लाखों रुपये खर्चून महाराजांचें लग्न मोठ्या थाटानें केलें. त्या गोष्टी सांगता संपावयाच्या नाहींत—"

"पण पुढें त्या सापाचें काय झालें?" बाजीराव व पिराजी यांनीं विचारलें.

जोत्याजी म्हणला, "बादशहानें सर्व गोष्टी आमच्या मनासारख्या कबूल करतांच त्या सापानें संतुष्टपणें फणा डोलविली. इतक्यांत महाराज एकाएकीं जागे झाले; त्याबरोबर साप कुंदाच्या अळ्याच्या मार्गें जाऊन दिसेनासा झाला. आपल्या मुलाच्या भावी भाग्योदयाचा हा शुभशकुन पाहून येसूबाई आईसाहेबांच्या नेत्रांतून सारखे आनंदाश्रूंचे लोट वाहत होते. यापुढें एक गोष्ट मात्र बादशहानें आपल्या स्वभावानुसार अत्यंत वाईट केली."

"ती कोणती?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

जोत्याजी उत्तरला, "हें जनावर केव्हां घात करील याचा नेम नाहीं; त्याला ठार मारलेंच पाहिजे असें बादशहाच्या मनानें घेतलें. त्यानें चार मुसलमान पहारेकरी बोलावून सापाचें बिळ खणविलें. आणि सापाला ठार मारण्यांत आलें. तेव्हां सर्वांना अदृश्य वाणी ऐकूं आली, 'बादशहा! त्वां माझ्या ब्राह्मणाचा निष्कारण वध केलास; त्याअर्थी तुला माझा असा शाप आहे कीं, तुझें साम्राज्य व तुझा वंश आजपासून दिवसेंदिवस मोडकळूं लागेल व थोड्याच दिवसांत तुझ्या वैभवासह तुझ्या वंशाची वाताहात उडेल.' ही शाप-

वाणी ऐकून बादशहा मनांत कांहींसा कचरला. पण करतो काय! झालेली गोष्ट आतां नव्हेशी थोडीच होणार! बेगमेला बादशहाच्या ह्या कृत्यामुळें खेद झाला. ती बादशहाला पुष्कळ बोलली. 'धर्मवेडाच्या भरांत तुम्हीं आजवर नानापरींचे अनर्थपात केले व हिंदूंना धायधाय रडायला लावलें म्हणूनच तुम्ही एवढे शाहनूशाह बादशहा असतांनाही सुखाचा लवलेश तुमच्या नशिबीं नाहीं. तुम्हीं आजवर हिंदूंचीं अनेक देवालयें फोडलीं व त्यांच्या देवांचा अपमान केला! गोब्राह्मणांचा किती छळ केला! रयतेचें पित्याप्रमाणें नीतिधर्मानें पालन करणें हें राजाचें एकच पवित्र कर्तव्य असतें, तें तुम्हीं मूळपासून पाळलें नाहीं; पायांखालीं तुडविलें. मी तुमची बेटी! माझा शद्व तुम्हांला कसा रुचणार? पण आतां तरी सावध व्हा व अशा अनर्थांपासून अलग राहा. आज त्या सापाला मारूं नका, मारूं नका म्हणून कानींकपाळीं ओरडून सांगत असतां तुम्हीं त्याला मारला. त्याचा शाप तुम्हांला—तुमच्या साऱ्या वंशाला—भोंवल्याशिवाय राहणार नाहीं. आतां एवढें तरी करा; कोणी सच्छील ब्राह्मण बोलावून शाहूच्या हातून त्या सापाची सशास्त्र उत्तरक्रिया करवा. शाहू हा त्या वेषधारी वेदोनारायणाचा मानसपुत्र आहे व तुमचाही धर्माचा नातू आहे. तुमच्या पापाबद्दल प्रायश्चित्त घेण्याचा त्याला अधिकारच आहे.' हा बेगमेचा उपदेश बादशहाला पटला. त्यानें ताबडतोब मला बेगमेच्या मनीषेप्रमाणें सर्व व्यवस्था करावयाला सांगितलें. मीं त्याप्रमाणें केलें. हें सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं," जोत्याजी धनाजीकडे वळून म्हणाला, "धनाजीबाबा! शाहूमहाराजांच्या जिवावर आजवर विंध्याचल हिमाचलासारखीं पर्वतप्राय सकटें कोसळलीं; पण तीं देवाच्या कृपेनें आम्हीं निवारलीं. मग ह्या एवढ्याशा संकटाची काय मातब्बरी? पिराजीनें मला हा प्रकार सांगितला तेव्हांच त्यानें व मीं काय करावयाचा तो विचार केला आहे. आतां आम्ही चंद्रसेनाचे गुप्त हेर म्हणून आमच्या संचारार्थ निघतों व ह्या अरिष्टाचा राक्षस गर्भांतच समूळ कसा कापतों तो पाहा तरी!"

जोत्याजीचा हा अपूर्व उत्साह पाहून बाजिरावाच्याही उत्साहाला भरतें आलें. तो म्हणाला, " बाबा! मीदेखील जोत्याजीबाबांबरोबर जाऊं का?"

बाळाजीपंत बाजिरावाच्या लाडक्या प्रश्नाला कांहीं उत्तर न देतां धनाजी व जोत्याजी ह्या उभयताच्या तोंडाकडे पाहत उभे राहिले. ते आपल्या संमतीची अपेक्षा करीत आहेत हें ओळखून धनाजी म्हणाला, "बाजीला त्यांच्याबरोबर जाऊं द्या. आजपासूनच त्याला महाराजांच्या सेवेंत रुजू होऊं द्या. जोत्याजी! ह्या दोन्ही मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी मात्र तुझ्यावर आहे. आमचा संभाजी किती क्रूरकर्मा आहे याचा तुम्हां कोणालाही अनुभव नाहीं--"

" आजोबा! मला त्याचा अनुभव आहे." पिराजी म्हणाला, " मी संभाजीला चांगला ओळखतों. तरी मी म्हणतों कीं, संभाजी आपलाच आहे. लहानपणापासून आम्ही तिघेंही एकत्र खेळीमेळीनें वागलों, आणि आज मोठेपणीं काय आम्ही एकमेकांच्या मानेला खिळावयाचें?"

बाजीराव म्हणाला, " मलादेखील संभाजीच्या स्वभावाचा पूर्ण परिचय आहे. मीं त्याला हजारदां सांगितलें कीं, बरोबरीच्या मुलांशीं भांडणतंटे करूं नयेत; तरी त्याला तें पटत नाहीं. मीं असेंदेखील सांगितलें कीं, तुझें माझें ह्या दावेदारीपायीं वांकडें येईल; तरी त्याचीही त्याला पर्वा नाहीं."

" चंद्रसेनाच्या संमतीनें तो पोर फार वांढ झाला आहे!" धनाजी म्हणाला, " तो केव्हां काय करील याचा नेम नाहीं."

" म्हणूनच मी म्हणतों, मी व पिराजी एकाला दोन जोत्याजीबाबांबरोबर जातों. मग कोण संभाजीमहाराजांच्या जिवावर कसा उठतो तें पाहूं." बाजिरावानें पिराजीकडे वळून म्हटलें.

" चल. बाजी, तूंसुद्धां आमच्याबरोबर चल. ते राजे व हे सेनापति खुशाल एकमेकांशीं राजकारणाचे डाव खेळोत कीं लढाया लढोत; आपणाला त्यांच्याशीं काय करावयाचें आहे! आमचा

आपला एक मंत्र, देह जावो अथवा राहो, स्वामीपायीं दृढ भावो! पिराजी! बाजी! राजांच्या पायीं तुमची एवढी अढळ निष्ठा असावयाला हवी!"

"तेवढी आमची अढळ निष्ठा आहेच." बाजीराव म्हणाला.

"पण तुझे बाबा तर धनाजीबाबांचे सेवक आहेत. त्यांचा मराठ्यांच्या गादीशीं काय संबंध?" जोत्याजीनें विचारलें.

"पण धनाजीबाबा तरी गादीचेच सेवक ना? सेवक त्यांनीं ठेविला पण सेवाधर्माची शपथ घेवविली ती गादीच्या नांवची घेवविली." बाजीराव बाळाजीपंताकडे पाहत उत्तरला.

बाजिरावाचें तें उत्तर ऐकून सर्वांनीं त्याच्या चाणाक्षपणाची मनांतून फार तारीफ केली. बाळाजीपंत उद्गारले, "जोत्याजीबाबा! तो माझा मुलगा आहे, व मी स्वामिभक्तीविषयीं अजरामर कीर्तीनें शोभणाऱ्या धनाजीबाबांचा धर्मपुत्र आहें."

"मग काय बाबा! मी त्यांच्याबरोबर जाऊं?" बाजीरावानें विचारलें.

"जा. खुशाल जा. पण जातांना मनोमन अशी शपथ घेऊन जा कीं, 'शाहूमहाराजांना सुखरूपपणें साताऱ्याला घेऊन येईन तरच तोंड दाखवीन, नाहीं तर तिकडच्या तिकडे मरेन." बाळाजीपंत म्हणाले.

"बाबा! हें का तुम्ही मला सांगावयाला पाहिजे! मी तुमचाच मुलगा ना? मी आपणां सर्वांसमोर अशी शपथ घेतों कीं, पिराजी! तूंदेखील शपथ घे. आम्ही अपेशानें काळें झालेलें तोंड घेऊन माघारे येणार नाहीं इतकेंच काय; पण महाराजांच्या वाटेंत कोणीं कशीही आग पाखडली तरी त्या आगीवर आम्ही आमच्या देहाच्या पायघड्या पसरून मरूं व महाराजांना वाट करून देऊं."

बाजीराव व पिराजी यांची ही शपथ ऐकून सर्वांना गहिंवर दाटून आला. विशेषतः बाळाजीपंतांचे डोळे तर पाण्यानें भरून आले. तें पाहून बाजीराव म्हणाला, "बाबा! तुमच्या पोटीं मीं जन्म घेतला

तो तुमच्या कीर्तीला साजेशा पराक्रमाची प्रभावळ तुमच्या पूजेसाठीं बांधतां बांधतां खर्ची घालावा लागला तर त्यांत वाईट तें काय झालें?"

बाळाजीपतांनीं बाजिरावाचा प्रश्न ऐकला. पण धनाजी कधीं न रडणारा आज आंसवें गाळूं लागलेला पाहून त्यांचें लक्ष तिकडे वेधलें होतें. त्यामुळें बाजिरावाला त्यांच्याकडून कांहीं उत्तर मिळालें नाहीं.

जोत्याजीलादेखील धनाजीच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागलेल्या पाहून अचंबा वाटला. त्यानें विचारलें, "धनाजीबाबा! हें मी काय पाहतों? धनाजीच्या डोळ्यांना पाणी; हें मी काय पाहतों? तुला रडावयाला काय झालें?"

"मला रडावयाला काय झालें? मला रडूं आलें,—माझ्या पोरट्याचे प्रताप पाहून जगांत माझा जो दुर्लौलिक होईल तो कसा भरून येईल! थोरल्या आबासाहेबापासून आजपर्यंत तीन पिढ्या निःसीम स्वामिनिष्ठेच्या लौकिकाची जी जिंदगी मीं जोडली, तिला माझ्या पोरानें आपल्या बद्करणीची चूड लावून एका क्षणांत ती जाळली! जोत्याजीबाबा! आतां मी रडूं नाहीं तर काय करूं? तूंच सांग! तुम्ही ह्या दोन मुलांना बेलाशक आपणाबरोबर घेऊन जा. त्यांना माझा म्हाताऱ्याचा आशिर्वाद आहे."

असें संभाषण इकडे चाललें आहे तोंच प्रतिनिधींकडून मागील मंडळींची चौकशी करण्यासाठीं घोडेस्वार दौडत आला. त्याला जोत्याजीकडे पाहून काय वाटलें नकळे; पण त्याच्या नजरेंत संशयाचे पाणी तेव्हांच खेळूं लागलें एवढें खरें. धनाजीनें लष्कराची माहिती विचारली व त्यानें ती सांगितली; पण मन सोडून सांगितली नाहीं. अर्थात् आतां सर्वांना त्या घोडेस्वाराच्या संशयानें आपापल्या गोष्टी आटोपत्या घेणें अवश्य होतें.

"आपला वेळ गप्पागोष्टींत फार गेला. मी तरी काय करूं? शाहूमहाराजांचें गुणवर्णन करूं लागलों कीं मला दिवसरात्र व तहानभूक यांचेंदेखील भान राहत नाहीं. हे असे प्रहरांचे प्रहर लोटतात. आतां प्रतिनिधि आले; आतां आमच्या दोन वाटा दोन दिशांनीं

फुटावयाच्या." पिराजी व बाजीराव यांच्याकडे वळून जोत्याजी म्हणाला, "मुलांनो! चला आतां."

जोत्याजी वगैरे मंडळीकडे खोंचिक दृष्टीनें पाहत स्वार निघून गेल्यावर जोत्याजी जावयाला निघतांच पिराजी व बाजीराव त्याच्या-बरोबर निघाले. धनाजीनें पुन्हा एकवार सर्वांना तोंडभर आशीर्वाद दिला व जोत्याजीला पुन्हा जाणीव दिली, "जोत्याजीबाबा! आमचा मानस तुला कळून चुकलाच आहे. त्याची साक्ष म्हणून मीं माझे दोन नातू आज तुझ्या स्वाधीन केले आहेत. पुढें संभाजी गेला आहे तो आमचा वैरी; तो माझा नातू नव्हे. तो विषारी साप आहे; तर त्याचें विष उतरून त्याचे दांत पाडणारे हे दोन मांत्रिक तुझ्याबरोबर आहेतच. आतां प्रतिनिधि काय घोंटाळा करतात तेवढेंच पाहा-वयाचें. पण कोणत्याही परिस्थितींत आम्ही महाराजांच्या पायांना अंतरणार नाहीं ही आमची अक्षयींची आणभाक महाराजांना सांगून निर्धास्त राहावयाला सांग."

जोत्याजी, बाजीराव व पिराजी हे तिघे प्रथम पायींच चालत जाण्याचा बेत करीत होते. पण साताऱ्यापासून खेड कडूसपर्यंतची वाट डोंगराळ व अडचणीची आणि प्रवासही थोडा थोडका नाहीं, चांगलें तीस पस्तीस कोसांचें अंतर; तेवढें तोडून जाईतों तिकडे संभाजीनें काय कारस्थानें रचिलीं असतील कोण जाणे! तशांत हीं दोन लेंकरें बरोबर जावयाचीं. इतक्या साऱ्या गोष्टींचा विचार करून धनाजी व बाळाजी-पंत यांनीं आपल्या मांडीखालचे घोडे त्यांना दिले. बाजिरावाचा आवडता मारुत तट्टू त्याच्याबरोबर होताच. ते तिघे तीन घोड्यां-वर स्वार होऊन निघाल्यावर धनाजी व बाळाजीपंत पायींच आपल्या लष्करामागोमाग चालूं लागले. त्यांचें लष्कर कांहीं फार दूर चालून गेलें नव्हतें; तें अर्ध्या पाऊण कोसाच्या अंतरावर असल्याचें त्यांना आतांच तिकडून आलेल्या स्वारामार्फत कळून चुकलें होतें.

स्वार आपणाकडे भेदक दृष्टीनें पाहत होता हें धनाजीच्या पूर्ण लक्षांत होतें. त्यानें वाटचालीला लागतांच बाळाजीपंतांना विचारलें,

“बाळाजी! हा आतांचा स्वार प्रतिनिधींचा गुप्तहेर तर नसेल ना?”

“असेल, असला म्हणून काय झालें? प्रतिनिधींचा मानस आईसाहेबांच्या बाजूचा पक्का आहे, हें एकवार आपणाला कळून चुकलें आहे. आतां त्याची एवढी फिकीर कशाला? आपण मात्र सावधगिरीनें वागलें पाहिजे” बाळाजीपंत म्हणाले.

धनाजीला बाळाजीपंतांची सल्ला पटली नाहीं असें कधीं तरी झालें आहे! त्यानें बाळाजीपंतांची धमक व धिमेपणा पाहून धीरानें उद्गार काढले, “कांहीं झालें तरी आम्ही सत्पक्षाचे पुरस्कर्ते आहों; देव आमचा पाठीराखा आहे.”

इतक्यांत समोरच्या वृक्षावर एक भारद्वाज पक्षी बसून ‘कूक्’ ‘कूक्’ ‘कूक्’ ‘कूक्’ असा शब्द करीत असलेला धनाजी व बाळाजीपंत यांना दिसला. हा आपणाला शुभशकुनच झाला असें समजून ते जास्त हुरुपानें चालूं लागले.

## प्रकरण एकविसावें

# मारुतराय

"मारुती! मारुतरायानें मारुतीच्या मस्तकावरून हात फिरवीत ममतेच्या स्वरांत विचारलें, "आतां तुला कसें वाटतें?" पण मारुतीनें ओ दिली नाहीं. थोड्या वेळापूर्वी शिपायी राजवाड्यांतून त्याला उचलून जंगलाकडे चालवीत नेऊं लागले तेव्हांच तो अर्धवट शुद्धींत होता. त्याचा जमिनीवर पाय ठरत नव्हता. शिपायांनीं त्याला प्रथम पांचपन्नास पावलें तसेंच फरफटत चालविलें. पण त्याचे पाय गळून लोंबकळूं लागतांच त्यांना त्याची दया आली. पण त्यांनीं लगेच चार भोई व एक डोली आणवून त्यांतून मारुतीला जंगलांत नेऊन सोडल्यावर ते माघारे वळले. त्याला टाकल्यावर आतां वाघ, कोल्हे त्याला कसे फाडून खातील याविषयीं गोष्टी बोलत हळहळत ते चालले असतांना मुक्ता सरपणासाठीं काटक्या गोळा करण्याकरितां म्हणून आजूबाजूला हिंडत होती तिनें ओझरतें ऐकलें. तिला मारुतीचें नांव मात्र ऐकूं आलें नाहीं. तिनें त्या शिपायांचें बोलणें ऐकून न ऐकल्यासारखें भासविलें. कांहीं वेळानें शिपायी बोलत बोलत दूर निघून गेल्यावर ती आपली सरपणाची टोपली अर्धवट भरली होती तशीच डोकीवर घेऊन लगबगीनें घरीं आली व प्रथम तिनें व्यासरावाला हा प्रकार सांगितला. शाहूमहाराजांविषयीं गौरवपर शब्द काढल्यामुळें राजद्रोहाचा गुन्हेगार ठरलेला हा कोणी तरी अभागी जीव असावा याविषयीं मुक्ता व व्यासराव यांचें तेव्हांच एकमत झालें. असें कोणी अडलें भिडलें माणूस पाहिलें म्हणजे त्याला हातभार लावण्यासाठीं स्वतः होऊन पुढें जावयाचें हा व्यासरावाचा बाणा होता, व मुक्ता तरी व्यासरावाच्या तालमींत तयार झालेली मुलगी.

Library

तिनें व्यासरावाच्याच मनांतील गोष्ट सुचविली, "आजोबा! आपण जाऊन त्याची चौकशी केली पाहिजे."

लगेच व्यासराव व मुक्ता तिन्हीसांजांच्या वेळीं शोध करीत करीत त्या जंगलांत गेलीं. ह्या वेळीं जंगलांतलीं जनावरें आजूबाजूला भ्रमण करीत असणार अशा समजुतीनें व्यासरावानें तरवार व भाला बरोबर घेतला होता. मुक्तादेखील आपला खंजीर निऱ्यांत खोंचून घेण्याला नेहमींप्रमाणें विसरली नाहींच; पण आज तिची कपिला हट्टानें तिच्याबरोबर बागडत असल्यामुळें वेळींवखतीं तिचें रक्षण करतां यावें यासाठीं तिनें पिराजीची एक तलवार घरांत होती तीही आपल्याबरोबर घेतली. वस्ती जंगलवाडींतील व जंगली जनावरांच्या डोळ्यांत सलणारी लुसलुशीत सुंदर कपिला पदरीं, तिचें रक्षण करण्यासाठीं तिला मधून मधून जनावरांशीं झगडावें लागे. तेवढ्यासाठीं ती पिराजीपासून भाला फेंकणें, बंदुकीचा नेम मारणें, पट्टा फिरविणें वगैरे शस्त्रविद्येंत बरीच पारंगत झाली होती.

आजदेखील जंगलांत शिरतांच आजूबाजूनें कोठून तरी एक चित्ता कपिलेच्या वासानें धावत आला. त्याच्यावर मुक्तेनें मोठ्या सावधगिरीनें तरवारीचा वार करून त्याला लोळविलें. शत्रु अशा रीतीनें मेला खरा; पण कपिला जी भ्याली ती जमिनीला पाय म्हणून कसा तो लावीना. ती आपली मुक्तेच्या खांद्यावर पुढचे दोन पाय टेंकून तिच्या छातीवर मस्तक टेंकून भीतीनें थरथर कांपत आंसवांनीं ओथंबलेल्या केविलवाण्या नजरेनें तिच्याकडे पाहूं लागली. अखेर मुक्तेनें तिला उचलून खांद्यावर घेतलें.

शोधतां शोधतां अखेर एकदांचा मारुती आढळला. व्यासराव व मुक्ता ह्या दोघांनींही त्याला ओळखलें व विलंब न लावतां तावडतोब त्याला आपल्या झोंपडींत नेण्याचें ठरविलें. वेळ न लावण्याचें कारण एक तर:मारुती जखमी झालेला व दुसरें, ताराबाईचा ज्या गुन्हेगारावर रोष झालेला होता त्याला आधार दिल्यामुळें राजकोपाची आकाशाची कुऱ्हाड आपल्या मानेवर कोसळली तर काय करा!

एका बाजूनें हें भय; पण दुसऱ्या बाजूनें भूतदयेचा एवढा जबरदस्त उमाळा व्यासराव व मुक्ता यांच्या अंतःकरणांत उसळला कीं पुढें काय वाटेल तें होवो; या वेळीं तरी आपण ह्या आसन्नमरण माणसाचा जीव कांहींही करून वांचवावयाचा, असा त्यांनीं आपल्या मनाचा निर्धार केला. आतां प्रश्न एवढाच उरला कीं मारुतीला एथून झोंपडीपर्यंत कसें न्यावें ! आजूबाजूच्या वाटांनीं ये जा करणाऱ्या कुणबीशेतकऱ्यांपैकीं कोणाला हांक मारावी तर विनाकारण ह्या गोष्टीचा बभ्रा होऊन पराचा पारवा व्हावयाचा ! बरें; मारुती शुद्धीवर येईतों वाट पाहावी तरीदेखील कोणी पाहील सवरील का ह्या भीतीची तरवार सदाची त्यांच्या मानेवर लटकत होतीच. शेवटीं त्या दोघांनींच मारुतीला उचलून झोंपडीपर्यंत न्यावयाचें ठरविलें. पण तो एवढा छत्तीस अडतीस वर्षांच्या उमरीचा ज्वान गडी; त्याला मुक्तेसारखी सोळा वर्षांची कोंवळी पोर काय हातभार लावणार ! अखेर एकट्या व्यासरावानेंच मारुतीला पाठुंगळीला मारून झोंपडींत नेऊन सोडलें. झोंपडीकडे जातांना पूर्वीं येते वेळीं मुक्तेनें ज्या जागीं कपिलेला मारून खाण्यासाठीं धावून आलेल्या चित्त्याला तरवारीनें ठार केलें होतें तेथवर येतांच त्या चित्त्याच्या प्रेताचें काय झालें तें मुद्दाम पाहिलें. हेतु हा कीं उद्यां कोणाच्या हातीं तरी त्या चित्त्याचें कातडें सोलून घेऊन, पिराजी परत येईल तेव्हां आपल्या पराक्रमाची खूण म्हणून त्याला तें दाखवावें. पण ती पाहते तों पांचपन्नास गिधाडें तेथें जमून त्या प्रेताला फाडफाडून खात होतीं.

झोंपडींत जाऊन पोंचतांच मारुतीच्या सर्वांगावरून मुक्तेनें एकवार नजर फिरविली तों त्याच्या उजव्या मांडींत गोळी घुसलेली तिला आढळून आली. लगेच तिनें व्यासरावाला सांगून गांवांत मंगळाईच्या देवालयांत एक साठीच्या उमरीचा मारुतराय या नांवाचा साधु वैद्यकीविषयीं प्रसिद्ध होता त्याला बोलावून आणविलें. मारुतराय हा सर्वसंगपरित्यागी व विरक्त असा साधुपुरुष होता. तो राजधानींत वास्तव्य करूं लागल्यापासून त्याच्या वैद्यकींतील नैपुण्याचा लौकिक

दिवसेंदिवस दाही दिशांना इतका दुमदुमूं लागला कीं, एकदां वेडा शिवाजीराजा प्राणांतिक दुखण्यानें आजारी असतां ताराबाईनें थोरां-मोठ्यांच्या शिफारशींवरून मारुतरायाला राजवाड्यांत बोलावून नेलें व त्याचें औषध शिवाजीला देवविलें. त्या औषधानें शिवाजीला ताबडतोब गुण आला. तेव्हांपासून राजघराण्याची श्रद्धा मारुतराया-वर बसली व त्याला दरबारांतून नेमणूक सुरू होऊन राजवैद्य म्हणून त्याला लोक मानूं लागले. मारुतरायापाशीं अशीं कांहीं दिव्य औषधें होतीं कीं, त्यांनीं असाध्य रोगांवरदेखील तात्काळ गुण यावा. चरक-संहितेनुसार शस्त्रविद्यादेखील त्याला चांगली अवगत होती. अनेक मोठमोठ्या दरबारी लोकांना लढाईत गोळ्या लागल्या, कीं मारुत-रायानें त्या तेव्हांच काढाव्या. हें मुक्तेला माहीत असल्यामुळेंच तिनें व्यासरावाला नेमकें मारुतरायालाच बोलवावयाला सांगितलें. व्यास-राव व मारुतराय यांचें मित्रत्वाचें नातें असल्यानें आपण गरीब ब्राह्मण व मारुतराय एवढा थोर साधु—तशांत राजवैद्य; त्याला बोला-वलें तर तो आपल्या गरीबाच्या झोंपडींत येईल किंवा नाहीं ही शंका देखील त्याला आली नाहीं. त्यानें ताबडतोब जाऊन मारुतरायाला बोलावून आणलें. मारुतरायानें प्रथम मारुतीच्या मांडीतील गोळी काढून त्या जखमेवर वनस्पतींपासून बनविलेलें कसलेंसें मलम चोळलें. मुक्ता जवळ बसून लक्षपूर्वक सर्व गोष्टी पहात होती.

औषध वगैरे देऊन झाल्यावर मारुतराय बराच वेळपर्यंत मारुती-च्या बिछान्याशेजारीं त्याचा चेहरा न्याहाळीत बसला होता. इतकें न्याहाळून पाहण्यासारखें त्या चेहऱ्यांत काय होतें तें त्याचें तो जाणे ! कांहीं वेळानें त्यानें मारुतीला नांव घेऊन हांक मारली. पण मारुती शुद्धीवर नसल्यामुळें ओ देऊं शकला नाहीं. पुन्हा कांहीं वेळ गेल्या-वर जेव्हां त्यानें पुन्हां हांक मारली तेव्हां मात्र मारुती हळुहळू शुद्धी-वर येऊन डोळे उघडून सभोंवार पाहूं लागला.

"बाळ ! आतां तुला कसें वाटतें ?" मारुतरायानें मारुतीला आपलेपणानें विचारलें.

"आतां मला अंमळ बरें वाटतें. पण मी इथें कुठें व कसा आलों?" मारुतीनें एकवार सभोंवार पाहत विचारिलें.

व्यासरावानें शिपाई मारुतीला जंगलांत टाकून गेल्यापासून एथवर घडलेली सर्व हकिकत सांगितली. ती ऐकून मारुतीला बरेंच समाधान वाटलें.

"पण मारुती! तुझ्यावर आईसाहेबांचा इतका रोष होण्याचें कारण काय?" मारुतरायानें विचारलें.

मारुतीनें आपल्या मांडींत गोळी कशी घुसली, भिकारीण वाड्यांत कशी आली, ती काय बोलली, तिच्या शब्दावर विश्वासून आपण शाहूमहाराजांविषयीं गौरवपर शब्द उच्चारल्यामुळें आपणाला देहान्त-शिक्षा ताराबाईनें कशी फर्माविली, वगैरे साऱ्या गोष्टी तेथल्या मंडळी-ला निवेदन केल्या. त्या कोणाही सहृदय माणसाला चीड आणणाऱ्या होत्या व त्या ऐकून सर्वांना पराकाष्ठेची चीडही आली. पण मारुत-राय चिडला तो तर जमदग्नीचा अवतार बनला. राजाश्रयावर राज-धानींत मोठ्या मानमान्यतेनें राहणारा व सर्वसंगपरित्यागी असा हा साधुपुरुष ताराबाई वगैरे मंडळीवर इतका चिडलेला पाहून सर्वांना मोठा अचंबा वाटला. कुठचा कोण मारुती व कुठचा हा साधु! मग असें कां? पण असें कां, असें त्याला कोणीं विचारावें?

"असें असलें तर यापुढें राजघराण्याशीं माझा संबंध कायमचा तुटला." मारुतराय मारुतीकडे वळून जरा शांत होऊन म्हणाला, "मारुती! तूं खाशांच्या तैनातींत आज किती वर्षें आहेस?"

"मी नुक्ता वर्ष–दीडवर्षांपूर्वी इथें रुजू झालों."

"तुझें मूळ गांव कोणतें?"

"मूळ गांव माझें पाडळी. तेथें माझे बाबा पाटील होते. आम्ही घरचे खाऊन-पिऊन सुखी होतों. पण मध्येंच मला काय दुर्बुद्धि आठवली, व तो मी माझी बायको, माझे आईबाप वगैरे सर्व माणसांशीं भांडून घराबाहेर पडलों व पुन्हा घरीं म्हणून गेलों नाहीं. तेव्हां-पासून आज चौदापंधरा वर्षें वणवण दाही दिशांना हिंडतां हिंडतां

नुक्ता दीड-दोन वर्षांपूर्वी चार मोठया माणसांच्या वशिल्यानें हुजुरांच्या तैनातींत रुजू झालों."

"इतक्या दिवसांत तुझ्या आईबापांचा, बायकोचा कांहीं पत्ता?"

"छे! त्यांचा पत्ताबित्ता विशेष असा कांहीं नाहीं. नाहीं म्हणायला मधून मधून वारेबातम्या कानांवर येत, त्यांवरून कळलें कीं, माझी आई 'मारुती', 'मारुती' करून धाय मोकलून रडत माझ्या दुःखानें मृत्युमुखीं पडली. माझी बायको मीं घर सोडलें तेव्हां आठ महिन्यांची पहिलटकरीण गरोदर होती; ती पूर्ण दिवसांनीं बाळंत झाली. तिला मुलगा झाला कीं मुलगी हें मला मुळींच माहीत नाहीं. मी घर सोडल्यापासून माझे बाबा मी त्यांचा एकुलता एक मुलगा जिवंत असूनही मेल्यासारखा झालों म्हणून पुत्रशोकानें विव्हल होऊन माझ्या बायकोच्या बाळंतपणांतच सर्वसंगपरित्याग करून देशांतराला निघून गेले. तेव्हांपासून त्यांचा पत्ता नाहीं. असा सर्व परींनीं माझ्या घराचा मांडव झाल्यावर माझ्या बायकोनें तरी तेथें कोणाच्या आधारानें राहावें! ती देखील आपल्या बारा दिवसांच्या तान्हुल्याला घेऊन घर सोडून कोठें निघून गेली ती कायमचीच गेली!"

"अरेरे!" मारुतराव हळहळत मारुतीशीं समदुःखी होऊन म्हणाला, "चांडाळा! तूं तारुण्याच्या ऐन भरांत हा केवढा बरें अविचार केलास?"

"केला खरा! पण आतां त्याला इलाज काय?"

"तेंही खरेंच. आतां त्याला कसला इलाज!" मारुतराय दोन-तीन दीर्घ उसासे सोडीत म्हणाला, "पण तुझी तुझ्या पित्याच्या व व बायकोच्या ठायीं खरीखरी भक्ति होती?"

"भक्ति होती?" मारुती त्याच प्रश्नाचा पुनरुच्चार करीत म्हणाला. "बाबाजी! भक्ति होती किंवा नाहीं तें मी माझ्या तोंडानें कसें सांगूं! मीं माझें हृदय फाडून दाखविलें तर आज जवळ जवळ तप सव्वा तप त्या अंतःकरणावर माझ्या माणसांविषयीं कायम ठशानें कोरून ठेविलेला भक्तिभावाचा वज्रलेप आपण अंतर्दृष्टीनें वाचूं शकाल

का? शकाल का? सांगा! तुम्ही सांगाल तर मी माझें हृदय फाडून दाखवितों म्हणजे तुमची खात्री पटेल."

"नको–नको! अविचारी मुला! माझा तुझ्या शब्दावर विश्वास आहे. पण आतां कल्पना कर, देवदयेनें तुझे बाबा, तुझी बायको व तुझें मूल हीं तुझीं माणसें तुला पुन्हा भेटलीं तर तूं त्यांच्याशीं प्रेमानें संसार करशील?"

"माझीं माणसें मला पुन्हा भेटणार? आतां कसलीं माझीं माणसें मला भेटतात! पण तीं भेटलींच तर बाबाजी! मी तुमचा जन्मोजन्मींचा ऋणी होईन! पण हें कधीं तरी शक्य आहे का?"

"कां? शक्य कां नाहीं? मारुती! परमेश्वरावर तुझी जर अढळ श्रद्धा असली तर परमेश्वरानें तुझे मनोरथ पूर्ण करण्याचें मनांत आणल्यास त्याला अशक्य काय आहे?" मारुतराय मारुतीच्या पाठी-वरून प्रेमानें हात फिरवीत गहिंवरलेल्या स्वरानें उद्गारला, "बेटा! तुझे मनोरथ पूर्ण होतील असा माझा तुला आशिर्वाद आहे. पण तूं आतां ज्या भिकारणीची हकीकत सांगत होतास तिचें पुढें काय झालें?"

"तिचें पुढें काय झालें तेंच मला कळलें नाहीं. मी तेव्हां शुद्धी-वर नव्हतों. पण तिला ओझरती पाहतांच मला असा भास झाला. पण मी तें कशाला बोलूं! नाहींच बोलत!" तें बोलण्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं." मारुती व्यासरावाकडे वळून म्हणाला, "व्यासराव! तुम्ही मात्र एक गोष्ट करा; त्या बाईचा तपास करून मला कळवा. बहुधा ती एव्हांना जिवंत नसेल; ती शिकारखान्यांतील भुकेनें वख-वखलेल्या चित्त्यांच्या भक्ष्स्थानीं पडली असेल. गरीब बिचारी!" मारुती एकदम दुःखीकष्टी होऊन उद्गारला.

"बाबाजी! ती आईसाहेबांच्या कोपाच्या कडकडत्या विजेखालीं केव्हांच भाजून मेली असेल." मारुती डोळे पुशीत म्हणाला, "गरीब बिचारी भिकारीण! चंद्रसेनाला आईसाहेबांनीं आज्ञा केली होती.– तो म्हणजे प्रतिराक्षस आहे. त्यानें तेव्हांच आईसाहेबांच्या आज्ञेची अंमलबजावणी केली असेल!"

" असें असेल, तर व्यासराव ! तूं आतांच्या आतां किल्ल्यावर जाऊन त्या भिकारणीची चौकशी करून ये." मारुतराय म्हणाला.

"व्यासरावाला किल्ल्यावर कोणीदेखील दाद देणार नाहीं. उलट हे तिचेच फितुरी साथीदार आहेत असा चंद्रसेन वगैरे मंडळींचा ग्रह होऊन यांच्यावरच एखादें संकट कोसळेल. मग कसें करायचें ?" मारुती म्हणाला.

" असें संकट काय कोसळतें ? जा, व्यासराव ! आतांच्या आतां असाच्या असा किल्ल्यावर जाऊन तपास करून ये. तुला कोणी अडविलें तर माझें नांव सांगून थेट आईसाहेबांची भेट घे. एकवार त्यांच्या माणुसकीची परीक्षा तरी पाहूं दे !" मारुतराव क्षणभर थांबून म्हणाला, " किंवा तूं तरी कशाला ! मीच जाऊन चौकशी करतों."

" जा–जा. बाबाजी ! कृपा करून आपणच जा म्हणजे कांहीं दाद लागली तर लागेल." मारुती विनवणीच्या स्वरानें म्हणाला, " एक मात्र करा; मी जिवंत आहें याची गंधवार्तादेखील कोणाला लागूं देऊं नका."

" बरें आहे." असें म्हणून मारुतराय तावडतोब किल्ल्याकडे जावयाला निघाला. जातांना त्यानें मुक्ता व व्यासराव यांना मारुतीची योग्य काळजी घेण्यास सांगितलें. त्या दोघांनींही तें कबूल केलें. मारुतरायानें सांगितलें नसतें तरी त्यांनीं मारुतीची योग्य ती सेवाशुश्रूषा केलीच असती.

पण मारुतराय गेल्यावर मुक्ता व व्यासराव ह्या दोघांनाही अचंबा वाटूं लागला कीं, ती भिकारीण कोण, मारुती तिच्याविषयीं इतका हळहळतो, तो कां, व मारुतरायासारखा सर्वसंगपरित्यागी पुरुष ह्या गोष्टींत इतक्या तत्परतेनें मन घालतो तें तरी कां ?

## प्रकरण बाविसावें

# ब्रह्मेंद्रस्वामींची भेट

"चंद्रसेन! स्वामी आले नाहींत का?" ताराबाईनें विचारलें.

चंद्रसेन ब्रह्मेंद्रस्वामींना आणावयाला गेल्यापासून ताराबाई एक-सारखी त्यांच्या वाटेकडे डोळे लावून उभी होती. रस्त्यावर टप्प्या-टप्प्याच्या अंतरानें तिनें तीनचार जासूद चंद्रसेन किंवा स्वामींची पालखी दिसतांच आपणाला खबर मिळावी म्हणून उभे केले होते. त्यांच्यामार्फत चंद्रसेन व पालखीही आल्याची खबर कळतांच तारा-बाईनें राजवाड्याच्या मधल्या दिवाणखान्यांत रत्नजडित रौप्य-चौरंग मांडून स्वामींच्या पूजेची सारी सिद्धता करून ठेविली होती. स्वामी ब्राह्मण पडले, ते आपल्या हातचा फलाहार ग्रहण करणार नाहींत, म्हणून मुद्दाम ब्राह्मण आचाऱ्याकडून फलाहाराची सर्व तयारी करून ठेवण्यांत आली होती. शाहूमहाराजांच्या सुटकेची वार्ता कानीं आल्या-पासून व स्वामी शाहूच्या बाजूचे आहेत असें समजल्यापासून तारा-बाईच्या मनांत स्वामींविषयीं कांहींसा कडूपणा उत्पन्न झाला असला तरी त्यापूर्वीच ताराबाईनें स्वामींना आपले गुरु मानलें होतें, व आपल्या वेडया शिवाजीला त्यांच्या पायांवर घालून 'हा मूढ बालक! याच्यावर आपली कृपादृष्टि असावी' अशी विनवणी करून त्यांचा आशिर्वादही मिळविला होता. तेव्हांपासून राजबाबतीं एकादा भानगडी-चा प्रश्न उपस्थित झाला कीं त्याचा निकाल ताराबाईनें स्वामींच्या विचारानें लावावा. नाहीं म्हणायला ही शाहूमहाराजांबाबतची एकच भानगड ताराबाई स्वामींना न सांगतां परपस्पर भागविण्याचा प्रयत्न करीत होती. त्यामुळेंच तिनें एखाद्या राजकीय चळवळीला नजर-कैदेंत ठेवावें त्याप्रमाणें आपल्या मतें स्वामींना न कळत त्यांच्या

सभोंवार अनेक गुप्तहेरांचें जाळें विणून त्यांच्या सभोंवार नजर-कैद निर्माण केली होती. पण नाना परींच्या दैवी आपत्ति नाना स्वरूपांनीं आपणावर कोसळत आहेत असें पाहतांच ह्या आपत्तींतून आपणाला सोडविणारी स्वामी ही एकच सर्वज्ञ व सर्वसमर्थ व्यक्ति आहे अशी ताराबाईची स्वामींच्या ठायीं श्रद्धा असल्यानें आज तिनें त्यांना एवढ्या इतमामानें आणवून त्यांचा आशिर्वाद मिळविण्याचा डाव रचिला होता.

पण चंद्रसेन पुढें आला व पालखीही आली; व ती भोयांनीं खालीं उतरण्याऐवजीं परपस्पर आंत नेली. तेव्हां ताराबाईला कळून चुकलें कीं स्वामी पालखींत नाहींत! त्यामुळें तिनें खिन्न होऊन चंद्रसेनाला विचारलें, "चंद्रसेन! स्वामी आले नाहींत का?"

"हो आईसाहेब! आले तर?" चंद्रसेन मुजरा करून उत्तरला.

"मग ते कुठें आहेत? पालखी तर रिकामीच दिसते."

"ते पायींच येत आहेत."

"पायीं? पायीं कां बरें? पालखी होती ना?"

"होय. पण आपणाला पालखी नको, आपण पायींच चालत येणार, असें स्वामी म्हणाले. त्यांच्यापुढें माझा कांहीं इलाज चालेना."

चंद्रसेनाच्या तोंडून स्वामींनीं पालखींत बसण्याचें नाकारल्याचें ऐकून ताराबाईचें मन एकाएकीं कच खाऊं लागलें. इतक्यांत स्वामी आल्याची खबर देणारा हुजऱ्या व स्वामी एकदमच आंत आले. ताराबाईनें स्वामींना नम्रतापूर्वक ननस्कार करून मुद्दाम त्यांच्यासाठीं मांडलेल्या रुप्याच्या चौरंगावर बसण्याची त्यांना विनंति केली. पण स्वामी बसेनात. ते उभ्या उभ्याच उद्गारले, "मुली! आमचे सुखा-सनावर बसण्याचे दिवस आतां संपुष्टांत आले आहेत; आतां आम्हांस पालखी तरी काय करावयाची?"

"स्वामी! आपल्या मनांत माझ्याविषयीं भलताच किंतु आलेला दिसतो." ताराबाई पुनः स्वामींना हात जोडून त्यांचे पाय धरून विनवूं लागली.

अखेर स्वामींनीं आसन ग्रहण केलें. नंतर ताराबाईनें त्यांची यथासांग पूजा करून त्यांच्या चरणीं मस्तक लीन केलें व पदर पसरून विनवणी केली, "आतां माझ्याकडून काय चूक झाली ती माझ्या पदरांत घालावी. ही मी पदर पसरतें."

"तुमची चूक कोणीं म्हणावी? तुम्ही आमचे राजे; आम्ही तुमचे रयत! राजा हा रयतेचा धनी आहे, पण राजाचा धनी कोण आहे! राजा करील ती पूर्वदिशा!" स्वामी म्हणाले.

"स्वामी! मला याचा अर्थच कळत नाहीं." ताराबाई मनांतून ओशाळून म्हणाली.

अर्थ कळत नाहीं! अर्थ कसा कळेल? निजलेल्यास जागें करतां येईल; पण जाग्यास जागें कसें करतां येईल? तुम्हीं आमच्यामागें आजकाल गुप्तदूतांचा ससेमिरा लावून दिला आहे व तुमच्या राज्यांत आमचें वास्तव्य म्हणजे तुम्हांस एक प्राणसंकट वाटत आहे हें आम्हांस ठावें आहे. आमचें काय! आम्हांस त्रिखंडांत भिक्षांदेहीची जहागीर श्री देव गजाननाच्या कृपेकरून मिळालेली आहे. ती आमची सत्ता सार्वभौम सत्तेच्याही श्रीमुखांत मारील अशी थोर आहे. तुमचें राज्य महाराष्ट्रमुलखीं चालतें; तुम्ही महाराष्ट्राचे छत्रपति. एवढा मोठा शाहन्शाहा दिल्लीचा बादशहा; पण त्याच्या राज्याची हद्द ओलांडूनही आम्ही भिक्षेकरी ब्राह्मण आमची भिक्षांदेहीची वसूली करूं शकतों. यासाठीं म्हणतों, आम्ही तुम्हांस तुमच्या एकतंत्री राज्यांत नको असूं तर तशी आज्ञा व्हावी. कारण तुम्ही राजे आहां!" स्वामी म्हणाले.

ताराबाईसारख्या चतुर स्त्रीला स्वामींच्या गूढ व खोचिक बोलण्यांतील मथितार्थ तेव्हांच कळला. ती कोणत्या तोंडानें त्या गोष्टी नाकबूल करील! तिनें मनांतल्या मनांत ओशाळून स्वामींचे पुन्हां पाय धरले व विनवणी केली, "स्वामी! मी आपलें लेंकरूं; आपण माझे गुरु. माझ्या पित्यासमान आपण मला पूज्य आहां. आजवर माझ्या हातून ज्या चुका झाल्या असतील त्या माफ करून सध्यां

उठलेल्या वादळांतून मराठी राज्याची नौका सुखरूपपणें तीराला लागेल असा उपाय सांगावा."

"उपाय आम्ही काय सांगणार?" स्वामी म्हणाले, "आम्ही वेळोवेळीं जो उपदेश केला तो तुम्हीं बिनदिक्कत पायांखालीं तुडविला; तुमची दानत तुम्हांस ठावी आहेच. झालें तर. माणसाची नियत सुटली रे सुटली, कीं त्याच्या नाशाला आरंभ झाला असें समजावें. राजवैभव दिसावयास गोड व गोंडस दिसतें खरें; पण खरें पाहूं गेलें असतां तें जसें अमृत आहे तसेंच अत्यंत जालीम असें हलाहलही आहे. तें भलत्याच माणसास बळकावून भक्षण करून पचवितां यावयाचें नाहीं."

"स्वामी! आपण म्हणतां तशा प्रकारची चूक माझ्या हातून झाली असेल; नाहीं असें नाहीं. पण आपणांसारख्या वडील माणसांनीं ती वेळच्यावेळीं दाखविली असती तर ती व्हावयाची टळली असती, किंवा होऊनही न झालेली तिची दुरुस्ती करतां आली असती!" ताराबाई म्हणाली.

"त्या भूतकाळच्या गोष्टी आतां कशास बोलाव्या! त्या तुम्हीं आम्हीं विसरून जाव्या हेंच उचित होय. आम्हीं तुम्हांस जेव्हां जेव्हां एखादी हितकारी गोष्ट सांगितली तेव्हां तेव्हां तुम्हीं तिचा अव्हेर केला."

"केला असेल; नाहीं म्हणत नाहीं मी. माझ्या हातून चूक झाली असेल, पण आजवरच्या साऱ्या चुकांबद्दल मीं आपल्यापुढें पदर पसरून क्षमा मागितलीच आहे."

"नुसतें तोंडी क्षमेच्या याचनेचें कोरडें आऊर उसळून उपयोग काय? त्यांत अंतरींच्या अनुतापाचा ओलावा कुठें आहे? बरें; आम्हांस तुम्हीं आज कशासाठीं बोलाविलें? शाहूराजांच्या सुटकेबाबत शंका विचारण्यासाठींच ना?"

"स्वामींना सर्व कांहीं कळतें आहे. आतां मी तरी आणखी काय सांगूं?" ताराबाई म्हणाली.

"आम्हांस काय कळणार? आणि कळलें तरी तें तुम्हांस कसें वळणार? तुम्हीं तुमचा मार्ग मनसोक्त आचरण्यास सुरुवात केली आहे. त्या दिशेनें तुम्हास मार्गदर्शक होईल असें कांहीं सांगण्याची बुद्धि श्रीगजानन आम्हांस देत नाहीं, व तुमच्या मनाविरुद्ध बोलणें उचित नाहीं."

"कां? उचित कां नाहीं? आपला उपदेश आमच्या व आमच्या राजाच्या हिताचाच असेल असा मला पूर्ण भरंवसा आहे."

"तो तोंडदेखला भरंवसा नको. कपटानें बोललेले बोल आपले आपणांसच शापतात."

"स्वामी! आपल्या पायांशपथ मी माझ्या मनांत कपटाला थारा देणार नाहीं. आजवर झाल्या त्या गोष्टी होऊन गेल्या. आपणासारख्या सव्यसाची महापुरुषाला मी सांगायला हवें असें नाहीं. मला माहीत आहे, मी राजाराममहाराजांच्या पश्चात् शिवाजींचें राज्यारोहण केलें, तें आपल्या मतें मंचकारोहण करावयाला हवें होतें. आणि खरें सांगायचें तर माझ्याही मनांत तेव्हां तसेंच होतें. पण तेव्हांची परिस्थितीच अशी बिकट होती कीं, मला माझा विचार व उपदेश बाजूला ठेवून जाणून बुजून आडरानांत शिरावें लागलें. कारण हें राजकारण! राजाराममहाराजांच्या पश्चात् मराठशाहीचे सारे मराठे सरदार सवते सुभे स्थापून आपापल्या परीनें छोटेखानी संस्थानिक बनण्याच्या बेतांत होते; त्यांना एकसूत्रीपणानें एकत्र बांधून ठेवण्यासाठीं मराठ्यांच्या गादीवर छत्रपति असणें अवश्य होतें. राजाराममहाराजांनीं स्वतःला राज्याभिषेक करून न घेतां राज्य केलें, व त्यांना तें साधलें याचें कारण चतुराई व मर्दाई त्यांच्या ठायीं होती. पण त्यांच्या पश्चात् दिवस मोठे कठीण आले. त्या विखारलेल्या परिस्थितीला पचनीं पाडण्यासाठीं मला शिवाजींचें राज्यारोहण करावें लागलें. नुसत्या देव्हाऱ्याची पूजा करण्याला कोणताही कर्ता पुरुष तयार होईना म्हणून देव्हाऱ्यांत देवाची स्थापना करणें मला भाग पडलें."

"त्या साऱ्या गोष्टी आम्हांस माहीत आहेत. त्याबाबत आम्हांस कांहींच बोलावयाचें नाहीं. जो मनाशीं खरा तो जनाशीं खरा. तुमचें मन तुम्हांस साक्ष आहे. आतां तुम्ही आम्हांस ज्या कोड्याचा निवाडा करण्यासाठीं बोलावलें, त्याचा निवाडा तुम्हांस रुचणार नाहीं हें माहीत असूनदेखील आम्ही सांगतों. छत्रपति शाहूराजांस राज्यावर बसूं देण्यांतच तुमचें, तुमच्या राज्याचें, तुमच्या साऱ्या मराठी दुनियेचें कोटकल्याण आहे."

"पण स्वामी! शाहू हा तोतया असून बादशहाचा हेर—"

"त्या साऱ्याचें आमच्या मतें एकच उत्तर, छत्रपतींचें पद शाहूमहाराजांचें आहे व तें तुम्हीं त्यांचें त्यांस दिलें पाहिजे." या स्वामींच्या शद्बांवर ताराबाई निरुत्तर होऊन बसली. अंमळशानें स्वामी पुन्हा म्हणाले, "तुम्हीं शाहूराजांचा मोड करण्यासाठीं फौज जारी केली आहे हें आम्हांस माहीत आहे. पण त्या फौजेची दाणादाण उडणार व अखेर शाहूराजे विजयी होऊन आपल्या राजधानींत येणार अशी भवितव्यता आहे. शाहूराजे हे साक्षात् शिवाचा अवतार! सर्वांचा उद्धार करण्याकरितां त्यांनीं अवतार घेतला आहे. त्यांनीं पूर्वजन्मीं बद्रिकाश्रमीं तपानुष्ठान केलें, त्याचें हें उत्तम फळ त्यांस ह्या जन्मीं मिळावयाचें आहे. अशी विधिघटना आहे. अशी विधिघटना असतांना तिच्याविरुद्ध जाऊन कोणाचें कसें चालेल!"

बराच वेळपर्यंत ताराबाई कांहीं बोलली नाहीं. तेव्हां स्वामी पुन्हा म्हणाले, "आमचें कार्य आटोपलें; आम्ही आतां जातों. तुम्हीं आतां तुमच्या विचारें योग्य ठरेल तें करावें."

एवढें बोलून स्वामी निघालेले पाहून ताराबाई एकाएकीं आपल्या विचारतंद्रींतून जागी झाली व स्वामींना आडवी जाऊन म्हणाली, "आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. ती आचरणांत उतरविण्याचा मी शक्य तों प्रयत्न करीन. शाहू जर तोतया नसून खरा असेल व त्याची मति जर मोगलांच्या संगतींत कर्तव्यमंद झाली नसेल तर तो मला तरी कसा नकोसा होईल! कसें झालें तरी तें आमचेंच

रक्त आहे. दिवसेंदिवस माझें वय होत चाललें, व शिवाजीराजांना तर राज्यकारभाराचा उरक नाहीं. अशा वेळीं कोणी कार्यकर्ता राजपुरुष लाभला तर माझ्या डोक्यावरचा भार हलका होईल. प्रश्न एवढाच आहे कीं, शाहू खरा आहे कीं खोटा आहे—"

"शाहू खरा आहे. आम्ही एकवार सोडून त्रिवार सांगतों, कीं शाहू खरा आहे. पुढें?"

"खरा असेल. पण नुसता खरा असून उपयोग काय? संभाजीराजे तरी थोरल्या आबासाहेबांचे औरस पुत्रच होते ना? पण तें नाणें कसें करणीनें खोटें निघालें? राजा म्हटला कीं राज्याचें भवितव्य त्याच्या दानतीवर अवलंबून असतें. त्या दृष्टीनें पाहतां शाहू खरा असला—मी म्हणतें तो खरा आहे—पण बादशहाच्या जनानखान्यांत मराठ्यांच्या द्वेषानें जेथलें वातावरण पूर्णपणें विखारलेलें आहे, अशा ठिकाणीं तो लहानाचा मोठा झाला असल्यानें त्याला मुसलमान जवळचे वाटतील व मराठे परके वाटतील. शाहू बादशहाच्या जनानखान्यांत त्याच्या बेगमेचा मुलगा म्हणून वाढून लहानाचा मोठा झालेला! त्याला आपलीं आईबापें मराठे होतीं याचादेखील विसर पडला असेल. तो मराठ्यांच्या गादीचा वारस म्हणून आला तरी स्वतः बादशहाचा मांडलिक होऊन बादशाहीची इभ्रत राखण्यासाठीं मराठ्यांचें राज्य बादशाही साम्राज्यांत बुडवून नामशेष करण्याला झटेल, ह्या संकटाला भिऊन मीं विरोध केला व करतें."

"पण आमचा शाहूच्या ठायीं विश्वास असल्याचें आम्हीं तुम्हांस निवेदन केलेंच. याउपरीदेखील तो तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें खोटा निपजला तर त्याचा न्यायनिवाडा करण्यास मराठशाहीचे कर्ते पुरुष व कोटमाप रयत सर्वस्वीं समर्थ आहे. राजानें एक स्वाभिमान सोडून राजकर्तव्यावर निखारा ठेवला तरी रयत तें कसें मानील?"

"स्वामी! तुम्ही रयतेवर एवढा विश्वास ठेवितां हें पाहून मला हंसू येतें!" ताराबाई स्वामींकडे पाहून उपहासपूर्वक हंसत म्हणाली, "रयत काय, ज़ो कोणी तिच्यावर सत्ता गाजवील तो तिचा राजा.

बळी तो कान पिळी हा न्याय रयतेसमोर यशस्वी होतो. कालच पाहा ना ! शाहूचें पत्र घेऊन जोत्याजी केसरकर नांवाचा म्हातारा शाहूच्या नावाचा जयजयकार करीत नगरांत येतांच सर्व लोक 'शाहूमहाराजकी जय' करूं लागले. पण मीं काल असल्या हुल्लडीची बंदी करतांच जिकडे तिकडे सामसूम होऊन गेलें. रयत ही अशी आहे. बरें; असा एखादा अरेराव जुलूमजबरदस्ती करूं लागला व रयतेची गांजणूक होऊं लागली, कीं तीच रयत रडत रडत आमचे पाय धरायला येते. म्हणून म्हणतें, रयतेचें पुरे !"

"असें म्हणूं नये !" स्वामी शांतपणानें म्हणाले, "तुम्हांस वाटतें इतकी रयत ही उपेक्षणीय वस्तु नाहीं. राजाचें सिंहासन रयतेच्या अंतःकरणांत असतें व जोंवर रयतेच्या अंतःकरणास राजाच्या जुलुमाचा किंवा अन्यायाचा धक्का लागला नाहीं, तोंवरच हें सिंहासन टिकतें. रयतेचा संतोष हीच राज्याची बळकटी असते. पण एकवार रयतेच्या असंतोषाचे धक्के त्या सिंहासनास बसूं लागले कीं तें उन्मळून पडण्यास उशीर लागणार नाहीं. संभाजीराजा एवढा अत्याचारी असतांही त्याचा पुत्र गादीचा खरा वारस आज मोकळा होऊन आपणावर राज्य करावयास येत आहे, असें कळतांच रयत संभाजीराजाची जुलूम जबरदस्ती विसरून शाहूचा स्वीकार करण्यास आपखुषीनें तयार झाली, तर त्यांत राजद्रोह होतो असें नाहीं. उलट आपली रयत एवढी नेकीची व राजनिष्ठ आहे असें पाहून तिचा तुम्हीं गौरवच करावयास हवा. शाहू झाला तरी तुमचाच पुतण्या. अस्सल भोंसल्यांचें तें रक्त; तें आपल्या देशाशीं कधींच बेइमान व्हावयाचें नाहीं. त्यांतूनही मूल आहे; त्याच्या हातून एखादी चूक झाली तर ती तुम्हीं वडीलपणाच्या नात्यानें संभाळून घ्यावयास हवी."

ताराबाईला स्वामींच्या बोलण्यांतील एक अक्षरदेखील मनापासून रुचलें नाहीं. आपले बेत तडीला नेण्याच्या कामीं आपणाला स्वामींचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं हें ओळखून ताराबाईनें आवरतें घेण्याच्या इराद्यानें म्हटलें, "मी आपल्या उपदेशानुसार वागण्या-

चा शक्य तों प्रयत्न करीन. आतां, सेनापति व प्रतिनिधि हे शाहूवर चालून गेले आहेत ते तिकडे काय करतील याचा मात्र मी तरी काय नेम सांगूं!"

"पण सेनापति व प्रतिनिधि यांस तरी तुम्हींच पाठविलें ना?"

"होय. मींच त्यांना पाठविलें हें खरें; पण माझी आज्ञा नुसती नांवाची. आजला राज्याचे खरे कर्ते पुरुष ते आहेत. त्यांचा जसा इरादा दिसला तशी त्यांना मीं आज्ञा दिली."

"त्यांसच शाहूशीं सख्य करण्याविषयीं जासुदापाशीं आज्ञापत्र देऊन पाठवा." असें म्हणून स्वामी जाण्यासाठीं निघाले.

"हो! तसेंच करतें." ताराबाई स्वामी निघालेले पाहून स्वामींना म्हणाली. इतक्यांत ब्राह्मणानें स्वामींच्या फलाहाराचें साहित्य आणलें. तिनें स्वामींना म्हटलें, "स्वामी! एवढा फलाहार करून जायचें होतें."

"तुमच्यांतील राजबाबतीं झगडा मिटेतों आम्हांस तुमच्या गृहीं जलप्राशनही करावयाचें नाहीं." ताराबाईला आपले बोल झोंबल्या-चें स्वामींना तिच्या चेहऱ्यावरून दिसलें, तेव्हां जातां जातां त्यांनीं पुन्हा ताराबाईची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, "रागास येण्याचें कारण नाहीं. तुम्ही आम्हांस गुरु मानितां, त्यास तुमचें, तुमच्या राजवंशाचें व राज्याचें अभ्रूनिशीं संरक्षण व्हावें अशी आमची उत्कट इच्छा. त्या इच्छेच्या साफल्यास्तव आम्हीं हें अनुष्ठानच आरंभिलें आहे असें समजावें."

ताराबाईला स्वामींची आज्ञा तोंडदेखली तरी मान्य करणें भिडे-स्तव भाग होतें. तिनें ताबडतोब चिटणिसांना हुजऱ्याहातीं बोलावून आणलें व त्याच्या हातीं स्वामींच्या इच्छेनुसार सेनापति धनाजी जाधवाच्या नांवानें पत्र लिहून तें हरनामसिंगाच्या स्वाधीन केलें व तें ताबडतोब सैन्यांत पोंचतें होईल अशी व्यवस्था करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें हरनामसिंग निघाला. पण तो मुजरा करण्यासाठीं वांक-तांच ताराबाईनें त्याला डोळ्यांनीं कसलीशी खूण केली. हरनामसिंग ताराबाईच्या तैनातींतील असल्यानें तिच्या खाणा-खुणांचे अर्थ त्याला

## प्रकरण तेविसावें

# मारुतरायाचे ग्रह फिरले !

" जा, मारुतरायांना आंत पाठवून दे. " ताराबाई हुजऱ्याला म्हणाली. ती मनांतून मात्र आतां आल्या गेल्या लोकांच्या भेटी घेण्याला पूर्ण कंटाळली होती. पण हा मारुतराय तिच्या वेड्या पुत्राचा धर्मापिताच पडला; म्हणून त्याला भेट देणें तिला भाग पडलें. ब्रह्मेंद्रस्वामी जातांच हरनामसिंग थोड्या वेळापूर्वीच्या नेत्र-संकेताचा उलगडा करून घेण्यासाठीं पुढें येऊन मुजरा करून उभा राहिला. त्याच्या हातीं दिलेलें पत्र ताराबाईनें मागून घेतलें व चिटणीस जवळच बसले होते त्यांना पुन्हा पत्र लिहावयाला सांगितलें. त्या पत्राचा आशय 'शाहूचा मोड करण्याचें काम सेनापतीवर न सोंपवितां तुम्हीं जातीनें पार पाडणें. सेनापति कांहीं गैरबांका वर्तणूक दर्शवूं लागल्यास त्यास ताबडतोब आमचें मागील आज्ञापत्र दाखवून स्वस्थ बसविणें. सभोंवतीं जाळें फितुरांचें आहे हें ओळखून उचित तें करणें' असा होता. पत्र लिहून होतांच तें बंद करून हरनामसिंगाच्या हातीं देण्यांत आलें.

हरनामसिंग ताराबाईला मुजरा करून दरवाजाबाहेर पडतो न पडतो तोंच मारुतराय आंत आला. नेहमींचा परिपाठ म्हणजे जरी मारुतराय राजनिमंत्रणावरून पालखींत बसून यावयाचा, तरी राजवाड्यांत येतांच प्रथम ताराबाईला राजमाता म्हणून वंदन करावयाचा व ताराबाईनें त्याला आपल्या शेजारींच आसन द्यावयाचें. पण आजचा मामला साराच निराळा होता.

" आईसाहेब ! तुम्हीं एका भिकारणीला देहान्त शिक्षा दिली

आहे, ही गोष्ट खरी ना?" मारुतरायानें उभ्या उभ्याच रागारागानें सर्व शिष्टाचार सोडून विचारलें.

मारुतरायाची ही क्रोधाकुल अवस्था पाहून ताराबाईला रागही आला व अचंबाही वाटला. त्याच्याविषयीं तिच्या मनात कांहींसा आदर होता ही गोष्ट खरी; पण तो कसाही अरेरावीनें वागला तरी तें सहन करण्याइतका तो तिच्या दृष्टीनें तरी आदरणीय नव्हता. ब्रह्मेंद्र-स्वामींशीं ताराबाईचें गुरुशिष्येचें नातें होतें, त्यामुळें स्वामी रागावले तरी ताराबाई शांतपणानें त्यांचें शांतवन करण्याचा प्रयत्न करी. पण मारुतरायाची इतकी मुर्वत ठेवावी असें तिला वाटण्याचा मुळींच संभव नव्हता. पण मारुतराय मात्र मनांतून स्वतःला ताराबाईच्या गुरुस्थानीं—निदान कल्याणकर्त्याच्या स्थानीं—मानीत होता.

पण ताराबाईनें आपला राग प्रथम उजेडांत येऊं न देतां मारुत-रायाच्या प्रश्नाला उत्तर दिलें, "मारुतराय! आमच्या राजकारणांत तुम्हीं ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करूं नये हें चांगलें. तुम्ही आमच्या आश्रयाला आहां तें तुमच्या तैनातींत कांहीं उणें पडलें असेल तर बोला."

"माझ्या तैनातीला आग लागो. मला विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर पाहिजे आहे. त्या भिकारणीचें काय झालें तें मला अगोदर सांगा." मारुतराय जरादेखील न भितां म्हणाला.

"ती भिकारीण तुमची कोण?" ताराबाईनें विचारलें. चंद्रसेन जवळच उभा होता. तो भिकारणीचें नांव निघतांच कान टवकारून ऐकूं लागला.

"ती माझी कोणी कां असेना? तिचें काय झालें तें सांगा." मारुतराय पुन्हा म्हणाला.

चंद्रसेनानें मारुतरायापाशीं जाऊन त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, "मारुतराय! तुम्हांला त्या भिकारणी-शीं काय करावयाचें आहे? तिनें गुन्हा केला त्याबद्दल ती शिक्षा भोगीत आहे."

"एकूण तिला अजून चित्त्याच्या जबड्यांत लोटण्यांत आली नाहीं ना?"

"नाहीं."

"मग ती आतां कुठें आहे? तिला कोणती शिक्षा सांगण्यांत आली आहे?"

"तिला नजरकैदेंत ठेवण्यांत आलें आहे."

"आईसाहेब! त्या भिकारणीला सोडून द्या." मारुतराय ताराबाईकडे वळून म्हणाला.

"कां बरें?" ताराबाईनें विचारलें. "तिच्या बाबतींत तुम्हांला इतकी काळजी घेण्याचें कारण काय?"

"आईसाहेब! निरपराधी अनाथांची काळजी घेण्यासाठीं परमेश्वर कधीं, कसा, व कोणाच्या मुखीं उभा राहतो याचा काय नेम सांगावा?"

"ती बाई निरपराधी आहे असें तुम्हांला कोणीं सांगितलें?"

"कोणीं कशाला सांगावयाला हवें? मला माहीत आहे. शाहूमहाराजांचें गौरवगाणें तिनें गाइलें हाच तिचा अपराध ना? होय ना? हा अपराध असेल तर मीही त्या अपराधाचा अंशभागी आहें."

"तिला तुम्हींच पढविली वाटतें?"

"तिला मीं पढविली नाहीं; तिनें मला पढविलें. उगवत्या छत्रपतींशीं राजनिष्ठ राहण्याला तिनें मला शिकविलें."

"मारुतराय! जरा तोंड आटोपून बोला. मीं ज्या हातानें तुमच्या तोंडीं सोन्याचा घांस भरविला त्याच हातांनीं मातीचा घांस भरविणें माझ्या वांट्याला आणूं नका!"

"आईसाहेब! माझ्यासारख्या सर्वत्यागी माणसाला माती व सोनें हीं सारखींच मातीमोल आहेत. मला तुमच्या सोन्याच्या घांसाची मातब्बरी ती काय? आतां, मी तुमचा रयत खरा; पण रयत झाला म्हणजे त्यानें आपली सदसद्विवेकबुद्धिदेखील राजाला विकलेली असते असें थोडेंच आहे!" असें म्हणून मारुतरायानें क्रोधानें ताड्कन् भुईवर पाय आपटले,

"चंद्रसेन!" ताराबाईनें संतप्त होऊन हांक मारली.

"आज्ञा सरकार!" असें म्हणून चंद्रसेन ताराबाईसमोर येऊन हात जोडून उभा राहिला.

"चंद्रसेन! हा माणूसदेखील कटवाल्यांना सामील दिसतो. ह्यानें आतां माझ्यादेखत माझा उपमर्द करून राजद्रोहाची शिकस्त केली आहे. याला आतां काय शिक्षा करशील?" ताराबाईनें चंद्रसेनाला विचारलें.

"आईसाहेब! अशा क्रोधवश होऊन अविचार करूं नका! आजच्या एका दिवसांत तुम्हीं किती निरपराधी रयतेला शासन केलें याचा विचार करा. तो मारुती–त्या बिचाऱ्याचा काय अपराध होता? ती भिकारीण तरी तुमच्या इतराजीला कां पात्र झाली? आणि तिसरा मी! आईसाहेब! तुमच्या इतराजीचें होमकुंड कल्पनेबाहेर भडकूं लागलें!"

"त्यांत आपली आहुती पडूं नये अशी तुमची इच्छा असेल तर बऱ्या बोलानें माझ्या दृष्टीसमोरून निघून जा कसे!" ताराबाई म्हणाली.

"मी निघून जातों. मला काय! राजवाडा व स्मशान मला दोन्ही सारखींच. पण तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें प्राणभयानें पळ काढणारा पळपुटा शेंदाडशिपाई मी नाहीं. माझ्या नसानसांत अस्सल मराठ्याचें रक्त उपजतच खेळत आहे. माझ्या कमनशिबानें माझ्या संसाराचा मोडकळता मांडव झाला म्हणून ज्या देहावर चिलखतें व शस्त्रास्त्रें शोभावयाचीं त्याच देहावर भगवीं वस्त्रें शोभूं लागलीं, हे माझ्या कमनशिबाचे खेळ आहेत. पण तुमच्या इतराजीच्या होमकुंडांत माझी आहुती पडेल, ह्या भयानें मात्र मी येथून ढळणार नाहीं. तुम्हांला काय करावयाचें तें खुशाल करा."

"फितूर! फितूर! सगळीकडे हें फितूर माजलें आहे! ह्या फितुराला वेळींच गाडलें पाहिजे!" ताराबाई चंद्रसेनाकडे वळून उद्गारली, "चंद्रसेन! आतां ह्या घरभेद्यांची गय करून उपयोगी नाहीं. आतांच्या आतां माझ्यासमोर ती ढालगज भिकारीण व हा

म्हातारा बुवा ह्या दोघांनाही शिकारखान्यासमोरच्या तटबंदी मैदानांत कोंडा व चित्त्यांकडून त्यांना फाडफाडून खाववा. जा, याला माझ्या दृष्टीसमोरून घेऊन जा. आतांच्या आतां माझ्या डोळ्यांसमोर ह्या शिक्षेची अम्मलबजावणी झाली पाहिजे. जा, चंद्रसेन! आतांच्या आतां त्या भिकारणीला माझ्यासमोर आण व हा म्हातारा आणि ती अशा दोघांच्याही दंडांना दोरी बांधून त्यांना भर राजरस्त्यानें चालवीत शिकारखान्याकडे घेऊन जा. आम्ही इतक्यांत येतों. मग चित्ते सोडावयाचे, आणि रस्त्यानें ही धिंड निघतांना दवंडी पिटवून तोतया शाहूशीं सख्य करूं इच्छिणाऱ्या फितुरी राजद्रोह्यांना असें देहान्त शासन केलें जाईल हें जाहीर करावयाचें. जा अगोदर."

चंद्रसेन हुकमाचा बंदा पडला. त्याला हुकमाची तामिली करणें प्राप्त होतें.

# प्रकरण चोविसावें

## वेड्या शिवाजीचे जनानी चाळे

" रत्ना ! " अशी तळघराच्या दरवाज्यांत जाऊन चंद्रसेनानें हांक मारली. दरवाजा आंतून लावलेला होता. नेहमीं हा दरवाजा बाहेरून उघडा असावयाचा. ताराबाईच्या कारकीर्दींत नाहीं म्हणायला एकवार—फक्त एकवारच हा दरवाजा आंतून बंद करण्यांत आला होता; तो वेड्या शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं. ताराबाईची सवत राजसबाई व तिचा धाकटा मुलगा संभाजी यांना शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं सापत्नभावाच्या भरांत कांहीं बखेडे उत्पन्न होऊं नयेत म्हणून ह्या तळघरांत ताराबाईच्या हुकुमानें कोंडून ठेवण्यांत आलें होतें. त्या वेळींदेखील राजसबाईच्या तैनातींत रत्नावलीच होती व ह्या राजकीय कैदखान्यावर देखरेख ठेवण्याचें कामही आजच्याप्रमाणेंच चंद्रसेनावरच सोंपविण्यांत आलें होतें. त्या प्रसंगानंतर त्या तळघराचा खरा जीर्णोद्धार असा आज झाला. नजरकैद म्हणून राजशाही पाहुणचार ह्या तळघरांत भोगणारी पहिली व्यक्ति म्हणजे ताराबाईची सवत राजसबाई, व त्यानंतर ही भिकारीण !

असो; चंद्रसेनानें त्या तळघराच्या दरवाज्यांत येऊन 'रत्ना' अशी हांक मारली पण कोणीं ओ दिली नाहीं. त्यानें पुन्हा हांक मारली, पुन्हां हांक मारली, पण ओ नाहीं. चंद्रसेनाला वाटलें, रत्नावली व हिरू पहारा सोडून कोठें बाहेर गेल्या कीं काय ! त्यानें प्रथम कडी कुलूप शाबूत आहे किंवा नाहीं हें पाहण्यासाठीं दरवाजाच्या वरील कडीकडे नजर फेकली तों कडी मोकळी ! त्यावरून त्याला संशय आला कीं, भिकारीण पहारेकऱ्याच्या हातावर तुरी देऊन पळाली कीं काय ! कारण ज्या पहारेकऱ्यापाशीं किल्ली होती तोही

तेथें जाग्यावर नव्हता. त्यानें पुन्हा दरवाज्याला बाहेरून कान लावून कानोसा घेतला, तों आंत रत्नावली व ती भिकारीण अशा दोघी-जणी बोलत असल्याचें त्याला ऐकूं आलें.

"बाई! ही नजरकैद तुमच्या वाट्यांला किती दिवसांपावेतों आहे?" रत्नावलीचे शब्द बाहेर ऐकूं आले.

"देवाला ठाऊक! मी तरी काय सांगूं!" भिकारीण उद्गारली.

"ह्याच जाग्यांत राजसबाई आईसाहेबांना शिवाजीराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळीं धाकट्या संभाजीराजांसह कोंडून ठेवण्यांत आलें होतें."

"होय का? मग हा योगायोग फार विचित्र आहे म्हणावयाचा. राजसबाई ताराबाईंची सवत म्हणून नजरकैदेंत पडल्या, व मी एका काळीं त्यांची सवत व्हायची होतें म्हणून पडलें!"

चंद्रसेन आणखी कांहीं वेळ तसाच दरवाज्याला कान लावून हें संभाषण ऐकत उभा राहिला असता. पण तितक्यांत ताराबाईंचा हुजऱ्या अजून भिकारीण कां बाहेर आली नाहीं याची चौकशी करण्यासाठीं तेथें आला, तेव्हां चंद्रसेनाला निरुपायानें दरवाजा ठोठावावा लागला.

एक दोन तीन वेळां चंद्रसेनानें दरवाजा ठोठावतांच आंतून कोणीं-तरी धांवत येऊन दरवाजाची कडी काढली. चंद्रसेन आंत डोकावून पाहतो तों हिरू समोर उभी!

"हिरू! पहारेकरी कोठें गेला?" चंद्रसेनानें विचारलें.

"कोण जाणे!" हिरू म्हणाली, "दरवाजाला बाहेरून कुलूप होतें आणि आम्ही आंत. बाहेर कोण आलें व कोण गेलें हें आम्हांला कसें कळणार?"

इतक्यांत दरवाजाच्या आंतील बाजूच्या दालनांतून कोणीतरी पोरकटपणें खदखदां हंसत उत्तरलें, "ह्यः! ह्यः! ह्यः! ह्यः! मी कशी गंमत केली!"

हें कोण बोलतें म्हणून हिरू व चंद्रसेन यांनीं त्या बाजूला वळून

पाहिलें तों तो वेडपट शिवाजी ! हिरूची व त्याची दृष्टादृष्ट होतांच तो चारगटपणें पुढें होऊन हिरूचा हात आपल्या हातीं धरीत म्हणाला, "काय हिरू! कशी गंमत केली?"

हिरू शिवाजीच्या हाताला जोराचा हिसका देऊन आपला हात सोडवून घेऊन त्याच्याकडे तिरस्कारानें पाहत दूर उभी राहिली.

"सरकार ! काय हें ! आपल्याला हें शोभत नाहीं. आईसाहेबांनीं पाहिलें तर त्या काय म्हणतील !" चंद्रसेन म्हणाला.

"काय म्हणणार? आईसाहेब काय म्हणणार! हिरूनें माझी राणी व्हावयाचें कबूल केलें आहे व मी तिला राणी करणार आहें. आणि म्हणे आईसाहेब काय म्हणतील!" शिवाजी वेडगळपणाच्या डौलांत म्हणाला.

चंद्रसेनाला हें एक गूढच वाटलें. तो हिरूच्या तोंडाकडे पाहूं लागला. तेवढ्यांत रत्नावली व भिकारीण कसला गलबला चालला आहे हें पाहण्यासाटीं तेथें आल्या.

"सरकार खोटें बोलतात!" हिरू म्हणाली.

"काय हिरू! थोड्या वेळापूर्वीं तुझ्या आईच्या देखत माझी राणी व्हावयाचें तूं कबूल केलें नाहींस?" शिवाजीनें विचारलें.

"रत्ना! हा काय प्रकार आहे?" चंद्रसेनानें रत्नावलीला विचारलें, "तुझ्या पोरीनें असा चावटपणा तुझ्यादेखत करावा व तो तूं मुकाट्यानें सहन करावा काय? ती आज कुणबिणीची पोर असली तरी उद्यां सेनापतीची सून व्हावयाची हें मनांत वागवून तरी तूं तिच्या वागणुकीवर नजर ठेवायला नको का?"

"तेंच! मी तरी सरकारांना तेंच म्हणालें. पण ते माझें मुळींच ऐकेनात. आले नि आपले एकदम माझें मनगट धरून मला वेडें-वांकडें विचारून म्हणाले, तूं माझी राणी होतेस का?"

"मग सेनापतीची सून होण्यापेक्षां राजाची राणी होणें वाईट कीं काय?" शिवाजीनें विचारलें.

शिवाजीच्या तोंडून हे शब्द निघावयाला व भिकारीण अजून

कां आली नाहीं याची चौकशी करण्यासाठीं ताराबाई तेथें यावयाला एकच गांठ पडली.

"बाळराजे! कसल्या वाटाघाटी चालल्या आहेत?" ताराबाईनें विचारलें.

ताराबाईचा शब्द ऐकतांच शिवाजी घाबरून लटलटां कापूं लागला.

"रत्ना!" ताराबाई रत्नावलीकडे वळून म्हणाली, "ह्या वाटाघाटी करतांना आज तिसऱ्यान्दां तूं सांपडलीस."

"मी तरी काय करूं आईसाहेब!" रत्नावली ताराबाईसमोर हात जोडून म्हणाली, "सरकारच मला मधांशीं पायंडा ओलांडूं देईनात. ते हिरूला राणी करणार असा हट्ट घेऊन तिचा हात धरून बसले, तेव्हां कशीबशी त्यांची समजूत करण्यासाठीं—त्यांची समजूत घालून वेळ टळवण्यासाठीं म्हटलें, होईल माझी हिरू तुमची राणी; आतां तिचा हात सोडा." रत्नावली शिवाजीकडे पाहत म्हणाली.

"चंद्रसेन! ह्या मायलेकींना आतांच्या आतां वाड्याबाहेर घालवून दे. राजवाडा आणि कुटाळखाना यांना सारखाच वाटतो, नव्हे? नगरांत दारोदार उंड्या मागून पोट भरण्यासाठीं ज्यांचा जन्म झालेला त्यांना सुखाची जागा मिळाली तरी भिकेचे डोहाळेच आठवायचे." ताराबाई म्हणाली.

"आईसाहेब! यांत आमचा काय बरें अपराध झाला?" रत्नावलीनें हात जोडून गयावया करीत विचारलें.

"चंद्रसेन! चल आटोप लौकर! ह्या मायलेकींना आंगावरच्या कपड्यांनिशीं हाकलून दे व ह्या भिकारणीला तिच्या कर्मांचीं फळें भोगण्यासाठीं बाहेर काढून मीं सांगितली तशी व्यवस्था कर." ताराबाई पुन्हा म्हणाली.

"काय, आईसाहेब! पुन्हा आपली लहर फिरली? पुन्हा आकाशची कुऱ्हाड माझ्या माथीं कोसळली? ठीक आहे. आमचें काय! राजांसाठीं जगायचें; राजांसाठीं मरायचें." असें म्हणून भिकारीण पुन्हा हंसतमुखानें 'राजा परदेशी' हें गाणें गाऊं लागली.

## प्रकरण पंचविसावें

# हा काय चमत्कार !

ताराबाईच्या आज्ञेप्रमाणें रत्नावली व हिरू यांना तेव्हांच राजवाड्याबाहेर घालवून देण्यांत आल्यावर, भिकारणीला बळजबरीनें राजवाड्याबाहेर ओढून नेण्यांत आलें. मारुतरायाला त्यापूर्वींच बाहेर खेंचून नेण्यांत आलें होतें. लगेच त्या दोघांच्या गळयांत तांबड्या जास्वंदांच्या माळा घालण्यांत आल्या व मस्तकावर आणि सर्वांगावर गुलाल उधळण्यांत आला. तसेंच त्यांच्या डाव्या उजव्या दंडांना दोरी बांधून त्यांना वधस्थानाकडे चालविण्यांत आलें. ह्या वेळपर्यंत भिकारणीला हे आपणाला शिकारखान्यांतील चित्त्याकडून फाडून खावविण्यासाठीं नेत आहेत हें माहीत नव्हतें. पण मारुतरायाच्या दंडाशीं तिचा दंड बांधण्यांत येतांच 'अरेरे ! बिचारीं दोघेंही आतां चित्त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडणार' असे विव्हळते उद्गार सभोंवार निघूं लागतांच तिला आपले अवचित भोग कळून चुकले. पण तिला त्याबद्दल मुळींच भय वाटलें नाहीं. उलट मारुतरायाकडे पाहतांच तिला व तिच्याकडे पाहतांच मारुतरायाला अत्यानंद झाला. त्यानें तिला अपत्यप्रेमानें ओथंबलेल्या हातांनीं मिठी मारून हांक मारली. पण कोणत्या नांवानें हांक मारली हें मात्र कोणालाच ऐकूं गेलें नाहीं.

त्या दोघांच्या भेटींतील अकल्पित आपलेपणा पाहून सभोंवारच्या सर्व लोकांना अचंबा वाटला. डोळयांवाटे वाहणारे आनंदाश्रु पुशीत भिकारणीनें मारुतरायाला हांक मारली, ती कशी व कोणत्या नात्यानें मारली तें सभोंवारच्या गलक्यांत कोणालाच ऐकूं गेलें नाहीं. तिचे शेवटचे बोल मात्र 'आपण आज एक दीड तपानंतर मरायला एकत्र आलों ! याला म्हणतात योगायोग ! तसेंच आपलें चुकलेलें

पाडस जर आपल्यापाशीं आलें असतें तर आपण तिघेंही एकमेकांच्या गळ्याला मिठी मारून सुखानें मेलों असतों. खरेंच; ते कुठें आहेत?' असे होते.

इतक्यांत दवंडीवाल्यानें दवंडी पिटली, "ऐका! ऐका! सर्व लोक हो, ऐका! तोतया शाहूशीं फितुरी करणाराला किंवा त्याचा गौरव गाणाराला असें अघोर देहान्त शासन केलें जाईल हो!"

दवंडीवाल्यानें प्रथम त्रिवार दवंडी पिटली. त्याबरोबर रस्त्याच्या दुतर्फा लोकांचे थवेच्या थवे जमून आश्चर्यविमूढ वृत्तीनें हा देखावा पाहण्यासाठीं गर्दीनें उभे राहूं लागले. शिवाय भिकारीण व मारुतराय यांना वधस्थानाकडे चालविणाऱ्या सरकारी शिपायांच्या मागोमाग देखील लोकांची एकच गर्दी उसळून गेली.

खरोखर, तेव्हांचा तो देखावा अत्यंत भयप्रद, पाषाणाचेंही काळीज भेदरून सोडणारा असा होता. तशांत मारुतराय व भिकारीण यांच्या हंसतमुखानें तर सभोंवार इतकी करुणा उत्पन्न झाली होती कीं, त्या करुणेच्या खोल डोहांत सर्व नगर बुडून जातें कीं काय असेंच सर्वांना वाटलें. कांहीं वेळानें भिकारीण 'राजा परदेशी' हें आवडतें गाणें वाटभर चालतां चालतां भैरव रागांत गाऊं लागली, तेव्हां इतरांना वाढता विषाद वाटूं लागला, यांत तर कांहींच नवल नाहीं. पण तिच्या व मारुतरायाच्या दंडाला बांधलेल्या दोऱ्या हातीं धरून जसा कसाई गाईच्या मानेचें दावें आपल्या हातीं धरून तिला कसाई खान्यांत चालवीत नेतो तसें त्या दोघांना मरणघराकडे चालविणाऱ्या मांगांच्या अंतःकरणांत देखील इतका ममतेचा उमाळा उत्पन्न झाला कीं, शिपायी भिकारणीला गाणें बंद करण्याविषयीं पावलोपावलीं बजावीत असतां व भिकारीण त्या बजावणीला मुळींच भीक न घालतां गाणें गात असतांही तिला गप्प रहा असें म्हणण्याची त्या मांगांची कांहीं छाती होईना.

अंमळशानें ही जित्या जिवांची प्रेतयात्रा शिकारखान्यासमोरच्या मैदानांत पोंचली. त्या मंडळींच्या मागोमाग ताराबाई व शिवाजी

पालखींतून तेथें येऊन थडकली. लगेच दवंडीवाल्यानें तीन वेळां पूर्वोक्त दवंडी पिटली. मारुतराय व भिकारीण यांना ज्या पटांगणांत लोटून देण्यांत आलें, त्याच्या चारी बाजूंना उंच उंच चिरेबंदी भिंती असून त्यांपैकीं एक भिंत म्हणजे चित्त्यांच्या पिंजऱ्याची एक बाजू करून त्या भिंतींत मजबूत लोखंडी गजांचा उघडझांपीचा दिंडीदरवाजा होता. शिकारखान्यावरील रखवालदाराला चित्त्यांचा पिंजरा साफ करावयाचा झाला म्हणजे त्यानें भिंतीच्या बाहेरील दगडी पायऱ्यांवरून भिंतीवर चढावें व तो दरवाजा वर ओढावा, म्हणजे चित्ते मुकाट्यानें पलीकडच्या पटांगणांत जात. पुन्हा दरवाजा लावून पिंजरा साफसूफ झाल्यावर दरवाजा पुन्हा उघडावा, कीं चित्ते पिंजऱ्यात येत. या भिंतीसमोरच्या भिंतीला एक मोठा मजबूद लांकडी दरवाजा होता. तो पटांगणाचा खरा दरवाजा. ह्याच दरवाजानें मारुतराय व भिकारीण यांना आंत कोंबण्यांत आलें होतें. अशा प्रकारची शिक्षा एखाद्याला द्यावयाची झाली कीं ती ह्याच जागीं देण्यांत येत असे. सामान्य मंडळीला हा देखावा पाहतां यावा यासाठीं सभोंवारच्या भिंतींना आंगचींच भोंकें राखून त्यांत बारीक लोखंडी गज बसविण्यांत आले होते. ताराबाई शिवाजीसह जी आली ती कांहीं निवडक बड्या मंडळीला ही क्रूर शिक्षा पाहतां यावी यासाठीं भिंतींतून अंमळ उंच अशा बांधीव जागीं मखमलीनें मढविलेल्या मऊ कोचावर जाऊन बसली.

लगेच ताराबाईनें चित्त्यांना मोकळे सोडण्याला हुकूम दिला. इतका वेळ हौशीनें चित्ते माणसांना कसे फाडून खातात तें पाहण्यासाठीं लोक पटांगणासभोंवार जमले होते, त्यांनीं हळहळत माना वळविल्या. मांग पिंजऱ्याचा दरवाजा उघडण्यासाठीं वर चढला. भिकारीण व मारुतराय हीं दोघेंही मात्र जरा देखील भ्यालीं नाहींत. त्या दोघांनींही ताराबाई बसली होती तिकडे तोंड करून हात जोडले व डोळे मिटून घेतले.

"आतां हात कशाला जोडतां? असल्या बेइमानी व बेगुमान

गुन्हेगारांविषयीं माझ्या अंतःकरणाला जरादेखील दयेचा पाझर फुटा-वयाचा नाहीं." ताराबाई आपल्या बसल्या जाग्यावरून ओरडली.

"आईसाहेब! तुम्हीं जीवदान द्यावें म्हणून मीं हात जोडले नाहींत; आजवर आपल्या अन्नावर जो हा देह पोसला त्याचा हा नैवेद्य आपल्याला दाखविणें आहे, तो पावता करून घ्या व ह्या जन्मापुरता मला ऋणमुक्त करा, एवढेंच आपल्या पायापाशीं माझें मागणें आहे. आईसाहेब! ज्या राज्यांत साधुसज्जनांचा अथवा गो-ब्राह्मणांचा छळ होतो, त्या राज्यावर राजलक्ष्मी रुसते व राज-मंदिराच्या भव्य मंदिराला कीड लागून तें कोसळण्याच्या पंथाला लागतें." मारुतराय म्हणाला.

"पाहूं आतां. ए! तूं चेटुक करतेस ना? आतां ह्या चित्त्यांच्या गरीब गाई बनव पाहूं! अग ए चेटकिणी!" ताराबाई अहंकारमदानें धुंदावलेल्या आवाजांत भिकारणीला म्हणाली.

पण भिकारणीचें ताराबाईच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. ती डोळे मिटून गाणें गाण्यांत समरस होऊन गेली होती. तेवढ्यांत मांगानें पिंजऱ्याचा दरवाजा उघडला. त्याबरोबर पिंजऱ्यांत इतका वेळ माणसांच्या वासानें वखवखून उड्या मारणाऱ्या चित्त्यांनीं डुरकण्या फोडीत पटांगणांत उड्या घेतल्या. हा वेळपर्यंत ताराबाईचे डोळे क्षणांत मारुतराय व भिकारीण यांकडे व क्षणांत त्या चित्त्यांकडे असे चौफेर तरळत होते, तेही तिनें आतां मिटून घेतले. शिवाजी तर यापूर्वीच घाबरून आपले हात डोळे मिटण्याला अपुरे पडतात कीं काय, म्हणून ताराबाईच्या अंगावरील रेशमी भरजरी शेल्यांत तोंड गुरफटून बसला होता. भिकारीण आपली गाणें गातच होती.

पण काय चमत्कार! चित्त्यांची जोडी जी पिंजऱ्यांतून डुरकण्या फोडीत बाहेर पडली, ते मारुतराय व भिकारीण यांच्यापाशीं जाते न जाते तोंच त्यांच्या आंगची हिंसावृत्ति लयाला जाऊन ते गरीब गाईप्रमाणें त्या दोघांच्या तोंडाकडे पाहत उभे राहिले. मारुतराय व भिकारीण ह्या दोघांनीं व ताराबाई आणि पटांगणासभोंवारची

इतर मंडळी यांनींही डोळे उघडून सविस्मय तिकडे पाहिलें. ते दोन्ही चित्ते आपले पुढचे पंजे उभारून आपल्या भक्ष्याकडे पाहत जबड्यांतून लळलळ जीभ काढून लाडिकल्या नजरेनें मागच्या दोन पायांवर उभे राहिले!

"मुक्ता–मारुत!" मारुतरायानें त्या चित्त्याकडे निरखून पाहत हांक मारली. त्याबरोबर ते दोन्हीही चित्ते माणसाळलेल्या कुत्र्यांप्रमाणें चट्कन् पुढें जाऊन मारुतरायाचा डावाउजवा पाय चाटूं लागले. तेवढ्यांत एका चित्त्यानें भिकारणीकडे टक लावून पाहण्याला सुरवात केली व भिकारणीनें 'मुक्ता' अशी हांक मारतांच ती छोटी चित्तीण भिकारणीच्या दोन खांद्यांवर आपले दोन पाय ठेवून मुलानें मातेचे मुके घ्यावे तसे तिचे मुके घेण्यासाठीं वळवळूं लागली. भिकारणीनें 'मुक्ते! लबाडे! आज इतक्या दिवसांनीं भेटलीस नव्हे का?' असें म्हणून तिला आंजारण्या-गोंजारण्याला सुरवात केली.

हा अभूतपूर्व देखावा पाहून जिकडे तिकडे 'ही जादूगारीण आहे' 'हा जादुगार आहे' 'ही भक्तीण आहे' 'हा साधुपुरुष आहे' असे मारुतराय व भिकारीण यांच्या गौरवपर उद्गार इतके निघूं लागले कीं, त्या संमिश्र आवाजानें तेथील वातावरण दुमदुमून गेलें. खुद्द ताराबाईलादेखील वाटलें कीं, ह्या दोन माणसांच्या आंगीं कांहीं तरी लोकोत्तरता आहे, यांचा छळ केल्यानें आपलें कल्याण कदापि व्हावयाचें नाहीं. लगेच तिच्या मनाला उपरति झाली. तिनें चंद्रसेनाला हांक मारून मारुतराय व भिकारीण त्या दोघांना सुरक्षितपणें पटांगणाबाहेर काढून देण्यास सांगितलें. पण ते दोन काळ त्यांच्याशीं लगट करीत होते; त्यांना कोंडावें कसें व मारुतराय आणि भिकारीण यांची मुक्तता करावी कशी हें कोणालाच कळेना. खुद्द शिकारखान्यावरचा माणूस देखील आपल्या हाताखालच्या त्या जनावरांना आवरण्याला कचरूं लागला. अखेर त्या दोघांही चित्त्यांना जरूर तर गोळ्या घालून ठार करावें असेंही ताराबाई म्हणाली. पण ज्यांच्यासाठीं त्या दोन जनावरांचा बळी पडावयाचा, त्यांना ही

योजना मुळींच रुचली नाहीं. त्यांनीं ताराबाईला हात जोडून विनविलें, "आईसाहेब! पाहिजे तर आम्हांला गोळ्या घालून ठार मारा; पण ह्या मुक्या जनावरांना मारूं नका. आपलींच लेंकरें हीं! राज्याच्या कल्याणकर्त्या निरपराधी माणसांना मारावयाचें नाहीं इतकी अक्कल त्यांना आहे. अशा अक्कलवान प्राण्यांना का ठार करावयाचें? त्यापेक्षां त्याच्या पायांत सोन्याचे तोडे घालून आपण त्यांचा गौरव केला पाहिजे. त्यांना कोंडावयाचा एथल्या मंडळीला एवढा बाऊ कसला वाटतो? हें पाहा, आम्हीं त्यांना त्यांच्या पिंजऱ्यात नेऊन सोडतों." असें म्हणून भिकारीण 'राजा परदेशी' हें गाणें गात पिंजऱ्याच्या दरवाजाकडे चालूं लागली. तिच्या मागोमाग मारुतराय 'मारुत! मुक्ता! चला' अशा हांका मारीत चालूं लागला. ताराबाई त्या जनावरांच्या शहाणपणावर इतकी खूप झाली कीं, तिनें ताबडतोब सोन्याचे तोडे आणून त्या दोघांच्या पायांत घालण्याला आज्ञा केली.

दोन्ही चित्ते पुन्हां पिंजऱ्यांत गेल्यावर पटांगणाचा दरवाजा मोकळा करून मारुतराय व भिकारीण यांना बाहेर घालवून देण्यांत आलें. त्यांना ताराबाई म्हणाली, "हें पाहा, आम्हांला यापुढें तुम्हां दोघांचीही हत्या करावयाची नाहीं. पण एकंदरीनें विचार करतां तुमचें राजधानींतील वास्तव्य आमच्या धोक्याचें आहे. यास्तव तुम्ही राजधानीची हद्द सोडून जा आणि तुमचे शाहूराजे आले म्हणजे माघारीं या"

"ठीक आहे आईसाहेब! आम्हांला काय, कांहीं झालें तरी सारखेंच." असें म्हणून भिकारीण आपलें आवडतें गाणें गात गात निघाली. तिच्या मागोमाग मारुतरायही निघाला. तीं दोघें वेशीपार होईतों त्यांना सोबत करण्याचें जबाबदारीचें काम चंद्रसेनाकडेच आलें.

इतकें सारें झालें तरी ती बाई कोण, तो मारुतराय कोण, त्यांना चित्त्यांनीं फाडून कां खाल्लें नाहीं, वगैरे गोष्टींचें गहन गूढ कोणालाच उकलतां आलें नाहीं.

## प्रकरण सव्विसावें

# शाहूमहाराजांच्या जिवावर मारेकरी !

“आज बाळ इतका कां बरें रडतो आहे?” पलीकडच्या दालनांतून तान्ह्या मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकून शाहूमहाराजांनीं विरूबाई त्यांचे पाय चुरीत बसली होती तिला विचारलें.

“उगाच रडत असेल.” विरूबाई म्हणाली.

“आजारी-बिजारी तर नाहींना?”

“छे! आजारी कुठचा? आतां मीं त्याला खालीं ठेवला तेव्हां तो चांगला हंसत खिदळत होता.”

राजाराणीचा हा संवाद डेऱ्याच्या पडदेवजा भिंतींतून पलीकडे ऐकूं जाण्याला अडचण नव्हती. डेरा तो काय! शाहूमहाराज मोठे राजेलोक खरे; पण राजेलोक मोहिमेवर निघाल्यावर राजवाडे थोडेच बरोबर हिंडवणार! बरें, खेड कडूससारख्या खेड्यांत तरी खेडवळ गोरगरिबांच्या झोंपडीशिवाय राजवाडे व मंदिरें कोठून असणार! यासाठीं शाहूमहाराज दक्षिणेंत यावयाला निघतांच त्यांनीं बादशाही थाटाप्रमाणें सर्व प्रवासी लवाजमा व सामग्री आपणाबरोबर घेतली होती. खुद्द शाहूमहाराजांच्या परिवाराच्या डेऱ्याला लागूनच पारद येथें अकल्पितपणें शाहूमहाराजांच्या पदरीं पडलेल्या लोखंडे पाटलाच्या बाळबाळंतिणीची व्यवस्था केली असल्यानें शाहूमहाराज विरूबाईशीं बोलत होते तें बाळंतिणीला तेव्हांच ऐकूं गेलें. ती तिकडून उद्गारली, “राणीसाहेब! फत्तेसिंगाचें न्हाणें चाललें आहे म्हणून तो रडतो आहे.”

‘फत्तेसिंगाचें न्हाणें चाललें आहे’ हे त्या बाईच्या तोंडचे शब्द ऐकतांच शाहूमहाराज पुन्हा बाह्यात्कारीं विरूबाईला मध्यें घालून पण खरें पाहू गेलें असतां त्या बाईलाच उद्देशून म्हणाले, “बरें का;

आतां फत्तेसिंगाला कोणी साध्या एकेरी नांवानें संबोधावयाचें नाहीं. तो आतां लोखंडेपाटलाचा पोरगा उरला नसून ते आतां शाहूराजे भोसले यांचे धर्मपुत्र फत्तेसिंगराजे भोंसले झाले आहेत."

"ऐकलें का हो!" विरूबाईनें बाईला हांक मारून हंसत हंसत विचारलें.

"हो! ऐकलें." बाई आनंदानें उत्तरली, "आमची चूक आम्ही पदरांत घेतों. अशी चूक पुन्हा होऊं देणार नाहीं."

असा शाहूमहाराजांचा विरूबाईशीं आमोदप्रमोद चालला असतां महाराजांचा आवडता खंड्या कुत्रा किंचाळत लंगडत लंगडत थेट शाहूमहाराजांच्या पर्यंकापर्यंत आला. हा कुत्रा शाहूमहाराजांनीं बादशहाच्या नजरकैदेंत असल्या वेळेपासून जवळ बाळगिला होता. तें बोलूनचालून जनावर; पण त्याचा महाराजांवर इतका लोभ होता कीं, त्यावरून विरूबाईही महाराज रंगांत असलेले पाहून 'आपला धर्मपुत्र खंडू छत्रपति आला' असा विनोद करी. शाहूमहाराजांचेंही खंड्यावर पोटच्या मुलाप्रमाणें प्रेम होतें. महाराज कोणत्याही परिस्थितींत असले तरी खंड्याला त्यांच्यापाशीं जाण्याला मुळींच मज्जाव नसे. तो नेहमीं बसावयाचा तो देखील शाहूमहाराजांच्या पायांपाशीं युवराजाप्रमाणें बसावयाचा. विरूबाईवर शाहूमहाराजांचें निस्सीम प्रेम होतें व तीही त्यांच्या ठायीं निस्सीम पतिव्रताधर्मानें वागत होती हें खरें. तरीही कधीं काळीं महाराज तिच्यावर रागावले तर वेळीं ती क्षणभर त्यांचा राग शांत होईतों त्यांच्या डोळ्यांआड होई. पण खंड्याला मात्र कधींही महाराजांच्या रागाला बळी पडण्याचा प्रसंग येत नसे.

तोच खंड्या आज लंगडत व केंकाटत आंत आलेला पाहतांच शाहूमहाराज एकदम बिछान्यावर उठून बसले व खंड्याला जवळ हांक मारून त्याचा दुखावलेला पाय हातीं घेऊन. रागानें म्हणाले, "खंड्याला कोणीं मारलें!" लगेच शाहूमहाराजांनीं संभाजीला हांक मारली,

पहिल्या हांकेला जरी नाहीं तरी तशीच दुसरी हांक शाहूमहाराजांनी मारतांच संभाजी हात जोडून समोर येऊन उभा राहिला.

"संभाजी! खंड्याला कोणीं मारलें?" शाहूमहाराजांनीं विचारलें.

"सरकार! खंड्या आपला कुत्रा तसाच मीही आपलाच कुत्रा. कुत्रे कुत्रे आपसांत भांडले तर धन्यानीं तें भांडण मनावर घेऊं नये. कुत्र्याची जात, वाईट वस्तु हुंगावयाला गेली म्हणून मीं दगड फेंकला, तो त्याच्या पायाला लागला असेल." संभाजी म्हणाला.

"तें खरें. पण तू कुत्रा कालचा आहेस व हा खंड्या आमचा जन्माचा सोबती आहे. एक वेळ तुला तुझ्या अपराधाबद्दल क्षमा केली आहे. पुन्हा असा गुन्हा झाल्यास कडक शासन होईल." अशी शाहूमहाराजांनीं संभाजीला सक्त ताकीद देऊन खंड्याच्या पायाला औषध लावण्याची व्यवस्था करण्यासाठीं जावयाला सांगितलें.

संभाजी मुजरा करून तेथून निघून गेला. वास्तविक आज संभाजीला अर्धचंद्रच मिळावयाचा. पण सातान्याहून आपलीं कुटिल कारस्थानें पार पाडण्याच्या इराद्यानें संभाजी जो निघाला, तो थेट शाहूमहाराजापाशीं आला व आपण धनाजी जाधव सेनापतीचा नातू असून त्याचा राजनिष्ठेचा निरोप घेऊन मुद्दाम पुढें आलों आहों; तसेंच ताराबाई आपला दुष्टावा करीत असून तिचे कांहीं मारेकरी आपल्या जिवावर संकट आणण्याच्या इराद्यानें रवाना झाले असल्यानें त्यांना वेळींच ओळखून त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं आपणाला महाराजांच्या पायांपाशीं खडा पहारा करीत राहिलें पाहिजे; असें सांगून तो शाहू महाराजांच्या खास तैनातींतील हुजऱ्या बनल्यामुळें आज एथें त्याचा बचाव झाला. जो कावा मनात धरून संभाजी सातान्याहून निघाला, तो त्याचा कावा एथवर तर साधलाच. आतां यापुढचा प्रश्न शाहूमहाराजांना जगांतून नाहीसें कसें करावयाचें हा होता व तो सोडविण्यासाठीं संभाजीची शिकस्त चालली होती. ताराबाईविरुद्ध फितुरी करण्याचा आव आणून त्यानें शाहूमहाराजांचा विश्वास तर खूप संपादन केला होता. आतां त्याच्या बेतांत आड

येणारे असे त्याच्याहूनही शाहूमहाराजांना जास्त जवळचे असणारे विरूबाई व खंड्या हे दोनच जीव होते. विशेषतः खंड्याचा वचक त्या ा मोठा होता. खंडू नेहमीं शाहूमहाराजांच्या बरोबरीनें त्याच्या शरीरसंरक्षकासारखा फिरावयाचा, व शाहूमहाराज डेऱ्यांत असले तर दरवाज्यावर याचा खडा पहारा असावयाचा. त्यामुळें कोणाही माणसाला केव्हाही शाहूमहाराजांजवळ जावयाचे आ ,—फार कशाला, खुद्द विरूबाईला महाराजांच्या शयनमंदिरात जावयाचें असलें तरी खंड्याला हांक मारून, आपण शत्रुपक्षाकडी नहीं अशी त्याची खातरजमा करून देऊन मग जावें लागे! संभाजीला तेथल्या दोन-तीन दिवसांच्या वास्तव्यांत खंड्याचा हा दरारा पूर्णपणें माहीत झाला होता, व त्यावरून आपल्या वाटेंतील हा कांटा दूर केल्या-शिवाज आपणाला कोणत्याही उपायानें आपले बेत सिद्धीस नेता यावयाचे नाहींत याची त्याला शंका उरली नव्हती. म्हणूनच हर उपायानें प्रथम खंड्याची पिडा टाळली पाहिजे अशी स्वतःच्या मनाशीं खूणगाठ बांधून तो त्या मार्गाला लागला होता. साताऱ्याहून निघाल्यापासूनच संभाजीनें सर्व बाजूंनीं चपळाई चालविली होती. एकवार जर धनाजी जाधव, प्रतिनिधि वगैरे मंडळी तेथें येऊन पोंचली, तर आपणाला ही गुप्त मसलत तडीस न्यावयाला फार जड जाईल हें संभाजी पूर्ण ओळखून होता. सैन्य येईल, वेळीं शाहू-महाराजांचा मोड करून ताराबाईच्या पक्षाला विजय मिळवून देईल. पण शाहूमहाराजांना ठार करावयाचा बेत कोणालाही रुचला नसता. खुद्द ताराबाईदेखील हा अनर्थ ह्या थराला नेऊन भिडविण्याच्या कामीं तितकीशी सामील नव्हती. तिची एवढीच इच्छा कीं, शाहूचा मोड होऊन मराठशाहींत त्याचे पाय रुजूं नयेत. म्हणूनच त्यानें ताराबाईला नकळत साधल्यास शाहूमहाराजांना जगांतून नाहींसें करून मग त्या पराक्रमाबद्दल तिच्यापाशीं अचानक बक्षिस मागावयाचें ठरविलें होतें.

आपल्या ठराविक गुप्त बेतांना शक्य तेवढ्या तांतडीनें मूर्त स्वरूप

देण्यासाठीं खंड्याला फितुरींत सामील करण्याचा बेत जेव्हां फसला तेव्हां संभाजीनें त्याला कायमचा आपल्या वाटेंतून दूर करण्यासाठीं जंगली जनावरांना मारण्याकरितां स्वारींत बरोबर घेण्यांत आलेलें विष हरउपायांनीं मिळवून तें दूधभाकरींतून खंड्याला चारण्याचा नवा डाव रचिला. पण खंड्याला असें कसें शहाणपण होतें नकळे; त्या गुलामानें त्या विषारी खाद्याकडे एक वेळ हुंगून पाहिलें मात्र, व त्याला जीभदेखील लावली नाहीं इतकेंच काय; पण संभाजी त्याला बळेंच ओढून दूधभाकर चारूं लागला तेव्हां तो संभाजीचा चावाच घ्यावयाला उठला. आतां आपणाला हा डसणार असें पाह- तांच संभाजीनें आपल्या हातांतील काठीचा एक जोराचा फट्कारा त्याच्या पायांवर मारला. त्या वेदनांनीं विव्हळत खंड्या शाहूमहाराजां- पाशीं धांवत आला होता.

हा डाव फसल्यानंतर संभाजी जो खंड्याच्या पायाला औषध लावण्याची व्यवस्था करण्यासाठीं आला, तो तें करून मग थेट शाहू- महाराजांच्या डेऱ्यापासून दूरच्या नांदुरकीच्या वृक्षाकडे वळला. तो तेथें जाऊन पोंचतांच त्याचे दुसरें दोघे साथीदार पुढें आले. हे साथीदार त्या गांवांतील ओझ्यांचीं गाढवें हांकणारे बेलदार होते. साताऱ्याहून निघतांनाच सभाजीनें चंद्रसेनाकडून असल्या कांहीं बाजारबुणग्यांना चारण्यासाठीं शंभर मोहरा व दहा मोहरांचें चिल्हर नाणें एवढा पैसा घेतला होता. त्या पैशाच्या जोरावर त्यानें तेथें येतांच गांवांत हिंडून हे दोन बेरड गांठले व पांच पांच मोहरांनीं त्यांच्या मुठी दाबून त्यांना वश करून घेण्याचें पहिलें काम केलें. त्या रानटी बेलदारांना काय; जो कोणी पैसा देईल तो सांगेल तें काम करण्याला त्यांची तयारी! संभाजी नांदरुकीच्या वृक्षाखालीं जाऊन पोंचतांक्षणीं ते दोघे त्याच्यासमोर येऊन उभे राहिले.

"तंट्या! तुफान्या! तुम्ही अगदीं सांगितल्याप्रमाणें वेळेवर येथें येऊन हजर झालां!" संभाजी त्या दोघांच्या जवळ जाऊन त्यांच्या खांद्यावर हात ठेवून हंसत हंसत बरोबरीच्या नात्यानें म्हणाला,

" हजर झालों म्हणजे राव ! आम्ही हलक्या जातीचे असलों तरी इमान म्हणजे इमान ! आम्ही शब्द देऊं तिथें प्राण देऊं; पण दिलेला शब्द खालीं पडू देणार नाहीं बघा !" त्या दोघां बेलदारांपैकीं एक, आंगानें विशेष बळकट व चर्येनें विशेष उग्र होता तो—तंट्या म्हणाला.

" शाबास ! असेंच इमान पाळलें पाहिजे. एवढें काम तुमच्या हातून बिनबोभाट पार पडलें, कीं मग तुम्हांला मी माझ्याबरोबर आमच्या ताराबाई आईसाहेबांकडे साताऱ्याला घेऊन जाणार."

" पण काम कसलें तें आम्हांस्नी सांगाना राव !" तुफान्या म्हणाला.

" आणि ह्या तुमच्या ताराबाई आईसाब कोन ?" तंट्यानें विचारलें.

" अरे ! तुला ताराबाई आईसाहेब माहीत नाहींत? ह्या राज्याचे छत्रपति धाकटे शिवाजीमहाराज आहेत ना, त्यांची ही आई." बरें आतां ऐका. त्या आपल्या महाराजांच्या राज्यांत लुटालूट करण्यासाठीं दिल्लीच्या बादशहाचा लेंक शाहू असें नांव बदलून आला आहे. त्याचा तळ सध्यां इथें आहे."

" हतं तर शाहूमहाराज हायती! त्यांस्नी हें सांगाया होवं." तंट्या व तुफान्या एकदम म्हणाले, " मायबाप सरकार ! त्यांची आम्ही परजा. त्येंनीं सांगितलं, तर बादशहाच्या लेकालाच काय, त्येच्या बालाबी आम्ही पानी पाजून शानी येऊं, येवढं मनामधीं पक्कं वोळखा राव !" तंट्या म्हणाला.

शाहूमहाराजांविषयींचा आदरभाव महाराष्ट्रजनतेच्या मनांत किती खोलवर रुजला गेला आहे, याचे संभाजी साताऱ्याहून एथवर येईतों सारखे दाखले घेत होता. कांहीं कांहीं खेड्यांतून तर कोणी शाहूमहाराजांच्या विरुद्ध तोंडावाटे ब्र तरी काढील त्याला इतर गांवकऱ्यांनीं तात्काळ जमीनदोस्त करावें, असले प्रकारही त्यानें पाहिले होते. अशा कांहीं प्रसंगीं अडाणी गांवकऱ्यांशीं गांठ पडली असतां

'मी शाहूमहाराजांचा हेर आहें' असें सांगून त्याला स्वतःचा बचाव करून घेणें प्राप्त झालें होतें. शाहूमहाराजांविषयींच्या पूज्य भावनेची लाट महाराष्ट्रांत दाही दिशांना अशी कशी उसळून राहिली होती, परमेश्वर जाणे! मानवी कर्तबगारीच्या अतीत अशी ही दैवी योजना होती हेंच खरें. संभाजीनें कोठेंही जावें व शाहूमहाराजांच्या विरुद्ध तोंडावाटे नुसता ओझरता उद्गार काढावा, कीं त्याला तेथून जिवंत सुटण्याचीदेखील पंचाईत! अशा दैवी परिस्थितीशीं टक्कर देऊन संभाजीला आपला पाशवी बेत पार पाडावयाचा असल्यानें त्यानें खेडला येतांच आपल्या बेतांना मूर्त स्वरूप देण्यासाठीं आपल्या मतें महाराष्ट्राचा राजा कोण व बादशहा कोण हें देखील ज्यांना माहीत असण्याचा संभव नाहीं अशा ह्या तंट्या व तुफान्या नांवाच्या दोघां बेलदारांना वेठीला धरिलें होतें, व त्यांनादेखील आपला कावा हा वेळपावेतों कळूं दिला नव्हता. पण आतां निरुपाय झाल्यामुळें त्याला त्या दोघांच्या डोळ्यांत खऱ्या वस्तुस्थितीच्या विपर्यासाची धूळ फेंकून त्यांना आंधळें करून आपल्या मागोमाग चालवावयाचें असल्यानें त्यानें त्या दिशेनें बोलावयाला सुरवात केली. पण तो इथें पाहतो तरीदेखील शाहूमहाराजच जनतेचे आवडते!

आतां कसें करावें, ह्या दोघा अडाणी साथीदारांना कसें चकवावें, याचा क्षणभर विचार करून तो म्हणाला, "तंट्या! तुफान्या! आतां तुम्हीं गोष्टच काढली म्हणून तुमच्यापाशीं मी खरें बोलतों, कोणाला हें सांगावयाचें नाहीं. खरेखुरे शाहूमहाराज बादशहाच्या हातावर तुरी देऊन निसटले ते केव्हांच साताऱ्याला जाऊन पोंचले आहेत, व तेथल्या किल्ल्यांत ते ताराबाई आईसाहेबांपाशीं सुरक्षित आहेत. त्यांच्यावर बादशहाचा घुस्सा झाल्याकारणानें त्यानें त्यांचा नायनाट करण्यासाठीं आपल्या लेंकाला तोतया शाहू बनवून पाठविलें आहे. येथें येऊन पोंचलेल्या तोतयाची फौज किती अफाट आहे हें तुम्ही पाहतांच आहां. त्याच्याशीं उघड उघड सामना करून आपला खरा टिकाव लागावयाचा नाहीं, म्हणून अशा डावपेंचांनीं

त्याला नाहींसा करण्याच्या कामावर शाहूमहाराज व ताराबाई आई-साहेब यांनीं माझी नेमणूक केली आहे."

"असं काय? मग ठीक आहे. आतां सांगा राव, आम्हांस्नी काय करायचं तें बिगिबिगि सांगा." तंट्या म्हणाला.

"आपण आतां एवढेंच करावयाचें;" संभाजी म्हणाला, "मी इथें येतांच हरउपायांनीं त्या तोतयाच्या पदरीं हुजऱ्याची नोकरी धरली आहे. त्याचा माझ्यावर अलोट विश्वासही आहे. त्यामुळें वेळीं अवेळीं केव्हांही त्याच्या डेऱ्यांत आपणाला घुसतां येईल."

तुफान्या मध्येंच म्हणाला, "पण त्या तिथं एक कुत्रा आहे तो ज्यास त्यास चावा घेतो म्हणतात"

"होय. पण त्या कुत्र्याचा बंदोबस्त मी करतों. वेळ पाहून त्याला गोळी घालून ठार करूं नि काय! मग तुम्ही माझ्या मागोमाग बुरखे घेऊन तेथें यावयाचें. मी तुम्हांला गुपचुप आंत सोडीन. तिथें तोतया व त्याची बायको झोंपी गेलीं असतील त्यांना कापून काढायाचें."

"पण राव! हा बार कधीं उडवायचा?" तंट्यानें विचारलें.

"आज रात्रौ मध्यरात्रींच्या सुमाराला."

"बरें तर; असं करायाचं ठरलं. आज रात्रौ आम्हांस्नी बाद-शहाच्या लोकांच्या डेऱ्यापाशीं यायाचं असंच ना?" तुफान्यानें विचारलें.

"होय. तुम्ही या; मग पुढें कसें काय करावयाचें तें आपण पाहूं. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं तोतयाच्या डेऱ्यासभोंवार खडा पहारा असतो. त्यांतून परक्या माणसाला आंत येतां यावयाचें नाहीं. या-साठीं जेव्हां जेव्हां कोणी पहारेकरी तुम्हांला हटकील तेव्हां तेव्हां त्याला 'राम राम' हा खुणेचा शब्द सांगत जा, म्हणजे कोणी तुम्हांला आडकाठी करणार नाहीं. इतकेंही करून कोणी पोटांत शिरून विचारूं लागलाच तर त्याला आपण शाहूमहाराजांचे हेर आहों असें सांगा. एवढें मात्र लक्षांत ठेवा; लोकांशीं बोलतांना त्या तोतयाला शाहूमहाराज म्हणावयाला चुकावयाचें नाहीं."

"ठीक आहे. पण एवढें काम अक्शी केल्यावर आमची बक्षिसी राव?" तंट्यानें विचारलें.

"अरे गुलामांनो! काम झाल्यावर बक्षिसीला रे तोटा काय? मी तर ठरल्याप्रमाणें आणखी दहा दहा मोहरा देईनच; पण आपण सारेजण मग जेव्हां साताऱ्याला जाऊं तेव्हां मी शाहूमहाराजांकडून तुम्हांला एकेक सोन्याचें कडें बक्षीस देववीन. मग तर झालें?" संभाजी म्हणाला.

तंट्या व तुफान्या ह्या दोघांची समजूत तेव्हांच पटली. ते रात्रौ भाकर खाऊन येतों असें सांगून आपल्या झोंपड्यांकडे निघाले. त्यांच्या मागोमाग संभाजीही निघाला. ते तिघेही अंमळ दूर जातात न जातात तोंच नादरुकीला लागून असलेल्या जाळींतून कोणाचे तरी सहा डोळे त्यांना नकळत त्यांच्याकडे टवकारून पाहूं लागले. संभाजी, तंट्या व तुफान्या जसजसे आडवाटेचीं वळणें घेत घेत एकामागून एक जाळ्या ओलांडीत चालले, तसतसे हे सहाही डोळे लपत छपत जाळीमागून जाळी ओलांडीत त्या तिघांवर अचूक नजर रोंखून चालूं लागले. पण संभाजी वगैरे तिघांच्या पाठीला डोळे नसल्यानें त्यांना मागचें कांहींच दिसत नव्हतें.

## प्रकरण सत्ताविसावें

# रत्नावलीशीं हितगुज

"तुमच्या आमच्या वांट्याला एकाच फुटक्या नावेंतून प्रवास करायाचें आलें आहे बाई! आतां असें रडून कसें चालेल!" असें म्हणून ती भिकारीण रत्नावली व हिरू यांचें भर रस्त्यांत शांतवन करूं लागली. मारुतरायानेंही त्यांना दोन हिताच्या गोष्टी सांगितल्या. पण फुकट!

"पण आतां आमच्या जन्माची काय वाट होईल? आजवर राजवाड्यांत सुखानें एवढें आयुष्य गेलें नि आतां ही दशा आली!" रत्नावली डोळ्यांना पदर लावून रडत म्हणाली, "माझे घरधनी मेल्यापासून मी ह्या एका पोरीकडे पाहून कसेबसे दिवस कंठतें आहें. मी माझ्या हिरूच्या नशिबाला तरी त्या परिस्थितीची झळ लागूं नये म्हणून मीं तिला आजवर फुलांत घालून वागविली व तिच्या रूपा-गुणांकडे पाहून चंद्रसेनानें तिला आपल्या संभाजीला बायको करून घेण्याचें कबूलही केलें होतें. हा संबंध आईसाहेबांच्या शब्दानें जुळून यावयाचा होता. पण!–" रत्नावली हिरूकडे बोट दाखवून म्हणाली, "पोर दळभद्री हो दळभद्री! आतां चंद्रसेन हिला कसली सून करतो!"

रत्नावलीचे हे बोलून ऐकून हिरूला देखील अत्यंत खेद झाला व तिच्या डोळ्यांतून आंसवांच्या गंगायमुना वाहूं लागल्या. ती कांहीं आतां लहान नव्हती, चांगली सोळा वर्षांची तरुणी होती. तिला संसारांतील खारट तुरट सारें कांहीं कळत होतें.

रत्नावली गहिंवर दाटून आल्यामुळें क्षणभर थांबून म्हणाली, "बाई! आमच्या नशिबाचा योगच असा विचित्र आहे कीं, आमच्या हातीं सोन्याची माती व्हायची! नाहीं तर पाहा! आम्ही कैक पिढ्यां-

पासून—आमचे आजोबा सांगत त्यावरून आम्हांला माहीत कीं, आम्ही शहाजीराजांपासून भोंसल्यांची सेवा करीत आलों. थोरल्या शहाजीराजांचे आजोबा बाबाजीराजे भोंसले देऊळगावीं येऊन राहूं लागले तेव्हांपासून आम्ही पवार त्यांच्या स्नेहसंबंधात व ऋणानुबंधांत आहों. पण तेव्हांपासून आजपर्यंत हे भोंसलेच आमचें वाटोळें व्हायला कारणीभूत होत आले आहेत. ज्या भोंसल्यांच्या आंगी कर्तबगारी होती त्यांनीं त्या परीनें छळलेंच; पण हा छत्रपतिसुद्धां असा वेडा व बावळट तरी त्यानें देखील माझ्या पोरीच्या नशिबाला चूड लावली!"

"पण यांतूनही तुझें व तुझ्या हिरूचें कल्याण होणार नसेल कशावरून!" मारुतराय रत्नावलीची समजूत पाडण्यासाठीं म्हणाला, "परमेश्वर कधींच कोणाचें अकल्याण करीत नाहीं."

"मग, यांत परमेश्वराने माझें व माझ्या पोरीचें कोणतें कल्याण पाहिलें? आम्ही अन्नाला महाग झालों, व सोन्यासारखें पोरीचें लग्न जमत होतें, त्यांत बिघाड आला. यांत आमचें कोणतें कल्याण परमेश्वरानें साधलें बरें?" रत्नावलीनें विचारलें.

त्यांतलें कल्याण तुला कळलें नाहीं तर तो तुझा अन्याय. पण तूं माझें ऐक, परमेश्वरावर भरंवसा ठेवून दिवस काढ. असें पाहा, एक राजा होता व त्याचा माझ्यासारखा एक म्हातारा प्रधान होता. राजाला प्रधानानें नेहमीं परमेश्वरावर भरंवसा ठेवून वागावयाला सांगावें व राजानें प्रधानाचा वडीलपणाचा शब्द विश्वासानें पाळावा. पुढें एके दिवशीं राजा प्रधानासह शिकारीला गेला तों घोर जंगलांत सर्वजणच वाट चुकले, व राजाचा घोडा उधळून भलत्याच दिशेला झुकला. राजा प्रधानाच्या उपदेशाप्रमाणें परमेश्वरावर भरंवसा ठेवून चालला असतांना त्याच्या मांडीखालच्या घोड्यानें एका कांटेऱ्या दरींत उडी मारली. त्या आघातानें तें बेफाम जनावर तर तात्काळ मेलेंच; पण राजालाही जबर दुखापत झाली. प्रधानानें आपणाला ठार मारून राज्य बळकावण्याच्या इराद्यानें आपणाला मुद्दाम ह्या आडवाटेनें शिकारीला आणलें अशी राजाची समजूत होऊन घरीं जातांच

प्रधानाला घोर शासन करावयाचें त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें. इतक्यांत चार जंगली लोक कालीदेवीला नरबलि देण्याच्या हेतूनें माणसाच्या शोधार्थ आज चार दिवस वणवण हिंडत होते, ते अचानक तेथें आले. त्यांनीं राजाला पाहतांच 'हा बलि चांगला सांपडला' असें म्हणून त्याला तेथून उचलून कालीच्या मंदिरासमोर नेलें. आतां आपण मरणार व हा सारा आपल्या दुष्ट प्रधानाचा कावा, अशी राजाची खात्री होऊन चुकली. आता ह्या अरिष्टांतून जिवंत बचावून आपण पुन्हा आपल्या राजधानीला गेलों तर प्रधानाला फांसावर चढविणार असाही त्याच्या मनाचा निश्चय झाला. राजाला कालीसमोर नेण्यांत येताच त्याच्या सर्वांगावरील कपडे काढून आंग तपासण्यांत आलें. कारण कालीला द्यावयाच्या बलीच्या आंगांतून कोठेंही जरादेखील रक्त बाहेर पडलेलें असतां कामा नये, असा बलिदानाविषयींचा नियम होता. पण राजाच्या आंगावर तर अपघातामुळें ओरखडे निघाले होते. तेव्हां हा बलि निरुपयोगी आहे असें पाहून ते जंगली लोक त्याला तसाच तेथें सोडून दुसऱ्या मनुष्याच्या शोधार्थ दूर निघून गेले. तेवढ्यात प्रधान आपल्या लवाजम्यासह राजाचा शोध करीत तेथें आला. राजाला पाहतांच सर्वांना आनंद झाला. राजाची विचारबुद्धीही आतां जागृत झाली होती. अरण्यांतून आज आपली मुक्तता होण्यासारखी नव्हती व आपले दहा लोक दहा दिशांना पांगलेले होते, अशा स्थितींत अपघात होण्यापूर्वी आपण त्या जंगली लोकांच्या हातीं लागलों असतों तर आपल्या आंगावर रक्ताचें टिपूसही न आढळल्यामुळें त्यांनीं कालीसमोर आपला बलि दिला असता; यासाठीं ईश्वरानें अपघात घडवून आणला अशी राजाची खात्री झाली व त्याचा प्रधानाच्या ठायींचा विश्वास दुणावला." ही गोष्ट सांगून मारुतराय रत्नावलीला म्हणाला, "यावरून रत्नावली! परमेश्वरावर भरंवसा ठेवून वागल्यानें आपलें कसें कल्याण होतें हें तूं पाहा."

मारुतरायाच्या उपदेशानें रत्नावलीच्या जिवाचा बराच विरंगुळा

झाला. आईचें दुःख ओसरलेलें पाहून हिरूचें दुःखही आपोआपच ओसरलें.

"पण आतां आपण जायचें कुठें?" रत्नावलीनें विचारलें.

"आपणाला काय? आपण सारींच हद्दपार झालेलीं माणसें आहों. आपणाला घरदार नाहीं, सगासोयरा नाहीं. म्हणून सारें जग हें आपलें घर, जगांतलीं माणसें हीं आपलीं सोयरींधायरीं." भिकारीण म्हणाली.

"खरें; पण बाई! तुम्ही अजून जिवंत कशा?" रत्नावली मारुतरायाकडे पाहत म्हणाली, "आईसाहेबांनीं तुम्हांला शिक्षा दिली होती ना?"

"होय. पण देव तारी त्याला कोण मारी?" असें म्हणून भिकारणीनें सर्व वृत्तांत रत्नावलीला निवेदन केला.

"सारें खरें; पण चित्त्यांनीं तुम्हां दोघांनाही खाल्लें नाहीं कसें, याचें मला आश्चर्य वाटतें! एकूण तुमच्यापाशीं कांहीं चेटुक आहे असें आईसाहेब म्हणतात तें खरें तर?" रत्नावलीनें विचारलें.

इतक्यात चंद्रसेन घोडा उधळीत उधळीत तेथें आला. त्याला पाहतांच सर्वांचीं तोंडें एकदम बंद झालीं. मारुतराय व रत्नावली यांना वाटलें कीं, आपणांवर हें एखादें नवें अरिष्ट कोसळत असावें. पण भिकारणीला तसें वाटलें नाहीं. सावजाच्या वासानें वाघ येतो तसा आपल्यासाठीं चंद्रसेन आला असावा अशी तिची खात्री झाली.

"हें काय? तुम्ही अद्याप इथेंच? हें आईसाहेबांना कळलें तर तुमची धडगत नाहीं." चंद्रसेन म्हणाला.

"मला वाटलें कीं तुम्हीच आम्हांला पकडण्यासाठीं आलां." भिकारीण म्हणाली.

"छे! मी तुमच्या संरक्षणासाठीं आलों आहें. रत्नावली व तूं अशा दोघींच्या ठायीं दोन परींनीं माझा जीव गुंतलेला आहे.—" एवढें बोलून चंद्रसेन थबकला. मारुतरायानें त्याच्याकडे असे तीव्र नेत्रकटाक्ष फेंकण्याला सुरवात केली कीं, तो तात्काळ भांबावूनच गेला.

भिकारणीच्या ठायीं आपला जीव गुंतलेला आहे असें आपण म्हणालों त्याचा मारुतरायाला राग आला असावा हें त्यानें तेव्हांच ओळखलें.

नामर्द! बापाचें नांव कांहीं तरी राखावयाचें होतेंस! धनाजी इतक्या म्हातारपणींदेखील रणांगणांत शीर हातावर घेऊन लढण्यासाठीं देशोदेशीं चालला आहे आणि तूं त्याचा कर्ता मुलगा परक्या बायकांच्या नादांत जीव गुंतवून भागूबाईसारखा घरांत बसला आहेस! शेंदाडशिपाई कुठचा! बांगड्या भर बांगड्या!" मारुतराय उद्गारला.

चंद्रसेन एरव्हीं मनाचा कितीही नीच असला तरी शौर्य व मानीपणा यांचा विचार करतां सिंहाचा छावा होता. पण मारुतरायाच्या साधुत्वाबद्दल व दैवी सामर्थ्याबद्दल त्याच्या मनांत विश्वास असल्यानें त्यानें अंमळ पड खाल्ली व सौम्य शब्दांनीं सांगितलें, "मारुतराय! तुम्ही संशय घेतां तसा कोणताच वाईट हेतु मनांत धरून मी बोललों नाहीं. रत्नावलीची हिरू माझी सून व्हावयाची आहे, व ह्या बाईच्या संरक्षणाची जबाबदारी मीं माझ्या शिरावर घेतली आहे."

आतां हा वाद कदाचित् भलत्याच थराला जाऊन पोंचेल, तसें होऊं नये म्हणून भिकारणीनें एकीकडे मारुतरायाला डोळ्यांनीं खूण करून दुसरीकडे चंद्रसेनाला म्हटलें, "सारें खरें; पण एक गोष्ट मात्र तुम्हीं माझ्या मनाविरुद्ध केली. मारुतीला तुम्हीं अखेर ठार केलेंच!"

"होय. पण ती गोष्ट माझ्या आवांक्याबाहेरची होती. मीं माझ्या परीनें त्याचा कर कर तपास केला; पण तो सांपडला नाहीं."

"बरें; तें झालें तें होऊन गेलें. पण तुम्हांला अजून माझ्या कल्याणाविषयीं तरी कळकळ वाटते ना? माझ्या हिरूला सून करून घेण्याचें वचन तुम्हीं मला दिलें आहे तें पाळण्याची अजून तुमच्या मनाची तयारी आहे ना?" रत्नावलीनें वेळ साधून विचारलें.

"होय." चंद्रसेन उत्तरला.

"बरें; मारुतीचें एक सोडून देऊं. तें होणें जाणें कांहीं तुमच्या हातचें नव्हतें. त्यांतूनही तो देवदयेनें जिवंत सांपडलाच तर—"

"तर त्याच्या केंसालाही धक्का लागणार नाहीं, अशी हमी मी घेतों, मग तर झालें?" चंद्रसेनानें उत्सुकतेनें विचारलें.

"होय. पण माझी अट तुमच्या लक्षांत आहे ना?" भिकारणीनें विचारलें.

"होय." चंद्रसेन मंद आवाजांत उत्तरला. त्यानें भिकारणीला 'तूं माझी हो' असें सांगितलें होतें, तेव्हां शाहूमहाराजांचे पाय वाड्याला लागल्यावर त्याच्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें तिनें कबूलही केलें होतें. ही अट आपल्या हातून कधींही पूर्ण व्हावयाची नाहीं अशी चंद्रसेनाची मनोदेवता त्याला वारंवार साक्ष देत असतांही त्याला या वेळीं होकार देण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

"तर मग ती अट पूर्ण होईतों तुम्हीं वाट पाहिली पाहिजे." भिकारीण म्हणाली, "तोंवर आम्हांला ह्या बेबंदशाहींत सुरक्षितपणा मुळींच नाहीं. हो! खऱ्या राजनिष्ठ लोकांना इथें देहान्त शिक्षा होतात व घरभेद्यांचा मात्र गौरव होतो, ही बेबंदशाहीच नव्हे तर काय? तेव्हां शाहूमहाराज येईतों आम्हीं अज्ञातवासांत राहण्याचें ठरविलें आहे. यापुढें महाराज आले कीं मग तुमची आमची भेट."

"पण तुम्ही जाऊन जाणार तरी कुठें?" चंद्रसेनानें विचारलें.

"कुठें म्हणजे काय? आम्हांला जिकडे पुढा तिकडे मुलूख थोडा." भिकारीण म्हणाली.

"आणि रत्नावली! तुम्ही मायलेंकी काय करणार?" चंद्रसेनानें रत्नावलीकडे वळून विचारलें.

"आमचें आतां काय! आमच्या वनवासाला वाट फुटेल तिकडे आम्ही जाणार!" रत्नावली म्हणाली.

"तुम्ही सारींजणें माझें ऐकाल तर तुम्हांला राजधानी सोडून जाण्याचें कारण नाहीं. व्यासराव आमचा आहे. त्याची झोंपडी अनायासें एका बाजूला आहे. तेथें तुम्ही सारींजणें रहा. त्यांतूनही तुमच्यावर एखादें संकट ओढवलेंच तर तें निवारण करण्याला मी आहेंच." चंद्रसेन म्हणाला.

"चंद्रसेन! आमच्या ठायीं तुझी ही खरीखुरी कळकळ आहे?" मारुतरायानें विचारलें.

"मारुतराय! आतां मीं काय केलें म्हणजे आपल्या मनाची तशी खात्री पटेल?" चंद्रसेनानें विचारलें.

मारुतराय मनमोकळेपणानें चंद्रसेनाशीं मारुतीच्या ठावठिकाणा-बद्दल देखील बोलून गेला असता, व आपण पुढें काय करणार वगैरे बेतही त्यानें त्याला सांगून सारले असते. पण हा सर्प केव्हां कसा उलटेल याचा नेम नाहीं याची भिकारणीला पूर्ण जाणीव असल्यानें तिनें मारुतरायाला मागाहून हळूच चिमटा घेतला व त्यानें मागें वळून पाहतांच जीभ आवरती घेण्याबद्दल त्याला डोळ्यानें खूण केली. मारुतरायाची तत्काळ समजूत पटली. तो जणुं काय आपण मनांत कांहीं चोरून ठेवलेंच नाहीं असें भासवीत सहजगत्या उद्गारला, "तर मग मी काहीं व्यासरावाच्या झोंपडींत राहत नाहीं; आजू बाजूच्या खेड्यापाड्यांत माझ्या ओळखी पुष्कळ आहेत, त्यांतल्या एखाद्या ओळखीच्या ठिकाणीं मी राहीन."

"आणि बाई! तूं कुठें राहणार?" चंद्रसेन भिकारणीकडे वळून म्हणाला, "मला वाटतें तूं, रत्नावली व हिरू यांना तरी व्यास-रावापाशीं राहावयाला कांहीं हरकत नाहीं."

"छे! मला वाटतें, चंद्रसेन! माझ्यासारखा जळता निखारा तुम्ही तुमच्या जबाबदारीवर पदरीं कांहीं घेऊं नका. तुम्हांला तें नडेल बरें! मलादेखील घरदार पाहिजेच असेंच कांहीं नाहीं. मला काय! माझा जिकडे पुढा तिकडे मुलुख थोडा. माझें मी पाहून घेईन. आतां, रत्नावली व हिरू यांचें मात्र तुम्ही काय तें पाहून घ्या. मात्र माझी अट पूर्ण होईतों तुमची माझी ही शेवटचीच भेट!" भिकारीण मारुतरायाकडे पाहत म्हणाली.

"बरें तर. रत्नावली! तूं व हिरू दोघीजणी व्यासरावाच्या झोंपडींत राहा. व्यासरावाला मी सांगेन." चंद्रसेन त्या मायलेकींना व्यास-रावाच्या झोंपडीकडे जावयाला सांगून निघून गेला.

## प्रकरण अठ्ठाविसावें

# मारेकऱ्यांना भोंदलें !

"जोत्याजीबाबा ! तुम्हीं आतांच्या बेरडांना ओळखलेंत ? महाराजांच्या जिवावर उठणाऱ्या कटवाल्यांविषयीं आपण साताऱ्याहून निघाल्यापासून बोलत आलों ते कटवाले हेच. आणि तो पोरगेलासा तो त्यांचा म्होरक्या."

"काय ? चंद्रसेन जाधवाचा हाच मुलगा ? धनाजीबाबाचा नातू तो हाच ? याचेंच नांव संभाजी काय ?"

"होय."

पिराजीचे हे शब्द ऐकतांच जोत्याजीच्या मुखावर खेदसूचक हंसरेपणा खेळूं लागला. त्या स्वतःच्या मनोभावांचेंच त्यानें स्वतःच्या शब्दांत ओघासरसें रूपांतर केलें, "फुकट रे फुकट गुलामा ! जाधवाचें नांव फुकट सांगतोस !"

बाजीराव हा वेळपर्यंत स्तब्ध होता. तो म्हणाला, "संभाजी क्रूर आहे, खुनशी आहे, स्वार्थी आहे हें सारें मला माहीत होतें. पण त्याच्या पशुपणाची मजल एथवर येऊन ठेपेल असें मला वाटलें नव्हतें."

"पाहा ! मी सांगत होतों ती आतां तुमची खात्री झाली ?" पिराजीनें बाजिरावाला विचारलें.

बाजिरावानें मुकाट्यानें खालीं मान घातली. ते तिघे नांदरुकीच्या झाडाखालीं येऊन पोंचावयाला व त्या दोघां बेलदारांची कुजबूज त्यांच्या कानीं पडावयाला एकच गांठ पडली. तोंपर्यंत पिराजी व बाजीराव ह्या दोघांत संभाजी शाहूमहाराजांवर मारेकरी घालण्यासारखें अघोर कर्म करावयाला तयार होईल किंवा नाहीं याविषयीं

प्रेमाचा पण कडाक्याचा वादविवाद चालला होता. बाजीराव म्हणे, संभाजी कितीही नीच असला तरी निदान धनाजीबाबांची कीर्ति राखण्यासाठीं म्हणून तरी असल्या अत्याचाराला प्रवृत्त होणार नाहीं; व पिराजी म्हणे कीं संभाजी काय पाहिजे तें करण्याइतका कमालीचा नीच आहे. जोत्याजीचें मतही बाजिरावासारखेंच होतें. हें एवढेंसें मिसरूडदेखील न फुटलेलें पोर, व शाहूमहाराजांच्या सभोंवार बादशाही थाटाचा खडा पहारा असावयाचा. एवढ्यांतून हा संभाजी आंत तरी जाऊ धजूं द्या, मग पुढच्या गोष्टी ! असें जोत्याजी-देखील बोलून मोकळा झाला होता. पण हा प्रकार पाहतांच व संभाजी आणि त्याचे दोघे साथीदार यांचें संभाषण ऐकतांच त्यानें देखील तोंडांत बोटें घातलीं व तोंडावाटे उद्गार काढले, "कसें झालें तरी तें सापानें पोसलेलें पिल्लूं आहे."

"बरें; पण आतां काय करावयाचें?" पिराजीनें विचारलें.

"त्याची एवढी फिकीर करण्याचें कारण काय? आपण आपल्या परमेश्वराच्या पायांपाशीं येऊन पोंचलों, आतां आम्ही आमचेच नव्हे तर राजांचेही राजे झालों."

"पण संभाजीच्या कटाचा बंदोबस्त केला पाहिजे. त्याचे सारे बेत आपण आतां ऐकलेच आहेत." पिराजी म्हणाला.

"होय. त्यासाठीं आपण प्रथम एक केलें पाहिजे. प्रथम शाहू-महाराजांना जाऊन भेटलें पाहिजे; म्हणजे ते सावध राहतील." जोत्याजी म्हणाला.

"त्यापेक्षां आपण असें करावें." पिराजी म्हणाला, "जोत्याजी-बाबा ! तुमच्या आमच्या दोन वाटा दोन दिशांना फुटल्या पाहि-तुम्ही आतां असेच शाहूमहाराजांपाशीं जाऊन त्यांना सर्व वृत्तांत सांगा व सभोंवारच्या एकंदर वातावरणावर नजर ठेवा. तोंवर मी आणि—" पिराजीनें बाजिरावाकडे वळून विचारलें, "धनीसाहेब ! तुम्ही माझ्याबरोबर येणार ? त्यापेक्षां तुम्हीं जोत्याजीबाबांबरोबर जावें हें बरें."

"हो! बाजी! तूं माझ्याबरोबर चल. तूं पिराजीबरोबर किती वणवण करणार?" जोत्याजी म्हणाला.

"आणि पिराजी तरी कसा वणवण करणार? जोत्याजीबाबा! मी जो तुमच्याबरोबर आलों तो नुसत्या माश्या मारावयाला नाहीं." बाजीराव म्हणाला.

"पण धनीसाहेब! मी आतां काय करणार तुम्हांला माहीत नाहीं. मी आतां ह्या दोघां बेलदारांचा पाठलाग करून त्यांना गांठणार आणि–पुढचें पुढें. माझ्याबरोबर कांट्या खुंट्यांतून तुम्ही कसे हिंडाल?"

"कसा हिंडेन म्हणजे? जसा तूं हिंडशील तसा मी हिंडेन."

"आणि कांहीं बरावाईट प्रसंग आला तर! उगाच मग मोठे धनीसाहेब आणि राधाबाई आईसाहेबदेखील मला बोल देतील. ही रात्रीची वेळ, व वाट ही अशी रानमाळाची. आमच्या एक असल्या अडचणलेल्या वाटेनें हिंडण्याफिरण्याचें आंगवळणीं पडलें आहे; पण तुम्हांला संवय नाहीं—"

"संवय नाहीं तर संवय होईल!" बाजीराव पिराजीला पुढें बोलूं न देतां म्हणाला, "पिराजी! असल्या भलभलत्या शंकाकुशंका काढीत बसूं नकोस. जोत्याजीबाबा! बाबांनीं मला तुमच्या हवालीं केलें तें गुलाबाच्या ताटव्यांतून हिंडण्यासाठीं किंवा मऊमऊ गाद्यांगिर्द्यांवर लोळण्यासाठीं केलें नाहीं. पिराजी! तूं भलतेंच कांहींतरी बोलतोस. म्हणे कांहीं बरावाईट प्रसंग आला तर! तसा प्रसंग आला तर तो तुझ्यामाझ्यावर सारखाच येईल. म्हणे आईसाहेब काय म्हणतील!"

बाजिरावाचा हा उमलता उत्साह पाहून जोत्याजी तरी त्याला नकार कसा देईल! तो म्हणाला, "ठीक आहे; तुम्ही दोघेही जा व काम फत्ते करा. परमेश्वर तुमचा पाठीराखा आहे."

मात्र जोत्याजीबाबा! आम्ही दोघेही परत येऊन तुम्हांला भेटेतों ह्या गोष्टीचा जरादेखील गवगवा होतां उपयोगी नाहीं. नाहीं तर

चोरटा शत्रु सावध होईल व आपणाला माहीत नाहीं अशा आणखी कांहीं ठिकाणीं त्यानें आपल्या कटाचे धागेदोरे रोंवले असले तर ते आपणां सर्वांनाच नडतील." पिराजी म्हणाला. इतक्यांत संभाजी समोरच्या वाटेनें जातांना व त्याचे साथीदार दरड ओलांडूं लागतांना त्यानें पाहिले. तो जरी बोलत होता तरी त्याचें लक्ष त्या तिघांकडे होतें. तो तिकडे पाहत म्हणाला, "आतां बोलत बसतां उपयोगी नाहीं; उद्योगाला लागलें पाहिजे."

लगेच तिघेही आपापल्या घोड्यावर स्वार झाले. जोत्याजी शाहू-महाराजांच्या छावणीच्या अनुरोधानें निघाला आणि बाजीराव व पिराजी त्या दोघां बेलदारांच्या मागोमाग घोडे दौडीत चालले.

तंट्या व तुफान्या या दोघांचींही घरें जवळजवळ होतीं. घरें कसलीं; झोंपड्या त्या! प्रत्येकाच्या घरांत पांचचार माणसें व बाहेर उकिरड्याच्या जागेंत कांहींसा आडोसा करून त्या आडोशाला असले-लीं दहावीस गाढवें, शिवाय ह्या परिस्थितीला साजेसेंच इतर वैभव! तंट्या व तुफान्या बोलत बोलत घरीं जाऊन पोंचले तेव्हां त्यांचीं बायकामुलें तिन्हीसांजांच्या वेळीं आंगणांतील दगडांवर बसून शिळोप्या-च्या गप्पा बोलत होतीं व त्यांचीं गाढवें सभोंवार उकिरडा फुंकीत होतीं.

संभाजी आज सकाळीं तंट्या व तुफान्या यांना प्रथम भेटला व त्यांचा बेत काय ठरावयाचा तो ठरून पांच पांच मोहरा प्रत्येकाच्या पदरांत पडल्या. त्यामुळें त्यांच्या घरच्या मुलांमाणसांच्या आनंदाला कांहीं पारावार नव्हता. त्या आनंदाच्या भरांत घरच्या मंडळीनें त्या दोघांनाही त्यांचा रोजचा कामधंदादेखील सुचूं दिला नाहीं. बायकां-ना लुगडीं व दागिने पाहिजे होते, मुलांना खाऊ व खेळणीं पाहिजे होतीं. स्वतः त्या दोघांनाही नवा पोशाख आणि तंट्याला चांदीचा करगोटा व तुफान्याला चांदीचीं कडीं आणावयाचीं होतीं. ही सारी बाजारहाट दिवसाउजेडीं पार पाडून मगच ते दोघे पूर्वसंकेतानुसार नांदरुकीच्या झाडाखालीं संभाजीला भेटावयाला गेले असल्यानें ते

परत येईतों त्यांचीं बायकामुलें आपापल्या परीनें सजून डौलानें त्यांची वाट पाहात बसलीं असतांना ते दोघे तेथें जाऊन पोंचले. त्यांना पाहतांच त्यांच्या मंडळीच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. एक मूल पुढें आलें, त्यानें आपले कपडे दाखवावे; दुसरें पुढें आलें त्यानें आपलीं चांदीचीं कडीं दाखवावीं, असा आमोदप्रमोद सुरू असतां तुफान्याच्या बायकोनें तुफान्यासाठीं गुडगुडी भरून आणली. अमळशानें दोघांच्याही बायका आपापल्या दादल्यांना गोडाधोडाचें रांधून घालण्यासाठीं झोंपडींत निघून गेल्या.

इतक्यांत पिराजी व बाजीराव घोडे दौडीत तेथें येऊन पोंचले. ते तंट्या व तुफान्या यांच्या मागोमागच यावयाचे. पण त्यांचे घोडे वाटचालीच्या श्रमानें दमले असल्यानें झोंपड्यांपासून कांहीं अंतरावर असलेल्या विहिरीवर त्यांना पाणी पाजण्यासाठीं दोघांनाही अंमळ थांबावें लागलें.

हे दोघे घोडेस्वार अशा कातरवेळीं आलेले पाहतांच झोंपडींतल्या सर्व माणसांचें धाबें दणाणून गेलें. तिन्हीसांजांच्या धुंदुरधुंदुर संधिप्रकाशांत तंट्या व तुफान्या यांनीं त्या दोघांना दौडत येतांना अंमळ दुरूनच पाहिलें व घाबरून आपापल्या झोंपड्यांत जाऊन दडी मारली. दडी मारून बसण्याचें कारण असें कीं, शाहूमहाराजांचा तळ ह्या खेड्यांत पडल्यापासून वेठीसाठीं माणसें धरण्याचा सपाटा चालला होता व तंट्या आणि तुफान्या यांनाही एकवार वेठीला जावें लागलें होतें. ते तेथून दोन दिवस राबून मोठ्या मिनतवारीनें सुटले होते. तसेंच हें नवें गंडांतर आपल्यावर आलें कीं काय असें त्यांना वाटलें. त्यावरून आपण घरांत असलों अथवा नसलों तरी कोणी सैनिक तपासाला आल्यास आमच्या घरचे पुरुष परगांवीं गेले आहेत व ते पांचसहा दिवस परत यावयाचे नाहींत असें सांगण्यास तंट्या व तुफान्या यांनीं आपल्या बायकामुलांना पढवून ठेविलें होतें.

पिराजी व बाजीराव घोड्यांवरून उतरून समोर येऊन आंगणांत उभे राहतांक्षणीं मुलेंमाणसेंसुद्धां शिकाऱ्याची चाहूल लागतांच हरणांचा

कळप पळावा त्याप्रमाणें सर्व भराभर झोंपड्यांत जाऊन आहेत कीं नाहींत अशीं गुपचूप बसलीं.

अंमळशानें तंट्याची बायको आपल्या तान्ह्या मुलाला समजावीत बाहेर आली व पिराजी आणि बाजीराव यांपैकीं कोणी कांहीं प्रश्न न विचारतांच म्हणाली, "घरधनी बाहेर गांवीं गेले आहेत. ते पांचसहा दिवस यावयाचे नाहींत."

तेवढ्यांत तुफान्याची बायको आंगणांत येऊन उभी राहिली. तिला पहिलीनें विचारलें, "साळे! तुफान्या घरांत आहे का ग?"

"नाहीं." साळी उत्तरली, "ते तुझ्या घरधन्यांबरोबरच आज सकाळीं बाहेर गांवीं नाहीं का गेले?"

"अग बायांनो! आम्हांला पत्ता सांगावयाला कांहीं हरकत नाहीं. आम्ही कांहीं धरणेंबिरणें घेऊन आलेले नाहीं. आमची व त्यांची चांगली जानपछान आहे." पिराजी म्हणाला, "तुझ्या नवऱ्याला म्हणावें, थोड्या वेळापूर्वीं नांदरुकीच्या झाडाखालीं तुम्ही ज्याला भेटलां त्याच्याकडून आम्ही आलों आहों."

इतका विश्वास मिळतांच तंट्या लगेच झोंपडीबाहेर आला व हात जोडून म्हणाला, "सरकार! मासनी वाटलें कीं धरणें आलें, म्हणून मी दडून राहिलों होतों."

"बरें; तुफान्या कुठें आहे?" पिराजीनें विचारलें.

"तुफान्या!" तंट्यानें हांक मारली. तुफान्यादेखील आपल्या झोंपडीच्या कवाडाआड उभा राहून ऐकत होताच; तो लगेच पुढें आला.

"मग काय? मघांशीं ठरलेला बेत कायम ना?" पिराजीनें विचारलें.

"हें काय विचारतां राव! आम्ही बेलदार खाल्ल्या निमकावर कधींच उलटावयाचे नाहीं." तुफान्या म्हणाला.

तंट्यानें विचारलें, "धनीसाहेब! तुम्हांला संभाजीरावांनीं हेंच विचारण्यासाठीं पाठविलें काय?"

"होय." पिराजी म्हणाला, "पण त्यांनीं तुम्हांला सांगितलें आहे कीं, रात्रौ मध्यरात्रीला तुम्ही यावयाचे ते नीट सावधगिरीनें या, आणि कोणाला सुगावा लागूं नये एवढ्यासाठीं पहारेकरी जे भेटतील त्यांना 'आम्हांला महत्त्वाची बातमी देण्यासाठीं थेट शाहू-महाराजांची भेट घ्यावयाची आहे' असें सांगा, म्हणजे ते तुम्हांला थेट डेऱ्याकडे घेऊन जातील. संभाजी व आम्ही तिथें आहोंच.

"ठीक आहे. पण राव, तुम्ही संभाजीरावांचे कोण?" तंट्यानें विचारलें.

"अरे! आम्ही देखील शाहूमहाराजांचेच हेर. संभाजीरावांचे साथीदार आम्ही." पिराजी बाजिरावाला एकीकडे डोळा मारीत म्हणाला, "पण तुम्हांला संभाजीरावांनीं पांच पांच मोहरा दिल्या ना?"

"होय. राव! काम असें करतों कीं तुम्हीं म्हणावें शाबास! पण काम झाल्यावर थोडीथोडकी बक्षिसी मात्र चालणार नाहीं बघा!" तंट्या तुफान्याकडे पाहत हळूच हंसत म्हणाला.

"तें आमच्या जिमेला लागलें. तुम्ही काम तर करा!" असें म्हणून पिराजी व बाजीराव यांनीं आपापल्या घोड्यांना हाताशीं धरून चालवीत जवळ आणलें. तीं दोन्ही जनावरें फार दमलीं होतीं. त्यांना आतां दाणापाणी पाहिजे होतें. शिवाय आपल्या येण्याचा बोभाटा होऊं नये यासाठींही त्यांना इथेंच ठेवणें इष्ट होतें. त्यासाठीं पिराजी तंट्याला म्हणाला, "तंट्या! आमच्या घोड्यांना तेवढें आजची रात्र दाणापाणी पाहशील का?

"ठीक आहे सरकार!" असें म्हणून तंट्यानें ती कामगिरी पत्करली.

लगेच पिराजी व बाजीराव पायींच जावयाला निघाले. ह्या दोघां अपरिचितांना काळोखांतून वाट सांपडणार नाहीं हें ओळखून तंट्या-च्या सांगण्यावरून तुफान्या चूड पेटवून हातीं घेऊन त्यांच्याबरोबर चालूं लागला व त्यांना मोठ्या रस्त्याला लावून मग चूड पिराजी-च्या हातीं देऊन माघारा आला. पुन्हा दोघांच्याही झोंपड्या आनं-दानें फुलून गेल्या.

## प्रकरण एकोणतिसावें

# डाव गळ्याशीं आला!

"जोत्याजीबाबा! एकूण माझ्यासाठीं तुला आमच्या राजधानींत रावापासून रंकापर्यंत एवढा अपमान सहन करावा लागला?" शाहू-महाराज म्हणाले.

"होय सरकार! पण मला त्या अपमानाचें कांहींच वाटत नाहीं. हातीं घेतलेल्या कामांत मला यश आलें; त्या यशाबरोबर मी असे सहस्रावधि अपराध पोटीं घालून पचवीन. सरकार! तुम्ही कांहींही म्हणा, ह्या जोत्याजीचा हात यशस्वी आहे. संभाजीमहाराजांचा बादशहानें तसा शेवट करून मराठशाहीला व भोंसले राजांच्या वंशाला एकदम गाडण्याचा घाट घातला होता, तशा स्थितींत आपण मायलेंकरें व आम्ही बापलेंक वनवासाला निघालों तेव्हां पुढें आपणाला हे दिवस पाहावयाचे आहेत असें आपल्या स्वप्नीं तरी आलें होतें का?" जोत्याजीनें विचारलें.

"नाहीं. खरेंच नाहीं." शाहूमहाराज म्हणाले.

"नाहीं कसें? माझ्या स्वप्नींच काय पण ध्यानींमनीं देखील होतें कीं आपण हे दिवस पाहणार. आज पिढ्यानूपिढ्या हा जोत्याजी आपल्या राजाला विष्णूचा अवतार मानून त्याची सेवा करीत आला ती त्याची सेवा देवाचरणीं रुजू झाली नाहीं असें कधीं तरी झालें आहे? मी म्हणतों, मी माझ्या राजांच्या स्वरूपांत परमेश्वराला भजलों, ही माझी तपश्चर्या फळाला येईल अशी माझी खात्री होती."

पण ही तपश्चर्या करतांना तुझ्या वाटेंत विघ्नांची सारखी परवड लागली होती!" शाहूमहाराज म्हणाले.

विरूबाई शाहूमहाराजांच्या जवळच बसली होती. ती मध्येंच

म्हणाली, "जोत्याजीबाबा! तुम्हांला वाटेल कीं मी तुमच्या तपश्चर्येचें श्रेय हिरावून घेतें; म्हणून मी बोलत नाहीं. नाहीं तर मीं म्हटलें असतें कीं, ही सारी माझ्या पायगुणांची थोरवी आहे. मी महाराजांची पट्टराणी म्हणून बादशहांनीं महाराजांच्या लग्नाची साखर माझ्याच तोंडीं घातली व महाराष्ट्रांतला सुभा महाराजांना तोडून दिला."

"बरें; तसें कां म्हणाना! कोणाच्याही कोंबड्यानें एकदांचें उजाडो म्हणजे झालें." असें म्हणून जोत्याजीनें पुन्हा एकवार डेऱ्याच्या आजूबाजूंचा कानोसा घेतला.

एवेंळ्यांतल्या एवढ्यांत हा प्रकार चारपांच वेळां झालेला पाहून शाहूमहाराजांनीं विचारलें, "जोत्याजीबाबा! मघांपासून एकसारखी चाहूल कसली घेतोस?"

"कांहीं नाहीं. सूर्याजी बाहेर गेला आहे तो अजून कसा आला नाहीं म्हणून पाहतों आहें." जोत्याजी म्हणाला.

शाहूमहाराजांचें जोत्याजीच्या ह्या उत्तरानें कांहीं समाधान होईना. तरी ते फार खोल पाण्यांत शिरले नाहींत. पण विरूबाई अशी स्वस्थ बसणारी स्त्री नव्हती. तिनें जोत्याजीला फिरून विचारलें, "नाहीं पण जोत्याजीबाबा! तुम्ही आमच्यापासून कांहीं तरी चोरून ठेवीत आहां एवढें बरीक खरें. मग तें कांहींही असो. खरें ना?"

जोत्याजी यावर कांहीं बोलला नाहीं.

"तुम्ही आतां म्हणालां त्याप्रमाणें धनाजी जाधव किंवा बाळाजीपंत यांच्यापैकीं कोणी तर यायचा नाहीं ना?" विरूबाईनें पुन्हा विचारलें.

विरूबाईच्या ह्या प्रश्नाचें जोत्याजीला मोठें कौतुक वाटलें. तो शाहूमहाराजांना म्हणाला, "सरकार! भोंसले राजांचें भाग्यच असें थोर कीं त्यांना संसारांतील साथीदारणी मिळतात, त्या खऱ्याखुऱ्या प्रधानपदाची जबाबदारी शिरावर घेऊन ती पार पाडावयाला लायक असतात."

"पण जोत्याजीबाबा! मीं विचारलेली मुख्य गोष्ट तशीच गुल

दस्तांत ठेवलीत! अशी भूल पाडून मी भुलायची नाहीं बरें का! आतांच तुम्हीं माझी स्तुति केली ना?" विरूबाई म्हणाली.

यावर 'छे! छे! तसें कांहीं नाहीं' असें म्हणून जोत्याजी स्वस्थ बसला. पण त्यानें अबोल्याचा हातचा कांहीं सोडला नाहीं. विरूबाईनेंही त्याची नाखुषी पाहून तो प्रश्न आणखी झटाला लावला नाहीं.

"बरें, आतां असेंच आणखी किती वेळ बोलत बसायचें? मध्यरात्रीचा सुमार झाला. आज हरिजागर करायचा विचार आहे कीं काय?" विरूबाई म्हणाली.

जोत्याजी हंसत हंसत उद्गारला, "आईसाहेब! आजची रात्र हरिजागर करण्यासारखीच महत्त्वाची आहे."

इतक्यांत डेऱ्याच्या दरवाजांतून कोणी तरी चोरून डोकावीत असल्याचा शाहूमहाराज, विरूबाई व जोत्याजी यांना एकदम भास झाला. त्याबरोबर जोत्याजीनें दरडावून विचारलें, "कोण आहे तें?"

"मी आहें सरकार!" बाहेरून उत्तर आलें.

"संभाजी?" शाहूमहाराजांनीं हांक मारून विचारलें, "तूं तिथें काय करतो आहेस?"

"आपल्या डेऱ्यावर पहारा करतों आहें सरकार!" संभाजी उत्तरला.

"पण मग आंत डोकावून काय पाहतोस?" विरूबाईनें रागानें विचारलें.

"कांहीं नाहीं राणीसाहेब! मला वाटलें, आपण हांक मारली; म्हणून मी आंत डोकावून पाहिलें." संभाजी भीतभीत बाहेर डोकें घेऊन म्हणाला.

खरें पाहूं गेलें असतां संभाजी तेथें बऱ्याच वेळापूर्वींपासून चोरट्या आंगानें उभा होता. जोत्याजीला सर्व प्रकार माहीत होता; पण त्यानें मुद्दामच त्याची वाच्यता केली नव्हती. मात्र संभाजीवर त्याची गुप्त नजर डेऱ्यांत आल्यापासून होती. संभाजीला नांदरुकीच्या झाडाखालीं त्यानें पाहिलें होतें; पण त्याला मात्र संभाजीनें पाहिलें नव्हतें.

विरूबाई कमालीची धूर्त असल्यामुळें असो किंवा योगायोग म्हणून असो, शाहूमहाराजांनीं संभाजीला खास तैनातींत नोकरींत ठेविलें हें तिला मनापासून आवडलें नाहीं. त्याच्या वर्तणुकीबद्दल तिला प्रारंभापासूनच जबरदस्त संशय होता. पण शाहूमहाराजांचा त्याच्यावर एकदम विश्वास बसल्यामुळें तिचें कांहीं चाललें नाहीं. आतांदेखील संभाजीचें उत्तर ऐकून तिचें समाधान मुळींच झालें नाहीं. तिनें त्याला उलट विचारलें, "संभाजी! आज पहारा करायला पहारेकरी नाहींत वाटतें?"

"पहारेकरी आहेत; पण ते झोंपी गेले आहेत. थोड्या वेळापूर्वी बाहेर कोणाचीशी परकी चाहूल लागली म्हणून मी उठून आलों. सरकारांच्या जिवावर सध्यां शत्रु फार उठलेले असल्यानें मला माझें कर्तव्य म्हणून डोळयांत तेल घालून जपावें लागतें. एवढें कुठें खाटखुट झालें कीं माझा जीव कावराबावरा होतो." संभाजी बाहेरून म्हणाला.

"सरकार! हा नवा नोकर कोण पैदा केला? मोठा इमानी दिसतो!" जोत्याजी म्हणाला.

"पण बाहेरचे पहारेकरी पहारा टाकून झोंपी कसे गेले? विरूबाईनें संभाजीला उद्देशून विचारलें. पण संभाजी जाग्यावर नसल्यानें उत्तर मिळालें नाहीं.

विरूबाई उठून दरवाजापर्यंत गेलेली पाहून जोत्याजी महाराजांजवळून उठून पुढें गेला व विचारूं लागला, "आईसाहेब! इतकें तुम्हांला उठून चौकशी करण्यासाठीं जाण्याजोगें हें प्रकरण आहे तरी काय?"

पण विरूबाई दरवाजांतून अंमळ दूरवर संभाजी कोणा दुसऱ्या दोघां माणसांशीं बोलत उभा असलेला पाहून ते काय बोलतात हें ऐकण्याच्या प्रयत्नांत असल्यानें तिला जोत्याजीचा प्रश्न ऐकूं गेला नाहीं. तिनें क्षणभर थांबून मागें वळून हांक मारली, "खंड्या!"

खंड्या म्हणतांच खंड्या शाहूमहाराजांच्या पर्यंकाशेजारीं मखमाली

गादीवर पहुडल्या पहुडल्या किलकिल्या नजरेनें व टवकारलेल्या कानांनीं एकंदर परिस्थितीचें निरीक्षण करीत होता तो धनिणीची हांक ऐकतांच धांवत पुढें गेला.

"खंड्या! ते कोण तिथें बोलत आहेत त्यांना धरून आण जा." विरूबाई खंड्याच्या मस्तकावरून हात फिरवून म्हणाली.

धनिणीची आज्ञा होतांच खंड्या वाऱ्यासारखा धावत संभाजी जेथें उभा राहून दुसऱ्या कोणा दोघांशीं बोलत होता तेथें इतक्या हळुवारीनें गेला कीं, खुद्द संभाजीला देखील त्याची दाद लागली नाहीं. संभाजी त्या दुसऱ्या दोघां माणसांशीं बाचाबाची करण्यांत गुंतला होता.

विरूबाईला ह्या मंडळीचा संशय येण्याचें कारण 'आज आपला बेत साधावयाचा नाहीं; कारण सारी मंडळी अजून जागी आहेत' अशा अर्थाचें संभाजीचें भाषण व 'नाहीं–नाहीं. संभाजीराव! आतां आम्ही ऐकणार नाहीं. आमच्याकडून तुम्ही काम घ्या किंवा घेऊं नका; कबूल केल्याप्रमाणें आमच्या प्रत्येकाच्या हातावर अगोदर दहा दहा मोहरा टिचवा तर खऱ्या' अशा अर्थाचें त्या दोघां नवख्या माणसांचें संभाषण तिनें ओझरतें ऐकलें होतें. जोत्याजी तेवढ्यांत दरवाज्यांत आला तेव्हां त्यानें देखील 'ह्या घ्या मोहरा आणि मुकाट्या-नें वाटेला लागा कसे' अशी त्या नवख्या माणसांची गुजरण करतांना ऐकलें, त्यावरून त्याच्या अंतःकरणांत काय प्रकाश पडावयाचा तो पडला. पण त्यानें बोलून मात्र दाखविलें नाहीं.

संभाजीनें एकाच्या हातावर दहा मोहरा मोजून दिल्या, व तो दुसऱ्याच्या हातावर मोजून देत होता, इतक्यांत खंड्यानें जाऊन त्याचा आंगरखा तोंडांत धरून त्याला ओढण्याला सुरुवात केली. संभाजीच्या आंगरख्याला जोराचा ताण बसला, तेव्हां संभाजीचें तिकडे लक्ष गेलें. त्याबरोबर त्यानें खंड्याला झटकून दूर ढकलण्याची शिकस्त केली. पण तो खंद्या शिपाई वृत्तीचा श्वानराज संभाजीला थोडाच मोकळा सोडतो! त्या धांदलींत संभाजीपाशीं दुसरा माणूस 'मोहरा द्या राव! माझ्या मोहरा द्या' असा एकच गिल्ला करूं

लागला. 'तुम्ही आतां मुकाटपणें निघून जा नाहीं तर सर्व गोष्टी चव्हाठ्यावर येतील व तुम्हांला आणि मला हकनाक मरावें लागेल' अशी संभाजीनें त्यांची समजूत घालण्याची शिकस्त केली. पण त्या आडमुठ्या माणसांची समजूतच पडेना. असा चोहों बाजूंनीं संभाजी कातावून गेला असतांना एका बाजूनें त्याला खंड्या ओढूं लागला व दुसऱ्या बाजूनें त्याच्याशीं हुजत घालणाऱ्या दोघां माणसांनीं त्याचे दोन दंड पकडून ओढाताण सुरू केली. आतां मात्र संभाजीचा निरुपाय झाला. तेवढ्यांत विरूबाईनें त्याला दरडावून हांक मारली. त्याबरोबर तो काकुळतीला येऊन ओरडला, "आईसाहेब! हे मारेकरी माझ्या जिवावर उठले आहेत. मला वांचवा!"

जोत्याजीचा मुलगा सूर्याजी तेवढ्यांत तिथें आला व जोत्याजीच्या कानांत हळुहळू कायसें सांगूं लागला. विरूबाईनें त्या बापलेकांना हुकूम केला, "त्या दगेखोरांना इकडे घेऊन या."

पण जोत्याजी व सूर्याजी यांना इतके श्रम घ्यावेच लागले नाहींत. संभाजीला खंड्यानें फरपटत ओढीत आणलें व त्याचे साथीदार त्याच्या मागोमाग आपल्या बक्षिशीसाठीं भांडत तेथें आले. त्या दोघांनींही तोंडावरून घोंगड्यांचे बुरखे घेतले असल्यानें ते कोणालाही ओळखले नाहींत.

## प्रकरण तिसावें

# हा कोण?

संभाजी! ही काय दंगल आहे?" विरूबाईनें रागानें विचारलें.

"आईसाहेब! हे दोघे चोर कटवाले आहेत. यांनीं महाराजांना ठार मारण्याचा गुप्त कट केला होता. तो पार पाडण्यासाठीं ते आज रात्रौ येणार असा मला आज सायंकाळीं सुगावा लागल्यावरून मी पाळतीवर होतों. मी यांच्या वाटेंत आड आलों म्हणून हे माझाच जीव घेण्याला तयार झाले होते."

"मग तूं त्यांना मोहरा कशाबद्दल दिल्यास व ते आतां बक्षिशी कसली मागतात?" विरूबाईनें विचारलें.

"सरकार! यांत आमची कांहीं कसूर नाहीं." एक बुरखेवाला म्हणाला, "संभाजीरावांनीं आम्हांला तोतया शाहूचा खून करण्याची कामगिरी सांगितली व त्याबद्दल बक्षिशी देऊं केली ती आम्ही मागतों आहों. आतां संभाजीराव आपल्या शब्दाला फिरत आहेत."

"हा निव्वळ आळ आहे सरकार!" संभाजी हात जोडून भीतीनें थर थर कांपत म्हणाला, "आतां आम्हांला वीस वीस मोहरा दे नाहीं तर तूंच आम्हांला हा कट करावयाला सांगितलेंस असा आम्ही बोभाटा करतों अशी धमकी यांनीं दिली म्हणून मी भिऊन माझ्यापाशीं होतें नव्हतें तें यांना द्यावयाला तयार झालों."

"तुम्ही कोण रे?" असें दोघां बुरखेवाल्यांना विचारून शाहूमहाराज जोत्याजीकडे वळले व म्हणाले, "जोत्याजीबाबा! यांच्या तोंडावरचे बुरखे काढ पाहूं!"

इतक्यांत छावणीवरील पहिल्या चौकीचे चौकीदार दुसऱ्या दोघां बुरखेवाल्यांना घेऊन डेऱ्याबाहेर येऊन थडकले. इतका गलबला

ऐकून पहारेकरी डोळे चोळीत चोळीत धडपडत जागे झाले व त्या नव्या बुरखेवाल्यांच्या दंडांना धरून दोन धक्के देऊन म्हणाले, "हरामखोर! कोण रे तुम्ही?"

"हळू बोला. संभाजीराव कुठें आहेत?" नव्यानें आलेल्या बुरखेवाल्यांपैकीं एकानें विचारलें.

तेवढ्यांत पहारेकऱ्यांची नजर त्या बुरखेवाल्यांच्या हातांतील सुऱ्यांकडे गेली. त्यावरून त्यांनीं ओळखलें कीं हे मारेकरी असावे. थोड्या वेळापूर्वी संभाजीनें त्यांना तंबाखूची चिलीम ओढावयास दिली व लगेच त्यांना अंमल चढला, त्यावरून त्यांना संभाजीचा संशय आला होताच. शिवाय विरूबाईनेंही त्यांना संभाजीवर लक्ष वण्यासाठीं मोघम सूचना दिली होतीच. तशांत आतां संभाजीही थें कोठें दिसेना, व हे दोघे सशस्त्र बुरखेवाले त्याचाच तपास ज्या त अर्थीं करीत आहेत त्या अर्थीं ह्या तिघांनीं एखादा कट केला असावा असा तर्क पहारेकऱ्यांना तेव्हांच करतां आला. बोलून चालून ते रानटी बेलदार! तशांत मारेकऱ्याचें काम करण्यासाठीं आलेले, व मुद्देमालासह पहारेकऱ्यांच्या हातीं सांपडल्यामुळें जीवभयानें जिवावर उदार झालेले! आतां एवींतेवीं आपण सांपडलों खरे; मग तेवढ्यांत साधतां आलें तर पळून जाण्याचा प्रयत्न कां न करा, असा अविचारी विचार करून त्यांनीं आंगावर चालून आलेल्या पहारेकऱ्यांना हातांतील सुऱ्यांनीं बेदरकारपणें भोसकण्यास सुरवात केली. त्यामुळें अर्थातच बाहेर हाःहाःकार उडाला. तो ऐकून सूर्याजी धावत बाहेर आला व बुरखेवाल्या बदमाषांवर तुटून पडला. त्याबरोबर दोघांही बुरखेवाल्यांनीं इतर पहारेकऱ्यांना सोडून सूर्याजीलाच सुऱ्यांनीं भोसकण्याचा सपाटा चालविला. इतर पहारेकरी अजून पूर्ण शुद्धीवर न आल्यानें ते जरी संख्येनें अधिक व शस्त्रांनीं सज्ज होते तरी दोघां बुरखेवाल्यांच्या एकेका तडाख्यासरसे ते भूमीवर लोळण घेऊन चीत झाले. त्यामुळें सूर्याजीला त्यांपैकीं एकाचीही मदत झाली नाहीं. तो दहा पांच ठिकाणीं जखमी होऊन विव्हळत खालीं कोसळला. तितक्यांत

जोत्याजी व पूर्वीचे दोघे बुरखेवालेही बुरखे टाकून धावत बाहेर आले, व त्यांनीं त्या दोघांही दंगेखोर बुरखेवाल्यांना हां हां म्हणतां जायबंदी करून लोळविलें. त्या झटापटींत जोत्याजीशिवाय बाकीच्या दोघांनाही जखमा झाल्या. पण सुदैवानें त्या म्हणण्यासारख्या प्राण-घातक नव्हत्या.

चारही बुरखेवाल्यांच्या तोंडावरील बुरखे दूर होतांच जोत्याजीनें त्या चौघांनाही ओळखलें. पैकीं प्रथम आलेले पिराजी व बाजीराव, व मागाहून आलेले तंट्या आणि तुफान्या हे होते. एकुलता एक पोटचा गोळा सूर्याजी पुढ्यांत मरून पडलेला दिसत असल्यानें जोत्याजीच्या छातीवर आकाशाची कुऱ्हाड कोसळल्यासारखी झाली. शाहूमहाराजांनीं ताबडतोब पुढें होऊन सूर्याजीच्या छातीला हात लावून पाहिलें. सूर्याजी जोत्याजीच्या मांडीवर मस्तक टेकल्या टेकल्या उद्गारला, "बाबा! महाराजांच्या जिवावर कोसळलेलें महासंकट निवारतां निवारतां मी मरतों आहे यांत मला आनंद आहे. तुम्ही आतां शोक करूं नका. मी येतों. राऽम! राऽऽम! राऽऽऽम राऽऽऽऽम!"

जोत्याजीनें एकवार आशेनें 'सूर्या!' अशी हांक मारली; पण सूर्यानें ओ दिली नाहीं.

"जोत्याजीबाबा! ईश्वरीसत्तेपुढें इलाज नाहीं. आतां मेला तो शाहू व आहे तो सूर्याजी असें मानून तूं वागलें पाहिजेस. आम्ही मरेतों तुला अंतर देणार नाहीं." शाहूमहाराज जोत्याजीला मिठी मारून वत्सलतेनें उद्गारले.

जोत्याजीचें शाहूमहाराजांच्या या शांतवनात्मक शब्दांनीं बरेंच समाधान झालें. तो आंसवें पुशीत उद्गारला, "ऊंः! त्यांत काय आहे? राजांचें रक्षण करतां करतां माझा सूर्या मेला; तो मरून अजरामर झाला! आतां मात्र हा जोत्याजी खरा पुत्रवान् शोभला!" लगेच त्यानें धीरोदात्त वृत्तीनें बाजीराव व पिराजी यांजकडे वळून पाहिलें, तों त्यांनीं संभाजी व त्याचे तंट्या तुफान्या हे साथीदार यांना दोघां चौकीदारांच्या साह्यानें जेथल्या तेथें डांबून ठेविलें होतें.

तें पाहून जोत्याजीला इतका आनंद झाला कीं, त्या आनंदाच्या भरांत तो पुत्रनिधनाचें दुःखही क्षणभर विसरून गेला. एवढ्या वेळांत जागोजाग बंदोबस्ताला असलेले आजूबाजूचे दहा-बारा शिपाई धावून आले. शाहूमहाराजांनीं पिराजी, बाजीराव, संभाजी, तंटया व तुफान्या यांच्याकडे बोट दाखवून त्या शिपायांना हुकूम केला, "ह्या पांचही बदमाशांना सांखळदंडांनीं बांधून बंदोबस्तानें कैदेंत ठेवा. उद्ईक यांचा न्याय करून यांना काय शिक्षा करावयाची ती करूं."

जोत्याजी उठून पिराजी व बाजीराव यांना हाताशीं धरून शाहूमहाराजांच्या पायांवर घालीत म्हणाला, "महाराज! हीं आपलीच लेंकरें! आपली सेवा करण्यासाठींच हे दोघे साताऱ्याहून येथवर माझ्याबरोबर आले. याच्या शिताफीनेंच आजचें आपल्यावरचें संकट टळलें. त्यांना आपण शासन करणार काय?"

जोत्याजीच्या तोंडचे शब्द ऐकून शाहूमहाराज व विरूबाई यांनीं तोंडांत बोटें घातलीं. तंटया व तुफान्या गांगरून त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागले. शाहूमहाराजांनीं विचारलें, "हे कोण?"

"हा माझा नातू; याचें नांव पिराजी. आणि हा बाजीराव. धनाजी जाधव सेनापतींना आपल्या बाजूला वश करून घेऊन सातारचें राज्य आपल्या हातीं यावें यासाठीं अहोरात्र कायावाचामनानें झटणाऱ्या बाळाजी विश्वनाथांचा हा मोठा मुलगा." जोत्याजी दोघांना दोन हातांशीं धरून म्हणाला.

"वा! एकूण ह्या दोघां मुलांनीं आपल्या बहाद्दुरीची कमालच केली म्हणावयाची!" शाहूमहाराज पिराजी व बाजीराव यांच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवीत म्हणाले. विरूबाईनेंही त्यांचें फार कौतुक केलें.

राहतां राहिले तंट्या व तुफान्या.

"सरकार! आमचा कांहींच अपराध नाहीं. संभाजीरावांनीं आम्हांस्नीं सांगितलें कीं, शाहूमहाराजांविरुद्ध लढण्यासाठीं बादशहाचा पोरगा तोतया शाहू बनून—"

"तें सारें आम्हांला माहीत आहे. तुम्ही आतां कांहींच बोलूं नका." जोत्याजीनें तंट्याला मध्येंच दाबलें.

"पण यांत हकनाक आम्ही अपराधी ठरतों. संभाजीराव आणि त्याचे हे दोघे साथीदार" तंट्या पिराजी व बाजीराव यांच्याकडे बोट दाखवून म्हणाला, "ह्यांनीं आम्हांस्नी भर दिली म्हणून असी वेड्यावाणी–" पुढें त्यांना बोलावयाला अवसरच मिळाला नाहीं.

शिपायांनीं संभाजी, तंट्या व तुफान्या यांना बांधून नेल्यावर जोत्याजीला आपल्या पुत्राला मांडीवर घेऊन पोटभर रडावयाला अवसर मिळाला. सूर्याजीच्या मृत देहाला मूठमाती देण्याच्या धांदलींत कोणालाच ह्या रहस्याविषयीं ऊहापोह करावयाला तेव्हां अवसर मिळाला नाहीं. सूर्याजीच्या शवावर आपल्या आंगावरील शाल घालून शाहूमहाराजांनीं त्याचा गौरव केला व महाराजांबरोबरच्या सर्व सरदारमानकऱ्यांनीं जातीनें हजर राहून प्रेतयात्रा पार पाडली. तेव्हां जोत्याजीला त्या दुःखांतही अपूर्व धन्यता वाटली.

प्रेतयात्रेहून सारी मंडळी माघारी येते तों एक घोडेस्वार दौडत दौडत थेट शाहूमहाराजांच्या डेऱ्यापाशीं येऊन थडकला. पिराजी, जोत्याजी व बाजीराव यांनीं त्याला ओळखलें; पण कोणी कांहीं बोललें मात्र नाहीं.

"जोत्याजीबाबा! मला प्रथम महाराजांच्या चरणांचें दर्शन घ्यावयाचें आहे; मग पुढच्या गोष्टी!" घोडेस्वार म्हणाला.

"वा! जरूर! चला; माझ्या मागोमाग या." असें म्हणून जोत्याजी त्या दोघांनाही थेट शाहूमहाराजांच्या बैठकखान्यांत घेऊन गेला. तेथें उभे असलेल्या इतर सरदारमानकऱ्यांना ह्या नवीन माणसाची ओळख नव्हती. ते आपसांत कुजबुजूं लागले, "हा कोण?"

## प्रकरण एकतिसावें

# पांगापांग

" तुम्हांला आमच्या झोंपडींत राहावयाला कोणीं चंद्रसेनानें सांगितलें?" रत्नावली व हिरू झोंपडींत राहण्याच्या उद्देशानें आल्या, व त्यांनीं राजवाड्यांतील एकंदर प्रकार आणि त्यानंतर वाटेंत मारुतराय आणि भिकारीण यांची भेट झाल्यावेळीं झालेलें संभाषण व्यासराव व मुक्ता यांना सांगितलें, तेव्हां व्यासरावानें विचारलें.

" होय." रत्नावली उत्तरली.

"पण तुमच्या येथें राहण्यानें आम्हां गरिबांवर कसलें किटाळ तर नाहीं ना येणार?" व्यासरावानें पुन्हा विचारलें.

" भटजीबुवा! त्याबद्दल तुम्ही मुळींच फिकिरींत पडूं नका. तुम्ही एवढें मात्र करा. आम्ही इथें आहों याबद्दल कोणापाशीं कांहीं बोलूं नका."

"पण चंद्रसेन बोलला तर?" मुक्तेनें विचारलें.

" तो बोलायचा नाहीं. कारण माझी हिरू त्याची सून व्हायची आहे." रत्नावली उत्तरली.

" खरेंच? तुझी मुलगी संभाजीची बायको व्हायची आहे?" व्यासरावानें विचारलें. मुक्तेच्याही जिभेवर नेमका तोच प्रश्न आला.

" होय." रत्नावली उत्तरली.

" मग ठीक आहे. सुंठीवांचून खोकला गेला म्हणावयचा!" व्यासराव मुक्तेकडे पाहून समाधानपूर्वक हंसत म्हणाला. रत्नावली व हिरू ह्या दोघींनाही त्या हास्याचा अर्थ तेव्हांच कळला. पण जी गोष्ट त्यांच्या फायद्याची होती, त्या गोष्टीविषयीं त्यांना विषाद अथवा चिंता कां म्हणून वाटेल!

" आपणाला एक गोष्ट मात्र करायची आहे." रत्नावली झोंपडींत वावरूं लागून म्हणाली, " मारुती इथें आहेना, त्याचा कोणाला पत्ता लागूं द्यायचा नाहीं असें त्या बाईनें व बुवानें मुद्दाम सांगितलें आहे."

" असें का? ठीक आहे." मुक्ता म्हणाली. मारुतराय गेल्यापासून मुक्ता एकसारखा स्वतःच्या मनाशीं विचार करीत होती कीं मारुतरायाचा मारुतीच्या ठायीं इतका जीव कां ओढावा? तो मारुतीला औषध देण्याला आला तेव्हांदेखील जणुं काय जन्मदाता बाप आपल्या पुत्राशीं वागत आहे असा भास होत होता. त्यालाच रत्नावलीपाशीं आलेल्या निरोपानें दुजोरा मिळाला. मारुतीला मारुतरायाच्या औषधानें चांगलाच आराम पडला होता. त्याला झोंपही लागली होती व तो आतां हातीं लागणार याविषयीं कोणालाच शंका नव्हती. प्रश्न होता तो एवढाच कीं, हा इथें आहे ही गोष्ट गुप्त कशी राहील! दोनप्रहरीं सर्वांचें जेवणखाण आटोपल्यावर एकमेकांशीं गप्पागोष्टी चालल्या असतां चंद्रसेन अकस्मात् आला तेव्हां मुक्तेनें ताबडतोब चपळाई करून मारुतीचें पायांपासून डोक्यापर्यंत सर्व शरीर पांघरुणाखालीं झांकून ठेवलें. चंद्रसेन रत्नावली व हिरू यांच्याविषयीं चौकशी करून निघून गेला. जातांना त्यानें मारुतराय व भिकारीण यांचा तपास करण्याचा प्रयत्न केला; पण तो फुकट गेला.

त्या दिवसापासून कोठून व कसा नकळे; मारुतराय मध्यरात्रीच्या सुमाराला रोज येई व मारुतीच्या प्रकृतीची चौकशी करून जरूर तर त्याला औषधपाणी देऊन जाई. ते एकमेकांशीं जिव्हाळ्यानें बोलत. इतक्या जिव्हाळ्यानें कीं मधून मधून दोघांच्याही डोळ्यांतून तो जिव्हाळा अश्रूंच्या रूपानें पाझरूं लागे. बहुशः मारुती रोज मारुतरायापाशीं भिकारणीची चौकशी करी, व मारुतराय कांहीं ना कांहीं टाळाटाळीचीं उत्तरें देऊं लागे, तेव्हां दोघांचेही डोळे पाण्यानें भरून येत. याशिवाय दिवसांतून पांचदहा वेळां तरी मुक्ता, रत्नावली, हिरू किंवा व्यासराव यांच्यापाशीं मारुती भिकारणीची चौकशी करी.

कधीं कधीं रात्रौ झोंपेंतदेखील त्यानें 'मंगले' 'मंगले' अशा हांका मारीत सुटावें व त्याला जागा करून ही मंगला कोण असें विचारतांच भिकारीण भेटली का असें विचारावें. मारुतराय प्रथम प्रथम कांहीं दिवस भिकारणीविषयीं कांहींच बोलेना. पण त्यामुळें मारुतीच्या जिवाला भलतीच हुरहूर लागून राहिली आहे असें त्याला दिसून येतांच तो त्याला तिची नुसती खुशाली मात्र सांगे. अखेर एके दिवशीं मारुतीनें हट्टच घेतला तेव्हां मारुतरायानें ती भिकारीण आपली शिष्या असल्याचें व ती सध्यां आपणापाशींच धावडशीला ब्रह्मेंद्रस्वामींच्या आश्रयानें राहत असल्याचें कबूल केलें. त्याबरोबर दुसऱ्याच दिवशीं मारुतीनें मारुतरायाचें शिष्यत्व पत्करण्याचा हट्ट धरला. मारुतरायानें फारसे आढेवेढे न घेतां तें मान्य केलें.

"अशानें तरी आपल्या सेवेंत व त्या जोगिणीच्या संगतींत माझे दिवस सुखानें जातील." मारुती म्हणाला.

"म्हणजे? तूं कायमचा संसाराचा त्याग करून माझ्या मठींत राहणार कीं काय?" मारुतरायानें विचारलें.

"होय. माझें तरी संसारांत आतां कोण आहे? ना बायको ना पोर; सडा फटिंग मी. माझें काय, जिकडे पुढा तिकडे मुलूख थोडा." मुक्ता जवळच बसली होती तिच्याकडे पाहत मारुती म्हणाला, "खरें ना मुक्ते?"

"हें पाहा, मला काय विचारतात तें!" मुक्ता हिरूकडे पाहून म्हणाली, "मी तरी बाई यांत काय सांगूं!"

"तुझें मन संसारांत आहे किंवा नाहीं हें मुक्ता काय सांगणार?" मारुतरायानें विचारलें.

"तर! पाहा तरी!" मुक्ता मारुतरायाकडे पाहत गालांतल्या गालांत हंसत म्हणाली.

"संसारांत माझें मन गुंतण्याला कांहींच कारण नाहीं. पण मन गुंतलेंच तर ह्या पोरीच्या ठायीं मात्र गुंतेल. खरेंच; मुक्ता होती म्हणून मी जगलों." मारुती मारुतरायाकडे पाहून आपल्या जगण्या

चें श्रेय एकट्या मुक्तेच्या पदरीं बांधण्याचा चुकून प्रयत्न केल्याबद्दल अंमळ ओशाळल्यासारखा होऊन केलेली चूक सांवरण्याच्या इराद्यानें म्हणाला, "आपलें औषध व मुक्तेची शुश्रूषा बेताला बेत जमला म्हणून मी हे दिवस पाहतों आहें. खरोखर बावाजी! माझा जन्मदाता बाप व पोटची पोर असतीं तरी तीं यांहून जास्त काय करतीं?"

"आणि तुझा अन्नदाता बाप व पोटची पोर असतीं व त्यांनीं तुझी शुश्रूषा केली असती तर तूं त्यांचें ऋण कसें फेडलें असतेंस?" मारुतरायानें विचारलें.

"त्यांचें ऋण माझ्या हातून फिटलेंच नसतें. मीं माझ्या कातड्याचे जोडे शिवून त्यांच्या पायीं घातले असते तरी त्यांच्या ऋणांतून मुक्त झालों नसतों." मारुती म्हणाला.

"बरें तर; आजपासून तूं माझा मुलगा व मुक्ता तुझी मुलगी." मारुतराय मुक्तेकडे वळून म्हणाला, "काय ग मुक्ते?"

"त्यांत मी काय सागूं? बाकी, मारुतराव आतां गेले म्हणजे मला मात्र त्यांच्याशिवाय चुकल्या चुकल्यासारखें होईल एवढें खरें!" मुक्ता म्हणाली.

मारुती म्हणाला, "खरोखर, बावाजी! मी, आपण, मुक्ता व ती बैरागीण अशीं चार माणसें जर देवदयेनें एकत्र राहिलों तर सर्वांचे दिवस किती आनंदांत जातील!"

"खरेंच, बावाजी! मारुतराव नि तुम्ही सारे जे त्या बाईचे एवढे गोडवे गातां, तें तिला मला एकदां पाह्यचें आहे. तिची आम्हांला एकवार भेट करून द्याल का?" मुक्तेनें विचारलें.

"हो! तूं आज आमच्याबरोबर येतेस का?" मारुतरायानें विचारलें.

"हो! येतें. पण आजोबांना ते मला पाठवतात का विचारून येतें." असें म्हणून मुक्ता व्यासरावाचा शोध करण्यासाठीं झोंपडीबाहेर फिरून आली. पण तिला कांहीं शोध लागेना. अखेर ती कांहींशी खिन्न होऊन माघारीं आली व म्हणाली, "आजोबा कांहीं

घरांत नाहींत; आपण सारीं उद्यांच त्यांना विचारून जाऊं परती. मारुतराय! तुम्ही इतके दिवस राहिलां तसे आजच्या दिवस राहाना! आणि बावाजी! तुम्ही उद्यां या."

"छे! मी तर आज जातोंच. ज्या माऊलीनें माझा जीव वांचविण्याची पहिल्या प्रथम इतकी खटपट केली, तिचें दर्शन घेऊन तिच्या पायांवर मस्तक ठेवल्याशिवाय माझ्या मनाला समाधान वाटावयाचें नाहीं." मारुती म्हणाला.

मारुतरायानेंही मुक्तेची समजूत घातली, "मुक्ते! आज मारुती माझ्याबरोबर येऊं दे. चंद्रसेनाला सुगावा लागला तर तो विषारी सर्प आहे; तो केव्हां काय करील याचा नेम नाहीं. मी तुला नेण्या-साठीं उद्यां फिरून माघारा येईन."

"पण पाहा हो! खरेंच याल ना? नाहीं तर फसवाल!" मुक्ता पायांशीं उभी असलेल्या कापिलेला कुरवाळीत लाडिकपणानें म्हणाली.

"खरोखर येईन." मारुतराय म्हणाला.

"माझ्या गळ्याशपथ? माझ्या कपिलेच्या गळ्याशपथ? पाहा बरें! मुक्या जनावराच्या गळ्याची शपथ खोटी घेतां कामा नये!" मुक्तेनें फिरून बजावलें.

मारुतरायानें मुक्तेच्या सांगण्याप्रमाणें तिच्या व कपिलेच्या गळ्या-ची शपथ घेऊन तिचें समाधान केलें व नंतर तो मारुतीला आपल्या बरोबर घेऊन निघून गेला. मारुतीनें परत भेटण्याच्या बोलीनें मुक्ते चा निरोप मागितला तेव्हां निरोप देतांना मुक्तेनें डोळे भरून आणले. तिची समजूत करण्यासाठीं मारुती म्हणाला, "बाळ! मनाला वाईट वाटून घेऊं नकोस. उद्यां आपली भेट होईलच." लगेच तो मारुत-रायाकडे पाहून म्हणाला, "कुठची मुक्ता व कुठचा मी! पण ऋणानुबंध कसा असतो पाहा!"

"ऋणानुबंधच तर काय! ह्या जन्मींच्या अथवा पूर्वजन्मींच्या लाग्याबांध्याशिवाय अशीं कोणाचीं अंतःकरणें एकमेकांविषयीं थोडीच

कढतात!" असें म्हणून मारुतराय मारुतीचा हात हातांत धरून झोंपडीबाहेर पडला. मुक्ता, तिच्याबरोबर तिची कपिला, रत्नावली व हिरू अशा त्यांना चार पावलें पोंचवून आल्या, त्या थोडा वेळ आंगणांतच पारिजातकाखालीं उभ्या राहिल्या. पारिजातकावर असंख्य कळया फुलण्याच्या तयारीनें रात्रीकडे डोळे लावून बसलेल्या हिरूनें पाहिल्या. ती लगेच वर चढून कळया तोडूं लागली व मुक्ता वेंचूं लागली. पुरेशा कळया हातीं आल्यावर हिरू खालीं उतरली व दोघीही गजरे गुंफूं लागल्या. रत्नावली सायंकाळच्या भाजीसाठीं तोंडलीच्या मांडवावरील तोंडलीं तोडूं लागली. अंमळशानें चंद्रसेन नेहमींच्या रिवाजाप्रमाणें तेथें येऊन सर्वांची चौकशी करून गेला. जातांजातां तो रत्नावलीला हंसत पाहात विनोदानें म्हणाला, "मुक्ते! तुला कांहीं तिच्याशीं सवतीमत्सर साधावयाला नको! ती व्हायची आहे सेनापतीची सून व तूं व्हायची आहेस हुजऱ्याची बायको! जलदेवता समुद्रांत राहतात म्हणून एखाद्या मासोळीनें त्यांच्याशीं हेवादावा करून चालावयाचें नाहीं."

"इश्श! हें पाहा बाई!" मुक्ता हिरूकडे पाहून हंसत म्हणाली, "माझ्या ह्या गोष्टी ध्यानींमनींदेखील नाहींत."

चंद्रसेन निघून गेल्यावर रत्नावली जरा दूर कुठेंशी गेली व झोंपडींत मुक्ता व हिरू ह्या दोघीच राहिल्या. ही संधि साधून हिरूनें मुक्तेला विचारलें, "मुक्ते! हें काय ग हें? व्यासराव ब्राह्मण ना, मग ते तुझे आजोबा ग कसे? तो पिराजी तरी ब्राह्मण आहे का?"

हिरूचा प्रश्न खरोखरीच मुक्तेला खिन्न करणारा होता. त्या प्रश्नानें तिच्या अंतःकरणांत विस्मयाचें व अस्थिरतेचें एवढें काहूर माजविलें कीं, त्यामुळें तिचा हात देखील दोऱ्यांत पारिजातकाच्या कळया गुंफावयाचा थबकला. ती कांहीं वेळ शून्य चित्तानें विचार करून उत्तरली, "हिरू! तूं मला आणखी काय पाहिजे तें विचार; पण एवढा प्रश्न विचारूं नकोस. मी कोण आहें व पिराजी कोण आहे हें आमचें आम्हांलाच माहीत नाहीं."

"तरीच! तरी मीं म्हटलें, चंद्रसेन तुला सून करायला कां तयार नाहीं!" हिरू आढ्यतेनें म्हणाली, "जाधव जातकुळीचे थोर पडले; त्यांना हलक्या जातकुळीशीं सोयरीक मानवायची कशी!"

"याचें उत्तर, हिरू! मीं देखील तुला दिलें असतें. पण आपण उगाच दुसऱ्याचें उणें कशाला बोलावें!" मुक्ता कपिलेला कुरवाळीत म्हणाली. मुक्तेच्या मनाची कष्टप्रद स्थिति पाहूनच कीं काय कपिला बापुडवाणी बनून मुक्तेच्या मांडीवर डोकें टेंकून तिच्या तोंडाकडे टकूमकू पाहत राहिली.

"तूं काय आणि कोण काय, उत्तर देऊन काय देणार! जाधवांच्या जातकुळीची थोरवी साऱ्या जगाला माहीत आहे." हिरू अंमळ कुऱ्यानें म्हणाली.

"खरें; पण संभाजीची जातकुळी—पण जाऊं दे!" मुक्तेनें बोलतां बोलतां ओंठ चावला.

हिरू यावर मुक्तेला एखादा प्रश्न विचारणार, तोंच व्यासराव बाहेरून आला. हिरूच्या मनांत मुक्तेच्या आतांच्या संशयित बोलण्यानें मळमळ उत्पन्न झाली होती. तो संशय फेडून घेण्यासाठीं तिनें व्यासरावाला विचारलें, "व्यासराव आजोबा! चंद्रसेनाला मुलगे किती हो?"

व्यासराव उत्तरला, "कां बरें? चंद्रसेनाला मुलगाच नाहीं. म्हणून तर त्याची बायको गर्भारशी आहे, तिला मुलगा व्हावा म्हणून व्रतेंवैकल्यें व एकादशण्या-अनुष्ठानें धनाजी करतो आहे."

व्यासरावाच्या तोंडून हे शब्द निघावयाला व रत्नावली बाहेरून यावयाला एकच गांठ पडली. तिनें व्यासरावाच्या तोंडचे शब्द ओझरते ऐकले व दारांतील तोंडलीच्या मांडवावरील तोंडलीं सायंकाळच्या भाजीसाठीं तोडलेलीं चिरावयाला घेत हिरूला विचारलें, "कसल्या गोष्टी चालल्या आहेत?"

हिरूनें रत्नावलीच्या प्रश्नाकडे मुदाम कानाडोळा करीत व्यासरावाला विचारलें, "मग संभाजी हा चंद्रसेनाचा खरा मुलगा तर!

मुक्ता व पिराजी हीं तरी तुमचीं खरीं नातवंडें का? कीं त्यांतही असेंच कांहीं तरी आहे?" हिरूनें विचारलें.

"पण तुला ह्या चांभारचौकशा कोणीं सांगितल्या आहेत?" रत्नावलीनें रागीट चर्या करून विचारलें.

"आणि आई! तूं मला असल्या हलक्या जातकुळीच्या मुलाला देणार होतीस!" हिरू म्हणाली, व खिन्न होऊन बसली.

दुसऱ्या दिवशीं हिरू, रत्नावली वगैरे मंडळीच्या समाचारासाठीं चंद्रसेन येऊन पाहतो तों व्यासराव मुक्ता नाहींशी झाली म्हणून खिन्न मनानें कपाळाला हात लावून बसलेला, व रत्नावली आणि हिरू यांच्या चेहऱ्यावरदेखील चिंतेची भेसूर छाया पसरलेली!

"व्यासराव! मुक्ता गेली तरी कुठें?" चंद्रसेनानें विचारलें.

"भगवान् जाणे!" व्यासराव म्हणाला, "मी आज मोठ्या पहांटेला रोजच्या नियमाप्रमाणें गणपतीची पूजा करण्यासाठीं गेलों तेव्हां मुक्ता झोंपलेली होती; पण पूजेहून परत येऊन पाहतों तों ती नाहीं!"

"हिरूला माहीत असेल." चंद्रसेन हिरूकडे वळून म्हणाला, "हिरू! मुक्ता कुठें गेली तें माहीत आहे का तुला?"

हिरू रागीट स्वरांत उत्तरली, "मला माहीत नाहीं."

"तुला तिच्याविषयीं सवतीमत्सर वाटत असेल. पण तुला त्याची काळजी नको. मी मुक्तेला खास माझी सून करीत नाहीं—"

"पण मला तुमची सून व्हायचेंच नाहीं मुळीं!—" हिरू म्हणाली.

"पण तुला तें कोणीं आतां विचारलें आहे का?" रत्नावलीनें विचारलें.

"नाहीं, हे जे मला मोठें भय घालतात ती त्यांना सांगतें" हिरू चंद्रसेनाला उद्देशून म्हणाली, "माझ्या जातकुळीचा पाकपणा एखाद्या कच्च्या जातकुळीच्या मातबराघरीं मिळणाऱ्या पालखी-पदापेक्षां कितीतरी पटींनीं थोर आहे."

"तुझ्या नशिबीं जर गोवऱ्याच लावावयाच्या असल्या तर त्याला

तूं तरी काय करणार! व्यासराव! ह्या मगरूर मायलेकींना तूं मुळींच थारा देतां कामा नये. रत्ना! तुझी ही पोर मी समजत होतों तितकी सिधी नाहीं. ही मैना चुरुचुरू बोलते ती तुझ्याच धीरावर—"

"देवाशपथ, मी तशी नाहीं!" रत्नावली गरीबपणानें उद्गारली, "तसें असतें तर मीं प्रथमच तुमच्यापाशीं तसें कबूल केलें नसतें."

"हा सारा मानभावीपणा मला कळतो बरें! बऱ्या बोलानें वागलां, मुक्तेचा, तसेंच ती भिकारीण व तो जोगडा मारुतराय यांचा उद्यांच्या आंत तपास लागला, तर ठीक आहे; नाहींपेक्षां भिकेची कटोरी हातीं घेऊन रस्तोरस्तीं वणवण हिंडावें लागेल." असें म्हणून चंद्रसेन तेथून तणतणत निघून गेला.

आतां कसें करावें व काय करावें याचा विचार करण्यांत रत्नावली व हिरू ह्या मायलेकींनीं तो सारा दिवस वेंचला. व्यासरावानेंही आपल्या परीनें मुक्तेचा खूप तपास केला. पण फुकट! त्या विवंचनेनें तो अगोदरच त्रासला होता; तशांत रत्नावली व हिरू यांच्यावर चंद्रसेनाची इतराजी झालेली. ह्या दोघींना तूं आपल्या घरांत थारा देतां कामा नये असें चंद्रसेनानें त्याला निक्षून सांगितलें असल्यानें त्यानें परिस्थितीला भिऊन त्या मायलेकींशीं बोलतांना कांहीं दुरुत्तरें वापरलीं व त्यांना निघून जावयाला सांगितलें. यांत त्यांनीं म्हणजे याच क्षणाला निघून जावें असा जरी त्याचा मानस नव्हता, तरी कावळा बसावयाला व डहाळी मोडावयाला एक गांठ पडली. व्यासराव रात्रौ गणपतीची सायंपूजा व धूपारती आटोपून घरीं येतो तों झोंपडी उघडी! रत्नावली व हिरू ह्या मायलेंकी झोंपडींत कोठें दिसेनात! ह्या पळापळीचा आपणावर वृथाऽरोप येऊं नये म्हणून त्यानें तावडतोब जाऊन चंद्रसेनाला खबर दिली. पण तेथेंही आपली ग्रहदशा फिरली आहे असेंच त्याच्या अनुभवाला आलें.

"व्यासराव! ह्या सर्व घडामोडींच्या मुळाशीं तूंच असावास असा मला जबरदस्त संशय येतो—" चंद्रसेनानें व्यासरावावर आळ घेतला, "तूं आतांच्या आतां माझ्या नजरेसमोरून चालता हो व

्क्ता, रत्नावली व हिरू यांना आणून माझ्यासमोर उभ्या कर. द्यां सायंकाळपर्यंत जर एवढें झालें नाहीं तर तुझी झोंपडी पाडून ाळून तिच्यावरून मी गाढवाचा नांगर फिरवीन, व गाढवावरून झी धिंड काढून तुला वेशीपार हांकलून देईन; याद राख!"

बिचारा व्यासराव कपाळाला हात लावून आपल्या कमनशिबाला ाल देत चंद्रसेनाच्या वाड्याबाहेर पडला तो कोठें गेला कोण जाणे! ापल्या झोंपडीकडे गेला नाहीं एवढें मात्र खरें. कारण त्या रात्रौ ाच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं त्याच्या झोंपडीकडे जाऊन पाहिलें तों ोपडींत दिवा नव्हता. निदान देवघरांत देवांसमोर तिन्हीसांजांचा ्वा लावावयाला व्यासराव चुकावयाचा नाहीं. पण आज त्याचे व अंधारांतच होते!

## प्रकरण बत्तिसावें

# शाहूमहाराजांना निर्वाणीचा खलिता

सूर्योदयाबरोबर शाहूमहाराजांच्या भेटीला जो घोडेस्वार आला, ते बाळाजीपंतच आहेत अशी जोत्याजीनें शाहूमहाराजांना त्यांची ओळख करून दिली, व त्यांना शांतपणानें खलबत करण्याला अवसर सांपडावा म्हणून त्यांना एकटे सोडून आपण स्वतः डेऱ्याबाहेर खडा पहारा करीत उभा राहिला.

"मग महाराज! ह्याप्रमाणें करावयाचें तर!"

"हो! पण अजूनही मी म्हणतों, सेनापतींची जर आमच्याशीं खरीखुरी दिलजमाई आहे, तर लटकी लढाई करून हकनाक उभयपक्षींच्या सैनिकांतील कांहींचे बळी देण्याचें तरी प्रयोजन काय?"

इतक्यांत जोत्याजी आंत येऊन शाहूमहाराजांना हात जोडून म्हणाला, "महाराज! बाहेर एक जासूद आला आहे, तो बाळाजीपंतांची भेट घेऊं इच्छितो."

बाजीराव तेवढ्यांत जोत्याजीच्या मागोमाग पुढें येऊन बाळाजीपंतांना म्हणाला, "बाबा! हैबती आला आहे."

"त्याला आंत पाठवून दे." बाळाजीपंत म्हणाले.

जोत्याजीनें बाहेर जाऊन हैबतीला आंत पाठवून दिलें. हैबतीनें शाहूमहाराजांना यापूर्वी कधींच पाहिलें नव्हतें. तरी त्या वेळीं डेऱ्यांत हे दोघेच आहेत व दुसरी व्यक्ति उच्चासनावर बसली असून आपले धनी त्यांच्या पायांपाशीं बसले आहेत असें त्यानें पाहिलें. तसेंच डेऱ्याच्या दरवाजांत त्याला पिराजी व बाजीराव हे दोघे भेटले तेव्हां त्यांनींही आंत बाळाजीपंत शाहूमहाराजांशीं बोलत बसले आहेत असें सांगितलें असल्यानें त्यानें तर्कानें त्यांना ओळखलें, व प्रथम लवून

ात्यंत नम्रपणानें त्यांना मुजरा करून मग दुसरा मुजरा बाळाजी-तांना केला.

"हैबती! काय खबर आहे?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

"सरकार! ताराबाई आईसाहेबांकडून हरनामसिंग एक खलिता ऊन आला. धनाजीबाबा तेव्हां तिथें होते; त्यांनीं त्याला प्रथम ाईसाहेबांचें कुशल विचारलें व कांहीं चिठ्ठीचपाटी आहे का अशी ौकशी केली. पण तो नाहीं म्हणाला, व अंमळशानें प्रतिनिधींना ाठून त्यानें गुपचुपपणें कसलासा खलिता त्याच्या स्वाधीन केला. नापतींचें तिकडे लक्ष होतेंच. त्यांना संशय येऊन त्यांनीं प्रतिनिधीं ाशीं तो खलिता पाहावयाला मागितला तेव्हां प्रतिनिधींनीं तो दाख-ण्याचें नाकबूल केलें. आपल्या अधिकारांत ढवळाढवळ करणारे प्रातिनिधि कोण असें म्हणून सेनापति संतापले. प्रतिनिधींशीं त्यांची रीच बाचाबाची झाली, व सेनापति वैतागून आपल्या सैन्यासह ाघारे जावयाच्या बेतांत आहेत." हैबती म्हणाला.

"पाहा! महाराज! मी जें म्हणालों त्याचें हें प्रत्यंतर पाहा. तारा-ाई आईसाहेसाहेबांचा प्रतिनिधींवर विश्वास आहे; पण सेनापतींवर ाश्वास नाहीं." लगेच बाळाजीपंतांनीं मागें वळून हैबतीला म्हटलें, 'हैबती! तूं जा व माझी धनाजीबाबांना अशी हात जोडून विनंति ांग कीं, मी इतक्यांत येतों, तोंवर स्वस्थ राहा."

"हैबती मुजरा करून निघून गेल्यावर बाळाजीपंत शाहूमहा-ाजांना म्हणाले, "तेव्हां महाराज! आपणाला माझी दोन्ही हात ोडून अशी विनंति आहे कीं, आपली सेवा आम्ही करीत आहों शी गोड करून घ्यावी. आम्ही मरूं पण आमच्या इमानाला सोड-ार नाहीं, याविषयीं विश्वास बाळगावा. सलोख्यानें ज्या गोष्टी व्हावया-या त्यांप्रीत्यर्थ हकनाक सैनिकांचे बळी देणें सकृद्दर्शनीं निष्ठुरपणाचें ्सतें खरें. पण त्याबरोबर हेंही खरें कीं, मराठशाहीमधील प्रस्तुतची ुफळी आजला जगजाहीर झाली आहे, त्या दुफळींत आपण डाव ेकावयाचा तर तो रणांगणावर प्रतिपक्षाशीं दोन हात करूनच

जिंकावयाला हवा. मला खरी पण कडू गोष्ट बोलावी लागत आहे याबद्दल मला क्षमा करा; पण ताराबाई आईसाहेबांनीं आपण बादशहाचे हेर आहां व मराठशाही जिंकून बादशहाच्या घशांत ती लोटण्यासाठीं ह्या मोहिमेवर आलां आहां असा जो आपल्या नांवाचा दुर्लौकिक केला आहे, त्याला सेनापतींनीं आपल्या राजेपणाला विना युद्ध मान्यता दिल्यास नसता जोर यावयाचाही ह्या रणसंग्रामानें थांबेल."

"खरेंच! ताराबाई आईसाहेबांचें अंतःकरण इतकें काळें असेल असें आम्हांला प्रारंभीं मुळींच वाटलें नव्हतें. आणि आजदेखील तुमच्यासारख्या त्रयस्थाच्या सांगण्यावर आमचा विश्वास बसला नसता. पण जोत्याजीबाबानें जो अनुभव सांगितला, तो ऐकून माझीदेखील खातरजमा झाली कीं, स्त्रीचरित्र खरोखरच अगाध आहे." शाहू महाराज म्हणाले.

"महाराज! त्याबाबत बोलावयाचेंच म्हटल्यास अनेक गोष्टी बोलतां येण्यासारख्या आहेत. पण मी एक यःकश्चित् सेवक, मी जर त्या गोष्टी बोलूं लागलों तर राजघराण्याची निंदा व आपली अमर्यादा केल्याचें पाप मला लागेल. ज्यानें त्यानें आपली पायरी ओळखूनच वागलें पाहिजे. तेव्हां मी आतां आपली रजा घेतों. यापुढें सर्व घडामोडी होऊन विजयश्री आपणाला माळ घालीतों जनलौकिकांत आम्ही आपले नाहीं; आपले प्रतिस्पर्धी आहों. असो. मी आतां येतों." असें म्हणून बाळाजीपंतांनीं शाहूमहाराजांच्या पायांवर डोकें टेंकून त्यांचा निरोप मागितला.

शाहूमहाराजांनाही बाळाजीपंतांची ही निःसीम स्वामिभक्ति पाहून गहिंवर दाटून आला. स्वामींनीं स्वप्नांत येऊन दिलेला साक्षात्कार, जोत्याजीनें आणलेलें शुभवर्तमान, व त्याच्या तोंडून ऐकावयाला सांपडलेला बाळाजीपंतांचा पूर्ववृत्तांत, वगैरे अनेक निमित्तांनीं त्यांनीं यापूर्वीच बाळाजीपंतांची पारख केली होती, व आतांच्या प्रत्यक्ष संभाषणांत त्यांना त्या सर्व गोष्टींची प्रचीति चांगलीच पाहावयाला

मिळाली. त्यांनीं बाळाजीपंतांना आपल्या हातांनीं वर उठविलें व त्यांचा गौरव केला, "बाळाजीपंत! तुम्ही, धनाजीबाबा, हे ऋणानुबंधी कैवारी परमेश्वरानें आम्हांला दिले आहेत, हेच मराठशाहीचे खरे आधारस्तंभ आहेत असें आम्ही मानतों. तुमच्याआमच्यांत रयत व राजा हें नातें असलें तरी त्या नात्यांतील उच्चनीच भाव बाजूला ठेवून आम्ही तुम्हांला तूर्त एवढेंच आश्वासन देऊन ठेवतों कीं, तुमची आमच्या ठायींची निष्ठा अनाठायीं कदापि व्हायची नाहीं. याहून जास्त तूर्त आम्हीं काय बोलावें!"

"एवढेंच.—महाराज! आपणापासून ह्या सेवकाला एवढेंच आश्वासन पाहिजे होतें. यापेक्षां जास्त मला तूर्त कांहींदेखील नको. परमेश्वराच्या कृपेनें सर्व गोष्टी मनासारख्या होऊन ती मंगल वेळा उगवेल तेव्हां मग मला काय मागावयाचें तें मी मागेन." एवढें बोलून बाळाजीपंतांनीं दरवाजाकडे वळून हांक मारली, "जोत्याजीबाबा!"

हांक ऐकतांच, श्रीरामांच्या अखंड सेवेला हनुमान हात जोडून उभा रहावा तसा जोत्याजी आंत येऊन शाहूमहाराजांसमोर हात जोडून उभा राहिला.

"बाजीराव बाहेर आहे का?" बाळाजीपंतांनीं विचारलें.

"होय; आहे."

"त्याला आंत आणून महाराजांच्या पायांवर घाला." बाळाजीपंत म्हणाले.

जोत्याजीनें तेथल्या तेथून उभ्या उभ्या हांक मारली, "बाजी!"

लगेच बाजीराव आंत येऊन शाहूमहाराजांसमोर हात जोडून उभा राहिला.

"बाजी! महाराजांच्या पायांवर डोकें ठेवून शपथ घे, कीं मी आमरण महाराजांच्या सेवेंत अंतराय पाडणार नाहीं." बाळाजीपंत म्हणाले.

बाजिरावानें ताबडतोब तसें केलें. बाजीराव आधींच रूपानें मदनासारखा सुंदर, तशांत नुकतेंच त्यानें शाहूमहाराजांच्या प्राणांवर

ओढवणारें संकट मोठ्या चतुराईनें निवारण केलेलें, त्यामुळें शाहू-महाराजांना तो पहिल्या भेटीतच आवडूं लागला होता. तशांत आतां बाळाजीपंतांचा तो मुलगा असें कळतांच महाराज त्याच्याकडे जास्तच आदरदृष्टीनें पाहूं लागले. ते बाळाजीपंतांना म्हणाले, "बाळाजी-पंत! हा मुलगा तुम्हांला शोभण्यासारखाच आहे. यानें आम्हांला पहिली सलामी दिली तीच आपल्या पराक्रमानें दिली." लगेच ते बाजिरावाकडे वळून म्हणाले, "बाजी! तुझ्यासारख्या ताज्या रक्ताच्या पराक्रमी तरुणांनींच आपल्या पराक्रमावर मराठी स्वराज्याचें सुवर्ण-मंदिर बांधलें पाहिजे."

बाजिरावानें यावर उत्तर दिलें, "महाराज! देव देव्हाऱ्यांत असल्यावर पुजाऱ्यांना काय तोटा!"

शाहूमहाराजांनीं बाजिरावाच्या उत्तराचें फार कौतुक केलें.

बाजिरावाच्या ह्या उत्तरानें शाहूमहाराज व बाळाजीपंत यांना किती धन्यता वाटली असेल याचें वर्णन करण्याला कोणाची वाणी समर्थ होणार!

* * *

बाळाजीपंत शाहूमहाराजांना भेटून माघारे येतात, तोंच हैबतीच्या सांगण्याप्रमाणें धनाजी जाधव खरोखरच अधिकारसंन्यास घेण्यासाठीं आतुर झालेला त्यांना आढळला. बाळाजीपंतांनीं त्याला विचारलें, "धनाजीबाबा! हें काय?"

"काय म्हणजे? आजपासून साताऱ्च्या गादीशीं असलेला आमचा सेव्यसेवक संबंध तुटला. आज मीं सेनापतिपदाचीं वस्त्रें खालीं ठेवलीं. आजपासून प्रतिनिधि सेनापति झाले आहेत."

प्रतिनिधींनीं तेवढ्यांत पुढें येऊन विचारलें, "बाळाजीपंत! तुम्ही शाहूमहाराजांचा शोध करावयाला गेलां होतां ना?"

"होय." बाळाजीपंत उत्तरले.

"मग, तुमचा तर्क काय चालतो? शाहू खरा आहे कीं तोतया?" प्रतिनिधींनीं विचारलें.

"पण आपणाला त्याच्याशीं काय करावयाचें आहे? आपणाला आईसाहेबांच्या हुकुमाबरहुकूम वागावयाचें—शाहूशीं लढून त्याचा मोड करावयाचा. मग तो खरा असो की खोटा असो. काय धनाजी-बाबा! मी म्हणतों हें खरें ना?"

"आतां ह्या मामल्यांत धनाजीबाबाचा संबंधच काय?" आतां प्रतिनिधि काय करतील तें खरें." धनाजी म्हणाला.

प्रतिनिधि म्हणाले, "सेनापति! हें काम तुमच्या किंवा माझ्या घरचें नाहीं; मराठशाहीचें नशीब ह्या स्वारीवर अवलंबून आहे. अशा वेळीं जर आम्ही आपसांत बखेडे माजवूं लागलों तर शत्रूला आयतें फावेल व त्यांच्या टापांखालीं आपणां सर्वांचाच चेंदामेंदा होईल. ताराबाई आईसाहेबांनीं मला खलिता पाठविला म्हणून तुम्हांला अशी शेंडींत राख घालावयाला काय झालें?"

"पण प्रतिनिधि! तुम्ही आम्ही कर्ते पुरुष काय किंवा प्रत्यक्ष राजा काय, राष्ट्राच्या भवितव्याची जी जबरदस्त जबाबदारी आम्हां सर्वांच्या शिरावर असते, ती पार पाडण्यासाठीं आम्ही ममत्व सोडून झटलों तरच राष्ट्रहिताचीं अवघड कार्ये तडीला जातील. पण ह्या कर्तव्याची जाणीव आईसाहेबांच्या ठायीं तरी कुठें आहे?"

धनाजीला पुढें बोलूं न देतां प्रतिनिधि म्हणाले, "सेनापति! आईसाहेबांनीं अमकी गोष्ट केली, ती कां केली असें विचारण्याचा अधिकार तुम्हां आम्हांला नाहीं."

"इतका आंधळा राजनिष्ठ कांहीं मी नाहीं. आम्ही कारभारी म्हणजे कांहीं अजाण शिकारी जनावरें नव्हे! राज्यकारभाराचा गाडा राजा ज्या खांचखळग्यांच्या वाटेनें ओढावयाला सांगेल त्या वाटेनें ओढून आत्मघात व त्याबरोबर राज्यघात करणें हेंच जर कारभाऱ्यांचें काम असेल, तर असल्या नामर्दपणाच्या कारभारीपणाला हा मीं रामराम ठोकला पाहा! हीं सेनापतिपदाचीं वस्त्रें आपल्या स्वाधीन करून घ्या व मला मोकळा होऊंद्या."

"सेनापति! असा त्रागा करणें उचित नाहीं. इतर कशासाठीं

नाहीं तर तख्तासमोर घेतलेल्या शपथेसाठीं तरी तुम्हांला ऐन वेळीं असा अवसानघात करतां कामा नये."

"शपथ? प्रतिनिधि! तुम्ही शपथेची गोष्ट बोलतां? ठीक आहे. मी शपथ पाळतों. उभ्या जन्मांत एकवार—फक्त एकचवार शाहूमहाराजांविरुद्ध मी रणांगणांत उभा राहीन अशी शपथ घेतली आहे खरी. शपथ काय करील? शपथ धनाजीचें जिवंत मढें रणांगणावर नेऊन उभें करील. पण शपथेच्या जुलमाच्या पाळणुकींत खऱ्या शौर्याचा उगम होत नसतो एवढें मात्र तुमच्या लक्षांत असूंद्या. बस्स! प्रतिनिधि! मीं शपथ पाळावी असाच तुमचा आग्रह आहे ना?"

"तुम्हीं तुमच्या नसानसांत खेळणाऱ्या वीर्यशाली रक्ताला व त्या रक्ताच्या लालीशीं एकजीव होऊन राहिलेल्या स्वामिनिष्ठेला स्मरून आपलें कर्तव्य करावें असा माझा आग्रह आहे."

"हें कधीं तरी शक्य आहे? कर्तव्य व शपथ हीं सदासर्वदा सलोख्यानें वागत असतातच असें नाहीं. मीं शपथ कोणत्या परिस्थितींत घेतली हें तुम्हांला माहीत आहे. खरें पाहूं गेलें असतां आईसाहेबांच्या भिडेला बळी पडून आम्हीं शपथा घेतल्या हीच घोडचूक झाली. आजवर खाल्ल्या मिठाचा प्रश्न आईसाहेबांनीं काढला म्हणून मला त्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं शपथ घ्यावी लागली. पण तुम्ही जर म्हणतां कीं ती शपथ मीं पाळलीच पाहिजे, तर ती पाळण्याला माझी तयारी आहे. बोला, लढाई करावयाची ना? काय तें विचार करून बोला. आईसाहेबांना शाहूमहाराजांच्या खरेपणाविषयीं शंका होती ती फिटली तरी आपण आपल्या राजाशीं लढण्याचें पाप जोडावयाचें ना?"

"सेनापति! राजाज्ञा पाळणें हें पाप नव्हे; पुण्य आहे. तसें पाहिलें तर शाहूमहाराजांशीं शत्रुत्व संपादन करण्यांत मला आनंद वाटतो असें का तुम्हांला वाटतें? पण हा सेवाधर्म पडला."

"बरें; आतां लढाई करावयाची हें तर ठरलें. पण ह्या लढाईचें पुढारीपण मात्र मी पत्करण्याला तयार नाहीं. मीं शाहूमहाराजां-

विरुद्ध एकवार लढण्याची शपथ घेतली आहे, ती मी व्यक्तिशः पाळीन. पण तुम्ही तुमच्या राजांविरुद्ध शस्त्रें उपसा असें मी माझ्या सैन्याला कोणत्या तोंडानें सांगूं? तसें सांगावयाला मी कांहीं शपथेनें बांधलेला नाहीं. तेव्हां ती जबाबदारी तुम्ही तुमच्या शिरावर घ्या." असें म्हणून धनाजीनें आपलीं सेनापतिपदाचीं वस्त्रें उतरून प्रतिनिधीं-समोर ठेवलीं.

प्रतिनिधींनीं धनाजीची समजूत घालण्याचा दिवसभर कर कर प्रयत्न केला; पण तो फुकट गेला. धनाजीनें अखेरपावेतों मराठ्यां-च्या सैन्याचें सेनापतित्व पत्करण्याचें नाकारलें. अखेर प्रतिनिधींनीं निरुपायानें ताराबाईपासून आगाऊ मिळविलेलें आज्ञापत्र आपल्या सैन्यांत जाहीर केलें. पण त्याचाही इष्ट परिणाम न होतां सैन्यांत एक प्रकारचा निरुत्साह मात्र उत्पन्न झाला. धनाजीसारखा रणधुरंधर सेनापतिदेखील ज्या अर्थी शाहूमहाराजांविरुद्ध लढण्याला नाखूष आहे, त्या अर्थी आपण तरी आपले जीव गमावून हें पाप कां जोडावें असें सर्व सैनिकांना मनांतून वाटलें. ताराबाईनें कागदी आज्ञेनें प्रति-निधींना सैन्याचे सर्वाधिकार दिले खरे; पण प्रत्यक्ष रणांगणावर तें चिटोरें थोडेंच लढणार!

बाळाजीपंतांना हीं लक्षणें एकंदरींत ठीक दिसेनात. त्यांनीं धनाजी-ची समजूत घातली, तसेंच शाहूमहाराजांशीं झालेलें संभाषणही त्याला नीट समजावून सांगितलें, तेव्हां कुठें धनाजीनें केवळ आपल्या व मराठशाहीच्या इभ्रतीसाठीं पुन्हा सेनापतिपदाचा स्वीकार केला. त्यांनीं प्रतिनिधींचें मन वळविण्याचा मात्र मुळींच प्रयत्न केला नाहीं. कारण त्या प्रयत्नांची उपड्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणें अवस्था होणार हें त्यांना पक्कें माहीत होतें.

प्रतिनिधि ह्या मोहिमेचा शेवट काय होणार हें मनोमन ओळखून होते. पण त्यांनीं आपला हेका अखेरपावेतों सोडला नाहीं. बाळाजी-पंतांनीं जेव्हां परोपरीनें त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, तेव्हां त्यांनीं निर्वाणीचें एकच उत्तर दिलें. "बाळाजीपंत! मी समजून

उमजून आगींत उडी घालीत आहें हें मला कळत का नाहीं? फार काय; तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें शाहूमहाराजांचा पक्ष खरा असेलही. प्रबळ तर आहेच आहे तो, व आजच्या मोहिमेच्या रागरंगावरून विजयश्री अखेर शाहूमहाराजांनाच माळ घालील. तसें झालें व मोहिमेचें अपयश आमच्या पदरीं पडलें तरी तें एका अर्थानें यशच आहे असें मी मानतों. याउप्परही आईसाहेबांच्या वतीनें मी बोलतों असा तुम्हीं व सेनापति वगैरे मंडळींनीं आपला वृथा गैरसमज करून घेतला आहे, हें माझें कमनशीब म्हणावयाचें, दुसरें काय!"

अखेर धनाजी, प्रतिनिधि, संक्राजी नारायण, बाळाजीपंत, व मराठ्यांच्या सैन्यांतील बडेबडे अधिकारी ह्या सर्वांच्या मतें शाहूमहाराजांशीं लढाई करून त्यांचा मोड करावयाचें ठरलें. आतां तंट्याला तोंड कोठून फोडावयाचें हाच काय तो प्रश्न होता. त्याचा खल करतां करतां प्रतिनिधींनीं तोड सुचविली, "आपण आपल्या—अर्थात् आईसाहेबांच्या तर्फेनें शाहूमहाराजांपाशीं वकील पाठवावा, व त्यांनीं ताबडतोब मराठी राज्याची सरहद्द सोडून आल्या पावलीं मार्गे बादशाही मुलखांत चालून जावें; तसेंच मराठ्यांचे जे प्रांत त्यांनीं जिंकले आहेत ते साताऱ्याच्या छत्रपतींच्या स्वाधीन करावे, नाहींपेक्षां युद्धाला तयार व्हावें; असा त्यांना खलिता पाठवा."

ह्या मोहिमेचा साराच कारभार प्रतिनिधींच्या एकतंत्री अमलाखालीं चालूं द्यावयाचा असें मोहिमेंतील कर्त्या पुरुषांचें बहुमत असल्यानें प्रतिनिधींच्या ह्या योजनेला मान्यता मिळण्याला मुळींच अवकाश लागला नाहीं.

"ही वकिली संक्राजीपंतांनीं करावी." प्रतिनिधि म्हणाले.

ह्या योजनेलाही तेव्हांच मान्यता मिळाली. प्रतिनिधींनीं छत्रपतींच्या तर्फेनें आपल्या नांवाचा खलिता लिहून तो संक्राजीपंतांच्या हस्तें शाहूमहाराजांकडे पाठविला.

## प्रकरण तेहतिसावें

# समेट संपल्यावर युद्धच !

इकडे उजाडतांच शाहूमहाराजांच्या गोटांत रात्रींच्या अनर्थाची बातमी वणव्यासारखी पसरली व त्यांतच सातारकर मराठ्यांचें लष्कर आपल्यावर चालून आलें आहे ह्या बातमीची भर पडली. मोरोपंत सबनीस, सेनापति, परसोजी भोंसले, चिमणाजी दामोदर, नेमाजी शिंदे, सयाजी भोंसले, निंबाळकर, भोंसल्यांचे कारभारी रामचंद्र महादेव वगैरे शाहूमहाराजांच्या सैन्यांतील सारी खाशी खाशी मंडळी प्राप्त परिस्थितीचा विचार करण्यासाठीं शाहूमहाराजांच्या डेऱ्यासमोरच्या दरबारच्या तंबूत एकत्र जमली. प्रथम मोहिमेविषयींचा खल झाला व सर्वांनुमतें सातारकर मराठ्यांशीं सामना द्यावयाचें ठरलें. पण पूर्वी एकवार धनाजी जाधव, परशरामपंत प्रतिनिधि वगैरे मंडळी सामोपचारांनीं आपल्याला वश होतातसें पाहावें व तो उपाय थकल्यावर मग युद्ध पुकारावें असें बहुमत पडलें. त्या मतानुसार चिमणाजी दामोदर यांजपाशीं खलिता देऊन वकील म्हणून मराठ्यांच्या गोटांत पाठवावें असें ठरून पुढीलप्रमाणें खलिता तयार करण्यांत आला.

"राजश्री धनाजी जाधव सेनापति यांस. श्रीमंत शाहूछत्रपति महाराज यांजकडून आज्ञापत्र ऐसें कीं, आम्ही श्रीभवानीदेवीचे कृपेंकरून बादशाही नजरकैदेंतून मुक्त होऊन आमच्या राज्यांत प्रविष्ट झालों आहों. ही गोष्ट आपणांस व समस्त मराठे सरदार मानकऱ्यांस विदित आहेच. आमच्या आगमनाची खबर आमच्या वतीनें आमचे निष्ठावंत सेवक जोत्याजी केसरकर यांनीं योग्य वेळीं साताऱ्यास राजधानींत जाऊन श्रीमंत ताराबाई आईसाहेबांस व त्या निमित्तेंकरून आमच्या समस्त मराठी रयतेस विदित केली

आहेच. पण दुर्दैवेंकरून आमच्या पत्राचा व आमच्या प्रतिनिधींचा तेथें अनादर करण्यांत आला. आपणासारखे कर्तेसवरते व मराठी राज्याचे खरेखुरे रक्षणकर्ते पुरुष देखील त्या निमित्तें आमच्याशीं बेइमान झाले हें चांगलें घडलें नाहीं.

"त्यानंतरही आम्हांस अशी उदंड आशा होती कीं, तुम्ही सारे मराठ्यांच्या गादीचे सेवक आमच्या गादीवरील वारसदारीस मान्यता देण्यास्तव व गादीच्या व स्वतःच्या इभ्रतीस्तव निदान तटस्थ वृत्तीनें तरी वागाल. पण आतां आम्ही पाहतों तों तुम्ही आमच्यावर चढाई करून बेइमानीस बळी पडत आहां! तुमच्या राजद्रोहाची मजल आमच्यावर घरचे मारेकरी घालण्यापर्यंतही गेली आहे! असले अपराध आम्हीं कां सहन करावे?

"यास्तव तुम्हां सर्वांस आमची अशी आज्ञा आहे कीं, हा राजद्रोहाचा गैरबांका मार्ग सोडून तुम्हीं आम्हांस येऊन मिळावें व एकजुटीनें मराठशाहीच्या मोडकळत्या इमल्यास आपुलकीचा आधार द्यावा. तुमच्यासारख्या कर्त्या कारभाऱ्यांची आम्हांस अत्यंत आवश्यकता आहे व म्हणूनच अजूनही तुमचा अविचार गंगार्पण मानून तुम्हांस तुमच्या इभ्रतीला साजेशा इतमानानें वागविण्यास आम्ही खुषी आहों.

"ही आमची आज्ञा तुम्ही अमान्य केल्यास मात्र आम्हांस आमच्या प्रतिस्पर्ध्यांचें पारिपत्य करण्याचें कटुकर्तव्य मोठ्या नाइलाजानें पार पाडावें लागणार आहे. पण ज्या गोष्टी सलोख्यानें व दिलजमाईनें पार पडावयाच्या, त्या रणांगणावर एकमेकांस मारून किंवा मरून पार पाडण्यांत एकंदरांस लांछन आहे. आम्हांस तुम्ही आमच्या वडीलधाऱ्यांच्या ठायीं आहां. आम्हीं तुमचा मान राखावा व तुम्हीं तुमचा मान राखून घ्यावा. तरवारीच्या व बाहुबलाच्या जोरावर तुम्हांस नमविण्याची म्हणजे आम्हांस आवड आहे असें नाहीं. याउपरी सुज्ञांस जास्त लिहिणें नलगे.

"शाहू छत्रपति"

चिमणाजीपंत शाहूमहाराजांचा खलिता घेऊन धनाजी जाधवाकडे जावयाला निघणार, तोंच संक्राजी नारायण प्रतिनिधींच्या सहीचा खलिता घेऊन तेथें येऊन पोंचले. तेव्हां शाहूमहाराजांची कारभारीमंडळी तेथें हजर होतीच. शाहूमहाराजांनीं चिमणाजीपंतांनाच तो खलिता वाचावयास सांगितलें. त्याचा मसुदा पुढीलप्रमाणें होताः

"शाहूराजे यांसः—तुम्हीं बादशाही मुलखांतून मराठमुलखांत येऊन स्वतःस छत्रपति म्हणवून घेत आहां व कांहीं बंडखोर मराठे सरदारांना सामील करून घेऊन छत्रपतींच्या मुलुखांत दंडेली चालविली आहे. सातारकर ताराबाई आईसाहेब व मराठ्यांच्या राज्याचे एकमात्र मालक श्रीमत छत्रपति धाकटे शिवाजी महाराज यांच्या तर्फेनें आमची तुम्हांस अशी सांगी आहे कीं, तुम्हीं तुमच्या सैन्यानिशीं छत्रपतींच्या मराठी राज्याची हद्द सोडून ताबडतोब बादशाही मुलुखांत माघारें जावें व आजवर छत्रपतींच्या राज्यांतील काबीज केलेल्या प्रांतांवरील आपला हक्क सोडावा. तसें न केल्यास आम्हांस तुमचें पारिपत्य करणें प्राप्त आहे.

"तसेंच तुम्हांशीं सामील असणाऱ्या सर्व मराठे सरदारांस ताकीद देण्यांत येते कीं, त्यांनीं ह्या बंडांत सामील होऊन छत्रपतींचा अक्षम्य अपराध केला आहे. त्यांनीं ताबडतोब ही पुंडगिरी सोडून आपआपल्या प्रांतीं निघून जावें. नाहीं तर त्यांचेंही पारिपत्य करणें आम्हांस प्राप्त होईल.

"गोब्राह्मणप्रतिपालक श्री धाकटे शिवाजी छत्रपति यांचेतर्फे

"परशरामपंत प्रतिनिधि"

हा उपमर्दकारक खलिता ऐकतांना शाहूमहाराज व त्यांचें कारभारी मंडळ यांचा संताप विद्युद्वेगानें वाढत होता. खलिता वाचून झाल्यावर कांहीं काळ सर्व मंडळी स्तब्ध होती. नंतर शाहूमहाराज आवेशानें आपल्या कारभारी मंडळाला उद्देशून म्हणाले, "पाहा! प्रतिनिधि

कसा माजला आहे तें पाहा! चोरांच्या उलट्या बोंबा म्हणतात तें याला!"

"महाराज! मला खलित्याचें उत्तर मिळावें व जाण्याची आज्ञा व्हावी." खलिता वाचून झाल्यावर संक्राजीपंत शाहूमहाराजांना हात जोडून म्हणाले.

"जोत्याजीबाबा! ह्या माणसाला आतांच्या आतां कैद कर." शाहूमहाराज जोत्याजीला म्हणाले.

संक्राजीपंत भीतीनें पण शुद्ध भावानें हात जोडून म्हणाले, "महाराज! ही कामगिरी माझ्या वांट्याला आली तेंव्हांच मी माझ्या वांट्याचे हे भोग ओळखून चुकलों होतों. पण माझादेखील त्याला कांहीं इलाज नव्हता. माझें शरीर तिकडे ताराबाई आईसाहेबांच्या हुकमतींत बंदिवान झालेलें व पंचप्राण इकडे महाराजांच्या पायांशीं गुंतलेले, अशी अनेकांची अवस्था आज झालेली आहे. त्यांतलाच मी एक आहें."

बाजीराव व पिराजी जवळच बाजूला बसले होते. त्यांनीं संक्राजी पंतांना पहिल्याप्रथमच ओळखलें; पण स्वतःची ओळख मात्र दिली नव्हती. पण आतां संक्राजीपंतावर संकट कोसळणार असें पाहतांच बाजीराव जोत्याजीपाशीं गेला व त्याच्या कानांत हळूच म्हणाला, "जोत्याजीबाबा! हे आपले संक्राजीपंत गांडेकर. माझे बाबा यांच्याच वशिल्यानें धनाजीबाबांच्या पदरीं नोकर राहिले. त्यांच्या आतांच्या बोलण्यावरून तुम्हांला त्यांच्या मनाची पारख होत नाहीं का?"

आतां जोत्याजीला मोठा पेंच येऊन पडला. बाजिरावानें संक्राजीपंतांच्या भलेपणाची साक्ष दिली खरी; पण एक तर जोत्याजीला त्यांची प्रत्यक्ष ओळख नसल्यानें त्याचा त्यावर तितकासा विश्वास बसेना. शिवाय शाहूमहाराज या वेळीं इतके बेसुमार संतापले होते कीं, त्यांच्यापाशीं संक्राजीपंतांच्या तरफदारीचे बोल बोलण्याची त्याला छातीच होईना. पण बाजिरावाला नाउमेद करणेंही त्याला प्रशस्त वाटेना. त्यानें बाजिरावाची समजूत केली, "बाजी! महाराजांचा

# प्रकरण चौतिसावें

## मनोवृत्तींची चलविचल

इकडे खेड–कडूसला ज्या दिवशीं ताराबाईचें सैन्य व शाहूमहाराजांचें सैन्य यांच्यांत रणधुमाळी माजण्याच्या ऐन रंगांत होती त्याच दिवशीं तिन्हीसांजांना तिकडे साताऱ्याला ताराबाई व चंद्रसेन यांच्या मनांत आशानिराशेचें तुंबळ संगर माजून राहिलें होतें. रोज एक सांडणीस्वार मोहिमेवरून खबर घेऊन येई तो प्रतिनिधि आणि सेनापति यांच्या बेबनावाच्याच बातम्या आणी; आणि त्या ऐकून ताराबाईचें मन जास्तच अस्वस्थ होई.

चंद्रसेन जाधवही ताराबाईप्रमाणेंच फिकिरींत होता. पण त्याच्या विवंचना ताराबाईच्या विवंचनांहून निराळ्या स्वरूपाच्या होत्या. त्यानें मांडलेल्या पापकर्मांचा पसारा शाहूमहाराजांवर मारेकरी घालण्यापर्यंत वाढला असल्यानें व कानीं येणाऱ्या बातम्यांवरून अखेर शाहूमहाराजच सर्वत्र विजयी होणार असा स्पष्ट रंग दिसूं लागल्याकारणानें, आपलीं पापें जर उजेडांत आलीं तर आपली काय अवस्था होईल याचें त्याला जबरदस्त भय होतें. संभाजीला आपण शाहूमहाराजांच्या नाशास्तव पाठविलें खरें; पण तो पोरवयीच पडला, त्यानें अचरटपणानें कांहीं गोष्टी केल्या व त्या आपल्या आंगाशीं आल्या तर तसेंच पिराजी व त्याच्याबरोबरचा तो शामभटजी यांनींदेखील विश्वासघात करून आपले दांत आपल्याच घशांत घातले तर ! ह्या अनर्थपरंपरेंतच व्यासराव, मुक्ता, रत्नावली व हिरू ह्या गांधीलमाशांना डिंवचून त्यांची आपण भर घातली आहे, याचीही चंद्रसेनाला पूर्ण जाणीव होती.

अशी माणसाची चोहोंकडून गाळण उडाली, कीं त्याला परमेश्वर

आठवूं लागतो. आपल्या प्रवृत्तींना पायबंद लावणारी कोणी अदृश्य शक्ति ह्या जगांत असून ती साऱ्या जगाचें समतान्यायानें नियंत्रण करीत आहे अशी भावना माणसांना अशा आणीबाणीच्या वेळीं उत्पन्न होते.

ताराबाई व चंद्रसेन यांचेंही थेट असेंच झालें. मारुतराय व ती भिकारीण हीं चेटुक करण्यांत निष्णात आहेत, त्यांचा आपण या वेळीं उपयोग करून घेतला तर आपल्या मानवी सामर्थ्याच्या टप्प्यापलीकडे दूर दूर असें दिसणारें यश आपणांला जवळ आणतां येईल, असें त्या दोघांनाही वाटलें. ताराबाईनें चद्रसेनाला सुचविलें, "चंद्र-सेन! आपण त्यांना दूर लोटलें ही आपली चूक झाली. मला अगोदर त्यांच्या जादूगारीची कल्पना करतां आली नाहीं. आतां तूं कांहींही करून त्यांचा शोध कर व त्यांना इकडे घेऊन ये."

चंद्रसेनानें ताराबाईला आपल्याशीं समदुःखीपणानें बोलतांना पाहून शाहूमहाराज विजयी झाले तर भविष्यकालीं ओढवणाऱ्या अनर्थांत आपलें आसन इकडे तरी स्थिर असावें ह्या इराद्यानें विचारलें, "आईसाहेब! मीं आजवर आपल्या सेवेंत मुळींच अंतराय पाडला नाहीं. सेवाधर्माची यथार्थ सांगता करण्यासाठीं, आपलें मन राखण्या साठीं प्रत्यक्ष बापालाही बाप म्हटलें नाहीं. पण आपण ही माझी सेवा विसरणार नाहीं ना?"

ताराबाईनें चंद्रसेनाचा मनोदय ओळखून त्याला धीर दिला, "चंद्रसेन! तूं धनाजीच्या प्रेमाला मुकलास तरी छत्रपति तर तुझे मायबाप आहेत ना? त्यांच्या वतीनें मी तुला आश्वासन देतें कीं, मी माझ्या तोंडचा अर्धा घांस तुला भरवीन. आतां तरी झालें तुझें समाधान?"

"हो! आईसाहेब! झालें माझें समाधान. आपलें एवढें आश्वासन मला पुरे आहे." असें म्हणून चंद्रसेन मुजरा करून निघून गेला. पण आतां मारुतराय वगैरेंचा शोध कुठें करावा हें त्याला कळेना. त्यानें बराच वेळ डोकें खाजवून पाहिलें तेव्हां त्याला विचार सुचला

कीं पुतळाबाई—संभाजीची आई—आणि आपली आई गोपिकाबाई ह्या दोघीही मारुतरायाच्या शिष्यिणी होत्या. मारुतरायाच्या ठायीं त्यांची अलोट भक्ति होती. त्या रोज त्याच्या दर्शनाला जात व मारुतरायही त्यांच्याशीं जिव्हाळ्यानें वागे. त्याला कोठें परगांवीं कामाकाजासाठीं जावयाचें झालें तरी तो त्या दोघींना सांगून जात असे, व वेळींवखतीं पुतळेलाही आपल्याबरोबर घेई. पुतळेवर मारुतरायाचें इतकें प्रेम असण्याचें कारण त्याची एक आवडती सून हरवली होती, व पुतळा तिच्यासारखीच रूपागुणांची होती. त्यानें आपल्या अमोघ वैद्यकलेंत पुतळेला बरेंच निष्णात करून ठेविलें होतें, व पुतळेच्या शिकवणीनें गोपिकाबाईही तांत्रिक वैद्यकी शिकली होती. अर्थात् मारुतरायाचा ठावठिकाणा ह्या त्याच्या जिव्हाळ्याच्या शिष्यिणींना माहीत असला पाहिजे असें चंद्रसेनाला वाटलें. तसेंच रत्नावली व हिरू ह्या दोघीदेखील जरी नाहींशा झाल्या होत्या, तरी त्या जाऊन जाणार कोठें! त्यांची राजवाड्याबाहेर ओळख अशी फक्त गोपिकाबाई व पुतळा यांच्याशींच जुळली होती, व तीही संभाजीशीं हिरूचें लग्न व्हावयाचें ह्या भावी आशेवर. अर्थात् सुटले कैंस पाठीलाच शरण जावयाचे. ह्या न्यायानें रत्नावली व हिरू ह्या दोघीही आपल्याच घरीं आसऱ्याला गेल्या असतील असाही चंद्रसेनाचा तर्क होता. त्याचा पडताळा पाहण्यासाठीं तो प्रथम आपल्या घरीं गेला.

चंद्रसेनानें घरांत पाऊल टाकतांच त्याला तेथें व्यासराव मात्र भेटला. हा साक्षात् यम आपल्या मानेसभोंवार यमपाश टाकण्यासाठीं आला असें व्यासरावाला वाटलें. आतां चंद्रसेन आपणाला काय शासन करील व काय नाहीं ह्या धास्तीनें व्यासराव गर्भगळित होऊन बसला होता.

"चंद्रा! त्या गरीब गाईंना व ह्या गरीब ब्राह्मणाला तूं कां रे छळतोस?" गोपिकाबाईनें विचारलें.

"गरीब गाई! म्हणे गरीब गाई! गरीब गाई तुला दूध देत असतील; पण मला त्या शिंगें मारतात तेव्हां?" चंद्रसेन आढ्यतेनें

म्हणाला. इतका वेळ जोंपर्यंत त्याला ह्या मंडळीपैकीं कोणाचाच शोध लागला नव्हता, तोंपर्यंत तो सर्प काळजीनें गारठला होता. पण आतां त्याला अंमळ आशेची ऊब लागतांच त्यानें फणा उभारून फूत्कार सोडावयाला सुरुवात केली.

"व्यासराव! मंडळीचा शोध लागला का?" चंद्रसेनानें विचारलें.

"नाहीं. मी त्यांचा कुठें शोध लावूं?" व्यासराव गरीबपणानें म्हणाला. गोपिकाबाई व पुतळाही तसेंच म्हणाल्या.

"तुम्ही दोघीही खोटें बोलतां. पण तुम्हांला मारुतरायांच्याच पायांची शपथ आहे; खरें सांगा."

आतां मात्र त्या भोळ्या भावाच्या श्रद्धाळू सास्वासुनांना मोठा पेंच पडला कीं खोटी शपथ कशी घ्यावी! तरीही गोपिकाबाई पुतळेच्या तोंडाकडे पाहत स्तब्ध राहिली. पुतळा मात्र म्हणाली, "तुम्हांला त्यांच्याशीं काय करायचें आहे? एकदां त्यांना चित्त्याच्या तोंडीं देऊन झालें, आतां पुन्हा त्यांना हत्तीच्या पायांतळीं द्यायचें आहे काय?"

चंद्रसेन खलवृत्तीचा दुरात्मा जरी होता, व पुतळेसारख्या अर्धपत्नीच्या सद्विचारात त्याला सद्वृत्तीचा बनविण्याचें बळ जरी नव्हतें, तरी तिची थोरवी त्याला माहीत नव्हती अशांतली गोष्ट नाहीं. जगांत जे खरे दुर्जन असतात, त्यांना स्वतःच्या दुर्जनतेची व सज्जनांच्या सज्जनतेची शहाजोग जाणीव असते; व दुर्जनापेक्षां सज्जन थोर आहेत हेंही त्यांना माहीत असतें. पण सज्जनांची सज्जनता उघड उघड कबूल करून त्या सज्जनतेला शोभेसें सौजन्य दाखविण्याचें मनोबळ त्यांच्या ठायीं नसल्यानें आपल्या पदरीं उघड उघड कमीपणा येतो ह्या भयानें ते सज्जनांचा तिरस्कार करीत असतात. पण प्रतिकूल परिस्थिति प्राप्त झाली कीं दुर्जनांचा देखील तात्पुरता तरी सज्जनतेकडे ओढा उत्पन्न होतो. निदान आपल्या पापांचें हें फळ प्रतिकूल परिस्थितीच्या रूपानें आमच्या पदरीं पडूं पाहत आहे याची त्याला जाणीव असते. अशा वेळीं मात्र त्याच्या ठायींच्या मनुष्यतेला क्षणैक डोकें वर काढावयाला वाव मिळतो.

चंद्रसेनाची देखील पुतळेसमोर थेट अशीच अवस्था झाली. त्याला आपल्या साऱ्या अन्यायांबद्दल क्षणैक उपरति होऊन तो म्हणाला, "पुतळे! आईसाहेबांनीं मारुतरायांचा छळ केला; मीं केला नाहीं. पण आतां तसें कांहीं व्हावयाचें नाहीं. आईसाहेबांची-देखील आतां मारुतरायांच्या भलेपणाबद्दल खात्री झाली आहे व त्यांना कृतकर्माबद्दल पश्चाताप होत आहे. आतां राजवटीच्या आबादानी-साठीं त्यांना मारुतरायांना प्रसन्न करून त्यांचा आशीर्वाद घ्यावयाचा आहे. त्यासाठीं मी मारुतरायांचा शोध करतों आहें. तुला त्यांचा पत्ता माहीत असला तर सांग."

इतक्यांत मारुतराय नेमका तेथें आला. चंद्रसेन या वेळीं राजवाड्यांत असेल, अशा समजुतीनें तो चोरून आला. पण त्याचा अंदाज चुकला. चंद्रसेन त्याला पाहून व तो चंद्रसेनाला पाहून, दोघेही चमकले.

"मारुतराय! तुम्ही तर अगदीं देवानें पाठविल्यासारखे आलां! हें आहे तरी काय?" पुतळा म्हणाली.

मारुतरायाला पहातांच व्यासरावानें त्याच्या पायांवर लोटांगण घालून म्हटलें, "मारुतराय! मुक्ता, हिरू व रत्नावली घरांतून नाहींशा झाल्या, म्हणून चंद्रसेनांनीं माझा मात्र हकनाक उभा छळ मांडला आहे. तुम्हांला तरी मुक्तेचा ठावठिकाणा माहीत असेल तर त्यांना सांगा व एकदांची ह्या छळांतून माझी मुक्तता करा."

"सर्वांचा ठावठिकाणा मला माहीत आहे; पण मी तो सध्यां कोणालाच सांगूं इच्छीत नाहीं." मारुतराय म्हणाला.

"आणि ती भिकारीण?" चंद्रसेनानें विचारलें.

"ती देखील." मारुतराय उत्तरला.

"झालें. चंद्रसेन! आतां तरी तुमचा आमच्यावरील वहीम गेला ना?" व्यासरावानें विचारलें.

"होय. पण त्या मंडळीचा अजून पत्ता कुठें लागला आहे?" चंद्रसेन म्हणाला.

"चंद्रसेन! मीं एकवार सांगितलें ना; त्यांचा पत्ता इतक्यांत लागावयाचा नाहीं. वाघीण पिसाळली आहे, व तीं गरीब माणसें भिऊन कोठच्या तरी कोनाकोंपऱ्यांत लपून बसली आहेत. त्यांचा त्राता—त्यांचा राज्यकर्ता—सुखरूपपणें राज्यात येईतों त्यांना कोणीही उजेडांत पाहूं शकणार नाहीं." असें म्हणून मारुतराय वाटेला लागला. मात्र जाता जाता त्यानें व्यासरावाला नजरेनें खूण केली.

मारुतरायाचे हे बोल चंद्रसेनाला बेपर्वाईचे वाटले. त्यानें तेथल्या तेथें रागाच्या आवेशात त्या वेळीं मारुतरायाचें पारिपत्यही केलें असतें. तो तेवढ्यासाठीं मारुतरायाच्या मागोमाग निघालाही. पण तेवढ्यांत पुतळेनें त्याच्या पायाना मिठी मारून विनवणी केली, "साधुपुरुषाचा असा छळ करूं नये; तो आपल्या नाशाला कारण होतो."

चंद्रसेनानें पुतळेच्या विनतीकडे लक्ष दिलें न दिलेंसें करून व्यास-रावाला आज्ञा केली. "व्यासराव! मारुतरायाच्या मागोमाग जा व मंडळीचा तपास लागतोसा पहा."

व्यासरावाला तरी मारुतरायाच्या नेत्रसंकेताप्रमाणें बाहेर जावयाचेंच होतें. त्याला हें आयतेंच निमित्त सांपडलें.

चंद्रसेन आपल्या सवतीला—त्या एका दीड दमडीच्या रखेलीला—इतका वचकला, हें पाहून पार्वतीबाईच्या अंगाची होळी झाली व संतापाश्रु डोळ्यात चमकूं लागले. त्याचा परिणाम असा झाला कीं, आतां पुतळा आपणाला चार हिताच्या गोष्टी सांगून लाजवील ह्या भयानें तो पार्वतीबाईच्या महालांत विश्रांतीसाठीं गेला. पण पार्वतीबाईनें घाईघाईनें आंत जाऊन दरवाजांतूनच 'लग्नाच्या बायकोला पायपोसां-प्रमाणें लेखून रखेलीसभोंवार लाळ घोटीत राहण्याची तुम्हाला संवय-च आहे; तिकडेच जा. माझ्या महालात पाऊलदेखील टाकूं नका' अशी त्याची निर्भर्त्सना करून धाडकन् दरवाजा लावून घेतला. थोडक्यात बचावलें, नाहींतर चंद्रसेनाचा हात नेमका दरवाजाच्या चिर्णींत चेंगरावयाचा.

आज तरी गृहसौख्य आपल्या कपाळीं नाहीं, आतां व्यासरावा-

मागोमाग जाऊन मारुतराय तरी भेटतोसा व त्याचें मन तरी वळवितां येतेंसें पाहावें, ह्या इराद्यानें चंद्रसेन घराबाहेर पडतो तोंच वळचणी ला उभी असलेल्या एका स्त्रीनें अकस्मात् पुढें येऊन त्याला हळूच सांगितलें, "चंद्रसेन! तू जर माझ्या पिराजीचा शोध सांगत असशील तर मी तुला पाहिजे असलेल्या साऱ्या मंडळीच्या वस्तीचें गुप्त ठिकाण सांगतें. मला तें माहीत आहे. मीं तें आजच पाहिलें आहे."

"पण तूं कोण? पिराजी तुझा कोण?"

"मी पिराजीची आई आहे. बस्स! एवढ्यांतच काय तें समज. मला माझ्या बाळाला केव्हां एकदा पाहीनसें झालें आहे. सांग, पिराजी कुठें आहे?"

"पिराजी तोतया शाहूविरुद्ध मोहिमेवर गेला आहे."

तोतया शाहू?– आणि एवढ्याशा चिरमुडल्या पोराला तुम्ही मोहिमेवर पाठविलें! किती रे निष्ठुर–मांग आहां तुम्ही? बरें, मोहिमेची कांहीं खबर?"

"अजून तशी म्हणण्यासारखी कांहींच खबर नाहीं!"

"बरें; आतां मी माझ्या पिराजीला शोधायचा तरी कुठें व कसा?"

"आमच्या व तोतयाच्या सैन्याचा सामना पुण्याजवळ खेड-कडूसकडे होईल असा रंग दिसतो."

खेडकडूस! अग बाईग! इतक्या दूर आतां मला जावें लागणार? पण मी जाणार! काय वाटेल तें झालें तरी तिकडे जाणार, माझ्या पिऱ्याला एकवार डोळांभर पाहणार व मग प्राण सोडणार!–पण हें खरें ना?"

"होय."

"बरें आहे तर. ही मी चाललें."

"पण ए बाई! तूं त्या मंडळींचा पत्ता मला नाहीं सांगितलास?"

"धावडशीला स्वामींच्या मठांत ती सर्व मंडळी भेटतील." असें चालतां चालतां उत्तर देऊन ती बाई निघून गेलीदेखील!

## प्रकरण पस्तिसावें

# पर्वतेश्वरी

" मारुतराय ! " व्यासरावानें मारुतरायाच्या मागोमाग झपझप पावलें उचलीत सुमारें दोन हाकांच्या अंतरावर तो हांकेच्या टापूंत येतांच त्याला हांक मारली.

" कोण आहे ? " मारुतरायानें थबकून मागें वळून विचारलें.

" मी व्यासराव. जरा उभे राहा." असें म्हणून व्यासराव मारुत-रायाजवळ जाऊन उभा राहिला.

" तूं आलास; बरें झालें. मला तुला भेटावयाचेंच होतें." मारुतराय म्हणाला.

" पण मुक्ता आणि मारुती कुठें आहेत ? "

" सर्व सुरक्षित आहेत. पण आपण आतां इथें फार वेळ बोलत उभें राहतां कामा नये. तुला मुक्तेला भेटावयाचें आहे ना ? "

" होय. "

"तर मग चल माझ्याबरोबर. पण हें पाहा, यांतली कोणतीच गोष्ट बाहेर फुटता उपयोगी नाहीं. आहे कबूल ? "

" आहे कबूल. पण त्या मंडळीचा शोध लावून आणण्यासाठीं चंद्रसेनानें मला तरवारीच्या धारेवर धरलें आहे त्याची काय वाट ? "

" त्याला एकच वाट आहे. तुला चंद्रसेनाची मर्जी राखावयाची असेल तर मुक्ता आजच मेली असें समज व आल्या वाटेनें माघारा जा. किंवा मुक्तेला भेटावयाचें असेल तर जी आमची वाट तीच आपली वाट, शाहूमहाराजाचे पाय राजधानीला लागेतों ह्या नगरांत— शाहूमहाराजांच्या शत्रुत्वानें बरबटलेल्या ह्या नरकपुरींत पाऊल कसें तें ठेवावयाचें नाहीं, असा मनाचा धडा करून माझ्या मागोमाग ये."

व्यासराव क्षणभर विचार करून म्हणाला, "कबूल आहे. मी तुमच्याबरोबर येतों. चंद्रसेनाचा आश्रय म्हणजे मला तरी केवळ सुळावरची पोळीच आहे. तशांत धनाजीबाबाही इथें नाहींत. मला तरी ह्या जगांत आतां काय करावयाचें आहे! त्या दोन अनाथ जीवां-साठी माझा जीव घुटमळतो. पण मी जर आज चंद्रसेनाशीं फटकून वागलों व उद्यां त्याच्या हातीं सांपडलों तर तो मला उभा फाडून खाईल."

"त्याची काळजी तुला नको. मरूं तर आपण सर्वच मरूं. आपण आपल्या इच्छेप्रमाणें विजयी झालों तर आमच्या सुखाला पारावार उरावयाचा नाहीं. तूं तुझें सांगतोस; आणि माझें तरी आता ह्या जगात काय उरलें आहे! पण तें मी आजच बोलत नाहीं. मग काय? तुला माझ्याबरोबर यावयाचें आहे कीं नाहीं? मला आतां विचार करीत उभं रहावयालाही फुरसद नाहीं. चंद्रसेन जर आला—आणि तो माझा शोध करीत खास यईल—मग ह्या आपल्या साऱ्याच बेतावर पाणी पडेल. यासाठीं काय निश्चय करावयाचा तो लौकर कर."

"बस्स! माझा निश्चय झाला; मला तुमच्याबरोबर यावयाचें. मग काय होईल तें होवो. पण एक मात्र करावयाचें; मी माझे देव बरोबर घेणार. घरादारला आग लागो, मला त्याची मुळींच पर्वा नाहीं. पण माझ्या जिवांत जीव असेतों मी माझ्या देवाना मात्र निर्माल्यांत ठेवणार नाहीं."

"तर मग लौकर चल तुझ्या झोंपडीकडे, आपण देव घेऊन जाऊं."

"चला." असें म्हणून व्यासराव झोंपडीकडे जाण्यासाठीं माघारा वळला. मारुतरायही त्याच्या मागोमाग चालूं लागला. थोड्याच वेळांत चंद्रसेनाचे लोक त्या बाईच्या सांगण्यावरून रातोरात धावडशी-ला निघाले ते त्याच वाटेनें समोर गेले. तेदेखील जर वाटेंतच चिलीम फुकीत बसले नसते तर नेमकी त्यांची व मारुतराय आणि व्यासराव यांची गांठ पडली असती. ते लोक तसेच रातोरात धावडशी-ला जाऊन पोंचले. पण तिथें पाहतात तों काय! सारेंच उजाड!

इतर मंडळी सांपडावयाची बाजूलाच राहिली; पण खुद्द स्वामी किंवा त्यांचा शिष्यपरिवारही तेथें नव्हता!

उजाडेपर्यंत तेथेंच थांबून उजाडतांच त्या लोकांनीं सारी धावडशी पालथी घातली. पण कांहींच तपास लागेना. तेथल्या रहिवाश्यापाशीं तपास करतां कोणीं सांगावें स्वामी तीर्थयात्रेला गेले, तर आणखी कोणीं आणखी कांहीं तरी सांगावें. त्याला कशाला कांहीं मेळ नाहीं. अखेर त्या लोकांनीं सर्व बाजूनीं निराश होऊन परत साताऱ्याची वाट धरली. वाटेनें येतांना ही खोटी बातमी देणारी खोडसाळ बाई जर वाटेंत आढळली तर तिला अर्धीकच्चा गिळून टाकूं असें त्याना वाटत होतें. पण त्याची तेवढीही मनीषा पूर्ण झाली नाहीं. बिचारे हिंडहिंड हिंडले मात्र, व ह्या श्रमांबद्दल चद्रसेनापाशीं जाताच शेलक्या शिव्यांचा आहेर मात्र त्याच्या पदरीं पडला! नशीब बिचाऱ्यांचें!

त्या बाईनें चद्रसेनाला धावडशीचा पत्ता सांगितला तेंही बरोबर, व चंद्रसेनाचे शिपाई मडळीचा शोध करण्यासाठीं धावडशीला गेले तेव्हां तेथें कोणी नव्हतें हेंही खरें. ब्रह्मेंद्रस्वामी ताराबाईला भेट देऊन माघारे गेले. ताराबाईच्या हातून महत्त्वाकांक्षेच्या भरांत कोणतेंही आततायीपणाचें कृत्य होणें अशक्य नाहीं अशी त्याची पक्की खात्री होऊन चुकली. वेळींप्रसंगीं ताराबाई आपणाला रसातळाला नेण्याचे प्रयत्न करण्यालाही कमी करणार नाहीं; त्यापेक्षां आपणच मराठशाहीची विस्कटलेली घडी नीट बसेतों अज्ञात स्थलीं स्थलांतर करावें, हें उचित होय, असा विचार करून स्वामी ताबडतोब धावडशीला आले व आपल्या माधव नांवाच्या शिष्याला अशा एखाद्या स्थलाचा शोध करण्याची त्यांनीं आज्ञा केली. लगेच माधवानें साताऱ्याजवळील पर्वतेश्वर डोंगर धुंडाळून, जेथें पूर्वीं कोणी एक साधु तपश्चर्या करीत असे अशी आख्यायिका ऐकिली होती, ती जागा धोरणानें हुडकून काढली. साधूनें एवढ्या मोठ्या तपश्चर्येला पसंत केलेलें स्थान साधु-पुरुषांना वास्तव्य करण्याला सर्वतोपरी रमणीय व सोईस्कर असावयाचेंच, व तें तसें होतेंही. सभोंवार घनदाट रमणीय झाडी, त्या

झाडींतून एक खोल दरी गेलेली, त्या दरींत दर्शनीं दिसावयाला लहानशी पण आत जाताच अत्यंत विस्तीर्ण अशी गुहा, बाजूला घन दाट वृक्षराजींतून एक जिवंत झरा खळखळ वाहत असलेला, ह्या व अशाच बहुविध निसर्गसौंदर्यानें नटलेलें असें तें स्थान होतें. सध्यां मात्र ती गुहा व तें वनवैभव तेथें आढळत नाहीं. तें काळाच्या उदरांत कोण्या निमित्तानें गडप झालें असेल. पण त्याची ओझरती साक्ष देण्याला पर्वतेश्वर मात्र अजून तेथेंच तिष्ठत उभा आहे.

असो. माधवानें हें निवासस्थान निश्चित केलें व स्वामी आपल्या शिष्यपरिवारासह तावडतोब तेथें जाऊन राहूं लागले. मारुतराय स्वामींच्या शिष्यवृन्दापैकींच एक होता, तो अर्थातच भिकारणीसह स्वामींच्या सन्निध जाऊन राहिला. पुढें मारुतीला व त्यानंतर मुक्तेलाही त्यानें तेथेंच नेलें. आजदेखील व्यासरावाला घेऊन तो तेथेंच जावयाचा होता. व्यासरावानें आपले देव बरोबर घेतल्यावर ते दोघे जे तडक निघाले ते रात्रौ पर्वतेश्वराच्या जंगलझाडींतून जाणें धोक्याचें असल्यानें उजाडेपावेतों पर्वतेश्वराच्या पायथ्याशीं असलेल्या पर्वतेश्वर खेड्यांतील एका जीर्ण शिवालयांत वस्ती करून राहिले. मारुतराय सायंकाळीं व्यासरावांच्या समाचारासाठीं साताऱ्याला यावयाला निघाला तेव्हां रात्रींबेरात्रीं परत जातांना सोबत असावी म्हणून माधवाला बरोबर घेऊन आला होता. पण वाटेंत गणपतीच्या देवालयांत रत्ना व हिरू ह्या मायलेंकी निराधार परिस्थितींत रडत बसलेल्या त्यांना पाहून त्यांची कींव आली व त्यानें त्यांची कहाणी ऐकून घेऊन त्यांनीं मुक्ता आणि मारुती यांच्या सहवासांत राहण्याची उत्कट इच्छा दर्शविल्यावरून त्यांना माधवाच्या सोबतीनें दिवसाउजेडीं पर्वतेश्वराला पोंचतें केलें होतें.

उजाडतांच मारुतराय व व्यासराव पुन्हा वाट चालूं लागले. ते सूर्योदयाच्या सुमाराला पर्वतेश्वरच्या गुहेंत जाऊन पोंचले. मारुतरायानें प्रथम रत्नावली व हिरू यांची चौकशी केली तेव्हां त्या दोघींनाही माधवानें सुखरूपपणें तेथें आणून पावत्या केल्याचें कळलें. व्यास-

रावानेंही मुक्तेला जेव्हां डोळांभर पाहिलें तेव्हां त्याच्या मनाचें समाधान झाले. तेवढ्यात मुक्ता 'आई! माझे केंस विंचरतेस का ग' असें म्हणून भिकारणीच्या पुढ्यात गेली, व भिकारीण 'हो! ये बाळ! विंचरतें तुझ केंस' असें म्हणून हातातील काम बाजूला ठेवून मुक्तेचे केंस विंचरावयाला येऊन बसली. तेव्हा तें दृश्य पाहून मारुतरायाला जो आनंद झाला, तो काही विशेष होता.

"मुक्ते! ही तुझी आई का?" मारुतरायानें हंसत विचारलें.

"हो! आमचें दोघींचें असें ठरलें आहे, कीं आम्हीं यापुढें मायलेकींप्रमाणें वागायचें. मारुतीही म्हणतो कीं, मुक्ता माझी मुलगी. तेव्हा मीं असें ठरविलें आहे की, आईनें हाक मारली म्हणजे तिला आई म्हणायचें, मारुतानें हाक मारली म्हणजे त्याला बाबा म्हणायचें, व तुम्हांला आजोबा म्हणायचें."

"आणि पोरी! मी?" व्यासरावानें मध्येंच विचारलें

"तुम्ही तर माझे आजोबा आहातच!" मुक्ता म्हणाली, "पण आजोबा! आतां आपण सारीजणें इथेंच राहिलों तर?"

"तसेंच आता करावयाचें आहे." व्यासराव म्हणाला.

इतक्यात मारुती कपिलेला चारा चारण्यासाठीं बरोबर घेऊन दूर गेला होता तो आला. त्यानें हाक मारली, "मुक्ता बाळ!"

"मारुतीबाबा! काय म्हणतां?" मुक्तेनें भिकारीण तिची वेणी घालीत असताना बसल्या बसल्या विचारलें.

मारुती व मुक्ता यांचें तें वात्सल्यपूर्ण संभाषण ऐकतांच मारुतराय व भिकारीण ह्या दोघांच्याही डोळ्यात आसवें उभी राहिलीं. पण त्या वेळीं सर्वांच्याच चर्येवर हास्य विलसत असल्याचें स्पष्ट दिसत असल्यानें व्यासराव, रत्नावली व हिरू यानीं ओळखलें कीं, मुक्ता, मारुती, मारुतराय व भिकारीण याच्यात काहीं तरी ऋणानुबंधाच्या ओलाव्याचा आनंदीआनंद असला पाहिजे खास!

"मुक्त! तुझ्या कपिलेला साभाळ. मी स्नान करून येतों." असें म्हणून मारुती तथून झऱ्यावर निघून गेला.

"पाणी तापलेलें आहे; आणून देतें. थंड पाण्यानें स्नान करूं नका." असें म्हणून भिकारीण मारुतीला पाणी देण्यासाठीं चुलीवरील पाण्याचें भाडें घेऊन झऱ्यावर गेली झऱ्यावर आंघोळीचें पाणी साठविण्यासाठीं एक दगडी टाकी कोरलेली होती. तिच्यात भिकारणीनें पाणी ओतून त्यात थंड पाणी मिसळून आंघोळीच्या बेताचें करून दिलें. मारुतीनें तेवढ्यात पाण्याची चूळ भरून भिकारणीच्या अंगावर टाकली वास्तविक त्या तेजस्वी स्त्रीनें हा अतिप्रसंग सहन करावयाचा नव्हे. पण कसा नकळे, सहन केला; व ती मुकाट्यानें स्मित हास्य करीत माघारी वळली. जाता जातां ती एवढेंच म्हणाली, "कोणी पाहील तर!"

"मंगले!" मारुतीनें भिकारणीला हांक मारली. त्याला तिच्याशीं कांहीं बोलावयाचें होतें.

भिकारीण जातां जातां म्हणाली, "मी एकदां सांगितलें ना? अजून तशी हाक मारायला अवकाश आहे."

इतक्यात माधव पाणी नेण्यासाठीं तेथें आला. त्यामुळें मारुती व भिकारीण याचें बोलणेंच खुंटलें.

"माधव! स्वामींचें अनुष्ठान आटोपलें का?" भिकारणीनें विचारलें.

"छे! इतक्यांत कसें आटपेल? आजचा तिसरा दिवस. आणि चार दिवस बाकी आहेत. हें पाहा, तुमच्या नव्या मंडळींना सांगून ठेवा कीं, आणखी चार दिवस, किंवा स्वामी आपण होऊन देवघराबाहेर येईतों कोणीं त्यांच्या दर्शनाला जावयाचें नाहीं. त्यांच्या समाधींत व्यत्यय येईल." असें म्हणून माधव पाणी घेऊन गेला.

"बरें आहे" असें म्हणून भिकारीणही निघून गेली.

आतां शाहूमहाराजांची सरशी होऊन ते राज्याधिकारी होईपर्यंत मारुतराय, मारुती, व्यासराव, भिकारीण, मुक्ता, रत्नावली व हिरू ह्या सर्व मंडळीनें स्वामींच्या पायांशेजारीं येथेंच अज्ञातवासांत राहावयाचें ठरल्यामुळें व हा मंगल योग केव्हां जुळून येईल याचा कांहींच

नेम नसल्यानें तोंपर्यंत हेंच आपलें घर असें मानून सर्वांचा सुखानें समावेश होईल अशा सोयी करून घेण्यांत मंडळी गढून गेली. आतां, हीं काणाचीं कोण हें जाणण्याविषयीं सर्वांनाच उत्कंठा लागून राहिली होती खरी. पण शाहूराजा परदेशी झाला तो मायदेशीं येईतों असेंच चालावयाचें, असा मारुतराय व भिकागीण यांचा निर्धार असल्यानें ह्या रहस्याचा भेद एव्हांच होणें शक्य नव्हतें.

## प्रकरण छत्तिसावें

## शाहूमहाराजांचा विजय

शाहूमहाराज व ताराबाई यांच्या सैन्याची खेडकडूस येथें लढाई झाली व त्या लढाईचा शेवटही पूर्वी बाळाजीपंत, धनाजी जाधव व शाहूमहाराज यांनीं संकल्पिल्याप्रमाणेंच झाला. धनाजी जाधव सेनापति ह्या नात्यानें समरांगणावर उभा राहिला खरा; पण त्यानें किंवा त्याच्या सैन्यानें महाराजांच्या सैन्याविरुद्ध नुसता हातदेखील वर केला नाहीं. मग एकटे परशुरामपंत प्रतिनिधि लढून काय लढणार ! प्रतिनिधींच्या एकदोघां नीच सैनिकांनीं शाहूमहाराजावर त्यांची नजर चुकवून गोळया झाडण्याचा प्रयत्न केला. पण बाजीराव व पिराजी हे एकनिष्ठ सेवक एका हातीं ढाल आणि एका हातीं चवरी घेऊन शाहूमहाराजांच्या अंबारींत त्यांच्या डाव्याउजव्या बाजूला बसले होते, त्यांनीं मोठ्या चतुराईनें ढालाईतपणा करून त्या गोळयांचा मारा चुकविला. एकदोन गोळया तर त्या दोघां बालवीरांना निसटत्या चाटूनदेखील गेल्या. पण त्यांनीं त्याची मुळींच पर्वा केली नाहीं. धनाजीनें असा अवसानघात केल्यामुळें प्रतिनिधींचा कांहीं उपाय चालेनासा होऊन त्यांना रणांगणावरून पळ काढावा लागला. शाहूमहाराजांचा सुशृंगारित हत्ती त्यांच्या सैन्याच्या अग्रभागीं चालत होता, तो विजयश्रीनें आपल्या धन्याला वरलेलें पाहतांच डुलत डुलत धनाजीच्या घोड्यासमोर येऊन उभा राहिला. आतां लढाई बहुतेक संपलीच होती.

जोत्याजी घोड्यावर स्वार होऊन शाहूमहाराजांच्या हत्तीबरोबर चालत होताच; व बाळाजीपंतांचा घोडाही धनाजीच्या घोड्याशीं भिडून उभा होता.

"धनाजीबाबा! तुझी प्रतिज्ञा पूर्ण झाली?" जोत्याजीनें विचारलें.

"होय. माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली. मी उभ्या आयुष्यात एक-वार—फक्त एकवार शाहूमहाराजांविरुद्ध रणांगणावर उभा राहीन अशी शपथ ताराबाई आईसाहेबापशीं घेतली होती ती मीं यथागति पाळली. त्या पाळणुकीसाठीं मला जनांत तरी महाराजांचा शत्रु म्हणवून घेण्याचें पाप जोडावें लागलें. त्या पापाचें परिमार्जन करण्या-साठीं मी महाराजांच्या पुण्यचरणांना वंदन करून अशी शपथ घेतों कीं, आजवर मीं जशी मराठ्यांच्या गादीची एकनिष्ठपणें सेवा केली तशीच पुढेंही करीन." असें म्हणून धनाजीनें आपल्या घोड्यावरून उतरून शाहूमहाराजांना साष्टांग प्राणिपात केला. त्याच्या मागोमाग बाळाजीपंत, व त्या दोघांचें पाहून धनाजीच्या बाजूचे सारे सैनिक अत्यंत नम्रपणें शाहूमहाराजांना मुजरा करून विजयोत्साही स्वरांत ललकारले, "गोब्राह्मण—प्रतिपालक छत्रपति शाहूमहाराज की जय!"

शाहूमहाराजांच्या पक्षांतील सैनिकांनीही त्याच जयजयकाराची पुनरुक्ति केली. शाहूमहाराजांनी अंबारींत उभें राहून उभयपक्षींच्या सैनिकांचे आभार मानले व जाहीर केलें, "आम्हांला विजय मिळवून देण्याच्या कामीं आमच्या रयतांपैकीं ज्यांची ज्यांची सेवा कामीं आली, त्यांना त्यांना त्यांच्या सेवाधर्माचें योग्य पारितोषिक मिळेल. मराठी राज्याचे आम्ही एक मात्र वारस आहों, व आमच्या गैरहजेरींत आमच्या राज्याची आबादानी राखून आम्ही मायदेशीं येतांच जे सरदार-दरखदार व कारभारी आमच्याशीं पूर्ण राजनिष्ठेनें वागले, त्यांच्या हितसंबंधांस व अधिकारांस आमच्या वरतु मुळींच बाध येणार नाहीं. इतकेंच काय, पण आमच्या नव्या राजवटीचे खरेखुरे आधार स्तंभ तेच आहेत, हें निरंतर मनांत वागवून आम्ही त्यांच्या सार्व त्रिक हितासाठीं उत्तरोत्तर अधिकाधिक जपूं. आपला कार्यभाग अजून पूर्ण झाला नाहीं. आपणाला अजून साताऱ्याची गादी प्राप्त करून घ्यावयाची आहे. तेवढें यश पदरीं पडून आम्हांला विधिपूर्वक राज्या भिषेक झाल्यावरच आमच्या खऱ्या कारकीर्दीला प्रारंभ व्हावयाचा

पिराजी व बाजीराव एकदम उत्तरले, "महाराज! आम्हीही गुन्हेगारच आहों."

"ठीक आहे तुमचाही न्याय करूं" असें महाराज हंसत हंसत म्हणाले. नतर त्यांनीं प्रथम सक्काजीपंतांची मुक्तता केली व 'तुमची आमच्या ठायींची निष्ठा आम्हाला ठावी झाली आहे. तिचें योग्य वेळीं योग्य चीज होईल' असें वचन दिलें. नंतर बाकीच्या गुन्हेगाराची चौकशी झाली. चौकशी ती काय करावयाची होती! महाराजाच्या जिवाला अपघात करण्याच्या प्रयत्नाचें बीज मूळ चद्रसेन जाधवाच्या कुटिल अतःकरणांत रुजलें, तें ताराबाईच्या अपरोक्ष सहानुभूतीनें वाढाला लागलें व त्याचाच पुढें एथवर वेलविस्तार वाढला, हें सर्वांना माहीत होतें. तेव्हां संभाजीचें पोरवय व तंट्या आणि तुफान्या यांचा अजाणपणा ध्यानीं घेऊन महाराजानीं त्यांची कींव केली. तट्या व तुफान्या याची शाहूमहाराजाच्या ठायीं किती अढळ निष्ठा आहे व त्याना संभाजीनें 'हा बादशहाचा मुलगा तोतया शाहू बनून आला आहे. खरे शाहूमहाराज साताऱ्याला सुरक्षित आहेत व त्यांच्याच आज्ञेवरून आपणाला ह्या तोतया शाहूचा मोड करावयाचा आहे' असें खोटेंच सांगून चकविल्यामुळें ते शाहूमहाराजांवरील अढळ निष्ठेनें आणि पैशाच्या मोहानें हा अत्याचार करावयाला कसे तयार झाले, याविषयीं स्वानुभवाची साक्ष बाजीराव व पिराजी यांनीं दिली; आणि त्या दोघानींही आपला गुन्हा कबूल करून महाराजांच्या पायांवर लोटांगण घालून त्याची क्षमा मागितली. महाराजानीं उदार अतःकरणानें त्यांना क्षमा केली. संभाजी मात्र आपला गुन्हा अखेरपावेतों कबूल करीना. तेव्हां महाराजानीं धनाजीला विचारलें, "धनाजीबाबा! तुमच्या नातवाला कोणती शिक्षा करावी?"

धनाजी इतका वेळ चंद्रसेन व संभाजी यांच्या कृष्णकारस्थानांची कहाणी ऐकून लाजेनें मेल्यापेक्षां मेला होऊन खालीं मान घालून बसला होता. तो उद्गारला, "महाराज! ह्या गुन्ह्याला मरणाहून मोठी

आहे. एवढें अखेरचें यश आम्हांला मिळवून देणें सर्वस्वीं आमच्या लोकाच्या आधीन आहे."

शाहूमहाराजाच्या तोंडचें शेवटचें वाक्य पूर्ण होतांच उभयपक्षींचे सर्व मातबर लोक महाराजांसमोर एकत्र उभे राहिले व त्यांनीं महाराजांच्या चरणांना स्पर्श करून आणभाक वाहिली, "आम्ही आमच्या देहांच्या पायघड्या महाराजांच्या पायातळीं पसरून त्यांवरून महाराजांना सातान्याच्या राजसिंहासनापर्यंत निर्धोकपणें चालवीत नेऊं. तोंवर जे कामीं येतील ते देशासाठीं व देशाच्या त्रात्यापात्या राजासाठीं कामीं आलों म्हणून उत्तम लोकीं जातील, व जे जिवत राहतील ते आमरण राजाच्या आणि राज्याच्या आबादानीसाठीं निस्सीम राजनिष्ठेनें वागतील."

अशी उभयपक्षांची दिलजमाई झाल्यावर दोन सैन्यांचे निरनिराळ्या ठिकाणीं दोन तळ पाडण्याचें कारणच उरलें नाहीं. सर्व सैन्य एकत्र राहावयाचें असें ठरलें. रणांगणावर मरून पडलेल्या सैनिकांना मूठमाती देण्याचें कामही असेंच एकजुटीनें उरकून घेण्यांत आलें.

आतां सर्व स्थिरस्थावर होऊन सातान्याच्या दिशेनें पुढें पाऊल टाकावयाचें; त्याप्रीत्यर्थ सैन्याची आवराआवर होते, तों इकडे शाहूमहाराजांच्या जिवावर उठलेल्या मारेकऱ्याचा न्याय करण्याचें काम शिल्लक राहिलें होतें तें उरकून घेण्याविषयीं जोत्याजीनें सुचवितांच शाहूमहाराजानीं छावणींत जात च आज्ञा केली, "त्या सर्व गुन्हेगारांना आमच्यासमोर आणा."

शाहूमहाराजांच्या आज्ञेनुसार संभाजी, तंट्या व तुफान्या यांना, आणि प्रतिनिधींचा खलिता आल्यामुळें महाराजांच्या रोषाला पात्र झालेल्या संक्राजीपंतांनाही महाराजासमोर आणून उभें करण्यांत आलें. त्या वेळीं उभय पक्षींचे मोठमोठे लोक तेथें हजर होतेच. आतां महाराज गुन्हेगारांची चौकशी करणार, तोंच पिराजी व बाजीराव चटकन् उठून गुन्हेगारांत जाऊन उभे राहिले. त्यांना पाहून महाराजांनीं विचारलें, "हें रे काय?"

शिक्षाच नाहीं म्हणून, नाहींपेक्षां ती देखील द्यावयाला मीं सांगितलें असतें."

शाहूमहाराज धनाजीच्या रागाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून विनोदानें म्हणाले, "संभाजी! तूं धनाजीबाबांचा नातू आहेस म्हणून नाइलाज आहे. मला वाटतें, बाजी व पिराजी यानीच त्यांच्या ह्या जोडीदाराला काय शासन करावयाचें तें सागावें."

बाजीराव व पिराजी यांना शाहूमहाराजाच्या दिलदारपणाचा फारसा परिचय नव्हता म्हणून ते प्रथम काहींच बोलेनात. पण महाराजानीं आग्रहच केल्यावर त्यानी आपसांत काहींसें कुजबुजून सगनमत केलें, व मग पिराजी उद्गारला, "महाराज! मुक्ता नांवाची आमची एक मैत्रीण आहे; तिला प्रसन्न करण्यासाठी संभाजीनें हें साहस केलें आहे. अर्थात् त्याचा निवाडा माझ्या मते तरी मुक्तेनेंच केला पाहिजे."

पिराजीचे बोल ऐकून बाळाजीपंत, धनाजी व जोत्याजी यांना तर हंसूं आलेंच, पण शाहूमहाराजानाही हसूं आलें. त्यांनीं म्हटलें, "ठीक आहे. आम्ही साताऱ्याला जाऊन पोंचेतों तुम्ही दोघांनीं हा गुन्हेगार सांभाळावयाचा. तेथें गेल्यावर तुमच्या मताप्रमाणें मुक्तेमार्फत आपण काय तो निकाल करू. आतां तुम्ही दोघे गुन्हेगार म्हणून आमच्या समोर उभे राहिलां आहां; त्या तुमच्या गुन्हेगारीबद्दल आम्ही तुम्हाला तूर्त अशी शिक्षा फर्मावितों कीं–" असें म्हणून महाराजानीं जोत्याजीकडून आपल्या डेऱ्यांतील खास स्वतःच्या उपयोगाच्या दोन सोन्याच्या मुठीच्या तरवारी आणविल्या व त्यांतली एक पिराजी व दुसरी बाजीराव यांच्या हातीं देऊन म्हटलें, "ह्या तरवारी घेऊन उभा जन्म आम्ही सांगूं ती गादीची सेवा तुम्हीं करावयाची."

बाजीराव व पिराजी यांनीं आनंदानें ही शिक्षा मान्य केली. या वेळीं जोत्याजी व बाळाजीपंत यांस किती धन्यता वाटली असेल बरें!

दुसऱ्या दिवशीं सकाळींच शाहूमहाराज आपल्या अफाट सैन्यानिशीं साताऱ्याला जावयाला निघाले.

हा मोहिमेचा आठवडा साताऱ्यांत ताराबाई आणि तत्पक्षीय मंडळी यांपैकीं कोणालाच सुखासमाधानाचा गेला नाही. ताराबाईला तर रोजरोज स्वप्नांत थोरले शिवाजीमहाराज उग्र स्वरूपांत दिसूं लागले. त्याचें तिला इतकें भय वाटूं लागलें कीं, पुढें पुढें तर तिनेंच त्या दिवाणखान्यांत जावयाचें सोडलें. एक वेळ तर तिची विकारवशता एवढ्या थराला जाऊन पोंचली कीं, आता शिवाजीमहाराजाचें हें पिशाच्च गाडल्याशिवाय गत्यंतर नाही असेंही तिला वाटूं लागलें. पण त्यासाठीं मारुतराय किंवा चेटुकवाली भिकारीण शोधून काढण्यासाठीं चंद्रसेनामार्फत तिनें जेवढे प्रयत्न केले, तेवढे सारे वायां गेले. अखेर चंद्रसेनानें मोठ्या मिनतवारीनें एक पंचाक्षरी ब्राह्मण हुडकून आणला. तोही निष्ठावत शिवाजीभक्त निघाला! त्यानें ताराबाईच्या म्हणण्याला मुळींच मान्यता दिली नाही. त्याप्रीत्यर्थ ताराबाईनें त्याला हत्तीच्या पायाशीं बांधून मारण्याची शिक्षा दिली, तीही त्यानें आनंदानें मान्य केली. राजवाड्यांतील देवघरात पुरातनचा एक सुवर्णमुखी बाण होता. तें फार जागृत व तात्कालिक साक्षात्काराचें दैवत होतें. थोरल्या शिवाजीमहाराजाच्या पुण्यशाली कारकीर्दीत तो बाण सुवर्ण प्रसवे अशी आख्याइका होती. पुढें संभाजीराजे नियम सोडून वागूं लागल्यानें कीं काय, बाण सुवर्ण प्रसवेनासा झाला, एवढें मात्र खरें. पण अजूनही त्याचे साक्षात्कार राजघराण्यांतील लोकांना पटत. ताराबाईनें तो बाण नवसाला पावावा म्हणून संकटनिवारणार्थ वेदविद्यासंपन्न ब्राह्मणांकडून रुद्राभिषेकाचें अनुष्ठान सुरू केलें. पण काय चमत्कार! अनुष्ठानाची समाप्ति होतांच बाण रक्त स्रवूं लागला. हा साक्षात्कार असलाच तर ती ताराबाईच्या अत्याचारांची साक्ष असेल. पण ताराबाईला वाटलें, कीं ब्राह्मणांनीं अनुष्ठान करतांना पापाचरण केलें त्याचा हा परिणाम! त्या काल्पनिक अपराधाबद्दल त्या ब्राह्मणांना मात्र जबर शिक्षा भोगाव्या लागल्या, व ताराबाईच्या पूर्वीच्या पापांत ह्या ब्रह्मच्छलाच्या पापाची नवी भर पडली. त्या पापाच्या दुष्परिणामाची साक्ष म्हणूनच कीं काय, परशरामपंत प्रतिनिधि पराभूत होऊन राज-

धानींत येऊन पोंचले व त्यांच्या तोंडून शाहूमहाराजांच्या विजयाची ताराबाईच्या दृष्टीनें अत्यंत अमंगळ वार्ता तिला ऐकावी लागली. लगेच दुसऱ्या दिवशीं प्रतिनिधींच्या गुप्त हेरामार्फत शाहूमहाराज आपल्या अफाट संयुक्त सैन्यासह साताऱ्यावर चालून येत असल्याची दुसरी जास्त भयप्रद वार्ता ताराबाईच्या कानीं आली, तेव्हां तर ताराबाई संतापातिरेकानें वेडीपिशी होऊन गेली. आतां शाहूच्या प्रतिकारार्थ काय उपाय करावयाचे याचा विचार करण्यासाठीं तिनें दरबार भरविला, व तिच्या प्रभावळींतील लोकांच्या मतें सैन्याची जय्यत तयारी करून शाहूमहाराजांशीं झगडण्याचें ठरलें. पण हा ठराव होऊन दरबार बरखास्त होण्याच्या वेळेला सर्व दरबारी लोक छत्रपति धाकट्या शिवाजीला त्रिवार मुजरा करूं लागले, तेव्हां छत्रपतीच्या मस्तकावरील राजमुकुट एकाएकीं कोसळून पडला. इतके अनर्थपात धडधडीत डोळ्यांसमोर घडत असताही ताराबाई निर्धारानें पुन्हा म्हणालीच, "कांहीं झालें तरी मी माझ्या कुडींत प्राण असे पावेतों शाहूला साताऱ्याच्या सिंहासनाची पायरी चढूं देणार नाहीं."

आणि चंद्रसेन!–त्याची दैना तर विचारावयालाच नको! संभाजीनें शाहूमहाराजांना ठार मारण्याचा जो डाव रचिला तो उघडकीला आला व संभाजी कैद होऊन त्याला आतां कडक शासन होणार आहे, ही वार्ता येऊन थडकतांच त्याच्या छातींत धडकीच भरली. मात्र ती धडकी संभाजीची दुर्दशा होईल म्हणूनच केवळ भरली होती असें नाहीं. 'ह्या महा भयंकर आरोपाचें खापर आतां आपल्या माथीं फुटणार, व शाहूराजे विजयी झाल्यावर आपलें वैर साधणार! ताराबाईनें आपणाला धीर दिला खरा. पण त्या धीरांत तरी काय राम आहे! ताराबाईच नामशेष होण्याचा जिथें संभव आहे, तिथें तिचा धीर काय उपयोगाचा! राजकोपाची वीज माथीं कोसळतांच दोघानींही मरावयाचेंच, तें एकमेकांच्या गळ्याला मिठी मारून मरावयाचें, यापेक्षां ताराबाईच्या आश्वासनांत शाश्वती तरी काय आहे!' अशा स्वरूपाची ती धडकी होती. हें सर्व दुःखही

चंद्रसेनानें वेळीं सहन केलें असतें; पण तो संभाजीच्या संकटग्रस्ततेची अशुभ वार्ता घेऊन घरीं जातांच पुतळा व पार्वती ह्या दोघी सवतींनीं तर त्याला दुःखातिरेकाच्या कड्यावरून थेट खालीं लोटून दिलें. प्रथम तो पुतळेचें शांतवन करावयाला गेला तेव्हां त्याला वाटलें होतें कीं पुतळा ही वार्ता ऐकून आकांत करील; तिला कसें तोंड दाखवावें! पण त्याला अनुभव आला तो अगदींच उलटा. संभाजी कसा झाला तरी तिचा पोटजाळच पडला, त्याच्यासाठीं तिला रडें हें यावयाचेंच. पण पुतळा पाय घसरलेली स्त्री असली तरी तिचा जन्म अस्सल खानदानीच्या पाक मराठाकुळांत झाला होता. ती खरीखुरी वीर· कन्या होती. तिला संभाजीच्या नीच कृत्याचा इतका तिटकारा वाटला कीं, चंद्रसेन जेव्हां तिचे अश्रु पुसून तिचें शांतवन करूं लागला, तेव्हां तिनें त्याच्या हाताला जोराचा हिसडा देऊन म्हटलें, "पोटचा पोर मेला किंवा मरणार म्हणून मला रडें आलें असें का तुम्हांला वाटतें? तर नाहीं हो! 'बोलूनचालून कमअस्सल जातकुळीचा पोर; तो असलीं कमअस्सल कामें करील, नाहीं तर काय करील?' असें म्हणून सारें जग त्याच्या व माझ्या तोंडावर थुंकेल,—आणि आधींच मीं कुळबुडवीनें स्वतःच्या बद्करणीनें माझ्या सासर–माहेरच्या दोन्ही कुळांचें काळें केलें आहे, त्यांत ही आणखी नवी भर पडली म्हणून मला रडूं आलें. देव करो व असल्या कुलांगाराचें पुन्हां तोंड पाहण्या· चें माझ्या कपाळीं न येवो. तो जिकडे गेला तिकडेच मेलेला बरा!"

पुतळा चंद्रसेनाची अशी झणझणीत कानउघाडणी करून आपल्या महालांत जाऊन रडत बसली, तेव्हां चंद्रसेनाची उमेद आणखी खचली. तेवढ्यांत संभाजीवरील संकटाची वार्ता ऐकून पार्वती आपल्या महालांत रडूं लागलेली पाहतांच तो तिची समजूत काढण्यासाठीं तिच्या महालांत गेला. तों तिनें तर त्याच्याशीं एक शब्दही न बोलतां त्याला धुडकावून लावलें! बरोबरच आहे! ती रडत होती ती संभाजी मेला म्हणूनच केवळ नाहीं कांहीं! उलट ती गरोदर होती, आपल्या पोटीं पुत्रसंतान होईल अशी तिची अपेक्षा होती, व त्या पुत्राच्या

वतनवाडींत संभाजी कदाचित् पुढेंमागें हिस्सा मागेल ह्या स्वार्थी भयानें ती संभाजीचें जगातून काळें होण्यासाठीं रोजरोज परमेश्वराला आळवीत होती. असें असतांही ती आज रडत होती, ती शाहूमहाराजांना ठार मारण्याचा संभाजीचा डाव फसला; आतां शाहूमहाराज छत्रपति झाल्यावर आपल्या पतीला कांहीं सेनापतिपद मिळणार नाहीं, व सेनापतीणबाई म्हणून आपणाला मिरवण्याला सांपडणार नाहीं म्हणून रडत होती.

राहतां राहिली गोपिकाबाई! तिनें मात्र चंद्रसेनापाशीं येऊन परोपरीनें त्याचें शांतवन करण्याचा प्रयत्न केला. पण ह्या आईची मुलाच्या ठायीं जितकी वत्सलता होती तितकी मुलाची आईच्या ठायीं कोठें होती! पराक्रमी व सदाचारी बापालाही बाप न म्हणणारा कुलांगार तो; तो आईला थोडाच जुमानतो! तो तिच्याशीं एक शब्दही न बोलतां ताराबाईशीं पुढील कृष्णकारस्थानांच्या घालमेली करण्यासाठीं थेट राजवाड्याकडे निघून गेला.

## प्रकरण सदतिसावें

# 'पेशवाईची प्राणप्रतिष्ठा'

मुक्ता, मारुतराय, भिकारीण वगैरे श्रद्धाळू माणसांचा निश्चय अखेर तडीला गेला काय?—पण तें निवेदन करण्यापूर्वी छत्रपति शाहूमहाराज खेडकडूसला विजय संपादन करून साताऱ्याकडे वळले, तेव्हांपासून सातारा त्याच्या ताब्यांत येईतों काय काय घडामोडी झाल्या याविषयीं इतिहासाची साक्ष अशी आहे कीं, "शाहूमहाराजांनीं धनाजी जाधवाला सेनापतीपदाचीं वस्त्रें दिलीं व खंडो बल्लाळ चिटणीस यांस चिटणिशी सांगितली. प्रतिनिधि पळ काढून निघाले ते साताऱ्याच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें येऊन राहिले. ते व अण्णाजी दत्तो सचीव वगैरे मातबर मंडळींच्या साह्यानें ताराबाई शाहूमहाराजांशीं अखेरपावेतों सामना द्यावयाचें ठरवून आपला धाकटा शिवाजी—वेडा शिवाजी छत्रपति यासह साताऱ्याजवळील चंदन-वदन किल्ल्यांत ठाणें देऊन बसली. पण शाहूमहाराजांनीं आपल्या पदरच्या परक्रमी पुरुषांच्या साह्यानें चंदन-वंदन हे दोनही किल्ले हस्तगत केले, तेव्हां ताराबाईचें आसन तेथून ढळलें. इतक्यांत पावसाळा सुरू झाला. तेव्हां शाहूमहाराजांनीं पावसाळाभर तेथेंच राहून साताऱ्याचा किल्ला घेण्याचा प्रयत्न चालविला. प्रतिनिधि वगैरे मंडळी आतां तरी आपली सत्ता मान्य करतील व आपण त्यांना त्यांच्या कृतापराधाबद्दल क्षमा करूं, ह्या इराद्यानें महाराजांनीं त्यांना लगेच आपणांस येऊन मिळण्याविषयीं पत्रें लिहिलीं. पण ती मंडळी वश होईना! अखेर महाराजांनीं बाळाजीपंत वगैरे मंडळीच्या संमतीनें एक युक्ति लढविली. साताऱ्याच्या किल्ल्याचा किल्लेदार शेख मिरा नांवाचा मुसलमान सरदार होता. त्याचें वतनाचें गांव वाई प्रांतीं असून त्याचीं बायका-

मुलें सध्यां तेथेंच राहत होतीं. त्यांना जेव्हां महाराजांनीं धरून आणून कैदेंत ठेवलें, तेव्हां त्यांच्या सुटकेसाठीं किल्ला महाराजांच्या स्वाधीन करण्यास शेख मिरा तयार झाला. ही भेदनीती यशस्वी होऊन साताऱ्याचा किल्ला महाराजांच्या हस्तगत झाला. पुढें प्रतिनिधीही हातीं लागले, त्यांना महाराजांनीं कैदेंत ठेवून सातारा राजधानी पूर्णपणें हस्तगत झाल्यावर राज्याभिषेक करून घेण्याचा बेत केला."

एवढ्या घडामोडी झाल्यानंतर आज सातारा राजधानी परोपरींच्या सौंदर्यसाधनांनीं पूर्ण शृंगारलेली दिसत होती. 'छत्रपति शाहूमहाराजकी जय!' 'छत्रपति शाहूमहाराजकी जय!' असा आपल्या सर्व रयतेकडून जयजयकार करून घेत सुशृंगारित राजरस्त्यांतून मिरवत मिरवत शाहूमहाराजांचा हत्ती राजवाड्यापाशीं येऊन पोंचला, तेव्हां सर्व रयत राजनिष्ठापूर्वक त्यांना सामोरी आली हें सांगावयाला नकोच. पण त्यांतच व्यासराव, मारुतराय, मारुती, भिकारीण, मुक्ता व मुक्तेची कपिला, रत्नावली व हिरू ह्या मंडळींची सर्वांच्या अगोदर शाहूमहाराजांच्या चरणांना वंदन करून त्यांची चरणधूळ शिरीं धारण करण्यासाठीं यातायात चालली होती. ती कांहीं और होती. पण एवढ्या अफाट जनसंमर्दांतून महाराजांच्या पायांपाशीं जाण्याला त्यांना वावच मिळेना. नगरातील अनेक मोठमोठयांच्या स्त्रिया महाराजांना ओंवाळण्यासाठीं सोन्याचांदीच्या पंचारत्या हातीं घेऊन राजद्वारीं तिष्ठत उभ्या होत्या. त्यांतच मुक्ता आणि हिरू पाजळलेल्या पंचारत्या हातीं घेऊन राजद्वारीं उभ्या होत्या. त्यांनीं राजवाड्याच्या प्रवेशद्वारांत महाराजांची ओंवाळणी करून त्यांची प्रथम दृष्ट काढली. वास्तविक मुक्ता हा कुठच्या झाडाचा पाला! पण मुक्तेचा पिराजी, व पिराजीचा आजोबा जोत्याजी यांच्या वशिल्यानें मुक्तेची आणि हिरू मुक्तेची मैत्रीण म्हणून तिचीही विरूबाईशीं ओळख झाली, व विरूबाईबरोबरच इतर सर्व स्त्रियांच्या अगोदर महाराजांना ओंवाळण्याचा मान त्या दोघींना मिळाला.

शाहूमहाराजाचा राजवाड्यात प्रवेश होऊन सर्व रयतेनें त्यांचें

प्रथम दर्शन घेतल्यावर जिव्हाळयाच्या मंडळींशीं बोलण्याला महाराजांना जेव्हां अवसर मिळाला, तेव्हा त्यानीं धनाजी व बाळाजीपंत यांना सांगून मारुतराय, मुक्ता वगैरे मंडळीला आपणासमोर बोलाविलें. संभाजी हा चंद्रसेन व ताराबाई यांच्या हातांतील बाहुलें बनून महाराजांविरुद्ध प्रारंभापासून कसकशीं कृष्णकारस्थानें रचीत होता, व पत्रांबाबत पिराजी आणि संभाजी यांच्यात झगडा झाला तेव्हां मुक्तेनें आपल्या अतुल चतुराईनें बाजू कशी सांभाळली, वगैरे गोष्टी बाळाजीपंत, पिराजी व बाजीराव याच्या मार्फत महाराजाना अगोदरच्च कळून चुकल्यानें मुक्ता आपल्या गुणांनीं व कर्तबगारीनें महाराजांच्या परिचयाची होऊन त्यांची आवडती झाली होतीच. तिला त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें मात्र नव्हतें, तें आज पाहिलें. मारुतराय व भिकारीण यांविषयींही तशीच गोष्ट होती.

"मुक्ते, तुझ्या कामगिरीबद्दल तुला काय बक्षीस पाहिजे?" शाहूमहाराज म्हणाले, "आम्हांला राजपद प्राप्त होण्यांत तुझी चतुराई आमच्या फार कामीं आली आहे. तुला काय पाहिजे सांग."

मुक्तेनें लाजाळु लाडिकपणानें एक–दोन–तीन वार पण चोरून पिराजीकडे पाहिलें; पण जणुं काय पाहिलेंच नाहीं असें भासविण्यासाठीं कपिलेच्या अंगावरून हात फिरवीत म्हटलें, "महाराज! माझी चतुराई ती काय! खरें पाहिलें तर हा पिराजीचा पराक्रम आहे. त्याला आपल्या पायांची कृपा लाभली आहे, तशीच सदोदित लाभावी व त्याची उत्तरोत्तर भरभराट होत जावी एवढीच माझी इच्छा आहे."

मुक्तेच्या ह्या बोलांतील कळवळा तेथील सर्व लोकांच्या व शाहूमहाराजांच्याही परिचयाचा होता. ते मुक्तेचा आशय ओळखून जोत्याजी व व्यासराव यांच्याकडे वळून म्हणाले, "व्यासराव! जोत्याजीबाबा! आमची अशी इच्छा आहे कीं, मुक्ता व पिराजी यांच्या जन्माच्या गांठी पडाव्या. यावर तुमचें मत काय आहे?"

जोत्याजीनें ह्या संबंधाला तावडतोब मान तुकविली. व्यासराव मात्र म्हणाला, "महाराज! मी जात व धर्म न पहातां चारा पाणी

घालून वाढविलेलीं हीं दोन लेंकरें तशीं जन्माचीं सुखी झालीं तर त्यांत मला आनंदच आहे. पण तशी मान्यता देण्यापूर्वी मला माझें एक कर्तव्य बजावलें पाहिजे.'' असें म्हणून व्यासरावानें कनवठीचा एक ताईत काढून महाराजांसमोर ठेवला व म्हटलें, ''हा ताईत मुक्ता जेव्हां माझ्या पदरीं आली तेव्हां तिच्या गळ्यांत होता, व मुक्तेच्या लग्नाचा प्रश्न निघेल तेव्हा येसूबाई आईसाहेब किंवा शाहूमहाराज यांच्या हस्तें तो उघडावा अशी मुक्तेची जी कोण आई असेल तिची इच्छा असल्याचें मला कळलें. त्याप्रमाणें मीं ही विश्वासाची ठेव आपल्या पायांशीं ठेवली आहे. आता आपण आपल्या मर्जीनुरूप काय तें करावें.''

''बरें तर, तूंच तो ताईत उघडून वाच पाहूं!'' शाहूमहाराज म्हणाले.

व्यासरावानें ताईत उघडून त्यांत चिठ्ठी सांपडली ती वाचली, ''प्रिय मैत्रिण राजमाता येसूबाईसाहेब यासः—मी आपली मैत्रीण अंबिका आहें. एका काळीं आपल्या इच्छेप्रमाणें आपली सवत, निदान आपली जाऊ—कै. राजारामहाराजांची राणी—होण्याची माझी इच्छा होती; पण माझ्या बाबाच्या गरिबीमुळें तो योग जुळून आला नाहीं. माझ्या बापाला माझ्यासाठीं राजाच काय, पण स्वतःच्या थोर कुळा-ला शोभेसा एखादा खानदानीचा मराठा सरदारपुत्रही मिळेना. अखेर त्यानें वैतागून मोंगलाईतील एखाद्या मुसलमान उमरावाशीं सोयरीक करण्याचें ठरविलें पण मी त्याला राजी झालें नाहीं. अखेर पाडळीचे सूर्यभानजी पाटील आमच्यासारखेच खानदानीचे व कैक पिढ्यांचे श्रीमंत पण त्यांच्या हयातींत माझ्या बाबांप्रमाणेंच दरिद्री झालेले होते, त्यांच्या मारुती नांवाच्या मुलाशीं माझें लग्न झालें. पण माझ्या कमनशिबानें माझा पति छंदीफंदी निपजून मी गरोदर असतां-नाच सूर्यभानजीशीं भांडून कोठें तरी निघून गेला. त्यामुळें माझ्या सासूसासऱ्यांना अपरिमित खेद झाला. माझी सासू त्या शोकानें मरून गेली, व सासरा वैतागून घरदार सोडून निघून गेला. अशी माझ्या

संसाराची होळी झाली. मलाही आता संसारांत गोडी वाटेनाशी झाल्यानें मी आतां ही माझी तान्ही मुलगी जगात अनाथ सोडून माझा सासरा व पति यांच्या शोधार्थ देशभर हिंडण्यासाठीं बाहेर पडत आहें. माझें नशीब माझ्याबरोबर आहे. पण आपण माझी जिव्हाळयाची मैत्रीण ह्या नात्याने आपणाला माझी एवढीच विनंति आहे कीं, आपली मैत्री पिढ्यान्‌पिढ्या रक्ताच्या संबंधानें कायम ठेवावयाची अशी जी आम्हीं उभयतांनीं शपथ घेतली होती, त्या शपथेला स्मरून आपण माझ्या मुलीला आपली सून करून घ्यावी. दुसरें तिसरें कांहीं मागणें नाहीं. —अंबिका."

शाहूमहाराज व जोत्याजी यांनीं येसूबाईच्या तोंडून मंगला नावाच्या तिच्या मैत्रिणीविषयीं जी माहिती ऐकली होती, ती यांशी चिठ्ठींतील माहिती तंतोतंत जुळली. त्यांनीं मारुतीला विचारलें, "मारुती! तुला यांतलें कांहीं माहीत आहेका?"

मारुती कांहीं उत्तर न देतां आंसवें पुशीत खालीं मान घालून उभा राहिला.

शाहूमहाराज नंतर मुक्तेला म्हणाले, "मुक्ते! तुझ्या आईची इच्छा मला शिरसामान्य आहे. पण पिराजीवर तुझें आणि तुझ्यावर पिराजीचें निस्सीम प्रेम आहे हें मला उघड उघड दिसतें आहे. अशा स्थितींत मी काय करूं, तूंच सांग."

"महाराज! मला राणीपद नको. आपण मला देवाप्रमाणें पूज्य आहां. पण—" पुढें मुक्तेच्यानें बोलवेना. ती मुळुमुळू रडूं लागली.

लगेच भिकारीण पुढें होऊन शाहूमहाराजांना हात जोडून म्हणाली, "महाराज! मीच ती अभागी मंगला. माझी चिठ्ठी मी परत घेतें. आपण माझी मुक्ता पिराजीलाच अर्पण करावी."

मारुतरायही तेव्हांच पुढें होऊन हात जोडून गद्गद कंठानें उद्गारला, "महाराज! मीच सूर्यभानजी पाटील. ही मंगला माझी सून व हा मारुती माझा मुलगा. पुत्रशोकानें विव्हल होऊन त्याच्या स्मरणार्थ मारुतराय हें नांव धारण करून मीं हा सध्यांचा बैरागीपणा पत्करला.

पुढें माझी सूनही मला भेटली. आम्हांला आमच्या मुलाविषयीं इतका शोक झाला होता कीं, आम्ही पुढें कांहीं दिवस जंगलांत राहत असतां आम्हांला दोन चित्त्याचीं पिलें सांपडलीं. तीं नर–मादी असल्यानें त्यांनाच आम्हीं 'मारुती' व 'मुक्ता' हीं नांवें देऊन पाळलीं. पुढें आम्ही वनवास सोडून वस्तींत आल्यावर यदृच्छेनें ताराबाईच्या रोषाला पात्र झालों, व आम्हांला ठार करण्यासाठीं कोंडून आमच्यावर चित्ते सोडण्यांत आले! ते आम्हींच पाळलेले निघाले म्हणून आमचा तेव्हां बचाव झाला. मारुतीला मंगलेची ओळख यापूर्वीच पटली आहे. पण आपल्या ठायीं तिची अढळ श्रद्धा, यास्तव शाहूमहाराज छत्रपति होईतों आपण संसारांत पडणार नाहीं अशी तिची प्रतिज्ञा होती, ती तिनें आजवर अखंड पाळली आहे. आतां आपल्या आशीर्वादानें त्यांचा संसार सुखाचा होवो."

"ठीक आहे." शाहूमराज म्हणाले, "मुक्ते! तूं जरी आपखुषीनें राणीपदावर पाणी सोडलेंस, तरी आम्ही तुला विसरणार नाहीं. तूं पिराजीशींच लग्न कर. तुम्हां दोघांवरही आमची सदैव कृपा राहील. तूं यापुढें आमच्या विरूबाई राणीसाहेबांबरोबर राहावयाचें. त्यांची दासी म्हणून नव्हे; मैत्रीण म्हणून राहावयाचें." लगेच शाहूमहाराज बाळाजीपंतांकडे वळून म्हणाले, "आणि बाळाजीपंत! तुमचे तर आम्ही जन्माचे उपकृत आहोंतच. आतां तुमची जर हरकत नसेल तर पिराजीनें यापुढें सदैव आमच्याबरोबर राहून आमची सेवा करावी."

पिराजी शाहूमहाराजांच्या तोंडचे हे शब्द ऐकून केविलवाण्या नजरेनें बाळाजीपतांच्या तोंडाकडे पाहूं लागला. बाळाजीपंत म्हणाले, "महाराज! पिराजीचें नशीब जर असें उदयाला येतें आहे–आणि तो तसाच गुणी मुलगा आहे.–तर त्याच्या हिताआड येण्याचा अधमपणा मी कधींच करणार नाहीं."

"पिराजी! तुझी काय इच्छा आहे?" शाहूमहाराजांनीं विचारलें.

पिराजी उद्गारला, "महाराज! आपल्या पायांपाशीं देवाप्रमाणें

माझी अढळ निष्ठा कशी आहे हें आपणाला माहीतच आहे मी आपला ह्या एकाच जमीचा काय पण जमोजन्मीचा एकनिष्ठ सेवक आहें मला माझ्या धन्यांचे पाय अंतरू नयेत एवढीच माझी इच्छा!"

"शाबास! पिराजी, शाबास! सेवक असावा तर असा असावा! बाळाजीपंत! जिव्हाळयाच्या माणसांची जोड परमेश्वर तुम्हाला देतो आहे व तुमच्यासारख्या कर्त्या पुरुषाची जोड आम्हाला देतो आहे, हेंच आमच्या व आमच्या देशाच्या भाग्योदयाचें मंगल चिन्ह आहे" शाहूमहाराज पिराजीकडे वळून म्हणाले, "ठीक आहे पिराजी! तुझ्या धन्याच्या ठायीं तुझी अशीच अढळ निष्ठा राहू दे. तसेंही आम्ही तुझ्या कल्याणाकडे पूर्ण लक्ष पुरवू" लगेच मारुतराय, मंगला—हो! आता तिला भिकारीण कोण म्हणेल!—आणि मारुती यांच्याकडे वळून महाराज म्हणाले, "मारुतराय! तू आजवर आमच्या राजघराण्याची अमोल सेवा केली आहेस ती आम्ही विसरणार नाहीं आजपासून तू आमचा खास राजवैद्य झालास तुझा मारुती यापूर्वी ताराबाई आईसाहेबांच्या तैनातीत होता, तसाच तो आमच्या तैनातीत राहील त्यानें मंगलेशीं सुखाचा संसार करावा व तुम्हीं तिघांनीं एकत्र राहून सुखी व्हावें"

मंगला मध्येंच हात जोडून म्हणाली, "महाराज! आपण आम्हां सर्वांना गौरवून सुखी केलें, पण हा रत्नावली व हिरू—आपल्याच राजघराण्याची सेवेकरी माणसें हीं! शिवाय याची पूर्वपीठिका पाहिली तरी कैक पिढ्या यांचें घराणही भोंसले हे छत्रपति होण्यापूर्वीपासून भोंसल्यांच्या ऋणानुबंधांतील आहे त्याना आतां आपणाशिवाय दुसऱ्या कोणाचा आधार!"

शाहूमहाराजांनीं संभाजीशीं हिरूचें लग्न ठरत असल्याची वार्ता ऐकली होती त्याची त्यांना या वेळीं आठवण होऊन ते म्हणाले, "रत्नावली! तू यापुढें आमच्या दासींतील मुख्य—विरूबाई राणी साहेबांची खास दासी म्हणून राहावेंस आतां, तू नियोजिलेला जावई

हा संभाजी केती हरामखोर आहे याची तुला कल्पना असेलच. असें असताही जर तूं म्हणत असशील—आणि तुझ्या मुलीलाही हा नवरा पसंत असेल, तर तुम्हा दोघींकडे पाहून आम्ही त्याला क्षमा करण्यास तयार आहों."

हिरू मध्येंच उमळून उद्गारली, "नाहीं.— मी प्राण गेला तरी —असल्या कमअस्सल कुलांगाराची बायको होणें बाजूलाच राहिलें, याचें तोंड पाह्यला किंवा याची सावली घ्यायलाही मी तयार नाहीं."

रत्नावलीनेंही हिरूप्रमाणेंच आपलें मत दर्शविलें. संभाजीनें तें ऐकून लाजेनें खालीं मान घातली, व हा आपलाच नातू आणि चद्रसेन हाही आपलाच मुलगा, म्हणून धनाजीनेंही शरमिंदेपणानें अधोवदन केलें.

शाहूमहाराज म्हणाले, "ठीक आहे. आतां आमच्या शब्दाला मान्यता द्यावयाची असेल तर—जोत्याजीबाबा! तुमचा एकुलता एक सूर्याजी आमच्याकारणें मृत्युमुखीं पडला; पण पुन्हा तुम्हीं संसारी व्हावें अशी आमची मनीषा आहे.—रत्नावली! हिरू जोत्याजीबाबाची पत्नी व्हावयाची. जोत्याजीबाबांच्या म्हातारपणाकडे न पाहतां, आमच्या वाणीनें श्रीशकर तुम्हां सर्वांच्या कल्याणाची आकाशवाणी बोलतो आहे असें समजून तुम्हीं मनांत यत्किंचित्‌देखील किंतु न धरतां हा संबंध मान्य करावा. जोत्याजीबाबा! आमच्या शद्बावर कोणी कांहीं बोलावयाचें नाहीं. हिरू! जोत्याजीबाबाशीं तुझा संसार दीर्घकाल-पर्यंत सुखाचा होईल व परमेश्वराच्या कृपेनें तुम्हांला पुत्ररत्नाचा लाभ होईल."

प्रत्यक्ष राजाचा शद्ब तो! तो अमान्य कोण करणार! हिरूही तशी देवभोळी होती. तिनेंही देवावर निष्ठा ठेवून आनंदानें ह्या संबधाला मान्यता दिली. पिराजी मध्येंच म्हणाला, "महाराज! आतां फक्त संभाजीचा न्याय करावयाचा राहिला आहे."

"खरेंच!" असें म्हणून शाहूमहाराज संभाजीकडे वळतात तोंच दोन मध्यम वयाच्या स्त्रिया—एक सुखवस्तु मराठा सरदाराची बायको

शोभणारी, व एक चेहऱ्यानें मराठीण पण पेहरावानें मुसलमानीण अशा—घामाघूम होऊन पळत पळत थेट शाहूमहाराजांसमोर येऊन उभ्या राहिल्या. शिपाई त्यांच्या पाठलागावर येत होते म्हणून त्या भ्याल्या होत्या. त्यांची ती विपन्नावस्था पाहून शाहूमहाराजांनीं शिपायांना धमकावून घालवून दिलें, व मग त्या दोघी बायांना विचारलें, "तुम्ही कोण?"

एक म्हणाली, "मी पुतळाबाई, धनाजी जाधव सेनापतींची सून. संभाजीची आई. मी त्याचा न्याय करण्यासाठीं आलें आहें." तोंच शाहूमहाराजांनीं धनाजीला खरेंखोटें विचारलें तेव्हां धनाजीनेंही पुतळेला ओळखलें. पुतळेनें आजूबाजूला मुळींच न पाहतां आपल्या निऱ्यांतून सर्रकन् एक तीक्ष्ण धारेचा सुरा बाहेर काढला व संभाजी-पाशीं जाऊन 'माझा पोर राजाच्या जिवावर उठला, त्याचा न्याय हा' असें म्हणून आपल्या हातानें संभाजीच्या छातींत जोरानें सुरा भोंसकला. तो वार संभाजीच्या छातींत आरपार गेला व तात्काळ तो मरून खालीं पडला. लगेच ती 'आणि असल्या कुलांगाराला जन्म देण्याचें महत्पाप मीं केलें त्या पापाचें प्रायश्चित्त हें' असें म्हणून तोच सुरा जोरानें आपल्या छातींत मारून घेऊन तात्काळ मरून धाडकन् खालीं पडली.

इकडे हा भयंकर प्रकार डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच झाला, तेव्हांच दुसऱ्या बाईनें 'माझा पिराजी कुठें आहे? मरण्यापूर्वी माझ्या बाळाला मला एकवार भेटायचें आहे' असें म्हणून थेट पिराजीपाशीं धावत जाऊन त्याला कडकडून पोटाशीं धरलें व आसवांनीं त्याला न्हाऊं घालून त्याचे अनेकवार मटामट मुके घेतले. पिराजी-नें आपल्या आईला ओळखलें व व्यासराव आणि जोत्याजी यांनाही तेव्हांच ओळख पटली कीं, ही म्हाळसाच!

"झालें! माझा बाळ मला एकदांचा भेटला. आज इतके दिवस त्याच्या शोधासाठीं वणवण हिंडत होतें, तें माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें. आतां मी मरायला जातें." असें म्हणून म्हाळसा जावयाला

निघाली. व्यासराव व जोत्याजी ह्यांनीं तिला हाका मारमारून थोपविण्याची शिकस्त केली; पण ती थांबेनाच अखेर जोत्याजीनें धांवत पुढें जाऊन तिला बळेंच अडावेलें व वात्सल्यपूर्ण स्वरानें विचारलें, "म्हाळसे! पोरी! मी तुझा जन्मदाता–ह्या जोत्याजीला तू ओळखलेंस का?"

"हो! बाबा! मी तुम्हाला ओळखलें. मीं व्यासरावांनाही ओळखलें. पण ओळख दिली नाहीं याचें कारण—बाबा! बाबा! कारण काय सांगू! जळलें माझें तोंड! माझ्या कर्माची अर्धी कहाणी व्यासरावांना माहीत आहे. व्यासरावापाशीं असल्या वेळीं माझें कम नशीब जास्त जोरावलें. मी एकटी एक दिवस रानात गेलें असतांना एथल्या मुसलमान किल्लेदाराच्या भावानें मला घेरली–पुढें मी कोणत्या तोंडानें बोलूं! फुटलें माझें कपाळ! त्यानें मला बाटवून वाई प्रांतात आपल्या घरीं नेऊन कैदेंत ठेवली! चारपांच महिन्यांपूर्वी तो मेला तेव्हां किल्लेदारानें माझी घरांतून हकालपट्टी केली. मी बाटलेली आहें. बाबा! मीं जन्मांतून उठलेली आहें. आतां मी कुणाला कसें तोंड दाखवूं! मी यापूर्वीच मरून गेलें असतें. पण पोटच्या गोळ्याला एकवार डोळाभर पहावें व मग मरावें म्हणून आजवर जगलें. तो माझा हेतु आज एकदांचा पूर्ण झाला. आतां मी मरायला जातें. माझ्या जगण्यानें माझा दुर्लौकिक, तुमचाही दुर्लौकिक. त्यापेक्षां जातेंच मी." असें म्हणून म्हाळसा जोत्याजीच्या समोरून वाऱ्याच्या वेगानें पळत गेली.

शाहूमहाराजांना आतां ह्या रहस्याचा कांहींसा उलगडा झाला. ते म्हणाले, "जोत्याजीबाबा! तुमच्या पोरीची काय हो दुर्दशा झाली ही!"

जोत्याजी थाड्थाड् कपाळावर हात मारून घेत उद्गारला. "महाराज! हें माझें कर्म! माझ्या कैक पिढ्यांचें पाप आज हें असें फळाला आलें! झालें! म्हाळसा झाली, गेली, ती मेली.–नाहीं–मरेल! आणि अशा परिस्थितींत ती मरणेंच योग्य. झालें, सुटलों एकदांचा!"

आकाश निरभ्र असून पौर्णिमेचें स्वच्छ चांदणें पडलेलें असावें, फारां दिवसांनीं एकत्र जमलेलीं जिव्हाळ्याचीं माणसें त्या चांदण्यांत अंगणांत गोष्टी बोलत बसलेलीं असावीं, अशा वेळीं एकाएकीं आकाश अभ्राच्छादित व्हावें, मुसळधार पाऊस पडूं लागावा व त्याच क्षणीं जोराच्या कडकडाटाबरोबर त्याच घरावर विद्युत्पात होऊन अनर्थ गुदरावा, तसाच हा प्रकार झाला. त्यामुळें सर्वांच्याच आनंदाचा क्षणभर विरस झाला.

पुतळेविषयीं धनाजीनें तेथल्या तेथें चौकशी करतां त्याला असें कळून आलें कीं, संभाजी व चंद्रसेन यांनीं धनाजी जाधवांचा लौकिक विसरून शाहूमहाराजांना मारण्याचा बेत केला होता हें पुतळेला कळल्या दिवसापासून ती जी बिथरली ती कायमचीच बिथरली. दरम्यान् पार्वती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला व चंद्रसेनावर पार्वतीचा पगडा बसला. तिच्या नादानें नदीबैल बनून चंद्रसेनानें पुतळेला घराबाहेर घालवून दिलें तेव्हांपासून तिचें डोकें फिरल्यासारखें झालें. म्हाळसेशीं तिची दोस्ती केव्हा जमली हें मात्र कोणालाच माहीत नव्हतें. धनाजीला त्यातल्यात्यांत एवढेंच समाधान वाटलें कीं, पुतळा आपल्या पोराची यःकश्चित् रखेली; पण तिनें पाक कुळांतील खऱ्या क्षत्रिय–ललनेला शोभेशी आपल्या राजनिष्ठेची शिकस्त केली. त्यामुळें तिचा जो लौकिक झाला, त्याचा महिमा एवढा अगाध होता कीं, ती एक रखेली होती हें विसरून दरबारच्या सर्व मोठमोठ्या मानकऱ्यांनीं तिची प्रेतयात्रा मिरवीत नेली. संभाजी इतका दुरात्मा होता ना, पण मरणोत्तर त्यालाही त्याच्या आईची पुण्याई थोरांमोठ्यांच्या खांद्यावरून स्मशानात मिरवत जाण्याला पुरी पडली.

म्हाळसेचा त्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं पिराजीनें कर कर शोध केला, तेव्हां एका दरींत तिचीं फाटकीं वस्त्रें मात्र सांपडलीं. त्यावरून सर्वांनीं तर्क केला कीं म्हाळसेनें कांहीं तरी खाऊन आत्महत्या केली; व लांडग्याकोल्ह्यांनीं तिचें प्रेत फाडून खाल्लें! आपलें प्रेत कोणाच्या हातीं लागलें तर आपण बाटून मुसलमानीण झालेली म्हणून तें उचलण्याला

देखील कोणी सांपडणार नाहीं व आपल्या पिराजीला फार त्रास होईल, ह्या भयानें तिनें मरण पत्करलें असेल! तरी पण पिराजीनें तिचे फाटके कपडे हृदयाशीं धरून तिच्या नांवानें 'आई! आई!' असा हंबरडा फोडून जंगलातल्या जंगलात जें आंसवांचें तर्पण केलें, तें तिला सद्गति प्राप्त होण्याला पुरलें असेल खास!

❀ ❀ ❀

वास्तविक शाहूमहाराजांचा साताऱ्याच्या राजधानींत प्रवेश झाल्यावर चारदोन दिवसातच त्याच्या राज्याभिषेकाचा टोलेजंग समारंभ व्हावयाचा; पण ज्याच्या जिवावर त्यांना राजपदाची प्राप्ति जास्त सुलभ झाली, त्यांच्या दुःखाचे आपणही वाटेकरी आहों हें प्रत्यक्ष कृतीनें दाखविण्यासाठीं त्यानीं पंधरवडाभर राज्याभिषेकाचा बेत लांबविला. हा बेत लांबविण्याचें आणखी एक कारण असें कीं, राज्याभिषेकाचा उत्सव बरेच दिवस चालावयाचा; त्यातच मुक्ता–पिराजी व हिरू–जोत्याजी यांचीं लग्नेंही मोठ्या थाटानें व्हावीं. तसेंच ब्रह्मेंद्रस्वामींच्या कृपेनें आपणाला राजपद मिळालें आहे अशी शाहूमहाराजांची स्वामींच्या ठायीं अढळ श्रद्धा असल्यानें व दरम्यान् स्वामी कांहीं दिवस रुग्णशय्येवर पडलेले असल्यानें ते बरे होऊन त्यांची भेट होऊन त्यांचा शुभाशीर्वाद मिळेतों सिंहासनारोहण करावयाचें नाहीं अशीही महाराजाची मनीषा होती. हे सर्व योग जुळून येतील असा माघ शुद्ध १ शके १६३९ हा शुभमुहुर्ताचा दिवस स्वामींच्या मतें राज्याभिषेकास्तव मुक्रर करण्यात आला.

❀ ❀ ❀

ठरल्या दिवशीं शाहूमहाराजांना राज्याभिषेक झाला. त्या समारंभाप्रीत्यर्थ स्वामींनीं शुभाशीर्वाद देऊन माधवाला मुद्दाम पाठविलें होतें. त्याप्रीत्यर्थ आपल्या उपयोगी पडलेल्या सर्व लहानथोर लोकांना कोणाला अधिकार, तर कोणाला नगद देणग्या देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. स्वामींनाही माधव शिष्याच्या हातीं बहुमोल महावस्त्रें पाठविण्यांत आलीं. त्या दिवसापासून स्वामी पुन्हा

धावडशींत वास्तव्य करूं लागले. धनाजी जाधवाला सेनापतिपद वचनानें पूर्वीच देण्यात आलें होतें. पण त्या पदाचीं वस्त्रें देण्याचा दरबारी सोहळा व्हावयाचा राहिला होता, तो आज उरकून घेण्यांत आला. सेनापतिपदाबरोबरच समस्त मराठशाहीच्या वसूलबाबीचा अधिकारहा त्याला मिळाला, व इतर प्रधानमंडळ नेमलें गेलें तेंही त्याच्याच संमतीनें नेमलें गेलें. बाळाजीपतांच्या उपकारांची फेड कशी करावी हें मात्र महाराजांना कळेना. कारण, धनाजीसारखीं अव्वलचीं मोहरीं आपल्या बाजूला आलीं म्हणूनच आपणाला राज्यपद प्राप्त झालें, व हें सारें बाळाजीपंतांच्या एकनिष्ठ प्रयत्नांचें फळ होय, हें महाराज पूर्णपणें जाणून होते. अखेर त्यांनीं बाळाजीपंतांनाच विचारलें, "बाळाजीपंत! तुम्ही आमची सेवा केली ती अमोल आहे त्याप्रीत्यर्थ तुम्हाला काय पाहिजे तें मागा."

बाळाजीपंत अत्यंत चतुर, महत्त्वाकांक्षी, पराक्रमी, पण व्यक्तिहितापेक्षा देशहिताकडे जास्त लक्ष देणारे होते. मिळवीन तर महाराजांच्या प्रधानमंडळातील उत्तम पद मिळवीन अशी त्यांची दांडगी महत्त्वाकांक्षा होती शाहूमहाराजांनाही त्यांच्या कर्तबगारीची पूर्ण जाणीव असल्यानें व 'मागाल तें देतों' असे ते स्वयंस्फूर्तीनें वचनबद्धही झाले असल्यानें बाळाजीपंतांनीं पेशवेपद मागितलें असतें तर तें त्यांना आज मिळालें असतें पण त्यामुळें राजवटींतील इतर मोठमोठ्या लोकांना वैषम्य वाटेल व तें सध्यांच्या दुफळीच्या काळीं परिणामीं मराठशाहीला हानिकारक होईल, असें त्यांना भय होतें. ह्या बाबतींत त्यांनीं स्वामींची व राधाबाईची सल्ला घेऊन जें मागणें मागावयाचें आगाऊच ठरविलें होतें तेंच मागितलें, "महाराज! आपण माझ्याकडून अशीच अधिकाधिक जबाबदारीची सेवा करून घ्यावी, व मी आपल्या पूर्ण कसोटीला उतरून माझी सेवा सर्वोत्तम ठरल्यास मग मला आपल्या प्रधानमंडळात उत्तम पद प्राप्त व्हावें. तूर्त मला आपली एकनिष्ठपणें सेवा करण्याची संधि मात्र पाहिजे आहे, यापेक्षां कांहीं देखील नको."

शाहूमहाराज हें गंभीर व दूरदर्शी उत्तर ऐकून संतोषले. त्यान तूतें दरबार साजरा करण्यासाठीं बाळाजीपंतांना बहुमोल वस्त्रालंका रांची देणगी देऊन वचन दिलें, "बाळाजीपंत! लौकरच योग्य वेळ तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील ही खूणगांठ मनाशीं बाळगून ठेवा."

हा राज्याभिषेकोत्सव पुढें बरेच दिवस चालला होता. त्यांत पिराजी आणि मुक्ता, तसेंच जोत्याजी आणि हिरू यांचीं लग्नें खा महाराजांच्या देखरेखीखालीं राजवाड्यांतच मोठ्या थाटानें पा पडलीं. असा सर्वत्र आनंदीआनंद झाला. बाळाजीपंतांना शाहू महाराजांनीं भविष्यकाळीं आपल्या प्रधानमंडळांत उत्तम पद देण्याचं वचन दिलें, येथेंच खरीखुरी 'पेशवाईची प्राणप्रतिष्ठा' झाली खरें पाहूं जातां पेशवाईच्या ह्या आद्य पुरुषाला पेशवाईचें ध्रुवपद आजच प्राप्त झालें. तेव्हांच्या महाराष्ट्र–राजकारणाच्या आकाशांत मराठशाहींतील दुफळीचीं अनेक दाट अभ्रें पसरलीं असल्यामुळें ह ध्रुवतारा आपल्या नैसर्गिक तेजाळ स्वरूपांत चमकत असलेला तेव्ह जगाला दिसला नाहीं खरा. पण पुढील पांचसात वर्षांच्या अवधींत ताराबाई, तिची सवत राजसबाई व तिचा पुत्र संभाजी, कान्होजी आंग्रे, चंद्रसेन जाधव, संकाजी नारायण सचीव, रामचंद्रपंत अमात्य ब्रह्मेंद्रस्वामि, धनाजी जाधव वगैरे व्यक्ति ह्या दुफळीच्या काळीं कश वागल्या व बाळाजीपंतांनीं बिकट परिस्थितीवर मात करून मराठ शाही राखून स्वपराक्रमाच्या जोरावर पेशवाई प्रत्यक्ष कशी मिळविली. हा मनोरम वृत्तांत 'पेशवाईचें ध्रुवदर्शन' ह्या 'कादंबरीमय पेशवाई'- मधील तिसऱ्या कादंबरींत यावयाचा असल्यामुळें, आज इथेंच छत्रपति शाहूमहाराजांच्या जयजयकारांत स्वल्पविराम घेणें चांगलें.

समाप्त